## बदलाचा प्रमुख घटक... शिक्षक

प्राचार्य लीलाताईंच्या लिखाणाचा सर्व भर प्राथमिक शिक्षणावर आहे; कारण त्यांना असे वाटते की, येथेच जीवन घडते. व्यक्तीच्या मेंदूची वाढ याच काळात झालेली असते व जीवनाचा पाया येथेच रचला जातो. बदलाचा प्रमुख घटक म्हणून शिक्षकवर्गाकडे त्या पाहतात. ब्राझिलचा शिक्षक पाब्लो फ्रियरे जसा बदलासाठी झपाटला तसा आपला शिक्षकवर्ग नोकरीच्या पाट्या टाकण्याची वृत्ती टाकून झपाटला तर त्यांना वाटते की, फार मोठा बदल होऊ शकेल. याचसाठी त्या स्वतः झगडल्या आहेत, त्यासाठीच त्यांचा सर्व अट्टाहास आहे. मुलांसाठी शाळेचा नव्हे तर स्वतः शिकण्याचा हक्क आणि प्रयोगशीलता हा त्यांच्या लिखाणाचा गाभा आहे.

**भाई वैद्य**

उन्मेष प्रकाशन

# परिवर्तनशील शिक्षण

## लीला पाटील




371.4=914.6
PAT
E01082

# परिवर्तनशील शिक्षण

लीला पाटील

**उन्मेष प्रकाशन**
□
**परिवर्तनशील शिक्षण**
□
**प्रकाशक-मुद्रक**
मेधा राजहंस
उन्मेष प्रकाशन
चंद्रनील अपार्टमेंट, 'सी'-विंग,
सिंहगड रस्ता, पुणे - ४११०३०.
दूरध्वनी : २४३३६२१९
□
**© लीला पाटील**
१७, सौरभ, रुईकर वसाहत,
कोल्हापूर - ४१६००५
□
**प्रथमावृत्ती**
ऑक्टोबर १९९५
**पुनर्मुद्रण**
ऑगस्ट २००६
□
**मुखपृष्ठ**
धनंजय सस्तकर
□
**टाइपसेटिंग**
अक्षर-प्रतिभा
चंद्रनील अपार्टमेंट, 'सी' विंग,
सिंगड रस्ता, पुणे - ४११०३०
□
**किंमत १५० रुपये**

सृजन-आनंद-शिक्षण या तिन्ही संकल्पना
साकार होण्यासाठी
सर्वसाधारण वास्तव प्रतिकूल असूनही
त्या संकल्पना
साकार करण्याच्या
आमच्या जिवट प्रयत्नांना
ज्या संस्था आणि व्यक्तींनी
आर्थिक व हार्दिक
सहकार्य दिलं
त्या सर्वांना
कृतज्ञतापूर्वक अर्पण

# अनुक्रम


मनोगत

प्रस्तावना

१) शिक्षणातील प्राथमिकता १५

२) शिक्षणव्यवस्था आणि मुलांचे हक्क २३

३) शिकण्याचा हक्क जोपासणाऱ्या शाळा हव्यात ३३

४) षष्ठीची नाती ४२

५) बालदिनानिमित्त बालकांच्या दीनत्वाबद्दल ४९

६) शाळा मुलांना काय देते? ५५

७) शाळांनी शिक्षकांना पगाराशिवाय आणखी काय द्यायचं? ६५

८) शाळेनं पालकांना काही द्यायचं असतं? ७५

९) शिकवणारे आणि शिकणारे ८९

१०) स्वातंत्र्याचा सराव आणि शाळा ९७

११) स्वतःला ओळखा आणि दुसऱ्याला जाणून घ्या १०५

१२) मुलांना विचार करता येतो ११२

१३) मीपण ज्यांचे पक्व फळापरी गळले हो! ११८

१४) थेंबे थेंबे वृत्तिविकास १२५

१५) रंग रंग मिसळुनी, एक रंग हा जुळे १३३

१६) शाळाशाळांत एडिसन कसे निर्माण होतील? १४२

१७) प्रदूषण मनाचं १४७

१८) खुरटवणारं प्रेम १५१

१९) हुशार मुलं १५५

२०) शुभं करोति १५९

२१) बाहेर काढणं १६४

२२) महत्त्वाचं काय? खेळणं की खेळिया? १७०

२३) शिक्षणपण : एक अनोखा पण फलदायी उपक्रम १७४

२४) राज्यपाल सी. सुब्रमण्यम् यांना अनावृत पत्र १८२

२५) आत्म्याचं शिक्षण महत्त्वाचं १८७




## मनोगत

प्रिय मित्रहो,

'परिवर्तनशील शिक्षण' ह्या पुस्तकासाठी मनोगत लिहिताना माझ्यात झालेल्या एका छोट्याश्या परिवर्तनाचा प्रत्यय मला आला. १९८७ ते १९९५ या कालावधीत मी पाच पुस्तकं लिहिली. हे पाचवं पुस्तक. आतापर्यंतच्या चारही पुस्तकांप्रमाणे हेही 'उन्मेष'मार्फत प्रकाशित होत आहे. फक्त तिसऱ्या पुस्तकाच्या मनोगतात मायना लिहिला असून तो प्रिय वाचकहो, सस्नेह नमस्कार असा आहे. ह्या मनोगताचा मायना 'प्रिय मित्रहो' असा लिहिला आहे. हा माझ्यात झालेला एक छोटा पण महत्त्वपूर्ण बदल नव्हे का? तो कशामुळे झाला? गेल्या आठ-नऊ वर्षांत सृजन-आनंद-शिक्षणाची ओढ असणारा एक वाचकवर्ग तयार झाला अणि भौगोलिक अंतर पार करून त्यांच्या-माझ्यात एक सुहृदभाव निर्माण झाला आहे हे त्याचं एक कारण. माझ्या या मित्रवर्गात इयत्ता आठवीत शिकणारा अभिजित किंवा इंजिनियरिंगच्या शेवटच्या वर्षात शिकणारा संग्राम गायकवाडसारखा विद्यार्थी, श्री. मदन हजेरी यांच्यासारखे अनेक प्राथमिक शिक्षक, मद्रासच्या उपेंद्र शेवगावकरांसारखे अनेक पालक आणि मालूताई किर्लोस्करांसारखे काही प्राध्यापक यांची पत्रं आहेत. मद्रासपासून राजापूरच्या भटआळीपर्यंतची अंतरं या पत्रांनी सांधली गेली आहेत. प्रत्येक पत्र उत्स्फूर्ततेनं, तळमळीनं लिहिलेलं आहे.

काही पत्रांत आजच्या शैक्षणिक वास्तवाबद्दल वाटणाऱ्या निराशेचं सावट दिसतं. राजापूरहून आलेल्या एका प्राथमिक शिक्षकाच्या पत्रात अशी निराशा उमटली आहे. त्या पत्रातला मजकूरच वाचू या.

'आज काही शिक्षणसंस्था अळंब्यांसारख्या वाढत आहेत. त्यांच्या हातात पैशांच्या थैल्या आहेत. कुठे कुठे बाजारभावाने पदव्यांची भेंडोळी विकणारे जणू चणेवाले आहेत. हजारोंच्या रकमा घेऊन तरुणवर्गाला नोकरीच्या दावणीला बांधणारे दलाल आहेत.' उदगीरसारख्या महाराष्ट्राच्या अंतर्भागात राहणारी एक प्राथमिक शिक्षिका अगदी भाबडेपणाने लिहिते, . 'ताई, आम्हा सर्वांसाठी स्वयंपाक करून ठेवलात. फक्त जेवण्याचं म्हणजे शिकवण्याचं कर्तव्य आमचं आहे. येत्या जूनपासून तुमच्या पुस्तकातले काही उपक्रम मी करणार आहे.' आजच्या वास्तवाबद्दल शिक्षकवर्गात दिसणारा उद्वेग स्वाभाविक असला, तरी दुसऱ्या पत्रात व्यक्त होणारा

आशावाद परिवर्तनाच्या दृष्टीनं अधिक महत्त्वाचा वाटतो. मुलुंडचे श्री. दत्ता ताम्हणे एक पणजोबा-पालक आहेत. माझी पुस्तकं का आवडली हे सांगता-सांगता स्वतःचे काही अनुभव मांडून शैक्षणिक परिवर्तनासंबंधीच्या माझ्या प्रेरणा ते सबल करतात. त्यांच्या पत्रातील एक किस्सा ऐकायचा का? 'पहिलीच्या बालभारती'तील 'वेडे कोकरू' या कवितेवर बाईंचा प्रश्न होता-- वेडे कोकरू खूप थकल्यामुळे काय झाले? कोकरू वाट चुकले-- हे बाईंना अपेक्षित असलेलं उत्तर.

माझा पणतू ऋषिकेश यानं लिहिलं-- वेडे कोकरू खूप थकल्यामुळे झोपेला आले. बाईंना हे मान्य नाही. ऋषिकेशनं कवी पाडगावकर यांना पत्र लिहून दोन्ही उत्तरं कळवली आणि कोणतं बरोबर असं विचारलं. पाडगावकरांनी पत्र पाठवून ऋषिकेशचं उत्तर बरोबर असा निर्वाळा दिला.' अशा पत्रांतून मुलांच्या विकासाची निगराणी करण्यासाठी प्रश्नांची तड लावणारे पालक भेटतात आणि सृजन-आनंद-शिक्षणाचे प्रयत्न जारी ठेवण्याची आमची उमेद वाढते. श्री. उपेंद्र यांनी अगदी थोड्या शब्दांत खूप काही सांगितलं आहे. ते लिहितात. . .

'स्वतःच्या अनुभवांतून आणि आजूबाजूच्या वास्तवावरून शाळा म्हणजे केळ्यातील गर फेकून त्याची साल खायचे शिक्षण जिथे दिले जाते ते ठिकाण असे मनात इतके भिनले आहे की, आपण चालवलेल्या शाळांसारखे प्रयोग वाचले की, काहीतरी अघटित घडते आहे असे वाटते.' अशी ही सारी पत्रं सृजन-आनंद-शिक्षणासंबंधीचे आमचे जिवंत अनुभव इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी प्रयत्नशील असायला हवं असं सांगत राहतात. त्यामुळेच हे मनोगत लिहिताना या प्रकारचा वाचकवर्ग व मी यांच्यातलं मैत्र मला जाणवावं हे स्वाभाविक नाही का?

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाच्या वेगवेगळ्या प्रश्नांबद्दल अनेक आयोग, समित्या, टास्क फोर्सेस आणि अभ्यासगट नेमले गेले. अभ्यासक्रमांच्या पुनर्रचना झाल्या. क्रमिक पुस्तकंही बदलली. 'शिक्षणाचे आव्हान'सारखा महत्त्वाचा शैक्षणिक दस्तऐवज प्रसृत होऊन त्यावर बऱ्याच चर्चा झडल्या. पण कोणत्याही स्तरावरच्या प्रत्यक्ष शिक्षणाचा तोंडवळा बदलला नाही. किंबहुना शिक्षण अधिकच बाजारू, शाब्दिक पोपटपंचीचं, अनावश्यक कर्मकांडांना महत्त्व देणारं आणि ज्यात विद्यार्थ्यांबद्दलची माया/आस्था अभावानंच असणारं आहे असं जाणवतं. अनेक विद्यार्थी स्वतःच्या मातृसंस्थेबद्दल अतिशय कडवटपणानं बोलतात. आजचं हे चित्र



बदलायलाच हवं असं वाटून जे प्रयत्न केले त्यातूनच 'परिवर्तनशील शिक्षण' आकाराला आलं आहे.

एक उपचार म्हणून पुस्तकाला मनोगत आणि प्रस्तावना हवीच असं मला वाटत नाही. तरीही आतापर्यंतच्या चारही आणि या पाचव्या पुस्तकात माझं मनोगत आणि मान्यवरांची प्रस्तावना असं दोन्हीही आहे. मनोगताच्या निमित्तानं अलीकडील एक-दोन वर्षांत ज्या गमती-जमती तुम्हाला सांगून आपलं मैत्र जोपासावंसं वाटतं, ते होऊ शकतं. त्रयस्थ व्यक्ती प्रसिद्ध व्हायचा मजकूर वाचून प्रस्तावना लिहिणारी असली, तर प्रस्तावनेला वस्तुनिष्ठ मूल्यमापनाचं थोडं-फार रूप येतं. आतापर्यंत आपल्या पुस्तकांना प्रस्तावना लिहिणारे डॉ. अनिल अवचट, सर्वश्री नानासाहेब गोरे, यदुनाथ थत्ते व प्रा. ग. प्र. प्रधान हे सर्वजण विलक्षण विचारवंत म्हणून ख्यात आहेत. त्यांच्यासारख्यांच्या दिशादर्शक विवेचनाचं बोट धरून वाचकांनी सृजन-आनंद-शिक्षणाच्या जिवंत अनुभवांकडं पाहावं याचं एक आगळं महत्त्व आहे. या पुस्तकाला श्री. भाई वैद्य यांची प्रस्तावना आहे. गेल्या कित्येक वर्षांच्या त्यांच्या राजकीय कारकीर्दीमुळे ते एके काळी शिक्षक होते हे विस्मरणात गेल्यासारखं झालं आहे. मला मात्र त्यांचं त्या वेळचं शिक्षकपण आजही तसंच झळझळीत आहे असं वाटतं. वर्गाच्या चार भिंतींत शिकवण्याऐवजी ते आज बिनभिंतींच्या शाळेत शिकवत आहेत इतकाच फरक! भाई वैद्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ऋजुता आणि सचोटी हे पैलू फार विलोभनीय आहेत. जनता दलाच्या राजवटीत ते जेव्हा गृहमंत्री होते, तेव्हा त्यांना फार मोठी रक्कम लाच म्हणून देऊ केली गेली. भाईंनी त्या व्यक्तीला भेटायला बोलावलं आणि पोलिसांकरवी चतुर्भुज केलं. असला 'अव्यवहारिक' मंत्री त्या माणसानं बहुधा पहिलाच पाहिला असावा. माझा त्यांच्याशी जो अल्पसहवास घडला, त्यात त्यांचा अत्यंत साधा, पण स्वच्छ पोषाख, आपल्या हातानं होण्यासारखं कुणाचंही काम करण्याची वृत्ती, अनोळखी लोकांतही सहजतेनं मिसळून जाणं-- अशा काही बाबी माझ्या मनात ठसल्या आहेत. त्यामुळेच सामाजिक परिवर्तनाला आवश्यक असणारं शिक्षण कसं असावं किंवा आहे याची जी थोडी-फार चर्चा ज्या पुस्तकात होणार आहे, त्याला भाईंनी प्रस्तावना लिहावी असं मला वाटलं. भाईंच्या ज्या वृत्तीचा उल्लेख केला त्यामुळे त्यांनी ही विनंती मान्य केली असावी. श्री. भाई वैद्य यांच्या प्रस्तावनेबद्दलची कृतज्ञता एक मोलाचा ठेवा म्हणून मी जपेन.

मी 'पुस्तकं लिहीत' असले तरी मला फारसं 'लिहिता' येत नाही हे अनेकांना माहीत नसेल. माझे वडील-- प्रा. ना. सी. फडके-- यांच्याकडून तेवढा एकच वारसा मला मिळालाय की काय, देवास ठाऊक. (स्वतःच्या हातानं न लिहिण्याचा.) त्यामुळं सारीच पुस्तकं मी सांगायची आणि कुणीतरी लिहायची असं झालं आहे. हे पुस्तक लिहिताना माझ्या सहकारी अरुणाताई, अलकाताई आणि नीताताई यांनी फार मोठी मदत केली आहे. लष्कराच्या या भाकरी ही मंडळी का भाजत असतील? की हे लिहिता-लिहिता त्यांचे माझे जे संवाद होतात, त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या परिवर्तनाला काही मदत होत असेल? आणि त्या पैलूंचं मनोहारित्व त्यांना आनंददायी होत असेल? की सृजन-आनंद-शिक्षणाचं काम ध्येयवादानंच करायचं हा परिपाठ त्यांच्यात रुजला असेल? कारणं काही का असेनात, आंधळ्याच्या गाई देव राखी या म्हणीप्रमाणे माझ्या पुस्तकाच्या लेखनाला योग्य व्यक्तींचा हात लागला हे मात्र खरं!

'उन्मेष प्रकाशना'मार्फत प्रसिद्ध होणारं हे माझं पाचवं पुस्तक. चौथ्या पुस्तकाच्या प्रकाशन-समारंभात मी म्हटलं होतं की, बिया टाकण्याचं काम हस्तलिखितांच्या रूपानं मी करत असले, तरी आकर्षक कुंड्यांत ती रोपं वाढवून इतरांपर्यंत पोहोचवण्याचं काम उन्मेष प्रकाशनामार्फत होतं. कित्येकदा मेधाताईंची आणि माझी पुस्तकातल्या मजकुराबद्दल चर्चा होते आणि हे सगळे जिवंत अनुभव सर्वसाधारण शिक्षक-पालकांपर्यंत पोहोचण्याची किती गरज आहे याबद्दल त्या तळमळीनं बोलतात. ही त्यांची तळमळ मलाच काय, पण असं लेखन करणाऱ्या साऱ्यांनाच दिलासा देणारी आहे.

या पुस्तकाचे वाचक, मित्र, पुस्तकातल्या मजकुराबद्दलची आपली मतं, अभिप्राय, अनुभव माझ्यापर्यंत पोचवून माझ्या 'शिक्षणा'ला आणि 'परिवर्तना'ला मदत करतील, असा विश्वास वाटतो.

आपली,
लीलाताई

संपर्कासाठी पत्ता--
प्राचार्य श्रीमती लीला पाटील,
१७, सौरभ, रुईकर वसाहत,
कोल्हापूर-- ४१६००५
दूरध्वनी-- ६५०६२२ (निवास)



## प्रस्तावना

कोणत्याही अधिकारवादाने नव्हे, तर प्राचार्य लीलाताई पाटील यांच्याबद्दल असलेल्या आदरभावामुळेच प्रस्तावना लिहिण्याचे काम नाकारू शकलो नाही. हे मात्र खरे आहे की, माझ्या आयुष्यातील जी दोन वर्षे अध्यापनात गेली, ती संस्मरणीय व अभिमानास्पद राहिली. त्यामुळे शिक्षणविषयक विचार मला नेहमीच प्रेरणादायी वाटत आलेला आहे.

भारतीय शिक्षणव्यवस्था अवाढव्य असून त्यातील सात लक्ष संस्थांमधून पस्तीस लक्ष अध्यापक आणि दहा कोटी विद्यार्थी आहेत आणि केंद्र व राज्य सरकारे त्यावर दरवर्षी अठ्ठावीस हजार कोटी रुपये खर्च करीत आहेत. ही संपूर्ण व्यवस्था अत्यंत टाकाऊ असल्याबद्दल आश्चर्यकारक एकमत देशभर आहे. सरकारी समित्याही ही टीका करण्यात आघाडीवर असून यात बदल झालाच पाहिजे, ही एकमुखी मागणी आहे. १९४८ साली पंतप्रधान नेहरूंनी सर्व शिक्षणमंत्र्यांना सांगितले की, शिक्षणाच्या पायात क्रांतिकारी बदल आवश्यक आहे. १९६६ साली कोठारी आयोगाने मांडले की, शैक्षणिक क्रांतीचीच गरज आहे. १९७८ साली 'लोकांसाठी शिक्षण' या आराखड्यात डॉ. जे. पी. नाईक म्हणतात की, व्यापक शैक्षणिक क्रांतीशिवाय हे आव्हान पेलता येणार नाही. इतके सततचे आवाहन होऊनही ही क्रांती काही अवतीर्ण होऊ शकली नाही. कारण कृतीने शब्दांचे कुंपण कधी ओलांडलेच नाही; मंत्रोच्चार मात्र निष्ठापूर्वक होत राहिला. या खंडप्राय देशात शिक्षणपद्धतीचे सर्वसामान्यीकरण करून ठराविक अभ्यासक्रम व क्रमिक पुस्तके यांचा पेणच्या गणपतीसारखा प्रचंड कारखाना बनवून सूत्रे शिक्षणशास्त्रज्ञांपेक्षा नोकरशाहीकडे देण्यात आली. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मसुद्यातही कंठशोष करून मांडले गेले की, 'शालापद्धती ही राक्षसी नोकरशाहीचा एक भाग बनलेली दिसते.' राजाच राज्यक्रांतीची मागणी करू लागल्यावर प्रतीक्षा करण्यावाचून जनता तरी काय करणार? गुलाम देशाला साजेशी, परिस्थितीचे आव्हान स्वीकारण्यास अपयशी ठरलेली आणि गोल भोकांत चौकोनी खुंटी बसविण्याचा प्रयत्न करणारी शिक्षणपद्धती बिनबोभाट चालूच राहिली. संविधानाच्या सरनाम्यांत ग्रंथित केलेली राष्ट्रीय उद्दिष्टे आणि शिक्षणप्रक्रिया यांचे सख्य विळ्या भोपळ्याइतकेच राहिले. मग ही व्यवस्था कोण शाबूत राखीत आहे? उघडच आहे की, ज्यांचे हितसंबंध ही व्यवस्था राखण्यात आहेत, ते बदल का होऊ देतील? ही व्यवस्था वर्णभेद राखण्यासाठी दुहेरी

पातळीवर चालू आहे. या व्यवस्थेतही उच्चवर्णीयांचे हक्क रक्षिण्यासाठी सामान्य विद्यार्थ्यांपासून अलग, महागड्या व उच्चभ्रू शाळा चालूच आहेत. समान शिक्षण, परिसर, शाळा आणि शिक्षणाचे लोकशाहीकरण त्यांना कसे मान्य होणार? ठराविक अभ्यासक्रम, यांत्रिक परीक्षापद्धती आणि डोक्याला त्रास न देणारी शिक्षणप्रक्रिया चाकरमान्या शिक्षकांनाही हवीच आहे. त्यांचेही हितसंबंध त्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे पं. नेहरूंपासून प्रत्येकाने सतत विरोध करूनही खरी सत्ता ज्यांच्या हाती आहे, ती उच्चवर्गीय-उच्चवर्णीयांची जोडगोळी जुनाट, टाकावू व बाजारू शिक्षणपद्धती बिनबोभाट चालवीत आहे. अशा स्थितीत ज्यांना ही व्यवस्था घातक वाटते, त्यांनीच उठाव करायला हवा.

भारतीय शिक्षणपद्धती कोणासाठी आहे आणि तिच्या बाहेर कोण फेकले जातात? या नकारासाठी प्रतिबंध, गळती व नापासी हे तीन प्रभावी उपाय वापरले जातात. देशात सुमारे सहा लाख प्राथमिक शाळा असूनही राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेनुसार ६ ते ११ वयाची सुमारे सहा कोटी मुले शाळेत नावे नोंदवू शकत नाहीत. त्यामुळेच जगातील निरक्षरांपैकी १/३ भारतात आहेत. गळती अशी की, शंभरापैकी सत्तावन्न पाचवीपर्यंत पोहोचतात व त्रेचाळीसांची छुट्टी होते. त्या उपरही जिद्दीने राहिले तर नापासी गळा कापते. माध्यमिक व उच्चमाध्यमिक शालांत परीक्षेत मिळून १९९४ साली साडेअठरा लाखांपैकी साडे आठलाख नापासींत कटले. प्रतिबंध, गळती व नापासी यांचे बळी प्रामुख्याने मुली, दलित, आदिवासी, भटके व अल्पसंख्यांक असतात. समाजातील हा वर्ग शिक्षणव्यवस्थेबाहेरच असल्यासारखा आहे. ह्या व्यवस्थेच्या वेशीबाहेरचे हे लोक आहेत. त्यांनी निर्धार केला तरच ही पद्धती बदलली जाणार. वेशीच्या आतील कशाला त्रास घेतील? शासनाची भूमिका तरी वेगळी काय असणार? आतापर्यंतच्या समित्या व आयोगांचे अहवाल बासनांत बांधण्यासाठीच असतात अशी शासनाची प्रामाणिक समजूत आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान सहा टक्के खर्च शिक्षणावर व्हावा अशी जागतिक भूमिका आहे. अमेरिकेत सात टक्के तर नॉर्वेत साडेसात टक्के होतो. परंतु महान भारतात ४.९ टक्के पंचवार्षिक योजनेत दाखविला जातो, तर प्रत्यक्षात १९९४-९५ च्या अंदाजपत्रकात ३.१ टक्के खर्ची पडला. अठ्ठावीस हजार कोटी शिक्षणावर खर्च; मात्र लष्करावर तब्बल पंचवीस हजार कोटी रुपये. महावीर, बुद्ध, गांधी हे अहिंसेचे पुजारी या भूमीत निपजले यावर कसा विश्वास ठेवावा?



शिवाय शिक्षणाचा दरडोई खर्च प्राथमिक शिक्षणात नाममात्रच. युनोच्या मानवी विकास अहवालान्'ना बाबींबद्दल किती ताशेरा झाडला आहे! सर्वच विकसनशील देश असेच वागत आहेत. सीरिया, इराक, सोमालिया, इथियोपिया हे देश तर लष्करावर शिक्षण व आरोग्यापेक्षा दुप्पट-चौपट खर्च करतात. कित्येक देशांतील भ्रष्टाचार व मादक वस्तूंचा व्यापार शैक्षणिक खर्चापेक्षा कित्येक पट आहे. भारतातील शेअर घोटाळ्यामध्ये तेरा लाख कोटी रुपये गुंतलेले होते. दलालांनी तीन टक्के मिळविले असले, तरी ती रक्कम शिक्षणावरील खर्चापेक्षा अधिकच होईल. परंतु लष्करावरील खर्चात कपात किंवा भ्रष्टाचाऱ्यांची मुस्कटदाबी याबाबत शासन काही करू शकेल असे वाटत नाही. बोफोर्सचीही नावे अजूनही गुलदस्तात आहेत. दरम्यान आवाज उठविणारेही सत्तेत येऊन गेले.

अशा स्थितीत शिक्षणपद्धतीत परिवर्तन कसे घडवायचे हा प्रश्न मोठा बिकट बनला आहे. काहींच्या मते तर समाज-परिवर्तन व शिक्षण-परिवर्तन या दोन्हींसाठी एकाच वेळी प्रचंड आंदोलन घडविले पाहिजे. डॉ. जे. पी. नाईक यांनी हे ठसठशीतपणे मांडले आहे. परंतु असे म्हणून आंदोलन थोडेच घडते? आधी आपल्या देशात अन्य देशांप्रमाणे मूलभूत बदलांची आंदोलने सहसा घडत नाहीत. बुद्ध, फुले, गांधी, आंबेडकर व जयप्रकाश यांनी अशी आंदोलने घडविण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यातून सत्तापरिवर्तने झाली, तरी व्यवस्थापरिवर्तन झालेच नाही. गांधी-जयप्रकाशना तर नवीन सत्ताधाऱ्यांनी दूरच सारले. निराशेचा सूर आळविण्यासाठी नव्हे, तर काम कठीण आहे याची जाणीव देण्यासाठीच हे सांगायचे. अत्यंत प्रखर व जबर राजकीय इच्छाशक्तीशिवाय हे काम होणार नाही. या बदलाचा किती तऱ्हेने विचार करावा लागेल, याचा आलेख लीलाताई पाटलांनी आपल्या सर्वच पुस्तकांतून उत्तम तऱ्हेने मांडलेला आहे. शिक्षणातील श्रेष्ठजनवाद मोडून काढावा लागेल. जाती-धर्माचे अडसर, नर-नारी विषमतेचे खूळ, दलित-आदिवासी-भटके यांना शिक्षणासाठी घ्यावी लागणारी जीवघेणी झोंबी ह्या अडचणी दूर केल्याशिवाय 'सर्वांना शिक्षण' कसे मिळणार? त्यासाठी समान शिक्षणाची कास धरावी लागेल आणि परिसर शाळा हाच त्यावर एकमात्र तोडगा आहे. कठोर निर्णय-शक्तीशिवाय हे घडू शकणार नाही. एकाही राजकीय पक्षाने हा अटीतटीचा मुद्दा करू नये हे भारतीय मनाच्या दारिद्र्याचेच लक्षण आहे. अजुनी एक महत्त्वाचा मुद्दा असा की, वाढत्या चंगळवादी व रुपयावादी संस्कृतीमध्ये 'आप डूबे, जग डुबे' ही व्यक्तिवादी

भावना वाढीस लागत आहे. व्यक्ती व समाज यांमध्ये समाज, सामाजिकभाव, दुसऱ्याबद्दलची करुणा यांचा लोप होत असून व्यक्तिवादी स्पर्धेला अवास्तव महत्त्व येत आहे. खेळ, परीक्षा, गुणवत्ता, चढाओढ यांमुळे स्पर्धेवरच समाजजीवन अवलंबून असते अशी चुकीची कल्पना पसरली आहे. वास्तविक कुटुंब असो की व्यापक समाज असो, सहजीवनाच्या आधारेच ते फुलतात, संपन्न होतात. शिक्षणातही व्यक्तिस्वातंत्र्याला उदंड वाव देणारे सहजीवन कसे असते ते मांडले पाहिजे. लीलाताईंनी याचा किती सखोल विचार केलेला आहे! मुलांच्या हक्कांबद्दल तर लीलाताईंनी किती भरभरून लिहिले आहे! विद्यार्थी म्हणजे मातीचा गोळा. त्याला आपण देऊ तो आकार मिळेल अशी बहुसंख्य शिक्षकांची भावना असते. त्यांच्या दृष्टीने शाळा म्हणजे कुंभाराचा आवा. माती पडलेली आहे. त्यातून डेरा, रांजण, माठ, घडा, मडकं, खुजा, सुरई, बोळकं, वाटेल ते बनवा. माती काही कुरकूर करणार नाही. वास्तविक मूल म्हणजे मातीचा गोळा नसून विविधरंगी जिवंत तजेलदार रोपटं आहे. फार काटेकाळजीने त्याच्या त्याच्या प्रकारानुसार जोपासना करावी लागते. 'टका शेरभाजी, टका शेरखाना' हा कायदा येथे कसा चालणार? परंतु आपल्याकडे गुरुपरंपरा थोर मानली जाते. गुरूशिवाय मोक्षप्राप्ती होऊ शकत नाही. म्हणूनच त्यास गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णो म्हटले आहे. गुरू या शब्दाचा अर्थच मुळी महान. स्वाभाविकच शिष्य लहान ठरतो. वयाने लहान असतोच. गुरूने त्यास फक्त कानमंत्र द्यायचा. त्यामुळे गुरूचे मुख आणि शिष्याचा कान हेच अवयव महत्त्वाचे. त्यात अदलाबदल म्हणजे अब्रह्मण्यम्. लीलाताईंनी गुरू आणि शिष्य, शिक्षक आणि विद्यार्थी दोघेही एकमेकांकडून सतत शिकत असतात, असा सिद्धांत अनेक प्रयोगांनिशी पटवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. शिक्षकांनी तो सिद्धांत अंगवळणी पाडल्याशिवाय लोकशाहीला अनुरूप अशी शिक्षणपद्धती सिद्धच होणार नाही. अधिनायकवादाकडून लोकशाहीकडे, नकाराकडून होकाराकडे, छातीवर घडी-ओठावर बोट या भयंकर अवस्थेतून थुई थुई नाचणाऱ्या कारंज्याकडे अशी ही वाटचाल आहे. सबंध शिक्षण-प्रक्रियेचेच यात आमूलाग्र परिवर्तन आहे. लीलाताई यापुढे जाऊन आग्रह धरतात की, पालकही पार्टनर झाल्याशिवाय ही प्रक्रिया पूर्ण होणार नाही. त्यापुढे म्हणतात की, मुलेच पालकाला पालकत्व शिकवीत असतात, हे पालकाने ध्यानी ठेवले पाहिजे. महत्त्वाचा प्रश्न येथे दत्त म्हणून उभा



राहतो तो असा की, शासन, राजकीय पक्ष अगर महान नेता यांनी निर्धारपूर्वक संपूर्ण बदलाचे काम हाती घेईपर्यंत आपण काय हात चोळीत स्वस्थ बसायचे? लीलाताई तितक्याच निर्धाराने गरजतात की, 'अजिबात नाही. आम्ही स्वस्थ राहणार नाही, जग स्वच्छ करण्याच्या कामाला सुरुवात मी माझ्या पायाजवळील जमीन स्वच्छ करून करणार.' दुसऱ्या शब्दांत विचारायचे तर, आहे त्या परिस्थितीतही परिवर्तन शक्य आहे का? लीलाताई उत्तर देतात की, अशक्य नाही. प्रत्येकाने प्रयोगाधिष्ठित परिवर्तनशील शिक्षणाचा ध्यास घेतला पाहिजे. हा विचार प्रत्येक शिक्षकांपर्यंत नेऊन त्यांना सबळ बनविले पाहिजे. आणि या परिवर्तनशील शिक्षणाचा प्रयत्न यशस्वी करण्यासाठी शिक्षकामागे लोकचळवळीची शक्ति व रेटा उभा केला पाहिजे. हा विचार प्रभावीपणे पुढे मांडण्यास लीलाताईंपेक्षा सबळ व समर्पित व्यक्तित्व दुसरे कुठले सापडणार?

लीलाताईंचा माझा स्नेह जुळला, त्यांचे जीवनसाथी आणि माझे ज्येष्ठ मित्र थोर समाजवादी दलित मित्र बापूसाहेब पाटील यांच्यामुळेच. लीलाताई शिक्षणावर बोलू लागल्या की, त्यांचे डोळे अक्षरशः ज्योती बनतात. एरव्ही आत्ममग्न वाटणाऱ्या लीलाताई भरभरून बोलू लागतात. त्यांच्या आयुष्याची चार दशके शिक्षणतपस्येत गेली आहेत. खरे तर आधीचीही वर्षे धरली पाहिजेत. कारण माहेर-सासरकडून थोर कादंबरीकार व नामवंत शिक्षक प्रा. ना. सी. फडके व महर्षी भाऊराव पाटील यांचा संबंध. त्याशिवाय आचार्य भागवत, डॉ. जे. पी. नाईक व डॉ. चित्रा नाईक यांचा सहवास. अगदी गुरुकुलात राहावे तसेच जीवन गेले म्हणा ना! शिक्षक, अधिव्याख्याता, प्राचार्य व सहसंचालक या नात्याने शिक्षण प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव. चाकरमान्या वृत्ती नसल्याने त्या काळात लिहिलेली दहा पुस्तके विद्यापीठमान्य व विद्यार्थिप्रिय ठरली. निवृत्तीनंतर त्यांच्या जीवनाला नवीन धुमारे फुटले आणि गेले एक दशक त्यांनीच स्थापन केलेल्या सृजन-आनंद विद्यालयातील लहानग्यांबरोबर संवाद साधत त्या आनंदाचे मळे फुलवीत आहेत. लीलाताईंच्या सहवासात ती फुले बहरताना पाहून मन पावन होते. या बहरामुळे लीलाताईंच्या जीवनवेलीवर पाच पुस्तकांची परिपक्व फळे लहडली आहेत. फळांचेही दुसरे बार, तिसरे बार लटकत आहेत. गोवर्धन पारीख, राजाराम पाटील, कोरगांवकर आणि मंगला पोटे पुरस्कारांनी त्यांना लोकमान्यता प्रदान केली आहे. अगदी 'ऐलमा-पैलमा' ते ज्यासाठी ही प्रस्तावना लिहीत आहे त्या 'परिवर्तनशील शिक्षण'पर्यंत

लीलाताईंचे सबंध लिखाण बालानंदाच्या तळ्यात बुचकळून काढले आहे, असे वाटते. किती प्रसन्न, सोपी आणि झऱ्यासारखी झुळझुळ वाहणारी भाषा आहे! विद्वजडता दाखविणारे आकडे नाहीत की, अनावश्यक कोटेशन्स नाहीत. अगदी सरळ, मनाला भिडणारी आणि विषयाचा ठाव घेणारी भाषा आहे. वाचताना असे वाटते की, लीलाताईंच्या जीवनातील कोजागिरी पुनवेत आपणही न्हावून निघत आहोत. तुलना नाही करत; परंतु वाटते, की फडकेंनीही या भाषेचा हेवा केला असता.

प्राचार्य लीलाताईंच्या लिखाणाचा सर्व भर प्राथमिक शिक्षणावर आहे; कारण त्यांना असे वाटते की, येथेच जीवन घडते. व्यक्तीच्या मेंदूची वाढ याच काळात झालेली असते व जीवनाचा पाया येथेच रचला जातो. बदलाचा प्रमुख घटक म्हणून शिक्षकवर्गाकडे त्या पाहतात. ब्राझीलचा शिक्षक पाब्लो फ्रियरे जसा बदलासाठी झपाटला, तसा आपला शिक्षकवर्ग नोकरीच्या पाट्या टाकण्याची वृत्ती टाकून झपाटला तर त्यांना वाटते की, फार मोठा बदल होऊ शकेल. याचसाठी त्या स्वतः झगडल्या आहेत; त्यासाठीच त्यांचा सर्व अट्टाहास आहे. 'परिवर्तनशील शिक्षण'च्या मनोगतात त्या झडझडून लिहितात की, 'आपण सारे मुडदे म्हणून हे शिक्षण सहन करतो.' खरे तर शिक्षक-संघटनांनी लीलाताईंचे नेतृत्व स्वीकारून पगार बदलासाठी नव्हे, तर शिक्षण-बदलासाठी का सज्ज होऊ नये? मुलांसाठी शाळेचा नव्हे, तर स्वतः शिकण्याचा हक्क आणि प्रयोगशीलता हा त्यांच्या लिखाणाचा गाभा आहे. 'आत्म्याचं शिक्षण' या प्रकरणात त्यांनी शिक्षण पर्यावरणातील प्रदूषणावर प्रखर कोरडे ओढले आहेत. त्यांच्या लिखाणातील सामाजिक आशय-घनता आणि संविधानांतील मूल्यांबाबतची निष्ठा बावनकशी झळाळीची आहे. 'योजनांच्या आकडेवारीत तृप्तीची ढेकर न देता आवश्यक बदलासाठी प्रखर इच्छाशक्तीने पावले उचलायला हवीत.' असे राज्यकर्त्यांना परखडपणे सुनावण्याची हिंमत हे त्यांच्या तपस्येचे फलित आहे.

लीलाताई, तुम्ही खऱ्याखुऱ्या शिक्षणमहर्षी आहात. बालकांच्या वात्सल्यामुळे जीवाच्या आकांताने तुम्ही टाहो फोडत आहात. शिक्षक व पालक, नाहीतर तुमची बालके तुम्हाला साथ दिल्याशिवाय राहणार नाहीत व शिक्षणातील प्रदूषण रोखून जीवनातील आनंदाचा कंद प्राप्त केल्याशिवाय स्वस्थ राहणार नाहीत याची खात्री बाळगा.

**--भाई वैद्य**



# शिक्षणातील प्राथमिकता

### शिक्षण नसणाऱ्या शाळा-

बेळगाव म्हटलं की मला 'बेळगावसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' या घोषणा आठवतात. या गावाच्या नावाशी जोडले गेलेले मांडे पुन्हा एकदा मनातल्या मनात खाल्ले जातात. आदरणीय प्रसिद्ध कवयित्री इंदिरा संत आणि त्यांचं मनाला मोहवणारं काव्य बेळगाव या नावाशी माझ्या मनात जोडले गेलं आहे. कोणत्याही शब्दाशी असे अनेक संदर्भ जुळलेले असतात. तुम्हालाही शिक्षण म्हटलं की, खूप काही आठवत असेल. मनाच्या अगदी वरच्या थरात शिक्षणाबद्दल कोणते शब्द असतात? परीक्षा, चाचण्या, नापासी, रटाळपणा, कंटाळा, नाइलाज, शिकवणं, शिक्षा, दंड, भीती, पुस्तकी अभ्यास, गृहपाठ. मनाच्या आतल्या थरात काय काय लपलेलं असतं? पार्सिलिटीबद्दलचा राग, कुणा-तरी बड्या धेंडाच्या मुलाला वर चढवलं म्हणून चीड, दलित विद्यार्थ्यांचा वर्गात होणारा अपमान पाहून वाटणारी शरम, पिण्याच्या पाण्याची किंवा वर्गातील आसनव्यवस्थेची असमाधानकारक व्यवस्था आणि त्याबद्दलचा संताप आणि या सर्वांबद्दलची आपली प्रचंड असहाय्यता. अनेक पालक आणि मुलं, विचारवंत आणि शिक्षणतज्ज्ञ शिक्षणाच्या या दुर्व्यवस्थेबद्दल बोलत असतात; पण त्यांनी बोलून काय उपयोग? ज्या शासनव्यवस्थेच्या हातात आज शिक्षण आहे, त्यांनी ते मान्य करायला हवं ना? या संदर्भात एक जुनी गोष्ट आठवते. एक बाई शेजारच्या घरी ताक मागायला गेल्या. सुनेनं सांगितलं, ''नाही हो, आमच्या घरी ताक.'' त्या बाई परतत असताना सुनेची सासू वाटेत भेटली. सासूबाई म्हणाल्या, ''कुठं निघालात?'' बाई म्हणाल्या, ''तुमच्याच घरी गेले होते ताक मागायला. सूनबाईंनी ताक नाही असं सांगितलं.'' ''असं का? चला माझ्याबरोबर.'' दोघीही घरापर्यंत आल्या. सासूबाई उंबऱ्याच्या आत गेल्या न गेल्या, तोच तोंड वळवून म्हणाल्या, ''आमच्या घरात ताक

नाही. माझं हे ऑफिशियल निवेदन आहे.'' शिक्षणाच्या दुर्व्यवस्थेबद्दल असंच ऑफिशियल निवेदन कोठारी आयोगाच्या वेळी झालं आणि त्यानंतर नव्या शैक्षणिक धोरणाच्या वेळीही झालं. या ऑफिशियल निवेदनाचा एक नमुना म्हणून 'शैक्षणिक धोरण : यथार्थ दर्शन' या पुस्तिकेतील दोन-तीन वाक्यं पाहू. पुस्तिकेत लिहिलं आहे, ''शाळेतील अध्यापन रटाळ असतं. सर्जनशीलतेला वाव न देता केवळ घोकंपट्टीवर भर असतो. शाळांतून शैक्षणिक वातावरणाचा अभाव असतो.'' ही तीन वाक्यं जरा नीट अभ्यासली की, प्रश्न विचारावासा वाटतो, ''मग शाळांत असतं तरी काय?'' शिक्षण नावाचं जे बहुमोल मूलद्रव्य वस्तुतः शाळांत असायलाच हवं किंवा मिळायलाच हवं, ते मिळण्यासाठी आम जनतेनं कुठं जावं? आणि जर हे मूलद्रव्य शाळांत मिळतच नसेल, तर शिक्षणाचा हा आतबट्ट्याचा व्यवहार शासन चालवतंच कशासाठी आणि कुणासाठी?

## दोघांना ५०० तर दहा हजारांना किती?

गेल्या काही वर्षांत शिक्षणविषयक अनेक प्रश्न लेख, व्याख्यानं, पथनाट्यं, प्रदर्शनं, घेराव, मोर्चे, धरणं अशा विविध माध्यमांतून सर्वांसमोर आले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणानं १९८६ साली जनतेच्या शिक्षणविषयक अपेक्षा उंचावल्या होत्या. भारताचे माजी पंतप्रधान कैलासवासी राजीव गांधी म्हणाले होते की, एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ६ टक्के खर्च शिक्षणावर केला, तर आजच्या आणि उद्याच्या कोट्यावधी निरक्षरांच्या जीवनांत ज्ञानाचा प्रकाश पडेल. प्रत्यक्षात काय घडलं? आजतागायतही आपण एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील ६ टक्के खर्च शिक्षणासाठी करत नाही! या वस्तुस्थितीला भारतातील गरीबी हे कारण पुढं केलं जातं आहे ते दारिद्र्य नाकारता येणार नाही. परंतु काही वेळा असं वाटतं की, पैशापेक्षा योग्य कल्पनांचं दारिद्र्य आपल्याकडं जास्त आहे का? तसं नसतं तर सर्वसाधारण माध्यमिक शाळांचा दर्जा सुधारण्याचा पाठपुरावा करण्याऐवजी शासनानं नवोदय विद्यालयांची योजना मांडलीच नसती. ज्या माध्यमिक शाळांत सर्वसामान्य नागरिकांची मुलं शिकतात, त्या शाळांसाठी शासनानं १०० कोटी रु. मंजूर केले आणि नव्यानं निघणाऱ्या नवोदय विद्यालयांसाठी ५०० कोटी रु. मंजूर



केले. सर्वसाधारण माध्यमिक शाळांत शिकणाऱ्या दर दहा हजार विद्यार्थ्यांमागं नवोदय विद्यालयांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या फक्त दोन असते, हे लक्षात घेतलं म्हणजे माध्यमिक शाळांसाठी केलेली तरतूद १०० रु. कोटी आणि नवोदय विद्यालयांसाठी केलेली तरतूद ५०० कोटी रु. हे वाटप निखालस चुकीचं वाटत नाही का? उच्च शिक्षणासाठी केली जाणारी आर्थिक तरतूद आणि प्राथमिक शिक्षणासाठी केली जाणारी आर्थिक तरतूद हाही प्रश्न असाच आहे. आम जनतेच्या वतीनं इ. स. १९५० च्या घटनेत १० वर्षांच्या अवधीत सक्तीचं प्राथमिक शिक्षण साकारलं जाईल, असं म्हटलं होतं. १९९३ साल संपलं, तरीही हे अभिवचन आपण पुरं केलेलं नाही. अशा परिस्थितीत उच्च शिक्षणावरचा खर्च कमी करून प्राथमिक शिक्षणाला अधिक निधी उपलब्ध करून देणं सामाजिक न्यायाच्या दृष्टीनं अधिक रास्त का ठरू नये? शिक्षणातील प्राथमिकतेसंबंधीच्या अग्रक्रमांविषयीच्या संकल्पनाच बदलल्याशिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत. शिक्षण कुणासाठी? कशासाठी? कशा प्रकारचं? कुणी द्यायचं? केव्हा द्यायचं? शिक्षणाच्या सफलतेची मोजमापं कोणती? ती मोजमापं कुणी ठरवायची? त्या मोजमापांचे निकष कोणते?-- अशा अनेक प्रश्नांची आवर्तं शिक्षणातील प्राथमिकतेचा विचार करायला लागलो म्हणजे घोंघावत राहतात.

## उजव्या मेंदूचं शिक्षण--

मुलं विचार करू शकतात यावर विश्वास नसलेली शिक्षणपद्धती विद्यार्थ्यांकडून फक्त क्रमिक पुस्तकांतले शब्द आणि ठराविक प्रश्नांची ठराविक उत्तरं अपेक्षित करते. आपल्या देशात अनेकदा किती पैसा किंवा श्रमशक्ती वाया गेली याचे हिशेब केले जातात; परंतु चुकीच्या शिक्षणव्यवस्थेमुळं देशातील किती बुद्धिमत्ता, कल्पकता आणि सृजनशीलता वाया गेली याचा हिशेब कोण आणि कधी मागणार? आजवरच्या आपल्या शिक्षणात डाव्या मेंदूतील काही केंद्रांच्या वापरावरच भर देण्यात आला. उजवा मेंदू जवळ जवळ दुर्लक्षित राहिला. उजव्या मेंदूचं काम कोणतं? आजूबाजूच्या अवकाशाचं ज्ञान, प्रतीकात्मक विचार, गुंतागुंतीचे विचार, अंतःप्रज्ञेचा विकास, आध्यात्मिक विचार, क्लिष्ट

आकृतींचं आकलन, संश्लेषण, अबोध मनाचा व्यापार, संशोधन करणं, कूट प्रश्न सोडवणं, चित्रकला, संगीत यांसारख्या कलांचं ज्ञान आणि सर्जनशक्तीचा विकास. उजव्या मेंदूची ही कामं लक्षात घेतल्यावर बाबू लोक तयार करण्याच्या उद्देशानं स्थापलेल्या शिक्षणपद्धतीत तो आजवर का दुर्लक्षित राहिला, हे सहज समजण्यासारखं आहे. परंतु स्वातंत्र्योत्तर काळातील ४७ वर्षांनंतर तीच स्थिती चालू आहे याचा विषाद मात्र फार वाटतो. अशी परिस्थिती निर्माण होण्याचं कारणही परीक्षा आणि परीक्षाफल यांना एकूण शिक्षणव्यवस्थेत मिळालेली चुकीची प्राथमिकता, चुकीचा अग्रक्रम हेच मानायला हवं.

## कारणं आणि परिणाम--

नव्या शैक्षणिक धोरणात बालक-केंद्रितता, कृतिमयता, सृजनशीलता आणि आनंदमयता यांचं महत्त्व वर्णन केलं आहे. धोरणात सांगितलेले हे शब्द गेल्या आठ वर्षांत शाळांशाळांतून साकार झालेले तुम्ही पाहिले आहेत का? पहिली गोष्ट अशी की सर्वसाधारण शिक्षकाला शिक्षण हे परीक्षाकेंद्रित असतं आणि परीक्षा ह्या पुस्तककेंद्रित असतात. हाच अनुभव येतो आहे. 'डेंजर स्कूल' नावाचं एक पुस्तक मध्यंतरी प्रसिद्ध झालं आहे. त्या पुस्तकातील एका व्यंगचित्रात शिकवण्याचं प्रमुख साधन म्हणजे तोंड आणि शिकण्याचं प्रमुख साधन म्हणजे कान असतात. ही वास्तविकता ती इंद्रियं त्या त्या व्यक्तींच्या ठिकाणी प्रमाणापेक्षा खूपच मोठी काढून व्यक्त केली आहे. अशी कितीतरी व्यंगचित्रं पाहण्यात येतात. विद्यार्थ्यांकडून अपेक्षित कृती म्हणजे ऐकणं, लिहून घेणं, पाठ करणं आणि परीक्षेत लिहिणं. निरीक्षण करणं, शोधणं, चर्चा करणं, प्रश्न विचारणं, आपला तर्क दुसऱ्याच्या तर्काशी पडताळून पाहणं, स्वतःला समजलेलं इतरांना समजावून सांगणं या प्रकारच्या कृती आजच्या शाळांत अपेक्षित नाहीतच; त्या धोरणात अपेक्षित होत्या. The destiny of India is being shaped in its class-room हे कोठारी आयोगाच्या अहवालातलं पहिलंच वाक्य आणि विद्यार्थी व शिक्षक यांच्याकडून होणाऱ्या आजच्या कृती यांचा मेळ घातला, तर भारताचं भविष्य कोणत्या प्रकारचं आहे, याची चर्चा करण्याचं कारण नाही. एकूण



शिक्षणावर परीक्षेची प्रचंड हुकूमत असल्यामुळं परीक्षेत जे जे आणि जसं जसं अपेक्षित असत, ते ते त्या त्या प्रकारानं घटवून घेण्यालाच महत्त्व असल्यानं सृजनशीलतेचा वारादेखील आजच्या शिक्षणाला लागणं संभवनीय नाही. परिणामतः १० ओळी अपेक्षित असताना १२ ओळींचं उत्तर झालं की, ही वही फेकून दिली जाते. गवताचा रंग प्रत्यक्षात पोपटी, पिवळसर, हिरवट असला, तरी परीक्षांत तो हिरवाच असावा लागतो. प्रत्यक्ष जीवन आणि पुस्तकातले शब्द यांचा दुवाच मुलांना समजत नसल्यानं 'कौमुदी का हसते आहे?' या प्रश्नाला इयत्ता तिसरीतल्या एका मुलानं 'पुस्तकात आहे म्हणून' असं उत्तर दिलं होतं. बालकवींची 'आनंदी आनंद गडे' कविता शिकताना 'आनंद कोठे कोठे भरला आहे?' या प्रश्नाचं उत्तर फक्त 'इकडे-तिकडे चोहीकडे' एवढंच पाहिजे असतं - फार तर पूर्ण वाक्यात पाहिजे असतं-- घरात, रस्त्यात, बागेत, शाळेत, मैदानावर अशा विविध ठिकाणी निरनिराळ्या मुलांना विभिन्न आनंद भिडलेले असतात. पण ते कुणाला हवे आहेत? आम्हाला फक्त बालकवींचा आनंद पाहिजे आहे! अशा या शिक्षणात आनंदमयता असू शकेल, असं तुम्ही म्हणाल का? शाळांतील प्रचंड गैरहजेरी, शाळा सोडून देणं, शाळांतले तास बुडवणं, कुणीतरी मरावं आणि शाळेला सुट्टी मिळावी अशी इच्छा करणं हे सारं कशामुळं घडतं? शाळा म्हणजे शिक्षा, जबरदस्ती, जुलूम, दंडुकेशाही असं आज बहुतांश विद्यार्थ्यांना वाटतं आहे. 'यथार्थ दर्शन' या पुस्तिकेतील ज्या तीन वाक्यांचा उल्लेख आपण पूर्वी केला, ती परिस्थिती-- अध्यापनातील रटाळपणा, घोकंपट्टीवर भर आणि शैक्षणिक वातावरणाचा अभाव - म्हणजे खरं तर बालक-केंद्रितता, कृतिमयता, सृजनशीलता आणि आनंदमयता नसण्याचा परिणाम आहे. परिणाम दूर करायचा असेल, तर काहीही करून मूळ कारणं दूर करायला हवीत.

## प्रायोगिकता जोपासा--

जे बदल शिक्षणात व्हायला हवेत असं विचारवंतांना वाटतं आहे आणि ज्या बाबींचा शाब्दिक घोष शासनही करीत आहे ते बदल साकार व्हायचे असतील तर समाजातल्या सुयोग्य व्यक्तींना प्रयोग करून

पाहण्यासाठी आवश्यक ते स्वातंत्र्य आणि उत्तेजन शासनानं द्यायला हवं. हे प्रायोगिक नमुने फार मोठ्या प्रमाणावर असणार नाहीत आणि म्हणून त्यांचा 'मास एज्युकेशन'ला काय उपयोग किंवा त्यांची रेप्लिकॅबिलिटी कोणती अशा युक्तिवादांनी ती कामं हतप्रभ करण्याची अनुदारता शासनानं सोडली पाहिजे. पायलट प्रोजेक्ट्स या नावाखाली प्रयोग करण्याचा मक्ता शासनाकडंच असतो का? आणि केलेल्या अशा प्रयोगांचा मास एज्युकेशनला आजवर कितपत लाभ झाला आहे? शासनाकडून आजवर जे शैक्षणिक प्रयोग केले गेले त्यांच्या यशापयशाचा साद्यंत अहवाल, ज्या समाजाच्या पैशावर ते प्रयोग झाले त्या, समाजापुढं शासनानं मांडलेला आहे काय? विद्यानिकेतन नावाचा जो प्रयोग झाला, त्याचं काय झालं? आणि आता नवोदय विद्यालयं कोणत्या नव्या उद्देशांनी सुरू झाली आहेत? हजारो पदवीधर बेकार असताना मुक्त विद्यापीठांमार्फत पुनः पदवीधर निर्माण करण्याचे प्रयोग कशासाठी? पण हे व असे सवाल करून शासनाला रोखण्याचं सामर्थ्य आपण मिळवल्याशिवाय शिक्षणक्षेत्रातली मरगळ दूर होणार नाही. बुद्धिमंतांच्या केवळ व्याख्यानांनी हे बदल घडणार नाहीत. या संदर्भात डिकन्सनं सांगितलेला एक किस्सा लक्षात ठेवण्याजोगा आहे. त्यानं बुद्धिमंतांची तुलना रस्ता कुठं जातो, हे सांगणाऱ्या पाट्यांशी केली आहे. आपल्या विधानाच्या स्पष्टीकरणार्थ तो पुढं म्हणतो की. 'ती पाटी त्या ठिकाणापर्यंत तुमच्याबरोबर येत नाही.'

## सबसे खतरनाक-सपनों का मर जाना--

The people who risk nothing, do nothing, have nothing and are nothing. They may avoid suffering and sorrow but they cannot learn, change, grow, love and live. हे वाक्य लक्षात घेऊन आपण शिक्षणातील आवश्यक परिवर्तनासाठी विचारपूर्वक काही धोके पत्करले पाहिजेत. अवतारसिंह पाशा नावाचा एक पंजाबी क्रांतिकारक त्याच्या ३२ व्या वर्षी मारला गेला. देशात सगळ्यांत धोकादायक बाब कोणती? सबसे खतरनाक क्या है? हे सांगताना त्यानं ज्या पाच-सहा गोष्टी सांगितल्या आहेत, त्यात 'सब सहन कर जाना और



सपनों का मर जाना' अशा दोन बाबी आवर्जून नोंदल्या आहेत. मनानं निश्चेतन असलेला जिवंत माणूस म्हणजे मुडदाच. कित्येक वेळा असं वाटतं की, आपण सारे मुडदेच आहोत का? का आपण हे सारं घाणेरडं शिक्षण सहन करतोय आणि त्यात आपल्या मुलांना ढकलतोय? जे शिक्षण मुलांचं बाल्य हरपवतंय, कुतूहल निपटून काढतंय, त्यांच्या आनंदाला विरजण लावतंय आणि त्यांची सारी ज्ञानेंद्रियं आणि कर्मेंद्रियं बधीर करतंय, ते शिक्षण काय कामाचं? पण असं शिक्षण सोसायची सवय झालेल्या समाजानं हे लक्षात घ्यायला हवं की, मळवाटांनी जाणं शरीराला सुखावह अणि मनाला कमी आव्हानात्मक असलं, तरी त्या चाकोऱ्यांनी जाताना तीच तीच ठराविक दृश्यं दिसणार. वेगळं दृश्य दिसण्याची आकांक्षा धरून चाकोऱ्यांनी जाणं म्हणजे स्वतःची शुद्ध फसवणूक आहे.

## लोकचळवळ हवी--

म्हणूनच शिक्षणातील प्राथमिकतेबद्दलचे विचारच बदलायला हवेत. लाखो मुलांना मूलभूत प्राथमिक शिक्षण मिळण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसताना उच्च शिक्षणावर खर्च करणाऱ्यांना, माध्यमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे प्रयत्न करण्याऐवजी नवोदय विद्यालयं काढणाऱ्यांना, स्मरणाधिष्ठित परीक्षांची नालस्ती करूनही तीच परंपरा पुढं चालवणाऱ्यांना आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या गाभ्यातून तत्त्वांची तोंडपाटिलकी करणाऱ्यांना आपण कोण आणि कधी रोखणार आहोत? लोकशक्ती आणि लोकचळवळ यांचं सामर्थ्य अतुलनीय आहे. नर्मदा घाटीतल्या अडाणी लोकांच्या शक्तीच्या प्रभावामुळं एकूण धोरणाचा पुनर्विचार सरकारला करावा लागत आहे. वृक्षतोडीविरुद्धच्या चिपको आंदोलनानं बलशाही सरकारही हतबल झालं. लोकचळवळीच्या प्रभावामुळंच संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला. ही उदाहरणं आपण लक्षात घ्यायला हवीत. ही मोठी उदाहरणं बाजूला ठेवली, तरी वर्तमानपत्रांतून येणाऱ्या बातम्या आपल्यापर्यंत लोकसामर्थ्याची आणि लोकचळवळीची शक्ती पोचवत असतात. खेड्या-पाड्यांतल्या प्राथमिक शाळांतले काही शिक्षक शाळेत शिकवत

नाहीत, हे लक्षात आल्यावर आपल्या पोराबाळांच्या शिक्षणाचं काय होणार असं वाटून काही खेडूत मंडळींनी शाळेला कुलूप ठोकलं आणि ''गुरुजी, हे असं चालायचं नाही. नीट शिकवायसाठी तुम्हाला नेमलंय.'', असं सुनावलं. काही खेड्यांतील लोकांनी ''तुम्ही परत जावा. आम्हाला तुमची गरज नाही. आम्ही आमच्या पोरांचं शिक्षण करू'', असं सांगितलं. लोकशक्तीची ही अग्निशिखा आपल्याला प्रत्यक्ष भिडल्याशिवाय राहणार नाही याची प्रचीती आलेले गुरुजी ठिकाणावर आले. शिक्षणात आवश्यक असणारं परिवर्तन घडवण्यासाठी शासनात आवश्यक ती 'इच्छाशक्ती' नाही, असं नेहमी बोललं जातं. इच्छाच नसल्यामुळं शक्ती नसते हे बरेचदा आपण लक्षात घेत नाही; म्हणूनच आता लोकांनीच देशात उभ्या राहू पाहणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या शैक्षणिक प्रायोगिक प्रयत्नांना हार्दिक आणि सक्रिय सहकार्य करणं जसं महत्त्वाचं आहे, तसंच आजचं हे निष्प्रभ शिक्षण तेजोमय व्हावं, स्वतंत्र देशाच्या स्वतंत्र अस्मितेला साजेसं व्हावं म्हणून तुमच्या-माझ्या आणि आपल्या शक्तीतून आपण शिक्षणपरिवर्तनासाठी आवश्यक इच्छाशक्ती शासनात निर्माण करायला हवी. ठामपणानं आपण बजवायला हवं की,

*हे असे असले तरीही*
*आता असे असणार नाही*
*दिवस अमुचा येत आहे*
*तो घरी बसणार नाही.*



# शिक्षणव्यवस्था आणि मुलांचे हक्क

## शिक्षण आणि मुलांचा विकास

मुलांचा अधिक चांगला विकास व्हावा म्हणूनच शिक्षणाची व्यवस्था निर्माण झाली असं आपण मानतो. बहुधा सयिस्कररीत्या आपण तसं मानीत असू. शिक्षणव्यवस्थेत अजिबात अशा बाबींचा समावेश झाला नाही किंवा फार अल्प काळ ज्यांचा समावेश झाला त्यांचा जो विकास होतो (आणि काही वेळा तर शिक्षण घेणाऱ्यांहूनही जो आपल्या अधिक प्रत्ययाला येतो) तो कशामुळं होतो? म्हणजेच मुलांचा विकास करणारी शिक्षण हीच एकमेव व्यवस्था आहे, असं नाही; अगर ज्याला 'शिक्षण' म्हणता येईल, पण ज्या शिक्षण म्हणून ओळखल्या जात नाहीत अशा पर्यायी व्यवस्था समाजात उपलब्ध असतात असा याचा अर्थ करता येईल का? ते काहीही असलं, तरी ज्या व्यवस्थेची निर्मिती मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणूनच केली जाते आणि ज्यावर राष्ट्रीय उत्पन्नापैकी बराचसा निधी खर्च केला जातो, त्या शिक्षणव्यवस्थेमुळं मुलांचा सर्वांगीण विकास कितपत होतो, होत नसल्यास त्याची कारणं कोणती, विकासाला पोषक वातावरणाऐवजी मारक वातावरण तर या व्यवस्थेत नाही ना; आणि तसं वातावरण असल्यास त्याबद्दल आपण काय करणार आहोत असे प्रश्न सार्वजनिक व्यासपीठांवरून फारसे चर्चिले जात नसले, तरी ते महत्त्वपूर्ण आहेत.

## मुलांना हक्क असतात?

मुलांचे हक्क हा शब्दप्रयोग ऐकल्याबरोबर मूल कोणाला म्हणावं असा प्रश्न मनात येतो. या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी एखाद्या आधारभूत दस्तऐवजाचं साहाय्य घेणं बरं ठरेल. अलीकडील असा एक दस्तऐवज म्हणजे १९८९ साली युनोच्या सर्वसाधारण सभेत सादर केला गेलेला

मुलांच्या हक्कांविषयीचा मसुदा. या मसुद्यातील पहिल्याच कलमानुसार मूल म्हणजे १८ वर्षांखालील प्रत्येक मनुष्य असं म्हटलं आहे. जन्मल्यापासून १८ वर्षांपर्यंतच्या कालावधीचा विचार केला तर जन्मल्यापासून साधारणपणं इयत्ता बारावी अखेरपर्यंतचं शिक्षण म्हणजे मुलाचं शिक्षण असं म्हणता येईल. या कालावधीत मूल सर्वांगानं वाढत असतं, बहरत असतं, फुलत असतं. त्याच्या शरीराप्रमाणंच त्याच्या कुतुहलाच्या कक्षा रुंदावत व उंचावत असतात. त्याच्या साऱ्या इंद्रियांना सृष्टीतील नानाविध बाबी साद घालत असतात. त्याचा कार्यकारणभाव निर्माण होत असतो. असं का आणि तसं का नाही असे प्रश्न उमटत असतात. स्वत्वाची जाणीव हळूहळू आकार घेत असते. चांगलं-वाईट पारखावं असं वाटत असतं. प्रत्यक्ष वस्तुस्थिती आणि वाचले जाणारे, ऐकू येणारे आणि बोलले जाणारे शब्द यांचा तुलनात्मक विचार मनात डोकावू लागतो. असे हे सारे बदल मनोभूमीत घडत असता मुलाच्या निकटच्या सान्निध्यात येणारी कुटुंबातील मंडळी आणि शिक्षक यांच्या मनात शिक्षण आणि विकास, तसंच विकास आणि व्यवस्था यासंबंधीच्या मूलभूत संकल्पनांत अंतर्विरोध असेल, तर मुलाच्या विकासाला हातभार लागण्याऐवजी अडसर निर्माण होऊ शकतात, असं सभोवारचं वास्तवं सांगतं.

## काही हक्कांची अशी ही फरफट--

वर उल्लेखिलेल्या युनोच्या मसुद्यात समाविष्ट झालेल्या मुलांच्या काही हक्कांचा थोडा विचार करू या. कलम १२ प्रमाणे ज्या बाबींचा मुलांवर परिणाम होणार असतो, अशा सर्व बाबींविषयी स्वतःचा दृष्टिकोन तयार करण्याचा आणि तो दृष्टिकोन मोकळेपणानं मांडण्याचा हक्क मुलाला आहे. या हक्काची जाणीव ठेवून आपण पालक-शिक्षक वागतो का? किंबहुना मुलाला हा हक्क आहे याची जाणीव आपल्याला असते का? या संबंधात एक ठळक उदाहरण मांडणं महत्त्वाचं वाटतं. प्रसंग आहे एका नामांकित शाळेतला. मुला-मुलींची शाळा. इयत्ता ८ वी साठी 'हादगा' हा एक 'सांस्कृतिक' उपक्रम करण्याचं शाळेनं ठरवलं. ज्या काळात मुलींना शिक्षणाची किंवा बाहेरच्या जगाशी दुवा साधायला फारशी संधी नव्हती, त्या काळात हादग्यासाठी फळं-फुलं जमवण्याकरिता भटकणं, त्यांच्या माळा करणं, मुक्तपणं गाणी म्हणणं, नाचणं, खिरापती करणं किंवा करण्यास मदत करणं, हादगा बोळवायला सर्व मुलींनी मिळून लांब कुठंतरी जाणं या साऱ्याला काही विशेष अर्थ असेलही. एवढंच नव्हे, तर आजही हा उपक्रम मुलां-मुलींतील भेदभाव दूर करणं, त्यांच्यातील बौद्धिक किंवा कौशल्यात्मक सृजनशीलतेला वाव देणं, परस्परांत सौहार्द निर्माण करणं आणि ते वाढवणं, सामुदायिक जबाबदारीची जाणीव जागवणं - अशी उद्दिष्टं समोर ठेवली, तर महत्त्वपूर्ण ठरू शकेल. परंतु त्या नामांकित शाळेनं हा उपक्रम इयत्ता ८ वीतल्या फक्त मुलींसाठी म्हणून जाहीर केला. त्या वर्गातली एक मुलगी म्हणाली, "मुलांनाही यात का नाही घ्यायचं? आणि मुलं हादगा नाचायला येणार नसली, तर त्यांना खिरापतही मिळणार नाही." स्वतःवर परिणाम होणाऱ्या बाबींचा विचार करण्याची शक्ती मुलांच्यात असते आणि अशा बाबींबद्दलचे आपले दृष्टिकोन मांडण्याचा हक्क त्यांना असतो याची सुतराम जाणीव नसलेल्या शिक्षिका मुलीला म्हणाल्या, "काय बोलतेस? मुलं कधी हादगा नाचतात का? मुकाट्यानं उभी राहा." विरोध करणारी मुलगी मवाळपणं फेरात सामील जाली. फेरातली एक मुलगी गाणं म्हणू लागली,

*श्रीकांता कमलाकांता, असं कसं झालं?*
*वेड्या नवऱ्याचं घर माझ्या नशिबी आलं.*

पुन्हा एकदा ती बंडखोर मुलगी फेर तोडून बाहेर आली. म्हणाली, "मी नाही म्हणणार हे गाणं. एवढ्यात आम्हाला कशाला असली नवऱ्याची गाणी म्हणायला सांगता? नशीब आणि नवरा यांचा संबंधच काय?" नुसतंच विरोधाचं अकांडतांडव न करता मुलीनं उपायही सुचवला. ती पुन्हा म्हणाली, "आमच्या मराठीच्या पुस्तकात सोळा कविता आहेत. दर दिवशी वाढत्या संख्येनं आम्ही त्या कविताच म्हणतो ना. कशाला ही असली घाणेरडी गाणी?" मुलीचं हे प्रकरण पार वरपर्यंत गेलं. अपवादात्मक असणाऱ्या मुलीची आईही अपवादात्मक आहे. तीही मुख्याध्यापकांपर्यंत पोहोचली. परिणाम काय झाला? एक सांस्कृतिक उपक्रम म्हणून हादग्याचा विचार झाला का? त्या उपक्रमाला

नवीन परिमाण देता येईल असं कुणाला वाटलं का? तसं न होता एक विचित्र मुलगी आणि तिचे विचित्र पालक यांच्या हट्टाखातर त्यांना हादग्यातून सुटका मिळाली. (हेही आजच्या परिस्थितीत विशेषच मानावं लागेल.) या मुलीच्या काही मैत्रिणी तिच्याशी सहमत होत्या; पण आपला दृष्टिकोन मोकळेपणानं सांगण्याचं धैर्य त्यांच्यात नसल्यामुळं त्यांच्या सांस्कृतिक विकासाला शाळेनं हातभार लावला. मुलाला मतं असू शकतात हे मान्य करणं प्रौढांना परवडण्यासारखं नसतं आणि म्हणूनच 'त्यांना काय समजतं? ती लहान आहेत.' असं म्हणून आपण शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाच्या पुढील बाबी साफ नाकारतो. १) आजूबाजूला घडणाऱ्या प्रसंगांचा आणि सांगितल्या जाणाऱ्या माहितीचा मूल विचार करतं. २) त्या विचारांतून त्याचे त्याबाबतचे स्वतःचे दृष्टिकोन तयार होतात. ३) ते दृष्टिकोन मांडण्याचा त्याला अधिकार असतो. या तिन्ही बाबी नाकारण्याचे परिणाम केवळ हादग्यासारख्या नैमित्तिक उपक्रमावरच होतात असं नव्हे, तर दैनंदिन घटनांवरही होतात. लेखनाचे विषय विद्यार्थ्यांनी सुचवायचे नसतात किंवा ते सुचण्याची क्षमता त्यांच्यात नसते असं आम्ही प्रौढांनी गृहीतच धरलेलं आहे. प्रौढ चुकू शकतात आणि ती चूक मुलांनी दाखवून देण्यात काहीच गैर नाही हेही मला-तुम्हाला मान्य नाही. एका शाळेत इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना शिकवताना शिक्षकानं 'पागोटं' याचा अर्थ 'पायात घालायची चप्पल' असा सांगितला. हा अर्थ ऐकून एक 'चमकदार' मुलगा हसला. "का हसलास?" असं विचारल्यावर, "अर्थ चुकीचा आहे." असंही म्हणण्याचा उद्धटपणा त्यानं केला! अर्थात यासाठी त्याला भरपूर किंमत द्यावी लागली हे उघडच आहे. हाच मुलगा वर्गाचा मॉनिटरही आहे. कोणत्या मुलाला काय शिक्षा दिली होती व ती त्यानं घेतली की नाही याची नोंद करण्याची जबाबदारी त्याच्यावर आहे. नोंदी करताना केवळ कोणत्या दिवशी कोणाला, कसली शिक्षा झाली किंवा कोणी, कोणता गृहपाठ करून आणला की नाही, याचीच नोंद न करता त्यानं इतरही काही विधानं लिहिली. उदाहरणार्थ, १) शिक्षा स्वीकारतो; पण तो फार हळवा आहे. २) शिक्षा स्वीकारताना त्याला काहीच वाटत नाही. ३) सतत त्याच त्याच शिक्षा देण्याने सुधारणा होईल का? ही विधाने वाचल्यावर रूढ



शिक्षकपण दुखावले. "नको त्या नोंदी करण्याची उचापत करायला कोणी सांगितलं होतं? जादा शहाणपणा दाखवू नकोस." याच मॉनिटरचं अज्ञान असं की, त्यानं मुलग्यांप्रमाणंच मुलींबद्दलही नोंदी केल्या की हो! वर्गाचा मॉनिटर हा मुला-मुलींचा असतो अशी त्याची भाबडी समजूत! ही समजूतही त्याच्या शिक्षकांनी दुरुस्त केली! हे जे घडलं ते मुलांच्या हक्कांच्या सनदेतील २९ व्या कलमाशी मुळींच सुसंगत नाही. त्या कलमात एकूण पाच बाबी आहेत. त्यापैकी पुढील दोन मुद्द्यांच्या संदर्भात वरील प्रसंग तपासून पाहण्यासारखा आहे. कलम २९ ब याप्रमाणं शिक्षणातून मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्य याबद्दलचा आदर मुलांत विकसित व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे आणि त्याच कलमातील ड प्रमाणं शिक्षणामुळं मुक्त समाजव्यवस्थेतील जबाबदार आयुष्यासाठी मुलाची तयारी व्हावी, तसंच शांतता, सहिष्णुता आणि लिंगभेदातील समता याबाबतचं त्याचं आकलन वाढावं अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. वरील नामांकित शाळेतील शिक्षकांनी मॉनिटरबाबत जे वर्तन केलं, त्यामुळं मानवी हक्क आणि स्वातंत्र्य याबद्दलचा मुलाचा आदर वाढला असेल का? लिंगभेदातील समतेबद्दलचा विश्वास निर्माण झाला असेल का? या मुलाची आई या संदर्भात बोलण्यासाठी मुख्याध्यापकांकडं गेली. आईला काय उपदेश केला गेला? "असल्या लहानसहान गोष्टींत लक्ष घालायला आम्हाला वेळ कुठं असतो? तुम्हीही घालत जाऊ नका." मुलांच्या हक्कांच्या संदर्भात ज्या मसुद्यांसंबंधी आपण बोलत आहोत त्यातील १४-२ ह्या कलमात म्हटलं आहे की, "State partiesshall respect the rights and duties of the parents to provide direction to the child in the exercise of his/her right in a manner consistent with the evolving capacities of the child."

मुलांच्या वाढत्या क्षमतांच्या विकासात शाळेची मदत होत नाही या अवस्थेतून त्या क्षमतांना योग्य दिशा देण्यासाठी आई शाळेत गेली होती; परंतु पालक म्हणून तिच्या हक्कांचा आणि कर्तव्याचा आदर शाळेकडून केला गेला नाही.

मूल म्हणजे केवळ शरीर नसतं. त्या शरीरात एक मन/आत्माही

असतो. मुलाची बहुविध कृत्यं केवळ शाळेत शिकलेल्या माहितीतून निर्माण होत नाहीत. जी सांस्कृतिक, राष्ट्रीय व इतर मूल्यं मूल आत्मसात करतं, त्यातूनही त्याच्या अनेक कृती होत असतात. या मूल्यांच्या खाणाखुणा निपटून टाकण्याचा अट्टाहास 'शालेय शिस्त' या नावाखाली का केला जावा? मुलींनी बांगडी घालणं अथवा न घालणं, तसंच कुंकू लावणं अथवा न लावणं आणि केस कापणं अथवा न कापणं यांवर शालेय शिस्त कशी काय अवलंबून असते? विद्यार्थी या नात्यानं वाचन, लेखन, खेळ अगर इतर कोणतेही शालेय कामकाज करताना ज्याची अडचण होईल अशी केशभूषा, वेशभूषा अगर अलंकार यांबद्दल शाळेनं नियम केले तर ते समजण्यासारखं आहे. बांगड्यांचा खळखळाट असू नये, दररोज नवनवीन अलंकार घालून त्यांमध्ये स्वतः गुंतून इतरांना गुंतवू नये हे खरं; परंतु 'भारतीय संस्कृतीचं रक्षण' या बिरुदाखाली बांगडी नाही म्हणून मनगटावर सुतळी बांधणं आणि कुंकू लावलं नाही म्हणून लाल शाईचा धब्बा लावणं यांमुळं आपण भारतीय संस्कृतीबद्दलचं प्रेम निर्माण करत आहोत, की नफरत? शिवाय मुलाचा आत्मसन्मान जोपासत आहोत, की तो उखडून टाकत आहोत?

## विश्रांती आणि फुरसदीचा हक्क--

याच संदर्भात कलम ३१ (१) चा उल्लेख योग्य ठरेल. मुलाला विश्रांती आणि फुरसत घेण्याचा हक्क आहे, असं मसुद्यात बजावावं का लागलं? करून न आणलेल्या गृहपाठाची पूर्तता होण्यासाठी मुलाची मधली सुट्टी वापरणारे शिक्षक पाहिले किंवा दिवसभरातील कंटाळवाणं कामकाज सहन करून घरी गेल्यानंतर संध्याकाळी मित्रांबरोबर खेळण्यापासून मुलांना वंचित करणारे पालक बघितले की, हक्क म्हणून फुरसत व विश्रांती यांची नोंद का झाली असेल हे लक्षात येतं. त्याचप्रमाणं काही शाळांत दुपारच्या सुट्टीत कोणत्या इयत्तेनं, कोणत्या दिवशी, कोणता खेळ खेळायचा याचंही वेळापत्रक असतं आणि ते त्या इयत्तेतील सर्वांना सक्तीचं असतं! मुलं म्हणजे सर्वकाळ शिक्षकसंचलित/पालकसंचलित 'रोबोज' आहेत असं आपण मानतो की काय? आणि अशा या क्रूर, निर्मम वातावरणाविरुद्ध मुलांनी कोणत्याही



प्रकारे विरोध दर्शवला की एक मनुष्य म्हणून त्याला जी प्रतिष्ठा असते ती धुळीला मिळेल अशा शिक्षा वर्गात/ वर्गाबाहेर किंवा घरांतही फर्मावल्या जातात. मुलांची शरीरं आणि मनं आज जायबंदी आहेत! पण आम्हाला त्याची काय पर्वा? पालकांचे आणि शिक्षकांचे एकमेव लक्ष्य म्हणजे परीक्षेत मुलांना मिळणारे गुण, शिष्यवृत्त्या, झळकणारी नावं, होणारे सत्कार! आपल्या अपेक्षांच्या पूर्तीसाठी आपण मुलांना बळी देत आहोत. तसं करण्याचा आपल्याला अधिकार आहे काय?

## सृजनशीलतेचे खच्चीकरण--

आजच्या शिक्षणव्यवस्थेबद्दलची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे सृजनशीलतेचे खच्चीकरण. मुलांनी स्वतः निरीक्षण करावं, शोधावं, विचार करावा, समजून घ्यावं आणि स्वतःला जे समजलं ते स्वतःला आवडेल त्याप्रमाणं मांडावं, अशी इच्छाच ठराविक प्रश्नोत्तरांच्या ताठर दडपणाखाली नष्ट होत जाते. 'सर्वांगीण विकास' हा शब्दप्रयोग आपण वरचेवर करत असलो, तरी विकासाच्या सर्व अंगांना आपल्या दृष्टीनं समान मूल्य नसतं.

*परीक्षेत परीक्षा बोर्डाच्या परीक्षा*
*बाकी सगळ्या गोष्टी कुचकामाच्या*

ही घोषणा शिरोधार्य मानून इ. १० वी, १२ वीच्या परीक्षांत शाळेत किंवा बोर्डात अधिक गुण मिळवणाऱ्या मुलांची नावं आपण झळकवतो. परीक्षा महत्त्वाच्या असल्याच तर इ. १ ते ९ मधल्या विशेष गुण मिळवणाऱ्यांची नावं आपण का लिहीत नाही? इंग्रजी, गणित या विषयांप्रमाणंच खेळ, शिवण, हस्तकला या विषयांना का महत्त्व देत नाही? मुलांचे अहवाल लिहिताना वर्षभरात झालेले महत्त्वपूर्ण बदल आपण का नोंदत नाही? तसंच मुलांच्या शोधनक्षमतेला वाव म्हणून त्यांच्यात झालेले बदल त्यांनाच शोधायला सांगून आपल्या निरीक्षणाशी ते का ताडून पाहत नाही? या वर्षी इ. २री च्या मुलांना ११ जून ९३ ते १६ मार्च ९४ या दहा महिन्यांत त्यांच्यात झालेले बदल त्यांनाच नोंदायला सांगितले होते. काही मुलांच्या नोंदी आपण पाहू.

माझी भुताची भीती गेली. जरासा गुटगुटीत झालो.

सायकल चालवायला लागलो. मिळूनमिसळून खेळायला शिकलो. चित्रकलेत नंबर आला. दोन दात पडले.

-- ओंकार

माझे केस आता मला विंचरता येतात. माझी मला सायकल चालवता येते. पहिलीत मला चित्रं काढायचा कंटाळा येत होता. आता मला कंटाळा येत नाही.

-- अर्चिस सबनीस

या शिवाय मुलांनी १) माझ्या शुद्धलेखनाच्या चुका सुधारल्या, २) मी आता गोष्टी तयार करून लिहितो, गोष्टी वाचतो, ३) मला आता दोरीच्या उड्या मारता येतात, ४) आता मी छान दात घासतो, ५) पहिलीत मी वहीची पाने फाडत होतो; आता फाडत नाही, ६) मी आता मारामारी करत नाही, ७) मी आता शांत बसायला शिकलो, ८) भरभर लिहायची सवय झाली, ९) पहिलीत रडत होते; आता रडत नाही, १०) मला पहिलीत तीळ नव्हता, आता आला, अशा नोंदी केल्या आहेत. या नोंदी आपल्याला काय सांगतात? शाळेच्या एकूण वातावरणात केवळ पुस्तकी अभ्यासाला महत्त्व नसेल, तर लहान मुलंही चिकित्सक वृत्तीनं स्वतःत झालेले बदल शोधू शकतात. किंबहुना शिकवणाऱ्या शिक्षकांच्या कदाचित लक्षात येणार नाहीत, असेही बदल मुलं नोंदतात. वाढणाऱ्या इयत्तेप्रमाणं मुलांच्या समजशक्तीत बदल होतो याचाही पुरावा सृजन-आनंद विद्यालयातल्या इयत्ता ४ थी च्या मुलांकडून मिळतो. काही नोंदी पाहू :

१) व्यायाम करताना आता हात अगदी ताठ राहू लागले. वेगवेगळे तक्ते स्वतःहून घरून करून आणू लागले. चित्रकला, शिवण छान करू लागले - सोनल.

२) व्यायाम आता व्यवस्थित करता येतो. भांडण्याची सवय बंद झाली. शाळेच्या वस्तू सांभाळायला लागले. वर्गाची स्वच्छता करायला शिकले. न कंटाळता खूप वेळ अभ्यास करते - प्रीती.

३) अजूनही अभ्यासात कच्ची आहे. वागण्यात व्यवस्थितपणा वाढला आहे - सुनयना.

४) आता पहाटे उठतो. थोडा शांत झालो आहे. खूप आणि पटपट अभ्यास करू लागलो आहे - स्वप्निल.

५) इयत्ता ३ रीत चिडत होतो; आता चिडत नाही. पूर्वी रडत, मारामारी करत होतो; आता करत नाही - राजगुरू.

६) मैदानी खेळ खेळत नव्हते, आता खेळते. पूर्वी रात्री दात घासत नव्हते; आता घासते. पूर्वी अभ्यास करत नव्हते; आता करते --गायत्री.

## मुलांनाही मानवी प्रतिष्ठा हवी--

आंतरराष्ट्रीय बालक वर्ष उलटून बरीच वर्षं झाली. त्या वर्षाच्या निमित्तानं अनेक लेख, कविता, नाटुकली, आकडेवारी प्रसिद्ध झाली; पण हे सारं क्षणकाल चमकणाऱ्या फुलबाजीच्या प्रकाशासारखं ठरलं. मुलांच्या विकासाची वाट सुस्पष्ट दाखवण्यासाठी किंवा मूल आणि मूलपण यांच्याविषयीच्या प्रौढांच्या कल्पनांना योग्य दिशा दाखवण्यासाठी हा प्रकाश पुरेसा ठरला नाही. खरं तर आपल्या महाराष्ट्रातील यासंबंधीचं चित्र आशादायक म्हणायला हरकत नाही. ज्याच्या स्थापनेला २६ वर्षं झाली, तो 'महाराष्ट्र पालक-शिक्षक संघ' कार्यरत आहे. 'पालकनीती'सारखं मुखपत्र दहा वर्षं प्रसिद्ध होत आहे. 'साप्ताहिक सकाळ'सारख्या नियतकालिकात 'शिक्षण घ्या शिक्षण'सारख्या लेखमाला प्रसिद्ध होत आहेत. मुलांच्या हक्कांची जाणीव ठेवून काम करण्याच्या प्रयत्नांत असणाऱ्या 'अक्षरनंदन, फुलोरा, सृजन-आनंद विद्यालय'सारख्या संस्था तगून आहेत, ही आशेची पालवीच नाही का? परंतु मनमानी पद्धतीनं काम करणाऱ्या शिक्षणसंस्थांतील रीति-रिवाजांची धग ही पालवी कधीच कोळपून टाकेल. भारताच्या घटनेनं शिरोधार्य मानलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय अशा मानवी प्रतिष्ठेच्या चतुःसूत्रीला डावलून 'हम करें सो कायदा', असं वागणाऱ्या संस्थांना जबाबदार नागरिक, सुजाण पालक आणि मानवी प्रतिष्ठेविषयी आस्था असणारी एक व्यक्ती म्हणून आपण त्याबाबत कृतिशील प्रतिरोध करणार नसलो, तर तुमची-माझी मुलं-बाळं हृदयशून्य यंत्रमानव बनतील काय? शिक्षणसंस्थांतली ही परिस्थिती बदलण्याच्या एकजुटीच्या प्रयत्नासाठी आवश्यक ते साहस आपण मिळवायला हवं. शाळेत मुलाला त्रास होईल, त्याच्यावर दात धरतील असा तात्पुरता विचार करून आपण

आपल्या मुलाचा भविष्यकाल उज्ज्वल करण्याचा प्रयत्न करत असलो, तरी अनेक मुलांचं वर्तमान आपण काळंकुट्ट करत आहोत हे लक्षात घ्यायला हवं. People get the Government they deserve असं म्हटलं जातं. ही उक्ती शाळेबाबतही खरी म्हणायची का? माजी अर्थमंत्री श्री. मधु दंडवते यांनी एके ठिकाणी Though our liberty is dead today it will be restructured through determined efforts of the prople. Your lordship, my freedom is dead; long live your freedom. असं म्हटलं होतं. त्याचप्रमाणं आज माझ्या मुलां-बाळांचे हक्क पायदळी तुडवले जात असले, तरी आपणच ते हक्क शाबूत राहतील अशी परिस्थिती निर्माण करणार आहोत, हे लक्षात ठेवू या.



# शिकण्याचा हक्क जोपासणाऱ्या शाळा हव्यात

## शिकण्याचा मूलभूत हक्क--

प्रत्येक मुलाला जे जन्मजात हक्क प्राप्त होतात असं आपण मानतो, त्यातला एक प्रमुख हक्क म्हणजे शिक्षणाचा हक्क. जात, धर्म, भाषा, लिंग असा कोणताही अडसर त्याच्या शिक्षणात येता कामा नये अशी आपली धारणा आहे. सर्वश्री शंकरराव खरात, लक्ष्मण माने, दया पवार किंवा आनंद यादव यांना शिक्षणाचा हक्क मिळावा म्हणून जी 'झोबी' घ्यावी लागली, ती इतर मुलांच्या वाट्याला येऊ नये म्हणून स्वतंत्र भारताची घटना तयार करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेनुसारच चौदा वर्षांपर्यंतचं शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचं असावं, असं घोषित केलं. स्वातंत्र्याची ४६ वर्षं उलटली, तरी अजूनही ही घटनात्मक तरतूद साकार झालेली नाही. अशा टप्प्यावर आपण शिक्षणाचा हक्क आणि शिकण्याचा हक्क या बाह्यतः एकाच अर्थाच्या भासणाऱ्या संकल्पना एकच आहेत का, हे समजून घेणं जरूर ठरतं आहे.

## शिकण्यासाठी आक्रोश--

प्रथमतः माझ्याजवळ असलेली दोन वेगवेगळ्या व भिन्न ठिकाणच्या शाळांतील अनुक्रमे इयत्ता पाचवी व इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची पत्रं किंवा त्यातील काही भाग आपल्या विचारार्थ देत आहे.

''हा आमचा अपमान आहे. होय सर, तुम्ही आमचा अपमान केलाय. आमच्या सासूबाई रागावतील, आमचा नवरा रागावेल असं न म्हणता तुम्ही नीट शिकवलं, तर सी. व्ही. रामन् यांच्याहून हुशार अशी मुलं-मुली तयार होतील. तुम्ही काय समजता? सर्वात हुशार तुम्हीच? अहो, तुम्हाला प्रश्नांची उत्तरं माहीत असतील; पण निबंधांची जादूकरणी तुमच्यात नाही. मला माहीत आहे. 'पावसाळ्यातील एक दिवस' काय 'क्यूट' विषय आहे. त्यावर

लिहिताना स्वतःच्या अनेक गमती-जमतीच्या अनुभवांनी तो नटवायचा की, पावसामुळं झालेल्या नुकसानीत त्याला मिसळायचं? अनेक चित्तरम्य प्रदेशात आम्हा मुलांना जाता येतं; तिथल्या सुंदर चित्रांशी खेळता येतं. तुम्ही जे जग पाहिलं नाही ते जग आम्ही पाहिलंय सर. आम्ही मुलं शब्दनगरीत, कल्पनेच्या अवाढव्य वृक्षावरदेखील जाऊन आलो आहोत. आम्हाला त्या सर्व नगरांमध्ये जाऊ द्या, सर! उत्तेजन द्या; पण प्रश्नांची उत्तरं पाठ करायला सांगू नका. सर, तसं सांगू नका.''

आता तिसरीतल्या विद्यार्थ्याच्या पत्रातील काही भाग--

''आमच्या वर्गात खूप मारामारी चालू असते. खेळायला तर सोडतच नाहीत. बाई आम्हाला गणितं, पाढे लिहायला सांगून शाल पांघरून खुर्चीवर बसल्या-बसल्या झोपतात. आमच्या बाई फार कडक आहेत. बाईंना काही शंका विचारायला गेलो, तर बाई एकदम ओरडतात आणि आम्हाला 'ओरडू नका रे' असं म्हणतात. आमच्या शाळेत कवायत, खेळ, गोष्टी, नाच, नाटक काहीच नाही. शाळेत रोज पाढे, शुद्धलेखन, फळ्यावरची गणितं असतात. बाई फळ्यावर काही प्रश्न-उत्तरं लिहून देतात. हाच आमच्या शाळेचा अभ्यास. त्यामुळं मला शाळेत मजा वाटत नाही. आमच्या बाई खूप मारतात, ओरडतात; म्हणून आम्ही त्यांना मशिनगन तोफ म्हणतो.''

काय वाटलं तुम्हाला मुलांची ही पत्रं वाचून? मला तर 'आक्रोश' या चित्रपटाची आठवण झाली. प्रचंड ताकदीच्या शिक्षणयंत्रणेविरुद्ध काही बोलू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांचा हा मूक आक्रोश आहे, असं मला वाटलं. त्याच्यांविषयी करुणा वाटली. त्यांच्या वतीनं आपण बोलायला हवं असं वाटलं.

## शिकणं म्हणजे--

१९८५ साली पॅरिस इथं जी 'आंतरराष्ट्रीय प्रौढ शिक्षण परिषद' झाली, त्यात 'शिकण्याचा हक्क' याचं जे विवरण करण्यात आलं होतं, त्याचा संदर्भ मनापुढं तरळला. कसं विवरण केलं होतं या परिषदेत? शिकण्याचा हक्क म्हणजे काय हे सांगताना त्या परिषदेत पुढील बाबींची नोंद केली आहे.

१) वाचणं, लिहिणं आणि गणितं करणं.



२) प्रश्न विचारणं आणि विश्लेषण करणं.

३) कल्पना करणं आणि निर्माण करणं.

४) स्वतःचं वास्तव्य जग समजून घेणं.

५) व्यक्तिगत आणि सामूहिक कौशल्यांचा विकास करणं.

## शिक्षणात विचारप्रक्रिया महत्त्वाची--

वरील प्रत्येक बाब शिक्षणसंस्थांतून बालकांना, किशोरांना, कुमारांना अथवा तरुणांना जे शिक्षण मिळतं, त्याच्याशी निगडित आहे - निदान असायला हवी. 'शिक्षणाची आव्हाने' व त्यानंतर प्रसिद्ध झालेलं 'शिक्षणाचं राष्ट्रीय धोरण' या दोन दस्तऐवजांचं श्रेय माजी पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांच्याकडे जातं. इ. स. १९८५ ते १९८७ या काळात तत्कालीन पंतप्रधानांनी जी वेगवेगळी भाषणं केली त्यातही त्यांनी देशातील शैक्षणिक दुरवस्थेचं चित्र मांडून त्याबद्दलचे विचार व्यक्त केले, होते. दिनांक २९ ऑगस्ट १९८५ रोजी विविध राज्यांच्या व केंद्रशासित प्रदेशांच्या शिक्षणमंत्र्यांची जी परिषद नवी दिल्ली इथं झाली, त्याचं उद्घाटन करताना श्री. राजीव गांधी म्हणाले, ''आजची शिक्षणपद्धती विचारप्रक्रियाच थांबवून टाकते. प्रश्न विचारण्याला प्रतिबंध करते. लहान मुला-मुलींना प्रश्न विचारण्याला उत्तेजित करणारं, न समजणारा भाग नुसता पाठ करून न टाकता शिक्षकानं तो स्पष्ट करावा असं सांगण्याची हिम्मत देणारं शिक्षण असायला हवं. शिक्षकानं विद्यार्थ्यांशी बोललं पाहिजे. या प्रकारच्या बदलाला पैशांची गरज नाही, वृत्तिबदलाची आवश्यकता आहे. . . बौद्धिक बाबतीत आक्रमक मन तयार करण्याचं काम शिक्षणामार्फत झालं पाहिजे. मेकॉलेनं सुरू केलेल्या व आजवर चालत आलेल्या शिक्षणानं लोकांना जीवनापासून आणि राष्ट्रांच्या गरजांपासून तोडलं आहे. . . आपल्याला सर्व काही माहीत आहे, असा स्वतःबद्दलचा आभास शिक्षकांनी तयार करण्याचं काहीच कारण नाही. जो केवळ ठराविक माहिती देतो, तो चांगला शिक्षक नव्हे. जो विचाराचा स्फुल्लिंग चेतवतो, विद्यार्थ्यांतील उत्तम ते फुलवतो, तो खरा शिक्षक. आज दुर्दैवानं असे शिक्षक कमी आहेत. . .'' पंतप्रधानांचे हे विचार शिक्षण घेता-घेता विद्यार्थ्यांना शिकता कसं येईल हे समजण्यासाठी उपयुक्त आहेत.

शिक्षण विद्यार्थिकेंद्रित, आनंददायी असायला हवं याबद्दलही या दोन-चार वर्षांत बरंच बोललं गेलं. अनेक विचारवंतही हेच विचार आजही मांडत आहेत. प्रख्यात वैज्ञानिक डॉ. जयंत नारळीकर यांना जनमानसात विज्ञान लोकप्रिय करण्याच्या कार्याबद्दल दि. ८ ऑगस्ट १९९० रोजी पुरस्कार मिळाला. त्या वेळी त्यांनी जे भाषण केलं त्यातील पुढील काही विचार पाहा.

"आपल्या विभिन्न छंदांच्या व ज्यात विशेष रस आहे अशा विषयांच्या अभिव्यक्तीसाठी ऑक्सफर्ड व केंब्रिज विद्यापीठांत विद्यार्थ्यांनीच चालवलेले अनेक क्लब्ज आहेत. त्यांत सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांची जिज्ञासा त्यांच्या मर्यादित अभ्यासक्रमापलीकडील अनेकविध विषयांपर्यंत विस्तारते. तसेच आपल्या क्षेत्रात विशेष कुतूहलजनक अशा ज्या घटना घडल्या, त्याबद्दल माहिती देण्याची संधी त्या क्लब्जमुळं तज्ज्ञांना मिळते. आपल्या देशातील विद्यापीठांच्या किंवा महाविद्यालयांच्या आवारात असे क्लब्ज क्वचितच आढळतात, हे दुर्दैवाचं आहे. याचं एक कारण म्हणजे अभ्यासक्रमाचाच बोजा मोठा असतो आणि सारं काही आयतं तयार करून विद्यार्थ्यांच्या शिदोरीत बांधण्यात येतं. . . वाहन चालवण्याचा परवाना मिळणं आणि वाहन चालवण्यात वाकबगार असणं या जशा दोन विभिन्न गोष्टी आपल्या देशात आहेत, त्याचप्रमाणं प्रश्नांची उत्तरं देण्याचं तंत्र आणि विषयाचं सम्यक ज्ञान या दोन गुणांचा आपल्याकडं बिलकूल संबंध नाही." याच व्याख्यानात ते पुढं एके ठिकाणी म्हणतात, "घोकंपट्टीचं शिक्षण, कसलीही प्रेरणा नसलेलं अध्यापन आणि रद्दी पाठ्यपुस्तकं यांमुळं मुलांच्या मनात गणिताचा बागुलबुवा उभा राहतो. . . मुलांची आकलनशक्तीच कुंठित होते."

## खुराड्यात बागा कशा फुलणार?

डॉ. नारळीकर सांगतात ती विज्ञान आणि गणित या दोन विषयांची जी स्थिती आहे, तीच इतर विषयांचीही आणि शिक्षणाच्या सर्व स्तरांवरील शिकण्याची आहे हे थोडासा विचार केला, तर लक्षात येण्यासारखं आहे. माजी पंतप्रधान श्री. राजीव गांधी व ख्यातकीर्त वैज्ञानिक डॉ. जयंत नारळीकर यांच्यासारखी मंडळी जे सांगत आहेत, ते लक्षात घेऊन शिक्षणसंस्थांतील



प्रत्यक्ष वास्तवाकडं नजर टाकली तर काय दिसतं? पूर्वप्राथमिक शाळेपासून सर्वच स्तरांवर वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या व शिक्षकांची संख्या यांत काही सुयोग्य प्रमाण राहिलेलं नाही. कोल्हापूरसारख्या लहान गावातल्या पूर्वप्राथमिक शाळांतही साठ-साठ छोटी मुलं एकेका वर्गात असतात. 'शाळा म्हणजे बाग' (Kinder garden) म्हणणारा शिक्षणतज्ज्ञ आज अवतीर्ण झाला असता तर कदाचित या सगळ्या 'बागा' त्यानं उद्ध्वस्त केल्या असत्या! कितीही उत्साही, प्रतिभावान, हुशार शिक्षक असला, तरी वर्गाच्या छोट्याशा खुराड्यात कोंडलेल्या वय वर्षं अडीच ते चारच्या त्या साठ-पासष्ट छोट्यांना तो कसा फुलवू शकेल? साधनं, जागा आणि मुलं यांचं प्रमाण अशा खुराड्यात सुयोग्य कसं राहू शकेल? प्रत्येक बालकाच्या विकासाचा तपशील गोळा करत-करत त्याच्या विकासाला आवश्यक असणाऱ्या चेतना व प्रेरणा देण्याऐवजी बहुसंख्य मुलांना काही ठराविक दिनक्रमात बांधून ठेवण्याकडंच आजच्या शिक्षकाचा कल वळण्याची शक्यता नाकारता येईल का? एका शाळेतील सीनियर के.जी. च्या वर्गात व्यवसायमालेसाठी पंचवीस रुपये आणायला सांगितलं होतं. ज्या मुलांनी पैसे आणले नाहीत, त्यांची दप्तरं जप्त केली गेली. त्यांना मधल्या वेळचा डबा खायला दिला नाही. प्रत्येकाच्या तळहातावर 'व्यवसायमालेचे पैसे उद्या आणलेच पाहिजे' असं लिहिलं गेलं. घरी गेल्यावर प्रत्येक मुलानं आपला तळहात आईसमोर पसरला! ही मुलं 'शाळा' नामक संस्काराचा कोणत्या प्रकारचा ठसा घेऊन मोठी होणार आहेत? वय, वर्षं ० ते ५ हा कालावधी व्यक्तीच्या विकासाच्या दृष्टीनं सर्वाधिक महत्त्वाचा आहे यावर विश्वास ठेवून आपण पूर्वप्राथमिक शाळा काढत आहोत, असं म्हणण्याचं धाडस अशा बहुसंख्य शाळांतील दैनंदिन व्यवहाराकडं पाहून कुणी करेल का? सर्वसाधारण पूर्वप्राथमिक शाळांत आज मुलांच्या शिकण्याच्या आणि विकासाच्या हक्कांचं काय होत असेल? शिक्षणाचा (Schooling) आणि शिकण्याचा (Learning) हक्क यांतील आपण काय पुरवत आहोत?

## कविता कशी शिकवावी?

प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता खरोखरीच सुधारायची असेल, तर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा आणि खाजगी प्राथमिक शाळा यांचा

तौलनिक विचार करणं जसं महत्त्वाचं, तसंच, किंबहुना त्याहूनही अधिक महत्त्वाचं म्हणजे शिकणं म्हणजे काय या संबंधीच्या शासनाच्या, समाजाच्या व शिक्षकांच्या संकल्पनांचा विचार करणं. ह्या संकल्पना बदलण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाबद्दलचा आग्रह सर्वांनी लावून धरायला हवा. एक उदाहरण घेऊनच हा मुद्दा समजून घेऊ. या पूर्वीच्या इयत्ता चौथीच्या बालभारतीच्या मराठी विषयाच्या पुस्तकात 'इथे' नावाची प्रा. श्रीमती शांता शेळके यांची कविता आहे. असं समजू या की, ही कविता शिक्षकाला शिकवायची आहे. ही कविता शिकवताना ती कशासाठी शिकवायची, या प्रश्नाचा विचार शिक्षकानं केला पाहिजे. या प्रश्नाची कोणती उत्तरं येऊ शकतील?

१) क्रमिक पुस्तकात ती कविता आहे म्हणून.

२) कवितेखालील प्रश्नोत्तरं परीक्षेत उपयोगी पडतात यासाठी.

३) दुर्मिळ, स्थळ, आम्रतरू, अंबर अशा अनेक शब्दांना समानार्थी शब्द शिकवता येण्यासाठी.

४) चाचणी परीक्षेला ती आहे. मग काय करणार?

५) शांतता अतिशय आवश्यक असूनही आजकाल शांतता दुर्मिळ झाली आहे. जीव तापून जातो. एखाद्या निवांत अशा निसर्गरम्य ठिकाणची शांतता मन शांत करते - हे समजावं म्हणून.

यांतील शेवटचा हेतू सर्वाधिक महत्त्वाचा मानून सृजन-आनंद विद्यालयात ही कविता शिकवताना खालील प्रश्नोत्तरं झाली.

१) तुम्हाला काय दुर्मिळ वाटतं?

पेट्रोल-- मुलांचं उत्तर! (त्या वेळी पेट्रोल मिळत नव्हतं.)

२) शांतता दुर्मिळ होण्याची कारणं कोणती असतील?

मोर्चे, घोषणा, घंटा, भोंगे, टी.व्ही. चे आवाज, शिट्ट्या, आरडाओरडा, जास्त माणसांचं एकमेकांशी मोठ्या आवाजात बोलणं, फटाके-- अशी मुलांची उत्तरं.

३) कवयित्रिनं तापून जायची काय कारणं?

कॉलेजला जाण्यासाठी करावी लागणारी धावपळ, शिकवणं, विद्यार्थ्यांचा दंगा, कसलीतरी काळजी - मुलांचा प्रतिसाद (कवयित्रिच्या जीवनाबद्दलची चर्चा कवितेला हात घालण्यापूर्वी झाली होती.)



या प्रकारात जेव्हा आपण 'इथे' ही कविता शिकवू, तेव्हा साहजिकच शांत, सुंदर ठिकाणं आपण आरडाओरडा, दंगा, आरोळ्या, टी. व्ही., रेडिओ यांच्या आवाजांनी खराब करता कामा नयेत याचीही चर्चा करावीच लागते. शिवाय वेगवेगळ्या लोकांचे जीव वेगवेगळ्या कारणांनी तापतात, याबद्दलही बोलणं होतं. आमच्या तशा बोलण्यातले काही तुकडे पाहू -

*** आईचा जीव कशाकशामुळं तापतो?**

--आमचा दंगा, कामवाली न येणं, बाबांचं रागावणं, घरातली कामं, पसारा या साऱ्यांचा उल्लेख मुलांनी केला. बरं नसलं तर आई जास्तच तापते, असंही सांगितलं.

*** आईचा जीव तापला/आई वैतागली म्हणजे ती कुठं जाते?**

--निघून जाईन, जीव देईन, भावाकडं जाईन - असं नुसतं म्हणते; पण कुठ्ठं जात नाही-- अशा अर्थाचे आपले अनुभव मुलं बोलली.

*** तुमचा जीव कशामुळं तापतो?**

--अभ्यास कर असं सारखं म्हटल्यावर खेळायला न सोडल्यावर, लहान भावाला माझी खेळणी द्यायला सांगितल्यावर, टी. व्ही. बघायचा नाही म्हटल्यावर, मित्रांबरोबर खेळत/बोलत असताना हाक मारल्यावर - अशा प्रकारचे मुलांचे प्रतिसाद.

*** तुमचा जीव तापल्यावर तुम्ही कुठं जाता?**

--बाहेर खेळायला, बागेत, मित्रांकडं, आजीकडं- अशी मुलांची उत्तरं.

'इथे' कवितेचा नुसता अन्वयार्थ सांगून धड्याखालच्या प्रश्नांची उत्तरं लिहून देणं आणि वरीलप्रमाणं कवितेच्या अनुषंगानं चर्चा करणं यांपैकी कशाला 'शिकणं' म्हणता येईल? शिकण्याचा हक्क म्हणजे काय, हे पाहताना वर ज्या चार मुद्द्यांचा उल्लेख केला आहे, त्यांपैकी वाचणं आणि लिहिणं, कल्पना करणं आणि स्वतःचं वास्तव जग समजून घेणं या साऱ्याच उद्दिष्टांना 'इथे' ही कविता शिकवताना स्पर्श केला गेला.

अशा प्रकारच्या सृजनशील अध्यापनात विद्यार्थ्यांचा 'शिकण्याचा हक्क' गृहीत धरला जातो. अनेक शिक्षक असं म्हणतात, "'असलं' शिकवणं आम्हाला नाही जमणार! आमच्या वर्गात साठ-पासष्ट विद्यार्थी असतात." खरं आहे. विद्यार्थ्यांच्या अवाजवी संख्येचा ताण शिक्षकांवर येणं स्वाभाविक आहे. परंतु तरीही ज्या मूलभूत हक्काचं शक्य तितकं संरक्षण व संवर्धन

करण्यासाठी व ज्या हक्काचा वापर करण्याची संधी देण्यासाठी शिक्षकीपेशा अस्तित्वात असायला हवा, तो 'शिकण्याचा' हक्क नाकारणं म्हणजे वस्तुतः शिक्षकानं स्वतःचं अस्तित्वच नाकारणं आहे. शाळांनी मुलांना 'शिकण्याला' प्रवृत्त करायचं तर राहोच; पण कोणी विद्यार्थी 'शिकायला' उत्सुक दिसला की, त्याची ती 'ॲबनॉर्मॅलिटी' छाटून टाकायचे प्रयत्न होतात हे आणखी एक भयंकर सत्य आहे.

सृजन-आनंद विद्यालयात इयत्ता पहिली व दुसरी झाल्यावर एका मुलाच्या पालकाची पुण्याला बदली झाली. त्यांची जी पत्रं येतात, त्यातील काही भाग या संदर्भात वाचण्यासारखा आहे.

"पुण्याच्या शेतकी कॉलेजवर भरलेलं झाडांचं, फुलांचं प्रदर्शन पाहायला शाळेची सहल गेली होती. x x x घरी आला न् म्हणतो कसा की, "आई, एकाही झाडाचं, फुलाचं नाव सांगितलं नाही. फक्त ओळीनं झाडं, फुलं दाखवली. एका फुलाचं नाव विचारायला मी गेलो, तर जाड काठी पायावर बसली." ओळीच्या बाहेर शंका विचारायला आला म्हणून त्याला पट्टी बसली. नावं कशाला हवीत तुला? ओळीत जा! असाही उपदेश मिळाला." पत्रातील हा मजकूर वाचून कोणताही सहृदय व जागरूक माणूस कळवळल्यशिवाय राहणार नाही.

## सर्वांसाठी शिक्षण आणि सर्वांसाठी शिकणं--

'सर्वांसाठी शिक्षण' साकार करण्यासाठी आपण नव्या शाळा काढतो आहोत, तुकड्यांची संख्या वाढवत आहोत. माध्यमिक शाळेत एका तुकडीतील विद्यार्थ्यांची संख्या सत्तर असावी असा संकेत रूढ झाला आहे. अंशकालीन व स्ववेळ किंवा अनौपचारिक शिक्षणासाठीच्या योजना आपण कार्यान्वित केल्या आहेत. प्राथमिक शाळांतील गळती व नापासी कमी कशी करता येईल याबद्दल चर्चा चालू आहेत, मुलींसाठी बारावीपर्यंतचं शिक्षण मोफत झालं आहे. सावित्रीबाई फुले दत्तक योजना अस्तित्वात आली आहे. खूप वेगवेगळे प्रयत्न होत आहेत. जात, धर्म, लिंग, राहण्याचं ठिकाण, भाषा यांसारख्या कोणत्याही अडसरामुळे मुलं शिक्षणाला - निदान प्राथमिक शिक्षणाला - वंचित होऊ नयेत म्हणून धडपड चालू आहे. या धडपडीला एखाद्या प्रचंड ताकदीच्या चळवळीचं रूप येऊन, अस्तित्वात असणाऱ्या



साऱ्या मानवी व भौतिक साधनांची लांबी, रुंदी व खाली त्या चळवळीच्या यशासाठी वापरली जायला हवी. प्रत्येक माणसानं 'सर्वांसाठी शिक्षणा'च्या पवित्र यज्ञात स्वतःच्या बौद्धिक व आर्थिक ताकदीची समिधा टाकायला हवी.

'सर्वांसाठी शिक्षण' साकार करत असताना आणखीही एका ज्वलंत प्रश्नाचं भान आपण ठेवायला हवं. 'सर्वांना शिकण्याचा हक्क' हाच तो प्रश्न. पूर्वप्राथमिक शाळेपासून पदव्युत्तर पातळीपर्यंत प्रत्येक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला शिकण्याचा हक्क आहे आणि शिकणं म्हणजे केवळ क्रमिक पुस्तकांतील आशय आणि शब्द लक्षात ठेवून, प्रश्नोत्तरं पाठ करून ते सारं जसंच्या तसं परीक्षेत उतरवणं नसून शिकण्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता व कौशल्य मिळवणं म्हणजे शिकणं, याबद्दलचा आग्रह आपण धरायला हवा. आज शिक्षणाच्या वरवंट्याखाली 'शिकणं' पार कुचलून निघत असेल, तर ते वाचवायला हवं. ज्यांना ज्यांना 'शिकणं' म्हणजे खरं काय ते समजतंय, त्यांनी त्यांनी आजच्या शिक्षणापासून स्वतःला, स्वतःच्या मुला-बाळांना आणि परिसरातील साऱ्या संबंधितांना वाचवण्यासाठी 'चल मारू धडक, उभा फोडू खडक' या निर्धारानं आजच्या सर्वसाधारण शिक्षणसंस्थांना धडक मारली पाहिजे. आजच्या शिक्षणसंस्था म्हणजे जणू 'शिकण्याचा' प्राण हरपलेली शरीरं आहेत. ह्या शरीरांत शिकण्याचं प्राणपाखरू पुनः कसं बागडू लागेल हे पाहण्यासाठी अभ्यासक्रम, क्रमिक पुस्तकं, शिक्षणसंस्थांचं संचालन, शिक्षकांच्या अध्यापन-पद्धती, परीक्षा व चाचण्या घेण्याची रीती, स्पर्धा व सहली, स्नेहसंमेलनं - अशा साऱ्या नसांचा आपण अभ्यास करून त्यात 'शिकण्या'ला कितपत अवसर आहे हे पाहायला हवं. तसा अवसर नसेल, तर त्याविरुद्ध हर प्रकारानं आवाज उठवायला हवा आणि एवढ्यावरच न थांबता 'शिकण्याचा हक्क' साकार होईल अशा पर्यायी संस्था उभ्या करायला हव्यात. त्या संस्था जोपासायला हव्यात. केवळ सहा वर्षांनी येणारं नवं शतक आपल्याकडून दोन अपेक्षा करतं आहे - सर्वांसाठी शिक्षण आणि सर्वांना शिकण्याचा हक्क.

# षष्ठीची नाती

कोल्हापुरात डॉ. वि. म. दांडेकरांचं भाषण होतं. भाषणाचा विषय होता-- 'नवं आर्थिक धोरण'. या भाषणाला जाण्याबद्दल एक नवरा आपल्या बायकोला सांगत होता, "तू जायलाच हवंस - तुझा एम. ए. चा विषय अर्थशास्त्र." बायको नवऱ्याला म्हणाली, "अहो, कसला माझा विषय? लग्नानंतर शिकायचं तर घरात बसून पास होता येईल असा विषय घ्यावा लागतो! ताकापुरतं रामायण आणि परीक्षेपुरतं अर्थशास्त्र." नवरा आपला मुद्दा मागं घ्यायला तयार नव्हता. तो पुन्हा म्हणाला, "घरात बसून शिकलं काय आणि महाविद्यालयात जाऊन शिकलं काय शिकायचा विषय आणि आपण यांची काही नाती तयार होतात की नाही? विषयाची आवड निर्माण होते. वर्तमानपत्रांत, नियतकालिकांत त्याविषयी काही आलं की, डोळे तिकडं खेचले जातात. वाचल्याशिवाय चैन पडत नाही. एवढंच नाही, तर माहिती महत्त्वाची वाटली किंवा मांडणी आवडली तर कात्रण काढून ठेवावंसं वाटतं. पुस्तकांच्या दुकानात गेलो तर एवढ्या सगळ्या पुस्तकांतून आपल्या विषयाचं पुस्तक आपल्याला जणू 'हॅलो' म्हणतं. रस्त्यावर येता-जाता अनेक वाक्यं कानावर पडत असली, तरी कान आपल्या विषयासंबंधीची वाक्यं नेमकी टिप-कागदासारखी शोषून घेतात. खरं सांग! या बाबतीत तुझे अनुभव असे नाहीत का?" बायको विषण्णपणानं हसली.

ह्या संवादानं शिक्षणातल्या एका महत्त्वाच्या दोषाकडं पुन्हा एकदा माझं लक्ष वळलं. पूर्वप्राथमिक पातळीपासून पदव्युत्तर पातळीपर्यंतच्या शिक्षणाचे भिन्न भिन्न हेतू आणि त्यांची सफलता अथवा असफलता याकडं स्वातंत्र्योत्तर काळात आपण फारसं लक्ष पुरवलं नाही, हे या दोषाचं कारण असेल का? ज्ञानापेक्षा माहितीला दिलं जाणारं अवास्तव महत्त्व हेही वरील परिस्थितीचं एक कारण आहे का? आवड म्हणून शिकण्यापेक्षा पदवीच्या बिरुदाशिवाय नोकरी मिळणं अवघड आहे म्हणूनच शिकायचं, ही मानसिकताही याला कारणीभूत असेल?



मनात विचारांचे हिंदोळे सुरू झाले आणि शिक्षणातील एक एक टप्पा नजरेसमोर येऊ लागला. गल्लोगल्ली दिसणाऱ्या खेळवाड्यांचं/बालवाड्यांचं उदाहरण घेऊया. घराचा उंबरठा ओलांडून सामाजिकतेशी परिचय करून देणारा आणि इंद्रिय-विकासाला गती देणारा खेळवाडी/बालवाडी हा शिक्षणातला टप्पा. मित्र व मैत्रिण या संकल्पनांशी पहिला परिचय होतो तो इथंच. आईप्रमाणं शिकवणाऱ्या ताई किंवा मावशीबद्दल मुलाला प्रेम वाटू लागतं. प्रेमाच्या भावनेत एक वेगळा रंग मिसळतो. आत्मविश्वासानं विविध कृती मोकळेपणानं करण्याची संधी मिळावी हा या टप्प्यावरील शिक्षणाचा हेतू असतो. आज नेमकं काय होतंय? अंक आणि अक्षरं शिकवण्याचा आटापिटा, ताठर शिस्तीला दिलं जाणारं अवास्तव महत्त्व, खूप छोटी छोटी मुलं लहान जागेत कोंबली आहेत असं दिसणारं दृश्य, मुलांच्या कोलाहलात शिकवणाऱ्या ताईचा/मावशीचा मुलांशी न जुळणारा भावनिक दुवा, नैसर्गिकरीत्या वाटणाऱ्या कुतुहलापोटी विचारल्या जाणाऱ्या मुलांच्या प्रश्नांना ताईकडून मिळणारी दटावणी. एकूण वातावरणात जाणवणारा कंटाळवाणा तोचतोपणा. परिणामतः खेळवाड्यांत आणि बालवाड्यांत होणारी मुलांची मानसिक. बौद्धिक आणि क्रियात्मक उपासमार!

या सर्वाचा एकत्रित परिणाम कोणता होतो? शाळा ही कंटाळवाणी; पण अपरिहार्य चीज आहे, ही भावना मुलांच्या मनात दृढमूल होते. शिवशिवणारे हातपाय, बोलू पाहणारे ओठ, इकडं-तिकडं बघू इच्छिणारे डोळे आणि सारं काही ऐकावंसं वाटणारे कान मिटवून घेऊन शाळा 'सहन' करायची असते, हे मुलं शिकतात. माझी शाळा, आमची शाळा, आमच्या ताई/मावशी अशा षष्ठीरूपी नात्यांचा मुलाला प्रत्ययच येत नाही. इतकी अक्षरं काढतो आणि एवढे अंक ओळखतो किंवा मोजतो ही यशाची मोजमापं सांडोसांड भरूनही अक्षरांबद्दल मुलाला आकर्षण वाटत नाही. घरातले पालक, शाळेतल्या ताई/मावशी किंवा शाळेत अधूनमधून येणारे पाहुणे अथवा शाळा तपासनीस यांना मुलांची पोपटपंची खूश करीत असली, तरी निळं आकाश, झुलत्या फांद्या,

रंगीबेरंगी फुलं, नाना प्रकारचे वास, चवी, स्पर्श आणि स्वर मुलांना भुलावतच राहतात. हृदय, मेंदू आणि हात यांच्या शिक्षणातल्या फारकतीला इथूनच सुरुवात होते.

ज्ञान आणि अपेक्षा प्रस्फोटाच्या आजच्या काळात इंद्रिय-विकास आणि सामाजिकतेला महत्त्व देणाऱ्या मॉंटेसरी आणि ताराबाई मोडक यांना आपण कधीच मोडीत काढलं आहे! बडबडगीतं ही ताराबाई मोडकांची लहान बालकाला अमूल्य भेट होती. वय वर्ष अडीच ते सहा या काळात मुलाला भेटणारे अनुभव बडबडगीतांत शब्दरूप झाले होते. मांजर, ससा, चंद्र, उंदीर, वेगवेगळ्या भाज्या या साऱ्यांची हजेरी या बडबडगीतांत होती. या वयाच्या मुलांना भुलवणारा ठेका त्यांत होता. माहीत असलेले शब्दच असल्यानं सहसा मुलांची अडवणूक होत नसे. शब्द, स्वर, ताल यांचा आनंद मुलं बडबडगीतांतून घेत असत. त्या गीतांचा लळा त्या मुलांना लागे. जड-हलके, मऊ-खरखरीत, हळू-जोरात अशा तुलना खेळ खेळताना मुलांच्या मनात स्पष्ट होत जात. दररोजच्या आयुष्यातील प्रौढांकडून केल्या जाणाऱ्या चिरणं, किसणं, धुणं, विसळणं, पुसणं, रगडणं, पाखडणं, बांधणं इत्यादी क्रियांशी मुलांची पूर्वप्राथमिक शाळेत ओळख होत असे. अक्षरं आणि अंक म्हणजे जणू वेगळ्या प्रकारचे आकार अशी भावना निर्माण होई. मित्र-मैत्रिणींशी अधिक जवळीक आणि शिकवणाऱ्या ताईमावशीचं प्रेम, किंबहुना अभिमान या वयातल्या मुलांना वाटत असे.

आजच्या पूर्वप्राथमिक शाळांत हे सारं घडतंय का? पंचवीसपर्यंतचे अंक आणि सगळी मुळाक्षरं अलीकडच्या पूर्वप्राथमिक शाळा मुलांच्यावर लादताना दिसतात. अनुभवाच्या पापुद्र्याला लागून संकल्पना उलगडत जातात, हे जणू आम्ही विसरलोच आहोत. रंगदर्शक शब्द तोंडपाठ असणं यापेक्षा पोपटी गवत, हिरव्या रंगाचा पोपट, केळीचं पोपटी रान, कैरीचा हिरवा रंग यांची ओळख- अक्षरं आणि शब्द यांच्यापेक्षा अनुभवाच्या वाटेनं झाली तर ते अधिक चांगलं असतं याकडं आपण हेतुपूर्वक डोळेझाक करतो आहोत काय? शिकलेल्या रंगदर्शक शब्दांचं दृढीकरण पुनःपुन्हा तेच शब्द म्हणून करण्याऐवजी ओळखणं, दाखवणं, हात लावणं, काढून दाखवणं, शोधणं, पकडणं - अशा मजेशीर



कृतीतून झालं, तर ते दृढीकरण आनंददायी ठरतं. अनेक प्रकारचे खेळ खेळताना प्रत्यक्ष आयुष्य आणि शिकायचा आशय यांचा मेळ मुलांना घालता आला तर ज्ञानाबद्दल एक प्रकारची रुची त्यांच्या मनात निर्माण होतं. पण हे सारं करायला आम्हाला वेळ नाही. ते आम्हाला परवडणारं नाही. 'मास-एज्युकेशन'च्या आजच्या काळात दहा-पंधरा मुलांच्याबरोबर रमत-गमत, हसत-खेळत शिकवणं कसं काय जमणार? पालकांकडून सारखी मागणी असते, "आमच्या मुलाला अक्षरं शिकवा, गाणी नाही शिकवली तरी चालतील. खेळ नाही घेतले तरी चालतील. परंतु प्राथमिक शाळेत प्रवेश मिळवण्यासाठी मुलांची जी चाचणी घेतात, त्यात पास होण्यासाठी सगळी अक्षरं व पंचवीसपर्यंतचे अंक मुलांना यायलाच हवेत हो." मागणी तसा पुरवठा या न्यायानं आजकाल शाळा चालवल्या जातात. मॉंटेसरीबाई किंवा ताराबाई मोडक यांचा काळ वेगळा होता. त्या वेळी प्राथमिक शाळेत प्रवेशासाठी चाचण्या नव्हत्या. पोटासाठी शाळा चालवणाऱ्यांना त्यांचा ध्येयवाद कुठला परवडायला?

आजच्या पूर्वप्राथमिक शाळांत असणाऱ्या सर्वसाधारण परिस्थितीचा परिणाम फार खोलवर झालेला आहे. टाईम्स, इंडियन एक्स्प्रेस यांसारख्या नियतकालिकांत त्याबद्दल लेखही प्रसिद्ध झाले आहेत. बालकांचं बालपण हरपवणारी ठिकाणं अशी या शाळांवर कडक टीका झाली आहे. पाठांतर आणि दिले जाणारे गृहपाठ यामुळं आज मुलांना प्रचंड थकवा येतो. वेळेला शाळेला पोहोचणं पालकांना अत्यावश्यक वाटत असल्यामुळे स्वतःचे देहधर्म पार पाडायला मुलांना बरेचदा पुरेसा वेळ मिळत नाही. पोटदुखी, डोकंदुखी, अन्नावरची वासना नाहीशी होणं, पचनाबद्दलच्या तक्रारी जडणं - अशा अनेक व्याधींना मुलं बळी पडायला लागली आहेत. कुणाशी न बोलणं, कंटाळलेलं असणं, चिडचिडेपण, अस्थिरता, चटकन रडणं, आक्रस्ताळेपणा अशा काही मानसिक तक्रारीही मुलांच्यात दिसू लागल्या आहेत. श्री. कृष्णकुमार यांनी याबद्दल टाईम्स ऑफ इंडियात लेख लिहून मुलांची दारुण परिस्थिती वर्णन केली आहे. मुलं रमत-गमत दूध पितात व तितका वेळ नसतो म्हणून काही पालक झोपेतच मुलाच्या तोंडात बाटली कोंबतात. आंघोळ म्हणजे मुलाची जलक्रीडा असते, परंतु वेळेवर शाळेत पोहोचण्यासाठी

आंघोळ हा एक स्वच्छतेचा उपचार बनतो किंवा उरकून टाकायची कृती ठरते. पूर्वप्राथमिक अथवा प्राथमिक शाळांत दिले जाणारे गृहपाठ पूर्ण करण्यासाठी मुलांना रात्री जागावं लागतं; शाळेतून आल्या आल्या गृहपाठाला जुंपून घ्यावं लागतं. बालकांचे कितीतरी हक्क आपण हिरावून घेत आहोत. स्वाभाविकच याचा परिणाम म्हणून मुलांच्यात शाळेबद्दलची नावड, शिक्षकांबद्दलचा तिटकारा आणि पालकांबद्दलचा राग खदखदत असतो.

यंत्राच्या पट्ट्यावर जशा वस्तू एकापाठोपाठ सरकत असतात, तशी शिक्षणाच्या पट्ट्यावर मुलं एका स्तरावरून दुसऱ्या स्तरावर ढकलली जातात. माध्यमिक शाळांत अशा रीतीनंच मुलं दाखल होतात. माध्यमिक शिक्षण म्हणजे नेमकं काय बरं? कुमारावस्थेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दिलं जाणारं सर्वसामान्य तांत्रिक अगर व्यावसायिक शिक्षण म्हणजे माध्यमिक शिक्षण. बौद्धिकदृष्ट्या बोलायचं झालं, तर ज्ञान-संपादनात अचूकता आणि संघटन यांचा विकास करण्याचा काळ म्हणजे माध्यमिक शिक्षण. भावनात्मक-दृष्ट्या बाल्यावस्थेतील प्रेम आणि प्रौढत्वातील सभ्यता यांच्यामधील स्फोटक आणि अस्थिर अशा कुमारावस्थेचा काळ म्हणजे माध्यमिक शिक्षणाचा काळ. सौंदर्यशास्त्रदृष्ट्या प्राणिमात्रांच्या प्रमाणबद्ध सौंदर्याच्या प्रशंसनेचा हा काळ. तात्त्विकदृष्ट्या माध्यमिक शिक्षणाच्या उद्दिष्टांची केलेली ही चर्चा प्रत्यक्ष माध्यमिक शिक्षणात कितपत प्रतिबिंबित होते?

सर्वसाधारण माध्यमिक शाळांत आज पूर्वीच्या ग्रँट-इन-एड कोडप्रमाणं सूचित केलेल्या-- म्हणजे कुमारावस्थेतील चाळीस मुलं-मुलं बसू शकतील अशा-- आकाराच्या खोल्यांत कमीतकमी साठ व क्वचित प्रसंगी ऐंशी विद्यार्थी कोंबलेले असतात. चार-चार विद्यार्थी एका बाकावर बसल्यामुळं बसायलाही पुरेशी जागा नसते. वर्ग-खोल्यांची दारं बंद करून शिकवण्याचा प्रघात पडला आहे. एवढ्या मोठ्या संख्येच्या वर्गात शिकवताना जी विविध तंत्र-पद्धती, माध्यमं वापरून सर्व विद्यार्थ्यांना शिकण्याकडं आकर्षित करायला हवं, ते करण्याची इच्छा व गरज फारच कमी शिक्षकांना वाटते. मग अशा अध्यापनाचा परिणाम म्हणून वर्गात निर्माण होणारी बेशिस्त व अस्थिरता नियंत्रित करण्यासाठी विद्यार्थ्यांवर



ओरडणं, त्यांचा अपमान करणं, त्यांच्याकडं संपूर्ण दुर्लक्ष करणं, मुख्याध्यापकांकडं पाठवून त्यांना नामोहरण करणं किंवा कडक शिक्षा करणं या उपायांचा अवलंब शिक्षकांकडून केला जातो. शाळांच्या तीन-चार मजली इमारतींत दहा मिनिटांच्या सुट्टीत पाणी पिऊन परत वर्गात येणं किंवा लघवी करून परत वर्गात येणं यासाठीही विद्यार्थ्यांना वेळ मिळत नाही. मधल्या सुट्टीत डबा खाण्यासाठी चांगली जागा नसते. अशा सर्व परिस्थितीचा परिणाम म्हणून कुमारवयातले हे विद्यार्थी जणू सुप्त ज्वालामुखी बनतात. शिक्षण ही एक केवळ विक्रीची वस्तू झाल्यामुळं शिक्षकांना त्यांच्या या मनःस्थितीकडं लक्ष देण्याची गरज वाटत नाही. न आवडणाऱ्या बाबींबद्दलचा विद्रोह आवरून एकूण शिक्षणयंत्रणेला मान तुकवणं, न कळलेल्या आशयाचं पाठांतर करणारं एक यंत्र बनून परीक्षांना सामोरं जाणं, हे सारं कुमारांना नकोसं वाटतं.

महाविद्यालयीन शिक्षण म्हणजे तर शिक्षणसोपानाची उच्चतम पायरी! स्वतः निवडलेल्या विषयांत 'विषयतज्ज्ञता' निर्माण करणं हे महाविद्यालयीन शिक्षणाचं प्रमुख उद्दिष्ट असायला हवं. संपन्न व्यक्तिमत्त्व निर्माण करणं, सत्याची निर्भय साधना करण्याची ऊर्मी प्रखर करणं, व्यक्ती व समाज यांच्या 'सुंदर' जीवनासाठी आवश्यक ती मूल्यं विकसित करणं ही महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणाची उद्दिष्टं आणि आजची त्या स्तरावरील स्थिती यांचा काही नातेसंबंध जोडणं किती दुरापास्त झालं आहे! त्यामुळंच श्री. के. एन. राज म्हणतात, "भारतातल्या उच्च शिक्षणातील मोठा दोष म्हणजे 'उच्च' या नावास ते पात्र नाही हाच होय." कोठारी आयोगाच्या अहवालात महाविद्यालयाच्या स्थितीचं जे वर्णन आहे, त्यात ग्रंथालयं, प्रयोगशाळा, प्राध्यापक यांच्या बाबतीतली दुरावस्था स्पष्टपणं मांडली आहे. त्यानंतरच्या काळात तर महाविद्यालयांची आणि विनाअनुदानित महाविद्यालयांची संख्या वाढतच आहे. ज्ञानलालसा निर्माण करण्याचं ध्येय कुठं आणि 'डिक्टेशन मेथड'नं विद्यार्थ्यांना शिकवलंसं करणं कुठं? प्राध्यापकांच्या व्यासंगानं आणि विद्येच्या तपश्चर्येनं भारून जाऊन विद्यार्थ्यानं विद्येकडं आकृष्ट होणं कुणीकडं; आणि अपुऱ्या तयारीनिशी आणि बहुधा गाईडच्या आधारानं तासिकेची वेळ मारून नेणाऱ्या तथाकथित प्राध्यापकांचं बोलणं 'हजेरीच्या

नियमासाठी' सोसून घेणं कुणाकडं? सत्ताधीश, साखरसम्राट अशासारख्यांच्या पुढे लव्हाळ्यासारखं वाकणारे महाविद्यालयातील प्राचार्य अथवा प्राध्यापक पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्येचं क्षात्रतेज कसं समजावं? अशा परिस्थितीत मग विद्यार्थीही व्यावहारिक तडजोडी करायला शिकतात. ह्या तडजोडीचा परीघ खून, मारामाऱ्या, पळवून नेणं, धमकी देणं, वृथा आरोप करून धमाल माजवणं, कॉमन ऑफ पुकारणं, संप पुकारणं, घेराव घालणं आणि प्राचार्य, कुलगुरू, प्राध्यापक यांना स्वतःचंच म्हणणं मान्य करायला लावणं असा असतो. विद्येची नशा आज महाविद्यालयांत अभावानंच दिसते.

ज्युनिअर किंवा सीनियर कॉलेजच्या अध्यापक/प्राध्यापकांच्या निवडीसाठी जे मंडळ असतं, त्यातील व्यक्तीही परिस्थितीवशात प्रश्न विचारतात. उमेदवाराची विषयतज्ज्ञता त्यामुळं दुय्यम ठरते. कोणत्या ना कोणत्या प्रकारचं 'वजन' जास्त महत्त्वाचं बनतं. अशा पद्धतीनं निवड होणारे अध्यापक/प्राध्यापक असंतमंच शिकवणार! या सर्व परिस्थितीमुळं महाविद्यालयीन पातळीवर व पदव्युत्तर पातळीवरही विद्यार्थ्यांकडून विषय 'घेतले' जातात, 'निवडले' जात नाहीत. विषयांचा आणि त्यांचा संबंध परीक्षेपुरता किंवा नोकरीपुरता असतो. विषय 'त्यांचे' नसतात आणि ते 'विषयांचे' नसतात. विषयाचा 'लळा' त्यांना लागलेला नसतो. जीवनात त्यांना अभ्यासविषय टायी ठायी भेटत नाहीत. ते विषय क्रमिक पुस्तकांत बंदिस्त असतात. हे चित्र बदलायचं असेल, तर पायापासून कळसापर्यंत साऱ्याच स्तरांवर आवश्यक ते बदल व्हायला हवेत. शिक्षणसंस्था, त्या संस्थांचे प्राचार्य/मुख्याध्यापक तसंच प्राध्यापक/अध्यापक आणि विद्यार्थी एकमेकांचे सगेसोयरे व्हायला हवेत. 'इथं मी शिकलो', 'ह्यांनी मला शिकवलं' असं म्हणण्यात विद्यार्थ्यांना सानंद अभिमान वाटायला हवा. परवाच सृजन-आनंद विद्यालयाच्या काही मुलांबरोबर रिक्षातून जाताना त्यांनी सांगितलं, "हीच ती पूर्वीची शाळा. इथं आम्हाला कोंडून ठेवत होते." मुलांची ही प्रतिक्रिया आणि परीक्षेपुरतं अर्थशास्त्र म्हणणाऱ्या त्या बाईचं उत्तर या दोन्हींनी मला शिक्षणातल्या षष्ठीच्या नात्यांच्या भोवऱ्यात अडकवलं..



# बालदिनानिमित्त : बालकांच्या दीनत्वाबद्दल

## निसर्गाचं अद्भुत सौंदर्य-मूल--

१४ नोव्हेंबरशी बालकांचं नातं जोडून नेहरूचाचांनी या जगाचा निरोप घेतला. सत्तावीस वर्षं झाली त्याला. जवाहरलाल नेहरू म्हटलं की देखणं, रुबाबदार, रसीले व्यक्तिमत्त्व डोळ्यांपुढं उभं राहतं; शेरवानीवर खोचलेलं लाल गुलाबाचं फूल त्यांच्या आठवणी सांगतं; 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया'सारखं अतिसुंदर पुस्तक आपल्याला हाका मारतं. धवल शिखरांकित हिमालय आणि पवित्र गंगा नदी ह्या निसर्गाच्या दोन आश्चर्यकारक सौंदर्याइतकंच निसर्गाच्या तितक्याच आश्चर्यजनक तिसऱ्या सौंदर्यावर-- मुलांवर-- मनःपूर्वक प्रेम करणाऱ्या भारताच्या पहिल्या पंतप्रधानांच्या स्मृतिदिनानिमित्त मुलांच्या आजच्या वास्तव्याबद्दल लिहिणं उचित ठरेल.

## युनो, मुलं आणि त्यांचे हक्क--

मूल कोणाला म्हणता येईल? दहा-बारा वर्षांच्या मुलांना अनेकदा 'घोड्याएवढा वाढलास' असं म्हटलेलं आपण ऐकतो; पण इ. स. १९८९ च्या युनोच्या अधिवेशनात पुरस्कृत केलेल्या मुलांच्या हक्कांच्या जाहीरनाम्यानुसार अठरा वर्षांखालील कोणतीही व्यक्ती म्हणजे मूल असं म्हटलं आहे. मुलांच्या हक्कांची जाणीव व जपणूक प्रौढांनीच ठेवायला हवी, अशी अपेक्षा त्यात केली आहे. या जाहीरनाम्यात मुलांच्या अनेक हक्कांची नोंद असली, तरी आज आपण त्यातील १२, २८ (२), २९ व ३१ (१) या कलमांशी संबंधित वास्तवाचाच विचार करू. काय सांगितलं आहे ह्या कलमांत?

## हीच ती चार कलमं--

१) स्वतःची मतं मांडण्याचा आणि स्वतःवर होणाऱ्या परिणामांच्या

संदर्भात ती मतं विचारात घेतली जाण्याचा हक्क मुलांना आहे अशी नोंद १२ व्या कलमात आहे. २) मानवाच्या प्रतिष्ठेला धक्का न लागता शालेय शिस्त जोपासली जाईल असं कलम २८ (२) मध्ये सांगितलं आहे. २९ व्या कलमात म्हटलं आहे की मुलांच्या व्यक्तिमत्त्व, बुद्धिमत्ता, मानसिक तशाच शारीरिक क्षमता यांचा त्यांच्या सुप्त शक्तींनुसार विकास होईल यासाठी शिक्षणाद्वारे प्रयत्न होतील. ३) मुलांचे आई-वडील, त्यांच्या सांस्कृतिक निजखुणा (identity), भाषा आणि मूल्यं यांच्या विकासाचा प्रयत्न शिक्षणाच्या माध्यमांमार्फत होतानाच देशाच्या राष्ट्रीय मूल्यांच्या विकासाचं लक्ष्य नजरेसमोर असेल. ४) ३१ व्या कलमात विश्रांती आणि फुरसत यासंबंधीचा मुलांचा हक्क, तसेच स्वतःच्या वयोगटांना योग्य अशा मनोरंजनात्मक अगर क्रीडात्मक उपक्रमांत सहभागी होण्याच्या त्यांच्या हक्कांचा उल्लेख आहे.

**छडी लागे छमछम--**

वरवर पाहिलं तर उद्धृत केलेल्या या हक्कांचं विशेषत्व जाणवत नाही; परंतु प्रचलित वास्तवाच्या संदर्भात या हक्कांचा विचार करू लागलो की, आपल्याला त्या हक्कांच्या प्रतिपादनातलं गांभीर्य लक्षात येतं. शिस्त आणि मुलांना जन्मजात मिळालेली मानवी प्रतिष्ठा याबाबतचं शिक्षणसंस्थांतलं आजचं चित्र कशा प्रकारचं आहे? शिक्षणखात्याच्या अनुदानसंहितेनुसार शारीरिक शिक्षेवर बरीच बंधनं असली, तरी ती पाळली जातातच असं नाही. कानफटात देणं, रूळ मारणं, पट्ट्या मारणं, धबके घालणं, रांगायला लावणं, दिवसभर किंवा बराच काळ उभं करणं, कंबरेत वाकून उभं राहायला लावणं, उन्हात उभं करणं - अशा आपल्याला माहीत असलेल्या किंवा माहीत नसलेल्याही शिक्षा आज आपली मुलं भोगत असतात. शिक्षा देण्याच्या कारणांचा अभ्यास केला गेला, तर फार कटू सत्यं बाहेर येतील. कुणीतरी एक पुस्तक लिहिलंय - गृहपाठ न करण्याची शंभर कारणं! पण शिक्षा करण्याची शंभर काय, हजारो कारणं असतात! शेजारच्या मुलाशी बोलणं, इतरांनी मागितलेली वस्तू वर्ग चालू असता त्यांना देणं, वर्गात अकारण हालचाल करणं, शिकवण्याकडं लक्ष नसणं, प्रश्नाचं उत्तर न देणं किंवा न देता येणं,



शिक्षकांना फालतू वाटतात असे प्रश्न विचारून वर्गाचा बहुमोल वेळ वाया घालवणं, शिक्षकांशी उद्धटपणानं वागणं, समजलं नाही असं म्हणणं, शाळेत वेळेवर न येणं, छोट्या-मोठ्या सुटीनंतर वर्गात उशीरा येणं, गणवेश न घालणं, फी वेळेवर न देणं, पुस्तक-वह्या किंवा शाळेचं इतर साहित्य जवळ नसणं, शंका विचारणं, मास्तरांची चूक दाखवून देणं, वर्गात सरांनी सांगितलेल्या मुद्द्याशिवाय दुसऱ्याच मुद्द्याचं लेखनं करणं, आवश्यकतेपेक्षा जास्त ओळींचं लेखन करणं, शिकवलेल्या रीतीपेक्षा वेगळ्या रीतीनं गणितं सोडवणं, असं का असं म्हणून मास्तरांची अडवणूक करणं, मुख्याध्यापकांकडं सरांबद्दल तक्रार नेणं, मॅडमची नक्कल करणं - असे कितीतरी 'घोर अपराध' अठरा वर्षांखालील मुलं-मुली करतात. या शिवाय 'कडक आहेत' अशी स्वतःची प्रतिमा तयार झाली म्हणजे पोरं सुतासारखी सरळ असतात, या विचारानं या प्रतिमेला नैवेद्य म्हणून मुलांना शिक्षा फर्मावल्या जातात. स्वाभाविकच अनुदानसंहिता राहते पुस्तकात आणि वर्गावर्गात असणारी आचारसंहिता वेगळीच असते.

**शिक्षण नको; तोंड आवर--**

शारीरिक शिक्षेशिवाय इतरही काही शिक्षा दिल्या जातात. आज पीएच.डी.सारख्या अत्युच्च पदवीनं विभूषित असलेल्या व बेरड समाजात जन्मलेल्या श्री. भीमराव गस्ती यांचं 'बेरड' पुस्तक वाचलं की, त्यातल्या मास्तरांनी त्यांची केलेली हेटाळणी, मानहानी लक्षात येते. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय या चतुःसूत्रीवर आधारलेल्या डॉ. आंबेडकरांच्या राज्यघटनेनंतर समाजातील आणि म्हणूनच शिक्षणसंस्थांतील वास्तव बदललेलं असेल अशी आपली समजूत असते; परंतु अजूनही आर्थिक, सामजिक किंवा सांस्कृतिकदृष्ट्या दलित असणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक प्रकारांनी मानहानी सहन करावी लागते. वर्गावर्गात शिकवताना ह्या विद्यार्थ्यांना मुळीच लक्षात घेतलं जात नाही. त्यांच्या खऱ्याखुऱ्या अडचणींना 'बकवास' म्हणून निकालात काढलं जातं. "असल्यांनी शिकायची स्वप्नं बघावीच कशाला?", "चांभाराच्या देवाला. . . ", "मांगाचं हृदय तुझं", "फुकटी मंडळी", "सरकारचे

जावई'' अशा वाक्यांच्या लाह्याही अधूनमधून फुटतात. अशा वेळी त्या विद्यार्थ्यांना शिकणं नकोसं व्हावं, त्यांनी नापास व्हावं किंवा त्यांनी शाळा सोडून जावं ह्यात नवल ते काय?

## सांस्कृतिक नाळ तोडणारं शिक्षण--

शिक्षांचे काही प्रकार वर्तमानपत्रांतूनही गाजलेले आहेत. एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत हातांना मेंदी लावली म्हणून शारीरिक शिक्षा झाली; तर अलीकडेच दुसऱ्या एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मधल्या सुट्टीत मराठीत बोलल्याबद्दल दंडाची शिक्षा सुनावली गेली. या शिक्षा त्या मुलांची सांस्कृतिक निजखूण (identity) व मूल्यंच नाकारणाऱ्या आहेत. बालकांच्या हक्कांच्या २९ व्या कलमानुसार हे अवैध ठरेल हे तर खरंच; पण खरंच विचार करता मुलांच्या शिक्षणाचा एक पदर त्यांच्या सांस्कृतिक जीवनाशी निगडित असतो, हे मूलभूत सत्यही या शिक्षांमुळं नाकारलं जातं. स्वतःचं सारं काही नाकारून किंवा विसरून केवळ क्रमिक पुस्तकांत लिहिलं गेलेलं आणि शिक्षकांच्या मुखातून बाहेर पडणारं जे असेल तेच शिक्षण अशी तप्तमुद्रा मुलांच्या मनांवर उठवण्याचे हे भयंकर प्रकार आहेत. वरील २९ व्या कलमात मुलांतील सुप्त शक्तींचा विकास करण्याचे प्रयत्न शिक्षणातून होतील असं म्हटलं आहे. आज शिक्षणाच्या नावाखाली सर्वसाधारणपणं जे घडवलं जातं, त्यांत मुलांच्या सुप्त शक्तींचा विकास अजिबातच अभिप्रेत नाही. मूल आणि त्याच्या सुप्त शक्तींचा विकास हे आजच्या शिक्षणाचं ध्येय नसून पोर्शन 'कव्हर' करणं (अभ्यास आणि ज्ञानाचा क्रम दोन्हीही ठराविक प्रश्नोत्तरांच्या पठनाच्या उद्‌घोषानं 'झाकून टाकणं') चालू असतं. घरांत आणि शाळांत ''तुला काय समजतंय?'' असं मुलांना ऐकवलं जातं. त्यांना प्रतीत होणारे शब्दांचे अर्थ सरळसरळ नाकारले जातात. त्यांच्या कल्पनाशक्तीला लवकरात लवकर परिणामकारकरीत्या विरजण लावून त्यांना 'शिक्षणाला' राजी करणं हे प्रभावी शिक्षणाचं 'राज' (रहस्य) असतं.

## शारीरिक गरजाही शिक्षणापुढं दुय्यम--

विश्रांती आणि फुरसतीचा हक्क सारं युनोच्या मसुद्यात पुरस्कारिलेला



आहे, पण वास्तव काय आहे? वयाची उणीपुरी दोन वर्षंही मुलाला मनाप्रमाणं विश्रांती आणि फुरसत उपभोगता येत नाही. खुळघर (Play group), खेळवाडी, बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक अशा सरकत्या पट्ट्यांवर मुलांना लवकरात लवकर कसं टाकता येईल याबद्दल पालक आतुर असतात. अनेक बालकांच्या शी, शू, दूध पिणं, आंघोळ करणं, पुरेशी झोप घेणं - अशा अगदी प्राथमिक गरजांनाही त्यांच्या 'उज्ज्वल भविष्यासाठी' चाललेल्या पालकांच्या व शिक्षकांच्या धडपडीमुळं गौणत्व प्राप्त होतं. याचे होणारे शारीरिक व मानसिक परिणाम गंभीर असले, तरी 'सोनेरी' भविष्यासाठी तसं करणं जरूरच असतं ना! तुम्हाला काय वाटतं?

## सृष्टी हीच एक परीकथा--

नेहरूचाचांच्या स्मृतिदिनी मुलांना उद्देशून त्यांनी लिहिलेला एक परिच्छेद आपण वाचू या--

''तुमचे शिक्षक आणि इतर प्रौढ यांच्याकडून तुम्हाला वरचेवर उपदेश मिळतच असेल; म्हणूनच तुम्ही काय करावं आणि काय करू नये याबद्दलची उपदेशगुटी मी तुम्हाला पाजणार नाही. ही आपली सुंदर सृष्टी, फुलं, झाडं, पक्षी, प्राणी, तारे, पर्वत, हिमनद्या आणि इतर कितीतरी अद्‌भुत अशा ज्या अनेकविध बाबींनी आपण वेढलो गेलो आहोत, त्याबद्दल तुमच्या सन्निध्य बसून बोलणं मला आवडेल. आम्ही प्रौढ माणसं हे सारं सौंदर्य विसरतो आणि समजतो की, आम्ही फार महत्त्वाचं काम करतो आहोत. पण मला आशा आहे की, तुम्ही मुलं आमच्याहून सूज्ञ व्हाल आणि आपल्याला वेढून टाकणारे हे सौंदर्य आणि जीवन डोळे तसेच कान उघडे ठेवून समजून घ्याल. फुलं, पक्षी किंवा एकूण निसर्गाशी मैत्री जमवणं तसं किती सहज असतं! फक्त तुम्ही मायेनं आणि स्नेहभरानं हात पुढं करायला हवा. पुष्कळ परीकथा आणि साहसकथा तुम्ही वाचल्या असतील; परंतु खरं तर ही सर्व सृष्टीच एक अतिसुंदर परीकथा आणि साहसकथा आहे. ही कथा समजून घेण्यासाठी फक्त पाहणारे डोळे, ऐकणारे कान आणि सृष्टीतील जीवन आणि सौंदर्याकडं झेपावणारं मन असायला हवं.''

आजच्या कठोर, निर्मम आणि भौतिकतेनं लडबडलेल्या वास्तवात युनोनं पुरस्कृत केलेला बालकांच्या हक्कांचा जाहीरनामा आणि चाचा नेहरूंनी साऱ्या सृष्टीशी मैत्र जमविण्यासाठी पाहणारे डोळे, ऐकणारे कान आणि सौंदर्याकडं झेपावणारं मन या सांगितलेल्या तीन बाबी किती अपरिचित आणि दूरच्या वाटतात! बालकांच्या हक्कांच्या जाहीरनाम्यातील बाबी साकार होण्यासाठी किंवा निसर्गाशी मैत्र जमवणारे डोळे, कान आणि मन विकसित होण्यासाठी जवाहरलाल नेहरूंनाच बालकांची कैफियत घेऊन सृष्टीतलावर यावं लागेल काय? की आपण पालक-शिक्षकही आपापल्या परीनं हे काम थोडंफार तरी करू शकू?



# शाळा मुलांना काय देते?

**सप्तपदीनंतर--**

आज हा लेख लिहिते आहे एप्रिल १९९२ मध्ये. शाळेची सात वर्षांची वाटचाल पूर्ण झाली आहे. सप्तपदीनंतर संसारातलं पाऊल स्थिरावतं असं मानलं जात असतं. तोच सप्तपदीचा दाखला आमच्या शाळेला लावायचा झाला, तर शाळाही किंचित स्थिरावली आहे, असं वाटतं. (हे वाक्य वाचताच सारे ताई-दादा मोठे-मोठे डोळे करून, "कसली स्थिरावली आहे? कशाला काही पत्ता नाही अजून!" असं म्हणतील हे मला माहीत आहे आणि त्यांचं म्हणणं बरंचसं खरंही आहे.) परंतु शाळेला अजून इमारत नाही. मानधनाचा आकडा कमी असल्यानं वर्गताई म्हणून काम करणाऱ्या ताई शाळा सोडून जाण्याचा धसका मनात असतो आणि ज्याच्या आधारावर सर्वस्वी विसंबून राहावं असा बक्कळ निधी किंवा भक्कम संस्था पाठीशी नाही हे खरंच आहे; पण मी म्हणते, "अहो, हे चालायचंच! प्रायोगिक कामं इतक्या अल्पावधीत कुठली स्थिर व्हायला? ते आपलं गोष्टीत! सकाळी बी लावली आणि रात्री वेल गगनापर्यंत गेला." तेव्हा असं माझं आणि ताई-दादांचं खोटं खोटं भांडण चालू असतं; मात्र पहिल्या वर्षाच्या तुलनेत शाळा स्थिर झाली आहे, हे ताई-दादाही नाकारत नाहीत.

स्थिरता हवीच कशाला असते? निःश्वास टाकायला; सार्थकता वाटायला; काही जणांच्या बाबतीत पुढची स्वप्नं रंगवायला. शाळेची सप्तपदी झाल्यानंतर माझ्या मनात मात्र असा विचार आला की, सार्थकतेच्या डबक्यात तर आपण बंदिस्त होत नाही ना? ज्या नावाची पताका खांद्यावर घेऊन शाळा उभी राहिली, त्या ब्रीदाचा विसर पडून आपण दुसऱ्या दिशेकडं तर निघालो नाही ना? ज्या मूलभूत संकल्पनेचा आधार घेऊन आपण समाजातील बहुविध मंडळींना साद घातली, त्या संकल्पनांना आपणाकडून योग्य न्याय मिळतो आहे ना? हे प्रश्न मनात

उमटले आणि मी चांगलीच चमकले. तेव्हा म्हटलं, "थोडीशी शोधाशोध तर करून पाहू या काय घडतं आहे ते." ही शोधाशोध शाळेच्या तीन प्रमुख घटकांबाबत करावी असं योजलं. ते घटक असे - १) या शाळेतून शिकणं संपवून इतर शाळांत गेलेली मुलं. २) शिकवणारे ताई-दादा ३) मुलांचे पालक. मुलं आणि ताई-दादा यांना मी फक्त दोन प्रश्न दिले. "सृजन-आनंदनं तुम्हाला काय दिलं? काय दिलं नाही?" माझ्या प्रयत्नांमागची पार्श्वभूमी समजावी म्हणून पालकांना मात्र एक छोटंसं निवेदन दिलं होतं.

**ही खबरदारी--**

सृजन-आनंदनं मला काय दिलं आणि काय दिलं नाही, याबद्दल त्या वर्षी शाळेत असणाऱ्या कोणत्याही मुलाला लेखन करायला सांगितलं नाही. त्याचं एक प्रमुख कारण असं की, दुसऱ्या शाळांचा एक-दोन वर्षांचा अनुभव आल्याखेरीज वरील प्रश्नांची उत्तरं मुलांनी लिहायची म्हटलं, तर ते लेखन विचारांपेक्षा भावनेनंच चिंब असणार! तसं तर व्हायला नको होतं; म्हणून मग इ.स. १९९२ मध्ये इतर शाळांत इयत्ता सहावी आणि सातवीतल्या, तसंच काही पाचवीत असणाऱ्या मुलांशी बोलले. त्यांना लिहायचा विषय सांगितला आणि काही सूचनाही दिल्या. त्या अशा - "आई-वडिलांना विचारू नका. त्यांना तुम्ही लिहिलेलं दाखवूसुद्धा नका. खरं खरं लिहा. पाकिटात बंद करून माझ्याकडं द्या."

**शाळा नव्हे, एक गंमत--**

बहुतांश मुलांच्या लेखनात शाळेनं जे दिलं आहे, त्याबद्दलचे प्रतिसाद कमी-अधिक प्रमाणात एकसारखेच आहेत. फरक आहे तो त्यांच्या लिखाणातील उत्कटतेत, भावनेच्या आवेगात. प्रौढांसारखी मुलं हातचं ठेवून काही लिहीत नाहीत. उदाहरणार्थ, हा सागरच काय लिहितो आहे बघा ना, "मी पूर्वी जात होतो त्या इंग्लिश शाळेत काय किंवा दुसऱ्या मराठी शाळेत गेलो असतो तरी काय, सृजनमध्ये माझी जितकी प्रगती झाली तितकी प्रगती झाली नसती." दीपाली महाडिक तर शाळेला शाळा म्हणायलाच तयार नाही. ती म्हणते, "मी, तुम्हाला एक गंमत



सांगणार आहे. त्या गमतीचं नाव आहे सृजन-आनंद." सृजनमध्ये इयत्ता तिसरी व चौथी ही दोन वर्षंच शिकलेल्या, तरल भाववृत्तीच्या व शब्दशक्तीची असाधारण जाण असलेल्या शमीनचं लिखाण खरं पाहता सारंच्या सारं द्यायला हवं. आपल्या लिखाणाचा शेवट करताना तिनं लिहिलं आहे, "फक्त हेच शिकवलं नाही, मला सृजननं तर शिकवलं निसर्ग पाहायला! शिकवलं या जगात राहायला आणि शिकवलं मी 'मी' आहे हे दाखवायला."

तुलना करणं तसं कठीणच असतं; पण मुलांच्या लेखनात त्यांनी केलेली चपखल तुलना जागोजागी दिसते. सृजनमधल्या वातावरणाचा मुलांवर खोल ठसा उमटलेला दिसतो. आता पुण्यातल्या शाळेत इयत्ता सहावीत असलेला विक्रम लिहितो - "आपल्या शाळेत एका वर्गात कमी मुलं असायची; त्यामुळं सगळेच मित्र जवळचे वाटायचे; पण इथं माझ्या वर्गात पंचाहत्तर मुलं आहेत. मला त्या मुलांची नावंसुद्धा माहीत नाहीत. . . . आपल्या शाळेत मारत नव्हते; पण इथं तर बाई खूपच मारतात; त्यामुळं बाई मारतात की, काय म्हणून गप्पच बसावं लागतं. . . आपल्या शाळेत सगळ्या ताई-दादांबद्दल जवळीक वाटायची; पण इथं बाईंशी बोलायला भीती वाटते." अंजली प्रभावळकरनं एक-दोन वाक्यांत तिला सांगायचं ते सर्व सांगितलं आहे. ती लिहिते, "चार वर्षं कशी गेली ते कळलंच नाही. आम्हाला सगळंच मिळालं - काही मिळालं नाही असं झालं नाही." सृजनमध्ये इयत्ता तिसरी व चौथी अशी दोनच वर्षं राहिलेली दर्शना म्हणते, "सृजन-आनंद विद्यालयात मला ज्ञान मिळालं, आनंद मिळाला आणि शाळेतल्या सर्व ताई-दादांचा सहवास मिळाला." इ. स. १९८५ मध्ये शाळा स्थापन झाल्यानंतर शाळेत दाखल झालेली व सलग चार वर्षं शाळेत असलेली नीता महाडिक मोठ्या अभिमानानं लिहिते, "आम्ही सृजन-आनंद विद्यालयाचे पहिले विद्यार्थी. शाळेच्या लीलाताई आम्हा मुलांना कधी परक्या नव्हत्या. त्या आम्हाला मुलांप्रमाणं सांभाळतं." मला वाटतं की घेणारा आणि देणारा यांच्यातल्या क्षमता आणि निर्माण होणारे भावबंध यावर कोण कुणाला काय देतं आणि कोण कुणाकडून काय घेतं हे अवलंबून असेल. तिसरी व चौथी या दोनच इयत्ता आमच्या शाळेत असलेली शमीन आपल्या लिखाणात म्हणते,

"काय दिलं नाही मला सृजननं? सारं दिलं."

**आत्मविश्वास-आयुष्याची बुनियाद--**

बहुसंख्य मुलांनी सृजन-आनंद विद्यालयाच्या काही बाबींचा मिळालेल्या महत्त्वपूर्ण देणग्या म्हणून उल्लेख केला आहे. मुलांची लिहिण्याची भाषा वेगवेगळी असली, तरी त्यांचा आशय जवळ जवळ एकसारखाच आहे. सृजन-आनंद विद्यालयाकडून मिळालेल्या आत्मविश्वासाचा उल्लेख सर्व मुलांनी केला आहे. याबद्दल लिहिताना सागर म्हणतो, "माझ्या मते सृजननं दिलेली गोष्ट म्हणजे आत्मविश्वास. मी जर तसाच इंग्लिश शाळेत राहिलो असतो, तर मला आत्मविश्वास कधीच मिळाला नसता. मी कायमचाच भित्रा राहिलो असतो." दर्शना म्हणते की, "ताई-दादांच्या सहवासात शिकण्यात आनंद, उत्साह मिळाला." अंजली लिहिते, "सृजनमध्ये आम्ही बाईंना ताई व सरांना दादा म्हणत होतो. शाळेत अगदी घरगुती वातावरण वाटायचं! धाक व दरारा तर मुळीच वाटायचा नाही." हीच बाब दर्शनानं पुढील शब्दांत मांडली आहे, "लीलाताईंनी आम्हाला एकत्र राहण्याचा धडा दिला आणि हा धडा आजसुद्धा आम्हाला उपयोगी पडतो." मुक्त वातावरणात वाढलेल्या या मुलांना दुसऱ्या शाळांत गेल्यावर तिथल्या बंदिस्त आणि अधिकारशाहीनं भारलेल्या वातावरणाशी जुळवून घेणं जड जातं. शमीननं आपल्या लिखाणात या संबंधीचा एक प्रसंगच सांगितला आहे. तिचं याबद्दलचं लिखाणच आपण वाचू या. "एका सरांनी तर माझी काही चूक नसताना माझ्या डोक्यात पंधरा-वीस छड्या दिल्या, तेव्हा मी चिडून सरांना म्हटलं, सर, मीही एक माणूस आहे. जनावर नाही आणि जनावरांनाही संवेदना असतात. त्यांनाही असं मारू नका. मी किती सहन करावं?" हा प्रसंग लिहून शमीन म्हणते, "असा एखाद्या गोष्टीला प्रतिकार करायलाही मला सृजननंच शिकवलं." सागरनं अतिशय मोकळेपणानं आपले अनुभव लिहिले आहेत. या शाळेत येण्यापूर्वी तो इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जात असल्यानं त्यानं या दोन शाळांची तुलना करावी हे स्वाभाविकच आहे. त्यानं लिहिलं आहे, "इंग्रजी शाळेतली मुलं फारशी बोलकी नव्हती. सृजनमध्ये तीस मुलं होती ना तितकीच माझ्या



त्या शाळेतलया वर्गात होती. पण मला एकदेखील मित्र नव्हता. सृजनमध्ये मला सर्व तीसच्या तीस मित्र-मैत्रिणी होते. माझ्यामध्ये असलेली कमरतरता दूर सारून (सागरला स्पष्ट बोलता येत नसे.) त्यांनी मला मित्र बनवलं. मला इंग्रजी शाळेत असताना शाळेला जाण्याचा कंटाळा येत असे. (शाळेला न जाण्याचा हट्ट करत बसलेल्या सागरचा फोटोदेखील घरात आहे.) पण मला या शाळेत जाऊ नये असं कधीच वाटलं नाही. शाळेवर माझं खूप प्रेम जडलं."

**वेगळे विषय, आगळे उपक्रम--**

सृजन-आनंद विद्यालयात शिकवले जाणारे हस्तकला, चित्रकला, शिवण हे विषय आणि सहली, प्रकल्प, स्नेहसंमेलनं असे उपक्रम मुलांच्या मनांत घर करून राहिले आहेत. अर्चना त्याबद्दल लिहिते, "हस्तकला, शिवण हे सृजनमध्ये वेगळे विषय आहेत; त्यामुळं आम्ही स्वावलंबी बनलो. पूर्वी बटण तुटलं, तर आईकडून लावून घ्यावं लागे. आता आमचे आम्ही बटण लावू शकतो." स्वप्निलनं तर आपल्या लिखाणात जणू शिक्षण या विषयावर व्याख्यानच दिलं आहे. तो लिहितो, "मुलांना चांगल्या गोष्टी करण्याची मोकळीक व संधी दिली पाहिजे. अभ्यास व खेळ याशिवाय इतर विषय हस्तकला-- चित्रकला, संगीत, शिकवले पाहिजेत. अशा एकमेव शाळेचं उदाहरण म्हणजे माझ्या मते सृजन-आनंद विद्यालय." तो पुढं लिहितो, "सृजन-आनंद विद्यालयात चार नवीन विषयांशी माझी ओळख झाली. शिवण, सुशोभन, प्रकल्प आणि स्वच्छता. या शाळेत मुलांनाही शिवण शिकवतात. इयत्ता पहिली ते चौथीत शिवण शिकताना मी धावदोरा, हेम, काज, टीप, बटण लावणं व रुमालावर डिझाईन काढणं इतकं सर्व शिकलो. रुमाल शिवला आणि शबनम पिशवीही शिवली." प्रौढ व्यक्तींनाही जे समजणं अवघड जातं ते छोट्याश्या स्वप्निलनं कसं समजून घेतलं असेल याचं आश्चर्य वाटतं. सुशोभन ही संकल्पना शब्दांत मांडणं तसं अवघड आहे. त्याबद्दल तो काय लिहितो ते पाहा, "दर दिवशी वेगवेगळ्या गटांचं आळीपाळीनं सुशोभन असतं. दुसऱ्या दिवशी सुशोभन असल्यास आदल्या दिवशी गटप्रमुख व गटांतील मुलं

एकमेकांत चर्चा करतात. एखादा विषय घेऊन त्या संदर्भात कुणी काय आणावयाचं, कुणी काय करायचं, हे ठरवतात. दुसऱ्या दिवशी वर्गाच्या एका सारवलेल्या कोपऱ्यात त्या वस्तू, लिखाण नीट मांडतात. सुशोभनातून आपली एखादी कल्पना मुलांना सांगता येते.'' विक्रम सध्या जात असलेल्या पुण्यातल्या शाळेशी तो सृजन-आनंदमधले अनुभव ताडून पाहतो. तो लिहितो, ''हस्तकला व चित्रकला यांचा आपल्या शाळेत नेहमी तास असायचा; त्यामुळं नवनवीन वस्तू, चित्रं शिकायला मिळायची. पण इथल्या शाळेत मी हस्तकला, चित्रकला विसरूनच गेलो.'' प्रकल्पामुळं इतर विषयांशी ओळख झाली, माहिती मिळाली असं स्वप्निलनं लिहिलं आहे. प्रकल्प म्हणजे एखाद्या विषयाचा वेगवेगळ्या दिशेनं अभ्यास करायचा, माहिती मिळवायची असं सांगून अभ्यासाव्यतिरिक्त खूप नवी माहिती झाली असं स्वप्निल लिहितो. विक्रमच्या मते प्रकल्प, गाणी, गोष्टी, अवांतर माहिती, वर्तमानपत्रातली माहिती सृजनमध्ये मिळत होती; पण त्याच्या पुण्याच्या शाळेत या गोष्टी मिळत नाहीत. सृजन-आनंद विद्यालयाची सहल वेगळ्या प्रकारची असते याचाही आठव मुलांना आहे. स्वप्निल म्हणतो, ''जेव्हा शाळेची सहल जात असे, तेव्हा ती अभ्याससहल असे. त्यासाठी आजूबाजूच्या गोष्टींचा सतत विचार व त्यांचं निरीक्षण करावं लागे. तसंच त्यांची नोंदही करून घ्यावी लागत असे. इतर शाळांत मात्र असं दिसत नाही.'' अंजलीच्या मनात स्मशानसहल ठसली आहे. त्याबद्दल लिहिताना ती म्हणते, ''आम्हाला स्मशानसुद्धा दाखवलं. तिथले धार्मिक विधी आणि प्रेतदहनसुद्धा आम्ही पाहिलं.'' सागरनं एका वेगळ्या बाबीचा उल्लेख केला आहे. त्याच्याच शब्दांत आपण तो वाचू. ''या शाळेतल्या ताई-दादांनी व मुलांनी माझ्या अंगच्या गुणांना खूप प्रोत्साहन दिलं. अभिनय करणं, छान छान विषयांवर गोष्टी किंवा निबंध लिहिणं या कलांना खूप वाव आणि संधी दिली. आमच्या वर्गाचं मी खूप वेळा व अनेक बाबतीत नेतृत्व केलं.'' इतरांनी न उल्लेखलेल्या छोट्या-छोट्या बाबी दीपालीनं आवर्जून लिहिल्या आहेत. ''पळत जाऊन झाडावर चढणं, शब्दांवर शिरोरेखा देणं, लिखाणावर तारीख टाकणं, नाव लिहिणं या सवयी शाळेनं आम्हाला लावल्या. डब्याखाली रुमाल घेणं,



डबा खाऊन झाल्यावर वर्ग झाडणं याही सवयी शाळेनं लावल्या.'' हे तिचे उल्लेख लक्षात घेण्याजोगे आहेत. विक्रमच्या लिखाणात दुसऱ्याच काही बाबींचे किरण झळाळताना दिसतात. तो लिहितो, ''दर शनिवारी आपल्या शाळेत व्यायामप्रकार व कवायत व्हायची. पण या शाळेत सर्व्वास जानेवारी आली म्हणून आमची कवायत सुरू झाली.'' आणखीही एका बाबीचा उल्लेख त्यानं केला आहे. ''आपल्या शाळेत कुणी ना कुणी मोठे पाहुणे भेट देत असतात; त्यामुळं माहिती व्हायची. पण इथं पाहुणे येतच नाहीत.'' असं त्याचं निरीक्षण आहे. अंजलीनं शेकोटीचा कार्यक्रम, त्या वेळी प्रत्येक मुलानं विशिष्ट भूमिकेला योग्य असा पोशाख घालून करून दाखवलेला अभिनय आणि एकत्र खाल्लेलं पिठलं-भाकरी यांचा जो उल्लेख केला आहे, त्यावरून त्या दिवशीची मजा मुलांच्या मनात अजूनही कुठंतरी ताजी आहे हे लक्षात येतं. त्याचप्रमाणं तिच्या लिहिण्यात मुंबईच्या उदयाचल प्राथमिक शाळेची मुलं आमच्या शाळेतल्या मुलांच्या घरी राहायला येऊन चार-पाच दिवस त्यांचं आमच्या शाळेत येणं व नंतर सृजन-आनंदच्या मुलांनी उदयाचल शाळेत जाणं या गोष्टीचाही उल्लेख फार टवटवीतपणानं झालेला आहे. ती लिहिते, ''आम्ही मुलांनी मुंबईहून आलेल्या काही मुलांना स्वतःच्या घरी चार-पाच दिवस राहून घेतलं. त्यांना बगा, गुऱ्हाळं, रंकाळा असं बरंच काही दाखवून आणलं होतं. ती मुलं इथं राहिल्यानं त्यांची वागणूक व शिस्त आमच्या लक्षात आली. ती मुलं जेव्हा मुंबईला जायला निघाली, तेव्हा आमची आठवण म्हणून काही ना काही भेटवस्तू दिली.'' स्नेहसंमेलनाचा उल्लेख अनेक मुलांच्या लिखाणात आहे. आणि गंमत म्हणजे जी गोष्ट एखाद्या मुलाला चांगली वाटते, तीच गोष्ट दुसऱ्या कुणाला तरी नको असं वाटतं. ''सृजन-आनंदच्या गॅदरिंगसाठी कधी वेगळे कपडे मुद्दाम विकत आणावे लागले नाहीत. कागदाचे कपडे आम्ही करत होतो.'' अशी अभिमानपूर्वक नोंद अंजलीनं केली आहे; तर दर्शना गॅदरिंगला ''खरे कपडे घालण्याचा आनंद मिळाला नाही'' असं म्हणते.

**हे मिळालं नाही--**

दिलखुलासपणानं आपली मतं सृजन-आनंदच्या ताई-दादांपुढं मांडता

येतात याचा अनुभव असल्यामुळं सृजन-आनंदनं शिस्त दिली नाही, हेही मुलांनी ठासून सांगितलं आहे. सृजन-आनंदनं शिस्त दिली नाही यावर बऱ्याच मुलांचं एकमत आहे. मुलं काय म्हणतात ते त्यांच्याच शब्दांत आपण पाहू. "शांत बसण्याची व दंगा न करण्याची शिस्त सृजन-आनंदनं लावली नाही; त्यामुळं पुढं हायस्कूलमध्ये असं शिक्कामोर्तब झालं की, सृजनची मुलं बेशिस्त, दंगेखोर व वांड (हा खास कोल्हापुरी शब्द आहे.) आहेत." - सागर. स्वप्निलनंही हा मुद्दा वेगळ्या शब्दांत मांडला आहे. "मी प्रामाणिकपणानं सांगतो की, माझा दंगेखोरपणा, तासाच्या वेळची बडबड व हसवाहसवी यावर सृजन-आनंदनं जरब व वचक बसवला नाही. सृजन-आनंदमध्ये कठोर शिक्षा करत नसत, ताई-दादा मारत नसत; त्यामुळं धड्यातील एखाद्या वाक्याचा वेगळाच अर्थ घेऊन काहीतरी विनोद करणं व दंगा करणं ही माझी खोड वाढली." प्रश्न विचारण्याबाबतही सागरनं आपला अभिप्राय स्पष्ट शब्दांत नोंदवला आहे. "सृजनमध्ये आम्हाला प्रत्येक गोष्ट जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारायला शिकवलं; पण बऱ्याच वेळा मोठ्या माणसांनी सांगितलेलं निमूटपणानं ऐकून घेणं म्हणजेच त्यांचा आदर करणं असं असतं; त्यामुळं हायस्कूलमध्ये व इतर ठिकाणी वावरताना आम्हाला अडचण आली. प्रश्न विचारण्यालासुद्धा मर्यादा असतात हे आम्हाला कधी सृजन-आनंद विद्यालयात समजलंच नाही." शमीनच्या संवेदनशील मनानं अनेक फरक टिपले आहेत. ती लिहिते, "बाईंनी माझी स्नेहसंमेलनात एकांकिकेसाठी निवड केली; पण मला तिकडं जाणं अजिबात आवडलं नाही. कारण कुणीतरी लिहिलेलं बाई सांगतील तसं करायचं. आणि सृजनमध्ये माझा ड्रेस स्वतःच बनवण्याचा आनंद मिळायचा, तो तर मिळालाच नाही; पण बाईंना हवा तसा भरमसाठ खर्च करून एक फ्रॉक मात्र शिवावा लागला! एवढा फरक निघाला दोन नाटकांत!" शमीनला आजच्या तिच्या शाळेतल्या वातावरणात अनुभवाला येणारा संघर्ष खूप गलबलून टाकणारा आहे; पण साऱ्याच गोष्टी थोड्याच सांगता येतात?

## क्षमतांचा विकास : जीवनपथासाठी तहानलाडू, भूकलाडू--

शिक्षण ही देण्या-घेण्याची बाबच नव्हे. शाळांत ज्या प्रकारचं जीवन प्रवाहित करण्याचा प्रयत्न केला जातो, त्याचं रंगरूप, वास, चव व स्पर्श



शाळेतल्या मुलांपर्यंत आपोआप पसरतात. त्यामुळंच इतर शाळांत 'शिक्षण' या नावाखाली ज्या बाबी अतिशय महत्त्वाच्या मानल्या जातात - परीक्षांतले गुण, लांबलचक व दिमाखदार गुणवत्ता याद्या, स्पर्धांतले विजय, कडक शिस्त, चमकदार गणवेष, घोटीव उत्तरं, आज्ञाधारकपणा आणि अशाच इतर काही बाबी-- सृजन-आनंदमधल्या ताई-दादांना गौण वाटतही असतील. त्यांच्या मते 'शिक्षणाच्या' दृष्टीनं महत्त्वाचं काय? प्रतिक्षणाला प्रचंड वेगानं वेगवेगळ्या माहितीनं भरत जाणाऱ्या या जगात मुलांना चांगल्या रीतीनं जगायचं असेल, तर कोणतीही माहिती पाठ करण्यापेक्षा माहिती मिळवायची कशी, निरीक्षण करायचं कसं, कोणतीही गोष्ट स्वतः कशी समजून घ्यायची, न समजलेलं विचारण्याचं धैर्य कसं जोपासायचं - अशा अनेक क्षमतांचा विकास प्राथमिक महत्त्वाचा मानायला हवा. स्पर्धापेक्षा सहकार्यातून शिकण्यातला आनंद मुलांना समजायला हवा. शिकणारा व शिकवणारा यांचं नातं श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या पातळीमुळं परस्परांना दूर ठेवणारं नसून जिव्हाळ्यानं एकमेकांचा हात धरून एकाला अनोखा असणारा प्रदेश दुसऱ्याने दाखवत किंवा एकमेकांच्या साहाय्यानं शोधत जाणाऱ्यांचं ते नातं असावं. प्रसिद्ध लेखक व विचारवंत श्री. कारंथ यांनी एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणं, "शाळा हे मुलांसाठी 'यातनागृह' होता कामा नये." शाळा ही एक 'गंमत' वाटावी. मुलांना शाळेचा लळा लागावा. एकूण आयुष्यच समजून घेण्यासाठी पुस्तक हे एक साधन आहे. ते एकमेव साधन नव्हे अशा विश्वासावर आधारून शाळेनं कोणत्याही शिकण्यासाठी अत्यावश्यक असणारा आत्मविश्वास व आत्मसन्मान, जिज्ञासा आणि जागरूकतार, साहस आणि सावधानता यांचे तहानलाडू, भूकलाडू मुलांच्या शिदोरीत बांधले पाहिजेत. ज्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरांतली मुलं शाळेत आहेत, तो स्तर म्हणजेच भारत देशातील एकूण वास्तव आहे असा उंबरातल्या किड्यासारखा अपसमज मुलांनी जोपासून आपली नाळ व इतर वास्तवाशी तोडून टाकण्याचा प्रयत्न करू नये. यासाठी फार लहान-लहान; पण महत्त्वपूर्ण अनुभवांचं दर्शन, सहली, स्नेहसंमेलनं, सामुदायिक वाढदिवस अशा अनेक माध्यमांतून मुलांपर्यंत पोहोचायला हवं असं मानून सृजन-आनंद विद्यालयात कामांची आखणी होते.

**समुद्रमंथन आवश्यक- -**

सृजन-आनंद विद्यालय ही एक प्रायोगिक शाळा आहे याचा अर्थच हा की, काही शैक्षणिक श्रद्धा गृहीतकं मानून शाळेतील ताई-दादा अनुभवांच्या निकषावर त्यांची योग्यायोग्यता तपासून पाहत आहेत. खरं तर गेल्या सात वर्षांत जी मुलं या शाळेत शिकली किंवा आज जी शिकत आहेत, ती ऐन तारुण्यात जेव्हा ही शाळा आठवतील आणि त्या वेळी त्यांना या शाळेनं आपल्या आयुष्यासाठी काही महत्त्वपूर्ण दिलं किंवा दिलं नाही असं जे वाटेल, तेच शैक्षणिकदृष्ट्या मूलभूत महत्त्वाचं मानावं लागेल. मात्र आज मुलं शाळेबद्दल जे सांगत आहेत तेही कमी महत्त्वाचं नाही. एक तर असं, की परीक्षांतील यशापयशापेक्षा दुसरं काही महत्त्वाचं शाळेनं द्यायला हवं हा विचारच स्वातंत्र्योत्तर काळातही झळाळून वर न आल्यामुळं मूळ विचारच कुंठित झाला आहे. या लेखाच्या निमित्तानं अनेक शाळांतून असा शोध घेतला गेला, तर कदाचित 'शाळेनं मुलांना काय द्यायला हवं.' याबद्दलचे अनेक विचार - मुलांचे व प्रौढांचेही - प्रगट होतील आणि समुद्रमंथनातून हाती आलेल्या मौल्यवान नवरत्नांप्रमाणं ते आपल्या भावी शिक्षणाच्या वाटचालीसाठी बहुमोल ठरतील. मात्र त्यासाठी अशा समुद्रमंथनाचे प्रयत्न व्हायला हवेत.



# शाळांनी शिक्षकांना पगाराशिवाय आणखी काय द्यायचं?

**आणखी काय द्यायचं?- -**

शिक्षक-प्रशिक्षक म्हणून मी दोन दशकांहून अधिक काळ काम केल्यामुळं शिक्षणाविषयीचे अनेक प्रश्न माझ्या मनाची नेहमीच उलघाल करत असतात. त्यातल्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरं मला आजही सापडलेली नाहीत. ती शोधण्याचा माझा प्रयत्न असतो. असाच एक प्रयत्न म्हणून मी काही नव्या-जुन्या शिक्षकांना ''ज्या शाळेत तुम्ही शिकवता, त्या शाळेनं तुम्हाला काय दिलं आणि काय काय दिलं नाही?'' असं विचारत असते. प्रश्न ऐकल्याबरोबर बरेचदा त्यांचा चेहराच मला उत्तर देतो, ''काय बावळट बाई आहे! शाळेनं शिक्षकाला काय द्यायचं असतं? पगार, सेवेत संरक्षण, दोन महिन्यांहून जास्त पगारी रजा, सावलीतलं काम आणि 'गातुवित्'पणाचा टेंभा. . .'' असा काहीसा भाव चेहऱ्यावर असूनही ती मंडळी प्रत्यक्षात मात्र मला म्हणतात, ''मॅडम, आम्ही तुम्हाला काय सांगणार? काय काय द्यायचं असतं शाळेनं?'' अनेक वर्षं मनात घोळणारा हा प्रश्न शेवटी मी नुकताच सृजन-आनंद विद्यालयात शिकवणाऱ्या शिक्षकांनाच विचारला. ''सृजन-आनंद विद्यालयानं मला काय काय दिलं आणि काय काय दिलं नाही?'' याबद्दल एक लेखी टिपणच करून देण्याची विनंती मी त्यांना केली. त्यांच्या टिपणानुसार जे हाती आलंय ते तुम्हाला सांगायचं आणि तुम्हाला विचारायचं की, तुमचा अनुभव काय? ऐकताय ना मग? सृजन-आनंद विद्यालयानं शिक्षकांना काय दिलं ते?

**शिक्षक - हे आणि ते- -**

शिक्षकांचं म्हणणं ऐकण्यापूर्वी काही बाबी आपण समजून घेऊ या.

सृजनमध्ये काम करणारे सारे शिक्षक प्रशिक्षित आहेतच असं नाही. काहींनी एस. एस. सी. चा उंबरठाही ओलांडलेला नाही; तर काहींनी पदव्युत्तर पातळीपर्यंत शिक्षण घेऊन शिक्षक-प्रशिक्षणही घेतलं आहे. शिवाय विद्यालयाच्या सेविकाही जणू तेथील शिक्षिकाच आहेत. त्या तर फक्त सातवीपर्यंतच शिकल्या आहेत. शिक्षणामुळं, तसंच प्रशिक्षणामुळं माणसाला शहाणपण येतं की काय, अशी जी थोडीशी शंका माझ्या मनात शिल्लक होती, ती या साऱ्यांची उत्तरं वाचता-वाचता निकालात निघाली! सृजनच्या सेविका विजयाताई यांच्या टिपणातली मर्मज्ञता कोणत्याही रीतीनं उच्चशिक्षित ताई-दादांपेक्षा कमी नाही. एका माजी प्राचार्यांना लागलेला हा अनुभवजन्य शोध कदाचित वाचकांनाही या ना त्या रीतीनं उपयोगी पडेल! व्यक्तीच्या शहाणपणाचं व बुद्धीचं मोजमाप त्याच्या शिक्षणावरून करण्याचा आपला पायंडा किती फसवा आणि संबंधित व्यक्तीच्या विकासाला बांध घालणारा ठरू शकतो हे माझ्याप्रमाणं आपण सारेच शिकलो, तर किती बरं होईल ना?

### भोपळा फुटला--

प्राथमिक शाळेत शिकवायचं ते काय? आणि त्याची तयारी कसली? कसलं नियोजन? धरायचं पुस्तक डोळ्यांपुढं आणि सुरू करायचं वाचायला. कधी मुलांना पुस्तकातलंच उतरून काढायला सांगायचं, कधी आपण पुस्तकातलं वाचून दाखवून मुलांना लिहून घ्यायला सांगायचं. धड्याखाली असणाऱ्या दोन-चार प्रश्नांची उत्तरं आपण मुलांना लिहून द्यायची आणि मुलांनी ती पाठ करायची - असं असतं प्राथमिक शाळेतलं शिकवणं, अशी समजूत सामान्यपणं असते. सृजन-आनंद विद्यालयातल्या ताई-दादांना मात्र असं वाटत नाही. निमाताईंनी हे मत फार छान मांडलं आहे. आपल्या टिपणात त्या म्हणतात, "लहान मुलांना शिकवणं सोपं असतं या समजुतीचा भोपळा फुटला. सर्वांत अवघड; पण तितकंच आनंददायी असं हे काम आहे, याची जाणीव 'सृजन' मध्ये येऊ लागल्यावर झाली. प्रत्येक गोष्टीचा बारीक विचार करण्याचा प्रयत्न 'सृजन'मुळं सुरू झाला. इथल्या कामाचा व्याप प्रचंड आहे. त्याची नस नू नस चाचपून पाहायला हवी; कुठं दुखतंय कुठं, सुखावतंय कुठं, सलतंय



कुठं, कुठं शस्त्रक्रियेची गरज आहे आणि कुठं दुर्लक्ष करून भागणार आहे याचा अंदाज येईल. हे सारं समजण्यासाठी मुलांप्रमाणं मीही सृजनमधील एक विद्यार्थीच आहे.'' मीनलताईंनी हाच विचार वेगळ्या पद्धतीनं मांडला आहे. त्या म्हणतात, "शिकवायचं म्हणजे मुलांना वाचून दाखवायचं, सांगायचं असं मी समजत होते; पण शाळेत निरीक्षण करायला आल्यावर व नंतर काम करू लागल्यावर लक्षात आलं की, शिकवायचं म्हणजे प्रत्यक्ष करून दाखवायचं. विषयाच्या मुळापर्यंत जाऊन परत वरपर्यंत यायचं. विषयाचा जीवनाशी निगडित असलेला संबंध उकलून दाखवायचा. मराठीचा गणिताशी, गणिताचा भूगोलाशी असलेला संबंध स्वतः समजून घ्यायचा व तो मुलांना समजेल अशा रीतीनं सांगायचा. मुलांना एकाच सरधोपट मार्गानं न नेता त्यांना अनंत वाटा दाखवायच्या. तऱ्हेतऱ्हेनं आपण विचार करायचा आणि तसाच विचार मुलंही करतील असं पाहायचं.''

शाळेच्या पहिल्या वर्षापासून आजपर्यंत शाळेत शिकवण्याचं काम करणाऱ्या आशाताईंनीही आपले याबद्दलचे अनेक विचार मांडले आहेत. त्या म्हणतात, "शिक्षक किंवा पालकच फक्त मुलांना शिकवू शकतो हा संकुचित दृष्टिकोन या शाळेमुळं नाहीसा झाला. संधी दिली तर मुलं स्वतःसुद्धा शिकतात, परस्परांपासून शिकतात, आजूबाजूच्या वास्तवाचं निरीक्षण करून शिकतात, हे मला 'सृजन'मुळं नुसतं समजलंय असं नाही, तर अशा पद्धतीच्या शिक्षणावर माझा दृढ विश्वास बसला. क्रमिक पुस्तकाच्या खुंट्याला बांधूनच शिकवत राहिलं, तर शिकवणं कंटाळवाणं, नीरस आणि नावड निर्माण करणारं होतं. मात्र आजूबाजूच्या घटना, प्रसंग, तसंच त्यांच्या चिमुकल्या आयुष्यातले संदर्भ अगर तयार केलेले वेगवेगळे खेळ यांचा उपयोग करून शिकवलं, तर गणितासारखा एरवी कंटाळा वाटणारा विषयही मुलं आनंदानं शिकतात. एवढंच नव्हे, तर शिकायचा विषय आणि शिकवणारा शिक्षक यांच्याबद्दलही त्यांना प्रेम वाटू लागतं. शिक्षणाबद्दलचा हा महत्त्वपूर्ण अनुभव विद्यालयामुळंच मला मिळाला.''

अंगणातले भरपूर दाणे टिपायला आलेली एखादी चिमणी जसे सगळे दाणे भरभर चोचीत वेचायचा प्रयत्न करते, तसाच प्रयत्न

सृजनमध्ये फक्त एक वर्षच शिकवण्याचा अनुभव असलेल्या शोभाताईंनी केलेला आहे. त्या लिहितात, ''या शाळेतल्या x x ताईंचं शिकवणं पाहिल्यावर माझ्या नावडीचं मराठी मला आवडू लागलं. मनात विचार यायचा x x ताईकडं काही जादू आहे का? मुलांच्याकडून एवढ्या छान कल्पना काढून घेऊन त्या शब्दांत कशा साकार करतात? आणि एकेका शब्दाला अर्थ तरी किती असतात! सृजनमध्ये येण्यापूर्वी वाटायचं की, शब्दाचा अर्थ त्या वाक्यापुरताच मर्यादित असतो. आता मात्र शब्दाचा, वाक्याचा, बोलण्याचा, पाहण्याचा दृष्टिकोनच बदलत चालला आहे.'' स्वतःच्या प्रशिक्षणातही जे मिळालं नाही, ते मिळाल्याचा निर्वाळा देताना सुनंदाताईंनी लिहिलं आहे, ''प्रशिक्षणकाळात मुलांना कसं शिकवावं यावर अनेक व्याख्यानं ऐकली, पाठ पाहिले; परंतु या विद्यालयात आल्यानंतरच मुलांच्या अंगी असलेली सुप्त कौशल्यं आणि क्षमता जागृत करून त्यांना सहजपणं कसं शिकवावं याचं ज्ञान आणि अनुभव मला मिळाला.'' शिक्षक-प्रशिक्षणांनंतर अनेक वर्षं माध्यमिक शाळेत शिकवणाऱ्या रेखाताई 'सृजन-आनंद'मध्येही गेली सहा वर्षं सहभागी आहेत. त्यांना ही चिमुकली शाळा काय शिकवणार हो? मात्र त्या लिहितात, ''अध्यापनाच्या पद्धतीत निरनिराळे प्रयोग व प्रयत्न करण्यास 'सृजन-आनंद'नं मला शिकवलं. मुलं कशा रीतीनं विचार करतात, याचं निरीक्षण करायला शिकवलं. शिकवणं म्हणजे केवळ क्रमिक पुस्तकातला आशय चघळणं नसून मुलांच्यात सामाजिक जाणिवा निर्माण केल्या पाहिजेत, हे इथंच जाणवलं. शिकवण्यात कृतिमयता आणण्याचं महत्त्व समजलं. शिकवायचा आशय लक्षात घेऊन खेळ कसे तयार करावेत, हे समजलं.'' रेखाताईंनी प्रांजळपणानं आपला अनुभव टिपणात नमूद केलेला दिसतो.

शिक्षकांचे हे अनुभव वाचता-वाचता मला वाटलं, की आर्थिक दृष्टीनं सबल नसलेल्या सृजन-आनंद विद्यालयानं निदान शिकवणाऱ्या ताई-दादांना तरी शिक्षणाच्या दृष्टीनं मूलभूत महत्त्वाचं असं थोडं-फार काहीतरी दिलंय याचं समाधान काही अगदीच नगण्य नाही.

सृजन-आनंद विद्यालयात शिकवण्याचं काम करणाऱ्या निम्म्याहून जास्त व्यक्ती अप्रशिक्षित आहेत. आपण प्रशिक्षित नाही आणि शाळेत



शिकवण्यासाठी प्रशिक्षणाची नितांत गरज असते या दोन्ही कल्पनांचा पगडा अप्रशिक्षित व्यक्तींवर एवढा आहे की, त्यामुळंच त्या सतत शिकत राहत असाव्यात आणि आपण 'शिकलो' असल्याचा त्यांचा दावा नसावा. सृजनमार्फत स्वतःचं शिक्षण कसं होतं आहे याबद्दलचे विद्यालयात शिकवणाऱ्या शिक्षकांचे अनुभव वाचू या.

## हे शिकले, असं शिकले--

सृजनसारख्या तत्त्वं मानणाऱ्या, नवनिर्मिती करू इच्छिणाऱ्या, सांघिक रीतीनं काम करणाऱ्या, उलट दिशेनं पोहण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि आत्मपरीक्षण करायला लावणाऱ्या शाळेत काम करणं खूप अवघड आहे. जेवढं खोल उतरायला हवं, तेवढं अजून जमत नाही आणि त्याची कारणं माझी मीच शोधते आहे. मुलांना वाढवण्यात एक ठाम; पण उदार अशी दृष्टी माझ्यात हळूहळू तयार होऊ लागली आहे. मुलांना आपण 'घडवत' नसतो; त्यांना 'घडायला' मदत करत असतो ही भूमिका सृजनमुळं रुजली. एक माणूस म्हणूनही विविध पातळ्यांवर स्वतःची उंची वाढवण्याचा प्रयत्न सृजनमुळंच सुरू झाला.

**निमाताई,** (शिक्षण : बी. कॉम.)

सृजन-आनंद शिक्षण-प्रवृत्तीच्या हळुवार; पण सातत्याच्या फुंकरीमुळं माझा आत्मतृप्तीचा कोष केव्हा आणि कसा फाटला हे मला समजलंच नाही. पंख फुटलेल्या माझ्या या नव्या रूपानं मला मोहरून टाकलं. शाळेच्या आणि केंद्राच्या विविध कामांत मी झेपावू लागले. हस्तकला, भाषिक खेळ, कविता करणं, नाटक करणं अशा सृजनशील कामांच्या रंगीबेरंगी ठिपक्यांनी माझे पंख सजत चालले. फुलपाखरांमार्फत परागीकरण होतं, असं म्हणतात. मी मिळवलेल्या विचारांचं परागीकरण करण्याचा माझा प्रयत्न असतो.

--**नंदिताताई,** (शिक्षण : इयत्ता नववीपर्यंत)

सृजन-आनंद विद्यालयात आल्यापासून मी विचार करायला शिकले. माझ्यात आता आत्मविश्वास निर्माण झाला. या शाळेत

काम करताना चार माणसांत बोलण्याचं धाडस माझ्यात आलं. स्वतःचं काही चुकल्यास टीका सहन करण्याचं शिक्षण मिळालं. एकमेकांना मदत करून अवघड गोष्ट सोपी होऊ शकते हे कळलं. शिकवण्याची वेगवेगळी तंत्रं व पद्धती समजू लागल्या. अलीकडं काही कविताही करायला शिकले आहे.

--**वासंतीताई**, (शिक्षण : एस. एस. सी)

या शाळेत काम करायला लागल्यापासून गेल्या सहा वर्षांत ताई-दादांच्या सहवासात खूप काही शिकायला मिळालं. वास्तविक पाहता अगदीच कमी शिकलेली व शाळेची सेविका असलेली मी! परंतु मला कमी न लेखणाऱ्या ताई-दादांच्या प्रोत्साहनामुळं मी शाळेतील विविध कामांबद्दल अहवाल लिहू लागले. विचार करण्यास चालना मिळाली. थोड्या-फार प्रमाणात का होईना, जो आत्मविश्वास निर्माण झाला तो या शाळेमुळंच. एवढंच नव्हे, तर माझ्या मुलाच्या स्नेहसंमेलनासाठी पालक म्हणून गेले असता त्या कार्यक्रमांच्या स्वरूपावर टीका करण्याचं धाडस व दृष्टीही सृजनमुळंच माझ्यात आली.

--**विजयाताई** (सेविका), (शिक्षण : इयत्ता सातवी)

डी. एड., बी. एड असलं की चांगलं शिकवता येतं. मला कसं शिकवता येणार? पण मी 'सृजन'मध्ये शिकवायला येऊ लागले. xx ताईंनी अनेक प्रकारांनी मार्गदर्शन करायला सुरुवात केली आणि आज मला असं वाटतं की, एखादी जबाबदारी आपण थोड्या-फार प्रमाणात का होईना, पार पाडू शकतो. शिक्षणातलं आपल्यालाही काहीतरी समजतं हा आत्मविश्वास सृजननंच मला दिला.

--**मीनलताई,** (शिक्षण : बी. ए.)

आज विचार करताना समजतंय की, मी या शाळेत केवळ गुंतलेली नाही; तर एकजीव झाले आहे. कर्तव्यापोटी केलेली कामंच फक्त माणसाला गुंतवून ठेवत नाहीत तर परतफेडीची कोणतीही अपेक्षा न ठेवता केलेलं काम आपले पाय अधिक घट्ट रुतवून ठेवतं, हे मला 'सृजनआनंद' नं शिकवलं. . .



श्रमाचं विकेंद्रीकरण केल्यानं कोणत्याही कामाची उंची वाढते, याचा अनुभव शाळेत काम करताना मिळाला. व्यक्तीपेक्षा संस्था महत्त्वाची, हा विचार सृजनआनंदकडून मिळाला. आठवडी शिक्षकसभांतील चर्चा, त्यांत सुचवलेली वाचनीय पुस्तकं, वाचून दाखवलेल्या कविता यांतून प्रेरणा मिळत राहते. आत्मशोधनाला मी प्रवृत्त होते. व्यक्तिमत्त्व प्रभावी करण्यास शाळेत घडणारे प्रसंग मोलाची मदत करतात. . . एवढंच नव्हे, तर पतीमुळं असलेलं सावलीसारखं समाजातलं एक स्थान 'सृजन'मधील अनेक अनुभवांमुळं स्वतंत्र व समृद्ध झालं. जगण्याला एक उद्दिष्ट मिळालं. . . शाळेनं माझं मलाच ओळखायला शिकवलं.

--**आशाताई,** (शिक्षण : एम. ए.)

लहान मुलांना शिकवण्याचा व त्यांना शिकवताना स्वतः शिकण्याचा आनंद शाळेनं दिला. संयम शिकवला. शब्द जपून वापरायला शिकवलं. सोप्या भाषेत शिकवणं तसं कठीणच; पण हळूहळू ते जमू लागलं.

--**संजीवनीताई,** (शिक्षण : एम. ए., एम. एड.)

मला मुलांशी खेळायला, बोलायला आवडतं हे, सृजन-आनंदमध्ये जायला लागल्यापासून अधिक लक्षात आलं. स्वतःचे गुणदोष समजून आले. स्वतःकडं अधिक तटस्थतेनं बघता येऊ लागलं. शाळेत जायला लागल्यानंतरच ओरिगामी शिकले. मग हस्तकला, हस्तव्यवसाय आवडतो हे लक्षात आलं. कार्यक्रमाच्या नियोजनाची चांगली कल्पना आली. स्वतःवरची टीका समजून घ्यायला व दुसऱ्यावरही टीका करायला शिकले. एखादी वस्तू मुलांना उपयोगाची ठरेल की, नाही याचा विचार केल्याशिवाय घरातली कोणतीही वस्तू आता मी टाकत नाही. माझ्यातल्या स्पर्धक शाळेनं जागा होऊ दिला नाही.

--**सिंधूताई,** (शिक्षण : एम. ए.)

ज्या गोष्टी येणं आवश्यक आहे, अशा बऱ्याच आपल्याला येत

नाहीत ही महत्त्वाची जाणीव तीव्रतेनं आणि सातत्यानं सृजन-आनंदनं करून दिली. . . स्वतःची स्वतःशीच नव्यानं ओळख करून घ्यायची जी विद्या सृजन-आनंदनं दिली, ती अतिशय मूलभूत आहे. सृजन-आनंदनं ज्या वेगवेगळ्या संधी दिल्या, त्यामुळं मी आत्मविश्वास मिळवू शकले आणि इतरांच्यात असा आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी त्यांनाही संधी मिळाली पाहिजे ही जाणीव या शाळेनं वाढीस लावली. आतापर्यंत जे काही थोडं-फार बौद्धिक वाचन झालं आहे, त्याचं श्रेय सृजन-आनंदलाच आहे. . . माझ्या मुलींना वाढवण्यात शाळेमुळं अधिक जागरूकता आली. माझ्या कुवतींचा अंदाज शाळेमुळं आला. माझ्या विचार करण्याच्या पद्धती, चटकन प्रतिसाद देणं, नानाविध शंका येणं, अभिनय करता येणं, हजरजबाबी असणं, आवश्यक तेवढं संयमी नसणं - हे सारं सृजन-आनंदमध्ये काम करता-करता माझं मलाच दिसलं.

--**रोहिणीताई**, (शिक्षण : बी. ए.)

अभ्यास करताना धड्याखालचे प्रश्न आणि त्यांचं पाठांतर यांचाच विचार करायचा आणि एखादी शंका आली तरी तिचं निरसन करून घेणं परीक्षेच्या दृष्टीनं गरजेचं नाही, असं वाटत असे; परंतु सृजन-आनंद विद्यालयात आल्यानंतर ज्याला आपण महत्त्व देत नव्हतो, अशा अनेक बाबी किती महत्त्वाच्या आहेत याची सत्यता पटली. x x ताईंच्यामुळं मला चित्र काढता येऊ शकतं हे समजलं. मला हे जमणार नाही, ते जमणार नाही ही भावना शाळेत काम करता-करता केव्हा दूर पळाली हे समजलं नाही. . . जबाबदारी पेलण्याची क्षमता निर्माण झाली. नवनवीन आव्हानं स्वीकारण्यासाठी मन तयार केलं गेलं. . . बुजरी वृत्ती जाऊन थोडासा धीटपणा आला. माणसाला पारखण्याची दृष्टी इथंच मिळाली. स्वतःचं आत्मपरीक्षण करायची सवय लागली. आपली एखादी चूक कबूल करणं हे स्वविकासाच्या वाटेवरचं पहिलं पाऊल आहे, हे मनोमन पटलं. माझ्या मनाचं अंतर्बाह्य सौंदर्य वाढवण्यात सृजन-आनंद विद्यालयाचा मोठा वाटा आहे



असं मला वाटतं.

--**विमलताई**, (शिक्षण : एम. ए., बी. एड.)

बरेच ताई-दादा किती खोलवर, सांगोपांग विचार करून शिकवतात हे पाहायला मिळालं. . . स्नेहसंमेलन हेसुद्धा एक शिकण्या-शिकवण्याचं साधन आहे याचा प्रत्यय आला. शिकवणं कसं आनंददायी करता येईल हे थोडं-फार शिकले. शिक्षणावरील काही चांगली पुस्तकं इथं वाचायला मिळाली. सहनशीलता वाढली. राग आला, तरी त्यावर ताबा ठेवून शांतपणानं कसं बोलावं हे इथं शिकले. विषयांची फारकत न करता शिकवता येणं गरजेचं आहे याची जाणीव झाली. शाळेत होणाऱ्या कार्यशाळांमुळं व बुद्धिमान आणि समर्पित लोकांचा सहवास घडल्यामुळं मरगळ नाहीशी झाली. आपल्या शिकवण्यात सुधारणा केली पाहिजे याची जाणीव झाली व ती कशी करता येईल याचा विचार सुरू झाला.

--**रेखाताई,** (शिक्षण : बी. एससी., बी. एड.)

इयत्ता तिसरी व चौथी अशी दोन वर्षं सृजनमध्ये शिकलेली माझी मुलगी आता एका 'नामांकित' शाळेत सहावीत आहे. एकदा त्या शाळेतल्या सरांनी हिंदीच्या कवितेला चाल लावायला मुलांना सांगितलं. माझी मुलगी एक चाल गुणगुणत होती. वर्गातल्या एका मुलीनं सरांना सांगितलं. "सर, ही 'ओये ओये' ची चाल लावते आहे." सरांनी माझ्या मुलीला बदडून काढलं! सरांनी स्वतःचं न ऐकता आपल्याला का मारलं, या मानसिक वेदनेनंच अधिक ठणकत मुलगी घरी आली. दुसऱ्या दिवशी मी शाळेत जाऊन सरांशी बरंच काही बोलले. 'खरं तर मारणंच अयोग्य; पण मुलाचं म्हणणं ऐकूण न घेता मारणं तर अक्षम्य आहे.' अशा प्रकारचं मी बोलले. बी. एड. झालेले सर आणि मी एक हौशी शिक्षक! पण त्या सरांशी तात्त्विक पातळीवर स्पष्टपणानं बोलण्याचं धैर्य माझ्यात सृजनमुळंच आलं आहे. अन्यायाची जाणीव करून देणारे बरेच प्रसंग घडत असतात. तेव्हा वाटतं, सृजन-आनंद माझ्यासाठी तुरटीच्या

खड्यासारखं आहे. मला निखळ ठेवणारं व स्वच्छ करणारं.

--**सुचितताई,** (शिक्षण : एम. ए.)

### पंख मागू नको--

खरं तर सृजन-आनंद विद्यालयानं शिक्षकांना दिल्या नाहीत अशा खूप बाबी आहेत. आटोपशीर इमारत नाही, प्रसाधनगृहाची सोय नाही, शांतपणानं बसून वाचता येईल अशी एखादी जागा नाही, लिहाय-वाचायसाठी स्वतंत्र टेबल-खुर्च्या नाहीत, पुरेसं मानधन नाही. . . ही यादी कितीतरी लांब करता येईल; परंतु या भौतिक सुखसोयींचा उल्लेखही न करता बहुतेक ताई-दादांना स्वतःच्या विकासाला खतपाणी पुरवणारं शाळेतलं वातावरणच महत्त्वाचं वाटलं. सृजन-आनंद विद्यालय ही शिक्षकपणाची आपली मातृसंस्था आहे असं वाटणं ही या विद्यालयाच्या यशाची एक महत्त्वपूर्ण बाजू मानायला हवी. परंतु याहीपेक्षा महत्त्वाची मला वाटणारी बाब अशी की जे शिक्षक भौतिक सुखसोयींपेक्षा विकासानुकूल वातावरणाला महत्त्व देतात, आत्मशोधनाला प्रवृत्त होतात, व क्रमिक पुस्तकाबाहेरही शिकवण्यासारखं खूप काही आहे असं मानतात, आत्मविश्वास जागृत होणं ही शिक्षणाची पहिली पायरी असं अनुभवतात - तेच शिक्षक यांसारख्या साऱ्या बाबी आपल्या आचार-विचारांतून मुलांपर्यंत प्रवाहित करण्याच्या प्रयत्नांत राहतात आणि

*“माग हवे ते गडे तू*
*माझे पंख मागू नको.*
*जरी तुझाच निर्झर*
*त्याची गती मागू नको.”*

असं स्वतः म्हणत राहतात आणि इतरांनाही तेच सांगतात. तुम्हाला काय वाटतं? कोणत्या प्रकारचे शिक्षक असावेत? शाळांनी शिक्षकांना काय काय द्यावं?



# शाळेनं पालकांना काही द्यायचं असतं?

### मागोव्यासाठी एक आवाहन--

कोणत्याही शाळेत प्रत्यक्ष शिकणारे कोण कोण असतात? हा प्रश्न ऐकला तर बरेच संस्थाचालक, शिक्षक व पालक म्हणतील, “कोण कोण? असा अनेकवचनी शब्दप्रयोग कशाला हवा? शिकणारी फक्त मुलंच म्हणजे विद्यार्थीच असतात!” मला मात्र असं वाटत नाही. मुलाचं नाव ज्या शाळेत दाखल केलं जातं (की मुलांना टाकलं जातं?), त्या शाळेच्या नित्य व नैमित्तिक अनुभवांतून पालकही बरंच काही शिकतात. ह्या विचारावर श्रद्धा असल्यामुळं सृजन-आनंद विद्यालयाच्या पालकांना एक आवाहन करण्यात आलं. ते आवाहनच आपण वाचू म्हणजे त्यामागची वैचारिक पार्श्वभूमी लक्षात येईल.

“प्रिय पालकहो,

आपल्या शाळेची प्रायोगिकता टिकवण्यासाठी व वाढवण्यासाठी वेगवेगळ्या अंगांनी सतत शोध घ्यावा लागतो; यशापयशाचा मागोवा घ्यावा लागतो. त्याच हेतूनं पुढील मुद्द्यांवर आपण एक विस्तृत व सोदाहरण टिपण शाळेत द्यावं ही विनंती. १) पालक या नात्यानं सृजन-आनंद विद्यालयानं मला काय दिलं? काय दिलं नाही? २) माझ्या पाल्याला सृजन-आनंद विद्यालयानं काय दिलं? काय दिलं नाही? ३) या शाळेत पाल्याचं नाव नोंदवताना आपल्या काय अपेक्षा होत्या? त्यांपैकी कोणत्या व कशा सफल झाल्या? ४) ज्या अपेक्षा असफल राहिल्या त्यांची कारणं कोणती? त्याबाबत शाळेला काय करता येईल? ५) शाळेचं काम अधिक प्रभावी होण्यासाठी कमीत कमी तीन उपाय सुचवा. आई व वडील यांनी स्वतंत्र टिपणं दिली तर फारच चांगलं; नाहीतर पाल्याच्या आई-वडिलांनी परस्परांशी विचार-विनिमय करून टिपण द्यावं.” शाळेच्या आवाहनाला प्रतिसाद देण्याची थोडी-फार सवय

असल्यामुळं इयत्ता पहिली ते चवथीच्या जवळ-जवळ निम्म्या पालकांची टिपणं मिळाली आहेत. आवाहनातल्या पहिल्याच प्रश्नानं बऱ्याच पालकांना आत्मशोधासाठी प्रवृत्त व्हावं लागलं. आत्मशोधातले काही कवडसे आपण पाहू या.

## पालकांना शाळेनं काय द्यायचं असतं? - -

''शाळेची पहिली पालकसभा सहामाही परीक्षेच्या अगोदर झाली. त्यात सहामाही परीक्षेची फी ठरवण्यापासून ते रिझल्टपर्यंत सर्वच विषय होते. अशी पालकसभा मी प्रथमच अनुभवत होते. सुशोभन म्हणजे काय, हेही प्रात्यक्षिकांसह समजावून सांगितलं. शिवाय मुलांच्या मनातील प्रत्येक उत्सुकतेचं तुम्ही स्वागत करा हा लीलाताईंचा कानमंत्र कौतुकास्पद आहे. खरंच, पालक व शिक्षक जर 'पार्टनर' झाले तर आपण नक्कीच एक सुजाण नागरिक बनवू शकू. . . सुशोभनात मी सामील झाल्यामुळं मला आज कळतंय की, आपली चित्रकला चांगली आहे. शाळेत मात्र मला नेहमीच चित्रकलेत कमी मार्क मिळायचे. आज वाटतंय की, आपल्याला त्या वेळी कुणीतरी असं भेटलं असतं, तर कदाचित आपण काही वेगळ्याच झालो असतो. . . स्नेहसंमेलनाच्या वेळीही पालकांनी करावयाच्या एका नाटकात मी सहभागी झाले होते. आमचा 'जोगवा' चालू असताना मंत्रमुग्ध झालेला प्रेक्षकवर्ग आणि पाहुण्यांच्या भाषणात आमच्या कार्यक्रमाचा झालेला उल्लेख ऐकून आमचा कार्यक्रम निश्चितच चांगला झाला असं वाटलं. माझ्यासारख्या सामान्य स्त्रीला नाटकात सामावून घेतल्याबद्दल शाळेला व निमाताईंना खूप धन्यवाद.'' (इयत्ता पहिलीत असलेल्या सुनयनाच्या आई.)

''पालक या नात्यानं सृजन-आनंद विद्यालयानं मला शिकण्याची व शिकवण्याची नवीन दृष्टीच दिली आहे. लीलाताईंच्या शिक्षणातील ओॲसिसनं आमच्याच नव्हे, तर सर्वच बालकांकडं पाहण्याची नवी दिशा मला दाखवली. माझ्या मुलांच्या प्रत्येक अडचणीच्या वेळी ते मला मार्गदर्शक ठरलं आहे.'' (इयत्ता तिसरीतील गायत्रीचे आई-बाबा)

''पालक या नात्यानं मुलांशी संवाद साधण्याचं महत्त्व माहीत होतं; पण संवाद साधण्याचे परिणाम आणि त्याची आवश्यकता सृजन-आनंद



विद्यालयामुळं जास्त जाणवू लागली हाच मोठा फायदा.'' (इयत्ता दुसरीतील गायत्री वडनेरकरचे आई-बाबा)

गेली पाच वर्षं शाळेत शिकवणाऱ्या रोहिणीताईंची शाल्मली इयत्ता पहिलीपासून सृजन-आनंद विद्यालयात आहे. पालक म्हणून काय मिळालं याबद्दल रोहिणीताईंचे जे अभिप्राय आहेत, त्यांत गेली पाच वर्षं प्रत्येक आठवड्याला होणाऱ्या शिक्षकसभांतून त्यांनी जी शैक्षणिक दृष्टी मिळवली आहे तिचं स्पष्ट प्रतिबिंब दिसतं. त्या म्हणतात, ''१) मुलांच्या अभ्यासक्रमाचा अभ्यास करायला मला शिकवलं. मुलाला तो भाग शिकताना कोणत्या अडचणी येत असतील, याचा विचार करायला शिकवलं. २) दर वेळी मूल आपल्यापर्यंत पोहोचण्याची वाट पाहण्यापेक्षा आपण त्याच्यापर्यंत पोहोचावं हे आता पटू लागलं आहे; मात्र ते अजूनही पूर्णपणे अंगात भिनलेलं नाही. ३) मुलाच्या बाबतीत आपण जशा अपेक्षा ठेवतो, तशाच मुलाच्या आपल्या बाबतीत अपेक्षा असतात हा दृष्टिकोन मिळाला. ४) मूल किती जबाबदारी पेलू शकेल याचा पूर्वी अंदाज नव्हता; आता थोडा-फार अंदाज करता येतो.''

मानसशास्त्रज्ञ म्हणून काम करणाऱ्या श्रीमती मेधा लिमये यांची निरीक्षणं समजून घेणं महत्त्वाचं ठरेल. टिपणात त्या लिहितात, ''माझी मोठी मुलगी दुसऱ्या शाळेत आहे. तिचा अभ्यास मीच घेत होते. सृजनमधील शिकवण्याच्या पद्धतीमुळं आपली शिकवण्याची पद्धत किती वरवरची होती हे आता लक्षात आलं आणि त्यात थोडी-फार सुधारणा करता आली. आपल्या पालकपणात किती त्रुटी आहेत, हे लीलाताईंची पुस्तकं वाचून कळलं. त्या पुस्तकांतील विचार स्वतःत आणि आसपासच्या लोकांत रुजवण्याचा प्रयत्न केला.'' (इयत्ता तिसरीतील नंदनची आई)

''मुलाला शाळेत घातल्यानंतर शाळेची काही वैशिष्ट्यं आणि वेगळेपण लक्षात येऊ लागलं. मुलांबरोबरच पालकांवर टाकल्या जाणाऱ्या जबाबदाऱ्या माझी कौटुंबिक परिस्थिती आणि व्यवसाय यामुळं पूर्ण करणं प्रथमतः त्रासदायक वाटलं; परंतु जसजसं तिकडं लक्ष देऊ लागलो, तसतशी त्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची आवश्यकता पटू लागली.'' (इयत्ता तिसरीतील परागचे बाबा)

रवी मुळीक यांचं टिपण वाचणं अतिशय आनंदाचं वाटलं. सुरेख अक्षर, नीटनेटकी मांडणी आणि कमी शब्दांत; पण स्पष्टपणं मांडलेले अभिप्राय अशा वैशिष्ट्यांमुळं ते टिपण नुसतंच देखणं झालं नसून एक जपण्याची चीज बनलं आहे. खरं पाहिलं तर ते संपूर्ण टिपणच प्रत्येकानं वाचायला हवं. इथं मात्र प्रत्येक मुद्द्याच्या संदर्भात त्यातील काही भागच लिहावा लागणार आहे. ते आपल्या टिपणात लिहितात, "पालक म्हणून सृजननं मला काय दिलं असेल, तर पालकत्वाची जाणीव. पालकत्व म्हणजे नुसतंच भूषण नसून जबाबदारी आहे याची जाणीव. सर्व पालकांना जाणवणारी जबाबदारी म्हणजे पाल्याचा गृहपाठ पुरा करून घेणं; पण गृहपाठ झाला का? म्हणून मुलांच्या मागं लागायला आम्हाला सृजननं शिकवलंच नाही. सृजननं आम्हाला सांगितलं - तुम्ही मुलांशी संवाद साधा. त्याला शाळेत काय शिकवलं, ते विचारा. कितीही कामात असलात तरी मुलासाठी थोडा वेळ काढा. मूल जसं वागायला तुम्हाला हवं आहे, तसं तुम्ही त्याच्याशी वागा. त्याच्या जबाबदारीची जाणीव त्याला मीटिंग्ज, चर्चा यांतून करून द्या. कार्यक्रमाची वर्गणी वेळेवर देण्याबाबतही सृजननं वेगळा आग्रह धरला. शाळेच्या उपक्रमांत तुम्ही नुसती पैशाची नव्हे, तर प्रत्यक्ष कामात उतरून मदत करा. त्यामुळं त्या कामामागची शाळेची भूमिका समजते, मुलांनी त्यातून काय शिकायचं ते समजतं, रोजच्या ठरीव साच्यातील कामांपासून दूर जाऊन काहीतरी वेगळं केल्याचा आनंद तुम्हालाही मिळतो. सृजनमधले उपक्रमसुद्धा ठराविक साच्याचे नसतात. त्यामुळं पालकांच्याही ज्ञानात भर पडते. उपक्रमांतील प्रत्यक्ष सहभागातून हे सारं मिळवण्याची संधी पालक या नात्यानं सृजननं आम्हाला दिली. . . मुलं, पालक आणि शाळा यांचं नातं सांगणारं वाचावं हे आम्हाला वेळोवेळी सांगितलं गेलं. 'तोतोचान' नावाचं पुस्तक वाचलं, त्या वेळी बऱ्याच गोष्टी लक्षात आल्या. मुख्य म्हणजे आपलं मूलसुद्धा विचार करत असतं हे समजलं. लहान-लहान प्रसंग कळत-नकळत त्याच्यावर संस्कार करत असतात, हे समजलं. . . पालकसभा, प्रकल्पातील पालकांचा सहभाग यामुळं ओळखी वाढल्या. मित्र मिळाले. कुटुंबं एकत्र आली. . . पालक या नात्यानं सृजननं काय दिलं नाही हे लिहिणं मात्र अवघड आहे; कारण माझं मागणंच काही नव्हतं." (माजी विद्यार्थी सागर व सध्या इयत्ता चौथीत शिकणारी धनुक यांचे बाबा)

"पालक या नात्यानं आपल्या पाल्याविषयीच्या अपेक्षा वाढवण्याच्या, तसंच त्याच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्नशील राहण्याच्या कामी सृजन-आनंदनं आम्हाला मदत केली आहे. मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत स्वतःचा सहभाग वाढवण्याची प्रेरणा विद्यालयाकडून मिळाली आहे." (इयत्ता पहिलीतील सुरुचीचे आई व पप्पा)

दीपेन आणि किशोरी यांनी शाळेकडून पालक म्हणून त्यांना मिळालेल्या एका वेगळ्याच पैलूचा उल्लेख केला आहे. ते लिहितात, "शिक्षणजत्रा, गणित कार्यशाळा, विज्ञान कार्यशाळा नेहमी व्हाव्यात. या कार्यशाळांत पालकांना सहभागी करून घेतलं जात असल्यामुळं आम्हाला खूप काही समजतं." (इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या ओजस सबनीसचे आई-बाबा)

## सारं काही मुलांसाठी--

मूल झालं की संसाराचा वेल मांडवावर गेला असं पूर्वी समजलं जात असे. अलीकडं मात्र तसं मानलं जात नाही. 'नामांकित' समजल्या जाणाऱ्या आणि शक्यतो के. जी. ते पी. जी. (पूर्वप्राथमिक ते पदव्युत्तर) शिक्षणाची सोय असणाऱ्या शिक्षणसंस्थेत मुलांना प्रवेश मिळाला की, आता पालक 'हुश्श'!" करतात; त्यामुळं सृजन-आनंद विद्यालयासारख्या प्रायोगिक आणि त्यातही मराठी माध्यमाच्या शाळेत पालकांनी मुलाचं नाव का घातलं, हे समजून घेणं आम्हाला महत्त्वाचं वाटलं. आमची शाळा इ. स. १९८५ ला सुरू झाली असली, तरी पहिली दोन-तीन वर्षं कोल्हापुरातही ही शाळा फारशी कुणाला माहीत नव्हती. अलीकडील दोन-तीन वर्षांतच शाळा माहीत होऊन मुलाचं नाव शाळेत दाखल करण्याची शक्यता दूरान्वयानं का होईना, निर्माण झाली आहे. म्हणूनच या शाळेत नाव नोंदवताना आपल्या काय अपेक्षा होत्या, असा प्रश्न विचारला होता. ह्या प्रश्नाला पालकांनी थेट उत्तर दिलं आहे. त्यांची उत्तरं समजून घेऊ या.

"ही शाळा इतर शाळांपेक्षा वेगळी आहे हे माहीत होतं." असं इयत्ता पहिलीतील आशीषची आई लिहिते आहे. क्लीन बोल्डचा पवित्रा

घेऊन इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या स्वप्ना कांबळेचे वडील श्री. जयपाल म्हणतात, "आमच्या पाल्याचं नाव शाळेत दाखल करताना सृजन-आनंद ही एक प्रायोगिक शाळा आहे म्हणजे काय याची आम्हाला कसलीही दखल नव्हती." डॉ. वाटवे हे आमच्या परागचे बाबा. त्यांची ह्या प्रश्नांची उत्तरं आपल्यालाही विचारशील बनवतात. ते म्हणतात, "काही विशिष्ट अपेक्षा बाळगून मुलाला शाळेत दाखल करण्याची परिस्थिती कुठं आहे हे समजेल काय? केवळ एक सामाजिक उपचार आणि प्रवाहाबरोबर वाहत जाण्याची सवय यामुळंच मुलाला शाळेत दाखल करावं लागलं. मातृभाषेतूनच मुलाला शिकवावं यावर आमचं दोघांचं (नवरा-बायको) एकमत झाल्यानं मी मराठी शाळेच्या शोधात होतो. मला जिथं राहायला जागा मिळाली तिथं एक नावाजलेली मराठी शाळा आहे; परंतु तिथं प्रवेश मिळू शकला नाही. मी चिंतेत असतानाच आपल्या शाळेतील एक विद्यार्थी नाकात हरभरा गेल्याच्या तक्रारीसाठी माझ्याकडं आला. चौकशी करता शाळेची माहिती मिळाली. प्रवेश मिळेल असं समजलं. विनासायास प्रवेश मिळतो आहे या एकमेव आनंदात मी परागचं नाव शाळेत नोंदवलं." सुशिक्षितांचा आजच्या शिक्षणाबद्दलचा भ्रमनिरास, मराठी माध्यमाचा आग्रह धरणारेही काही पालक असतात याची आनंददायी प्रचीती आणि विनासायास प्रवेश मिळणं किती अवघड आहे हे त्यांनी सूचित केलं आहे. श्रीमती वझे या आमच्या पालक असून त्या जर्मन भाषा शिकलेल्या आहेत. श्री. वझे हे एक उद्योजक आहेत. ते दोघेही शाळेच्या काही उपक्रमांत सहभागी असतात. टिपण मात्र श्रीमती वझे यांनी लिहिलं आहे. मुलाचं नाव या शाळेत घालण्याबद्दल त्या लिहितात, "ही शाळा एक प्रायोगिक शाळा आहे व अभ्यासाव्यतिरिक्त या शाळेत बाकीचंही शिकवतात एवढंच ऐकलं होतं. शाळेच्या नावातच म्हटल्याप्रमाणं इथं शिकताना मुलांना आनंद मिळेल, अशी माझी अपेक्षा होती." नंदनचे आई-बाबा लिहितात, "इतर शाळांपेक्षा वेगळ्या शाळेत आपल्या मुलाला घालतो आहोत, हे माहीत होतं. इतर शाळांसारखी घोकंपट्टी, अवजड अभ्यास, गृहपाठ इथं नाहीत, एवढंच माहीत होतं. या शाळेत नाव घातल्यामुळं मुलावर अभ्यासाचा बोजा पडणार नाही. त्याला इतर गोष्टी शिकायला मिळतील, खेळायला पुष्कळ वेळ मिळेल अशी



अपेक्षा होती." नंदनची आई मानसशास्त्रज्ञ आहे हे लक्षात घेतलं म्हणजे त्यांच्या लिहिण्याला एक वेगळी डूब येते. सध्या इयत्ता चवथीत शिकणाऱ्या शरदचे बाबा मोकळेपणानं सांगतात की, इयत्ता पहिलीत शरदसाठी प्रवेश घेताना त्यांना फी व इतर माहिती मिळाल्यावर समाधान वाटलं. नाहीतरी शेवटी पालकांच्या आर्थिक आवाक्यातली शाळा असली, तरच सर्वसाधारण पालक आपल्या पाल्याचं नाव शाळेत घालू शकणार ना? इयत्ता तिसरीतल्या शिल्पाचे बाबा स्टेट बँकेत नोकरी करतात. त्यांचं टिपणही वाचण्यासारखं आहे. "मी माझ्या मुलीला आपल्या शाळेत घातलं याचं कारण मी इंग्रजी माध्यमाविरुद्ध असल्यानं ती मराठी शाळेतच शिकणार होती. तसंच ही शाळा आमच्या घरापासून फारच जवळ होती. सर्वांत महत्त्वाचं कारण म्हणजे शाळेच्या संचालिका म्हणून असणारे सर्वपरिचित नाव - लीलाताई पाटील. माझ्या मुलीचा उपजत असणारा थोडा-फार धीटपणा जपण्यास व वाढीस लागण्यास त्यांचा फार उपयोग होणार होता." असं त्यांनी लिहिलं आहे. सृजन-आनंद विद्यालयात आपल्या मुलाचं नाव घालताना रवी मुळीकना असं माहीत होतं की, इथं मुलांना वेगवेगळ्या माध्यमांतून शिकवलं जाईल. शाळा प्रायोगिक असल्यामुळं इतर ठिकाणांपेक्षा वेगळं शिक्षण मिळेल. शिवाय मुलांची संख्या मर्यादित ठेवणार असल्यानं मुलांकडं वैयक्तिक लक्ष पुरवलं जाईल. थोडक्यात, उपाय झाला नाही, तरी अपाय निश्चित होणार नाही ह्या अपेक्षेनं त्यांनी शाळेत सागरचं नाव दाखल केलं आणि नंतर धनुकलाही याच शाळेत घातलं.

**अपेक्षासाफल्य--**

अपेक्षांच्या साफल्याबद्दल लिहिताना श्रीमती वझे यांनी तपशीलवार नोंदी केल्या आहेत. त्या लिहितात, "मला लिहायला आनंद वाटतो की, माझ्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणात पूर्ण झाल्या आहेत. मला मुलांना फक्त परीक्षार्थी करायचं नव्हतं; त्यांना व्यवहाराची, जीवनाची माहिती व्हावी अशी इच्छा होती. या शाळेत मुलांच्या कुतुहलाच्या प्रश्नांकडं विशेष लक्ष पुरवलं जातं व त्यांना अभ्यासाचे विषय शिकवताना त्यांचा व्यवहारातील उपयोगही शिकवला जातो. नुसतीच घोकंपट्टी व पोपटपंची

होत नाही. शाळेच्या पुस्तकातील अभ्यासक्रमाव्यतिरिक्तही बरंच शिकवलं जातं. इतिहास विषयाच्या संदर्भात स्वातंत्र्यासाठी झुंजलेल्या महान व्यक्तींबद्दल बरंच शिकवलं जातं; त्यामुळं मुलांना राष्ट्राबद्दल व या थोर नेत्यांविषयी प्रेम निर्माण झालं आहे. या शाळेत जाऊन मुलं नक्कीच जास्त चौकस झाली आहेत. या शाळेतल्या विविध प्रकल्पांमुळं - धान्यप्रकल्प, पक्षीप्रकल्प, पोस्टप्रकल्प - त्यांचं सामान्यज्ञानही वाढलं आहे. सुशोभनामुळं मुलांमधील सुप्त गुणांना दिशा मिळते.'' श्रीमती वझे यांच्याप्रमाणंच 'लांबची शाळा जवळ' करणाऱ्या श्रीमती लिमये त्यांच्या पाल्याला सृजन-आनंदनं काय दिलं याबद्दल सांगताना लिहितात, ''नंदन शाळेत खूपच रमला आहे. शाळा न चुकवण्यासाठी त्याची धडपड असते. कोणतीही गोष्ट स्वतः करून पाहायची व त्यातील आनंद वरचेवर घेण्याची त्याला आस असते. शाळेतलं शिक्षण नुसतंच पुस्तकी नाही. मुलांच्या सामाजिक जाणिवा प्रगल्भ व्हाव्यात, त्यांनी एक चांगलं माणूस व्हावं, या दिशेनं शाळेत वेगवेगळे उपक्रम केले जातात.'' आणखी एक पालक श्रीमती गार्गी भांडारी साफल्याच्या प्रश्नाबाबत लिहितात, ''गायत्रीमधील सर्व क्षमतांना सृजन-आनंद विद्यालयात चालना मिळत आहे. ती संवेदनशील होण्यात घरच्याइतकाच ताई-दादांचाही वाटा आहे. तिच्यातील बदल सुरवंटाचं फुलपाखरू व्हावं तसे मनोहर आहेत.'' या वर्षी इयत्ता दुसरीत प्रवेश घेतलेल्या सुनयनाच्या आई-बाबांनी शाळेबद्दल खूप भरभरून लिहिलं आहे. ते लिहितात, ''पहिल्या दिवशीच सुनयनानं सांगितलं की, शाळा खूप चांगली आहे, मारत नाहीत आणि मला खूप मैत्रिणीदेखील मिळाल्या. शाळेची प्रार्थना खूपच वेगळी व छान आहे. शाळेत बाई नि सर नाहीत, ताई-दादा आहेत. डबा खातानाही खूप मजा येते. ताईपण आमच्याबरोबरच डबा खातात; शिवाय प्रत्येकाच्या डब्यात काय आहे हेही पाहतात. पूर्वी सुनयना खूप घाबरट होती; पण आता ती फारच बोलकी आणि धीट झाली आहे.'' किशोरी व दीपेन सबनीस लिहितात, ''शाळेत ओजस लगेचच रुळला. शाळेत जाण्याबद्दल तक्रार कधीच नसते. शाळेतील शिक्षणपद्धतीमुळं मुलांना विचार करण्याची सवय लागते. मुलं निर्भीड बनतात. ओजस स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकतो. एखाद्याचं चुकलं असेल, तर तसं स्पष्टपणं तो सांगू शकतो.



त्याच्यासारखा अतिशय भित्रा, लाजाळू, अबोल मुलगा आता त्याचं मत कसं बरोबर आहे हे पटवून देतो किंवा स्वतःची चूक कमीपणा न मानता कबूल करतो. विचार करण्याचा दृष्टिकोनही चांगला असतो. मुलांना विचार करण्याचं, बोलण्याचं स्वातंत्र्य मिळाल्यामुळं मुलांचं कुतूहल वाढतं. ओजसच्या मते त्याला काही समजणार नाही असं नसतं. मुलांना मिळालेला बाललेखक कार्यशाळेचा अनुभवही छान आहे. सृजनमुळं ओजसला वेगवेगळे अनुभव निश्चितच मिळाले; त्यामुळं त्याला आपण 'अभ्यास' केला असं वाटत नाही. डॉ. जयंत नारळीकर, श्री. ना. ग. गोरे यांच्यासारख्या मान्यवर लोकांना पत्रं लिहायची संधी शाळेमुळं ओजसला मिळाली. त्यांची आलेली उत्तरं स्वतःजवळ ठेवण्याचा त्याचा आनंदही मोठा आहे.'' इयत्ता तिसरीतील श्वेताच्या बाबांनी पाल्याची सर्व बाजूंनी उन्नती झाली असं सांगून पुढं म्हटलं आहे, ''माझी मुलगी सृजनमध्ये येण्यापूर्वी अत्यंत भित्री होती. तिचा आत्मविश्वास ढळला होता. आता ती निर्धारानं बोलण्याचा प्रयत्न करते. कोणत्याही ताईच्याबद्दल अवास्तव भीती नाही. ताई-दादांचं प्रेम तिला मिळतं; त्यामुळं ती शाळेत जाण्यास उत्सुक असते. श्वेता इंग्रजी शाळेत शिकत असताना तिचं सामान्यज्ञान फार कमी होतं; पण आता दैनंदिन अभ्यासाशिवाय इतर बऱ्याच गोष्टींची साधारण तरी कल्पना तिला असते.'' परागच्या बाबांनी नेटकेपणानं आपलं म्हणणं मांडलं आहे. ते लिहितात, ''सृजन-आनंदनं नेमकं आपल्याला काय दिलं याची यादी करता येणार नाही; परंतु सर्वांगसुंदर व्यक्ती घडवण्यासाठी जे जे लागतं, ते ते या शाळेत मिळतं व मिळेल असं वाटतं.'' रवी मुळीकनी याबद्दल पुढील मुद्दे मांडले आहेत. ते मुद्दे असे - ''१) आत्मविश्वास, २) सभाधीटपणा, ३) विचार करण्याची सवय, ४) कल्पकता, ५) लेखनाची सवय, ६) प्रत्येक गोष्ट समजलीच पाहिजे हा आग्रह.'' मुरुची यंदा शाळेत पहिलीत दाखल झाली असली, तरी तिच्या आई व पप्पांचं टिपण सविस्तर आहे. ते लिहितात, ''आमच्या पाल्याला पाठ्यक्रमाचं शिक्षण तर दिलंच आहे; शिवाय त्याचबरोबर सतत कृतिशील व प्रयत्नशील राहण्याची पाल्याची वृत्तीही जोपासली जात आहे. विशेष म्हणजे एक नागरिक या नात्यानं सर्वसामान्य कर्तव्यं असतात, त्याची

शिकवण तिला आतापासूनच मिळत आहे. 'सारे साफ साफ' या गाण्यातून तिनं हे नक्कीच लक्षात घेतलं की, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावल्यानं आपल्यालाच फायदा होतो. शाळेतील वातावरणात जिवंतपणा आहे; त्यामुळं पाल्य स्वतःहून शिकण्यास प्रेरित होत आहे. स्वतः शिकण्याची ही प्रक्रिया सृजनमुळंच निर्माण झाली.'' श्री. शिवाजी व श्रीमती सुशीला पाटील आपल्या पाल्यांबद्दल म्हणतात, ''या शाळेमुळं आमची दोन्ही मुलं निर्भय, आत्मविश्वासू व अंतर्मुख झाली आहेत.'' सृजन-आनंदनं शाल्मलीला काय दिलं, याबद्दल रोहिणीताईंनी इतर पालकांप्रमाणं शाळेमुळं हे हे झालं असा निर्वाळा न देता वेगळ्याच प्रकारानं आपली मतं मांडली आहेत. त्या लिहितात, ''चौकसपणा व निरीक्षण हे गुण माझ्या मुलीत जन्मतः किती प्रमाणात होते व ह्या शाळेत गेल्यामुळं त्यात किती वाढ झाली हे ठरवणं कठीण आहे. मात्र एक गोष्ट नक्की की, शाळेत त्यासाठी प्रयत्न केले गेले. काही शाळांत गेल्यानंतर हे गुण नाहीसं होणं, कमी होणं हा परिणाम दिसतो. मुलीत आत्मविश्वास आहे. ती अंदाज करू शकते आणि तुलनात्मक विचारही करू शकते. उदाहरणार्थ, बाजारात गेल्यावर एखाद्या भाजीचा दर समजल्यानंतर ती महाग की स्वस्त, घ्यावी की नाही, किती घ्यावी याबद्दल ती विचार करू शकते. शाल्मली स्वतःचं मत पटकन मांडते किंवा कळवते. तिच्यावर फारसं दडपण येत नाही.'' शाळेनं मुलाला हे दिलं, ते दिलं याबद्दलचं पालकांचं म्हणणं वाचताना सृजनच्या ताई-दादांनाही आपण जे करायचा प्रयत्न करतो आहोत हे निदान थोडं-फार उगवत आहे याचा प्रत्यय आला आणि आनंदही झाला.

### हे हवं--

मिळायला हवी होती अशी एक बाब बऱ्याच पालकांनी नमूद केली आहे. मांडण्याची तऱ्हा आणि वापरलेले शब्द जरी वेगवेगळे असले, तरी साऱ्यांचा मतितार्थ तोच आहे. मुलं जादा आत्मविश्वासू झाली आहेत असा तो थोडा नाराजीचा स्वर. श्रीमती वझे त्याबद्दल लिहितात, ''विद्या विनयेन शोभते या म्हणीतला विनय, निखिल आणि अजय यांच्यात दिसून येत नाही. त्यांना 'ग' ची जास्त बाधा झाली आहे. पण विनय



मुलांमध्ये हवाच. त्यासाठी शाळेत विशेष प्रयत्न करायला हवेत.'' रवी मुळीकसुद्धा वेगळ्या सप्तकात, पण हाच स्वर लावतात. ते म्हणतात, ''प्रत्येक गोष्ट समजलीच पाहिजे या आग्रहामुळं तुम्ही काहीही बोललात, तर लगेच पाच-दहा प्रश्न हजर असतात. काही वेळा वाटतं की, प्रश्न विचारायलाही मर्यादा आहेत हे त्यांना शिकवायला हवं. काही प्रश्नांची उत्तर स्वतः शोधायची असतात, हे त्यांना माहीत व्हायला हवं.'' किशोरी सबनीस यांनी हीच री थोडी-फार ओढली आहे. ''कधी कधी ओजसचा स्पष्टपणा उद्धटपणाकडं झुकणारा वाटतो. मोठ्या माणसांच्या वयाचा आदर करून बोलता आलं पाहिजे. दुसऱ्याची चूक त्याचा अपमान न करता सांगता आली पाहिजे.'' रोहिणीताईंना शाल्मलीचा आत्मविश्वास फाजील आहे असं वाटतं, तसंच इतर व्यक्तींच्या बाबतीत ती थोडी बेपर्वाईनं वागते, आपलंच म्हणणं इतरांनी मान्य करावं असा तिचा आग्रह असतो, हे सांगून त्या विचारतात की, शाळेत कळत-नकळत नेतृत्व करण्याची संधी मिळते त्याचा तर हा परिणाम नसेल? शिल्पाच्या बाबांनी मुलगी 'भयंकर धीट' झाली आहे असं लिहिलं आहे.

### चांभारचौकशा--

पालकांच्या या मुद्द्याचा थोडाअधिक विचार करूया. स्पष्टवक्तेपणा आणि फटकळपणा, निर्भयपणा आणि उद्धटपणा, स्वतःच्या मताचा आग्रह धरतानाही इतरांच्या मतांचा आदर न करणं, आत्मविश्वासू असणं आणि आगाऊ असणं यांत निश्चितच फरक आहे. शाळेचा प्रयत्न मुलं निर्भय, आत्मविश्वासू, बोलकी व्हावीत असाच असतो. एकजण बोलत असताना दुसऱ्यानं घुसखोरी करायची नाही हे त्यांच्या मनावर बिंबवलं जातं. परंतु आपल्याला हवं तेव्हा बोलकेपणा आणि नको असेल तेव्हा तोंड मिटून बसणं किंवा आपल्याला मुलांनी धीटपणा दाखवावा असं वाटतं तेव्हा त्यांनी धीट व्हायचं आणि इतर वेळी नाही, असं घडायला मुलं म्हणजे काय वीज सुरू-बंद करायची बटनं आहेत का? शिवाय शिक्षणातला एक चतुर्थांश भाग माणसाला यथावकाश हळूहळू जीवनातूनच मिळत असतो. त्यामुळंच उद्धटपणाकडं झुकणारा, आज भयंकर वाटणारा अथवा 'आगाऊपणा' म्हणून लेबल लावला जाणारा मुलांचा बोलकेपणा, निर्भीडपणा, धीटपणा इत्यादीत

कदाचित यथावकाश फरक पडेलही. माझी मात्र प्रार्थना त्यांचे हे गुण कमी होऊ नयेत अशीच राहील! कारण गुण म्हणून पालकांना ते हवे आहेत. फक्त त्यांना स्वतःला किंवा इतरांना ते गैरसोयीचे वाटतात, तेव्हा त्यांना ते नको आहेत.-

**मोठ्यांचा आदर--**

वयानं मोठ्या असणाऱ्या माणसांशी आदर ठेवून बोलावं आणि सृजनमधली मुलं तसं बोलत नाहीत या वाक्यातील अर्थाचे सर्व धागेदोरे उलगडून पाहू या का? आदर ठेवून बोलायचं म्हणजे काय बरं करायचं? पटत नसलं तरी पटलं म्हणायचं? की स्वतःचं मतच मांडायचं नाही? सांगतील तसं फक्त करायचं? कित्येकदा मोठ्या माणसांची माहितीसुद्धा चुकीची असते किंवा अपुरी असते. लहान मुलं अभिनिवेशानं त्या चुकीला चूक म्हणतात किंवा अपुरी माहिती पुरी करतात. मी स्वतः याला आगाऊपणा म्हणणार नाही. 'मलाच सारं समजतंय' असा पवित्रा घेणार नाही. फार तर आपल्या दोघांचं म्हणणं आपण तपासून बघूया, असं म्हणेन. एक मात्र खरं की, दुसऱ्याच्या चुकीचा आपण जितक्या तत्परतेनं चूक म्हणू, तितक्याच तत्परतेनं स्वतःची चूक कबूल करण्याचं धाडसही मुलांत असलं पाहिजे. शिवाय चूक सांगताना अकारण धारदार शब्द वापरले जाणार नाहीत याची खबरदारी घ्यायला हवी. सृजन-आनंद विद्यालयात याची जाणीव ठेवून त्या दिशेनं जाण्याचा प्रयत्न असतो.

**असं नेतेपद--**

नेता म्हटला की, तो मुजोर, बेफिकीर, स्वतःचंच खरं करणारा असतो असं मुलांना वाटत असावं. घरातलं नेतेपद ज्यांच्याकडं असतं, त्या मंडळींचं वागणं, दूरदर्शनवरील कार्यक्रमातून मिळणारं 'शिक्षण' आणि कदाचित याला नकळत खतपाणी घालणारं इतर काही नेतेपणाच्या ह्या संकल्पनेला जबाबदार असू शकेल. मात्र चौथीतली शाल्मली, धनुक, तिसरीतला पराग, ओजस, भैरवी, संजीवनी, दुसरीतला प्रसाद, गायत्री, स्वप्निल आणि पहिलीतली रसिया, सुप्रिया, प्रणव यांना आम्ही सतत सांगत असतो, "तुझं एकट्याचं सुशोभन चांगलं आहे; पण



आपल्या गटातल्या साऱ्या मुलांना घेऊन तुम्हाला काम करता आलं पाहिजे. पुढाऱ्याने स्वतः पुढं जाण्यापेक्षा इतरांना कसं पुढं नेता येईल, याचा विचार करायला हवा." शिवाय शाळेत गटकामाचे अनेक प्रसंग येतात. वस्तू वापरून गणितं तयार करणं, प्रयोग करणं, चित्रांचं निरीक्षण करून त्याबद्दल लिहिणं, दिलेल्या प्रश्नांची उत्तरं नकाशा पाहून निवडणं, एखाद्या प्रसंगावर नाटक कसं करायचं ते ठरविणं - अशा गटकामाच्या वेगवेगळ्या बाबी असतात. त्या वेळीसुद्धा सर्व गटाचं मत घेणं, गटातील प्रत्येकाला बोलायला सांगणं, कोणावर न चिडता, न रागावता सर्वांशी बोलणं याची प्रात्यक्षिकं मुलांना कमी-अधिक प्रमाणात मिळत असतात. नेतृत्व करणाऱ्या मुलांत समंजसपणा, संयम अशा गुणांची वाढ कशी होईल, याबद्दल ताई-दादा कृतिशील असतात.

**त्यानं मायबाप होऊ नये--**

श्री. मुळीक यांनी म्हटलेली आणखीही एक बाब लक्षात घेण्यासारखी आहे. ते लिहितात, "सृजनमध्ये कोणत्याही गोष्टीची सक्ती नाही; त्यामुळं आम्हालाही आवश्यक तिथं सक्ती करणं अशक्य होतं. सक्ती न करता गोष्टी होण्यास वेळ फार लागतो. कित्येकदा हा वेळ नसतो आपल्याजवळ!" हा दृष्टिकोनही तपासून पाहण्यासारखा आहे. आवश्यक तिथं सक्ती म्हणजे काय. हे श्री. रवी मुळीकनी लिहिलेलं नाही. पण एक सांगू का? पाणी जसं उताराकडं आपोआप जातं, तसाच पालकपणा आणि शिक्षकपणा आपल्याला हवं असेल ते करवून घेण्याच्या सक्तीकडं किंवा छडीकडं चटकन् झुकण्याची शक्यता असते. प्रक्रियेपेक्षा दृश्यपरिणामाला आपण महत्त्व देणार असू तर मुलं शांत बसली आहेत यालाच महत्त्व दिलं जाईल. ती तशी कशामुळं बसली आहेत? मारापोटीच्या धाकानं, रागाच्या भीतीनं, बक्षीसाच्या लालसेनं की सगळेजण कामात असतात. तेव्हा आपणही शांत बसायचं असतं या जाणीवेनं, असा विचार होणार नाही. यांतील पहिल्या तीन बाबी झटपट रंगारी पद्धतीनं आणि स्वतःला 'अमूल्य' असणारा वेळ न दवडता कदाचित साध्य करता येतीलही; पण मुलांतील विचारशक्ती जागृत करायची, त्याची सारासार विवेकशक्ती विकसित करायची म्हटली तर

बोलणं, सांगणं, ऐकणं, चर्चा करणं, दाखवून देणं, आवश्यकता पटवून देणं अशा कितीतरी प्रक्रियांचा अवलंब करावा लागतो आणि त्यासाठी 'वेळ नाही' असं म्हणून चालणार नाही. झाडं रुजवायची, जगवायची आणि फुलवायची इच्छा असेल, तर त्यासाठी परिश्रम, वेळ, शक्ती खर्च करायला हवी. त्यांची निगराणी ठेवायला हवी. अन्यथा बाजारात मिळणारं प्लॅस्टिकचं झाड आणून घरात ठेवावं. बहिणाबाईनं म्हटलं आहे ना,

*हाती नाही बळ*
*दारी नाही आड*
*त्यानं फुलझाडं लावू नये.*
*सोसता सोसेना*
*संसाराचा ताप*
*त्यानं मायबाप होऊ नये.*

श्री. रवी मुळीकांचं तत्त्वज्ञान ज्यांना पटतं आहे, त्यांनी माझ्या मताचा नसला, तरी बहिणाबाईंच्या काव्याचा विचार करायला हरकत नसावी.

शाळेनं पालकांना काही द्यायचं असतं किंवा द्यायला हवं, हा विचार मनात ठेवून सृजन-आनंद विद्यालयात पालकसभा घेतल्या जातात. शाळेचा वैचारिक दृष्टिकोन पालकांपर्यंत पोचवण्याचा व रुजवण्याचा प्रयत्न असतो. शाळेच्या दैनंदिन व नैमित्तिक उपक्रमांत त्यांचा प्रत्यक्ष सहभाग असावा व सहभागानंतर त्यांनी त्याबद्दलचा अहवाल द्यावा, असं आवाहन असतं. सृजन-आनंद विद्यालयातले आपण सारेजणच सतत काही शिकू शकतो, शिकायला हवं, असं मांडलं जातं; त्यामुळंच 'शाळेनं पालकांना काही द्यायचं असतं?' अशी प्रश्नार्थक वाक्यरचना ताई-दादांच्या मनात नसते आणि तशी वाक्यरचना पालकांच्या मनात डोकावू नये यासाठी ताई-दादा प्रयत्नशील असतात. अनेक पालक हक्कानं अध्यापन नोंदवह्या वाचायला येतात, स्वतःच्या मुलांच्या संदर्भात चर्चा करायला येतात, सुशोभनं करून आणतात आणि त्याबद्दलचे अभिप्राय विचारतात. शिक्षक हाही मुलांचा पालकच आहे हे पालकांना आता पटलं आहे. किंबहुना सारा समाजच मुलांचा पालक असायला हवा, असंही काही पालकांना वाटू लागलंय.



# शिकणारे आणि शिकवणारे

**त्यांना काय समजतंय?--**

एका कार्यशाळेच्या तपशिलांची चर्चा चालू होती. त्यात एक तपशील असा होता की, एकाच प्रकारच्या अनुभवावर विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनीही लिहायचं. लेखनानंतरच्या सत्रात विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या लेखनावर चर्चा करायची. त्यातील बरं काय, वाईट कोणतं हे ठरवायचं. त्या लेखनासंबंधी शेरे (Remarks) द्यायचे आणि शेवटी विचारपूर्वक दहापैकी गुणही द्यायचे. या तपशिलापाशीच चर्चा अडखळली. 'हे काय नवीनच काढलं आहे तुम्ही ? विद्यार्थी ते केवढे आणि ते काय आमच्या लिखाणाचं मूल्यांकन (evaluation) करणार.' दुसरे एक मार्गदर्शक म्हणाले, 'अनुभवासंबंधी मुलांनी लिहायचं हे ठीक आहे. आम्ही कशासाठी लिहायचं?' आणखी एक मार्गदर्शक जरा घुश्श्यातच म्हणाले, 'मुलांनी दिलेले शेरे आणि गुण सर्वांसमोर आम्ही ऐकून घ्यायचे हे शक्य होईलसं वाटत नाही. त्या चिमुरड्यांची अक्कल ती काय आणि शेरे देण्याचा त्यांचा अधिकार तो काय?' या सर्व प्रतिक्रिया अपेक्षितच होत्या. शिक्षकांची जी भूमिका वर्षानुवर्षे आपल्या मनावर ठसली आहे ती 'शिक्षक श्रेष्ठ, विद्यार्थी कनिष्ठ', 'शिक्षकानं विद्यार्थ्याला शिकवायचं आणि विद्यार्थ्यानं शिक्षकाकडून शिकायचं' अशी आहे. शिक्षकांकडून झालेल्या प्रतिरोधाचं मूळ या भूमिकेत आहे. त्या साऱ्यांना एकच प्रश्न विचारला, 'विद्यार्थ्यांकडून आपण काहीच शिकत नाही का? गुणात्मक मूल्यांकन करणं हा वृत्तिविकासाचा एक महत्त्वाचा टप्पा असल्यानं त्याची अनुभूती विद्यार्थ्यांना मिळावी म्हणून त्यांनी शिक्षकांच्या लिखाणाचं गुणात्मक मूल्यांकन केलं तर काय बिघडलं?'

**रामदास आणि इयत्ता तिसरीतली मुलं--**

ज्ञान जेव्हा मर्यादित होतं, ठराविक बाबीतच सामावलेलं होतं,

बंदिस्त होतं, प्रत्येक ज्ञानकणाचा दैनंदिन वास्तवाशी अतूट आणि भक्कम सहसंबंध जोडणं जेव्हा महत्त्वाचं नव्हतं, समाजाची रचना ज्या वेळी शास्ते आणि शासित अशी होती, एकूणच मानवसंबंधात श्रेष्ठ-कनिष्ठतेची पक्की उतरंड होती, त्या वेळी 'राजा बोले, प्रजा चाले' याच चालीवर शिक्षक आणि विद्यार्थी यांचं नातं ठरणं स्वाभाविक मानलं जात असेलही; परंतु ज्ञानाचा प्रचंड प्रस्फोट होत असताना शिक्षक-विद्यार्थ्यांचं नातं परस्परांना शिकवणारे आणि शिकणारे असं असू शकेल, नव्हे असायला हवं. वर्गावर्गात शिकवताना जर आपण विद्यार्थ्यांना स्वतःचे विचार व्यक्त करायला संधी दिली, तसं आवाहन केलं, तर त्यांच्या विचारांची पातळी खूपच उंच असते असं आढळून येतं. नुकतीच झालेली सृजन-आनंद विद्यालयातील एक घटना तपासू या. इयत्ता तिसरीला मनाचे श्लोक आहेत. मराठी शिकवणाऱ्या लीलाताईंच्या मनात त्या श्लोकासंबंधी खूप वैचारिक वादळ निर्माण झालं. भ्रष्टाचारानं लडबडलेल्या, खऱ्यापेक्षा खोट्याची सरशी होणाऱ्या आणि खोटं सांगूनच स्वतःला हवं ते मिळवणाऱ्या आजच्या जगात हे श्लोक कशा रीतीनं शिकवावेत असा पेच त्यांच्या मनाला पडला. लीलाताई म्हणाल्या, "आपल्या शरीरावर आणि शरीराच्या आत कितीतरी अवयव आहेत. नाक, हात, पाय आपल्याला दिसतात; हृदय-फुफ्फुसं-मेंदू दिसत नाहीत. मेंदूत काय काय चाललंय हे आपल्याला दिसत नाही. पण गंमत अशी की, आपण बहुतेक जे जे करतो, ते सारं आपला मेंदू मन आपल्याला सांगतो. उदाहरणार्थ, बागेतलं सुंदर फूल दिसल्यावर कोणाचा मेंदू सांगतो, 'ते फूल तोड.' कोणाचा मेंदू म्हणतो, 'फूल किती सुंदर आहे! वाऱ्याबरोबर कसं डुलतं आहे ते पाहा.''' त्या पुढं म्हणाल्या, "तुमचा (मेंदू-मन) तुम्हाला काही सांगत असेल, असं कर, तसं करू नकोस. तुमचा (मेंदू मन) तुम्हाला काय करायला सांगतो त्याबद्दल दोन वाक्यं लिहा आणि जे करू नको असं सांगतो त्याबद्दल दोन वाक्यं लिहा." एवढं बोलून लीलाताई स्वस्थ बसल्या. लीलाताईंच्या या बोलण्याला अभिसाद म्हणून मुलांनी काय लिहिलयं ते आपण वाचू या.

विचार कर. कोणाच्या वस्तू चोरू नको (स्वप्ना)
खरं बोल. काम चांगल्या प्रकारे कर. (ओजस)



आई-वडिलांची आज्ञा पाळ. हावरटपणा करू नको. (स्वप्ना)
वर्गात कचरा करू नको. इतरांना मारू नको. (गायत्री)
चांगला वाग. दंगा करू नको (संजीवनी)
झाडे तोडू नको. अभयारण्य तयार कर. (पराग)
छान विषय सुचव; म्हणजे मी त्यावर गाणे करेन. (भैरवी)

श्री समर्थ रामदासांनी मनाच्या श्लोकांत सत्य सोडू नको, मिथ्य मांडू नको असं जे सांगितलं त्याचाच प्रत्यय श्लोक न शिकताही मुलांच्या लिखाणात आपल्याला येतो ना? हा प्रत्यय आल्यावर लीलाताईंनी मुलांना आणखीही एक मुद्दा स्पष्ट केला. "पहिल्या श्लोकात रामदासांनी जे जे सांगितलं, तेच तुम्हीही लिहिलंत. मात्र तुम्ही रामदासांच्यासारखे संत नाही. तुमचं लिहिणं, बोलणं आणि वागणं यांच्यात बरेचदा फरक असतो ना? म्हणून तुम्ही संत नाही." लिलाताईंच्या बोलण्यावर मुलं खुसुखुसु हसली. मुलं आणि रामदास यांच्याबद्दलचं हे उदाहरण सांगण्यात श्री समर्थ रामदासांना लहान ठरवण्याचा हेतू निश्चितच नाही. मात्र लहान मुलांच्या छोट्याशा मेंदूत (मनात) सुंदर विचारांची खूप मोठी झेप घेण्याची क्षमता असू शकते, हे सांगण्याचा हेतू मात्र निश्चितच आहे.

**अचंबित करणारी प्रतिभा--**

सृजन-आनंद विद्यालयात काम करताना मुलांच्या प्रतिभेचे उन्मेष पाहून आम्ही कितीदा तरी चकित होतो. आपण थक्क व्हावं असं लखलखणारं काहीतरी दिसतं आणि लक्षात येतं की, हे अप्रूप आपण त्यांना दिलेलं नाही; मुलंच आपल्याला काहीतरी महत्त्वाचं देत आहेत. असं काय ते महत्त्वाचं? मुलांच्या क्षमतांवरचा विश्वास हीच ती महत्त्वपूर्ण देणगी. संशोधनानंही ही बाब सिद्ध केली आहे की, जे शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांच्या क्षमता कमी आहेत ते सामान्य दर्जाचे आहेत, असं समजून शिकवतात, ते विद्यार्थी कधीच उंच झेप घेत नाहीत. किंबहुना आपण अशी झेप घेऊ शकू असा आत्मविश्वासच त्यांना वाटत नाही. पण जे शिक्षक सतत काहीतरी नवंनवं शोधून आपल्या विद्यार्थ्यांना आकाश हीच मर्यादा असं सांगतात, अनोख्या कामाला न बिचकता सामोरं जायला सांगतात, त्यांच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता विकास पावतात. अशी काही

उदाहरणं आपण पाहिली, तर आपलाही विद्यार्थ्यांच्या क्षमतांवरचा विश्वास वाढेल असं वाटतं. वाचूया आपण काही उदाहरणं.

**चमकत्या चांदण्या--**

शमीननं सृजन-आनंद विद्यालयात तिसरीत असताना इयत्ता चौथीच्या मुलांना निरोप देण्यासाठी एक कविता लिहिली. तिची कविताच वाचूया.

*"आज निघाल्या काही चमकत्या चांदण्या*
*संपला आमचा आनंद*
*संपल्या सुखाच्या रेषा*
*चालले आकाशाचे राजे*
*इथे आले ते पहिले*
*पण,*
*निघाले इथून ते दुसऱ्या आकाशाकडे."*

शमीनचं हे लिहिणं म्हणजे आमच्या शिकवण्याचं प्रतिबिंब आहे, असं म्हणणं ही अहंकाराची परिसीमा ठरेल. अहो, एखादी कविता आम्ही सर्वांनी करायला घेतली आणि काही सुचेनासं झालं तर शमीन ती झकास पुरी करून टाकेल. सारीच मुलं भावनाशील असतात असं नाही. काहींना वास्तवाचं भान फार लवकर येतं. (ते भान इतकं लवकर येणं बरं का हो?) इ. स. १९९० च्या चौथीच्या निरोप-समारंभाच्या वेळी तिसरीतल्या शाल्मलीनं केलेली कविता अगदी वेगळी आहे. ती म्हणते--

*"तुम्ही जाणार वाईट वाटतं*
*नंतर सर्वांना जावंच लागतं.*
*तुमच्यानंतर आम्ही जाणार*
*आमच्यानंतर दुसरी जाणार.*
*तुम्ही आम्हाला विसरू नका*
*परत यायचं टाळू नका.*
*यायला नाही जमलं तर*
*पत्र लिहा पानभर, पोटभर."*

कधी कधी घरात घडणाऱ्या प्रसंगांनी मुलं व्यथित झालेली असतात. भळभळत्या मनावर पट्टी बांधून ती शाळेत येतात. परंतु मनात माजलेली खळबळ अक्षरबद्ध करण्याचं सामर्थ्य लाभलेलं असल्यानं ती अक्षरं घेऊन मूल शाळेत येतं. ताई-दादांपुढं वही उघडली जाते आणि अप्रतिम असं काहीतरी ताई-दादांना सुखावून जातं. सुख-दुःखाच्या धाग्यांचा आडवा पट हा असा-- व्यथित मूल पाहून वाटणारी करुणा आणि मुलाची विकसित झालेली क्षमता पाहून वाटणारा आनंद. इयत्ता चौथीत शिकणाऱ्या धनुकची आई स्वतःच्या भावाला भेटायला हॉलंडला गेली. धनुकनं दुसरे दिवशी पुढील कविता आम्हाला दाखवली.

*"पाखराची आई*
*पाखराला सोडून जाई*
*आईला काय माहीत*
*पाखराला किती दुःख होई!*
*पाखराला टोचली सुई*
*तरीसुद्धा ते करत नाही उऽऽई*
*पण आई जाताना मात्र केले कुईऽ कुईऽ*
*पाखरू म्हणाले, "थांब ना ग आई."*
*आई म्हणाली, "भाऊ आहे तिथं जाते ग बाई"*
*अन्ऽऽ*
*पाखराची आई पाखराला सोडून जाई."*

धनुकनं स्वतःसाठी योजलेलं पाखराचं रूपक, नाईलाजानं दुःख सहन करणाऱ्या कुत्र्याच्या पिलाचा कुईऽ कुईऽ या आवाजाचा तिनं केलेला चपखल उपयोग हे सारंच आम्हाला विशेष वाटलं. कवितेतच फक्त प्रतिभा दिसते असं थोडंच आहे? काही प्रश्नसुद्धा प्रतिभाशाली मनाचे द्योतक असतात. इ. स. १९९१ च्या पहिलीतल्या मुलांना मीराताई शिकवीत होत्या. वर्गातल्या मुलांच्या नावांचा अर्थ सांगत होत्या. त्याच वर्गातल्या रसियानं त्यांना विचारलं, "अर्थ याचा अर्थ काय? अर्थ असं नाव का ठेवायचं नाही?" आहे का उत्तर तयार तुमच्याजवळ? एक-दोन मिनिटं मीराताईही भांबावूनच गेल्या होत्या. क्लीनबोल्डच म्हणा ना. आणखी एकदा रात्री आपल्याला कशाकशापासून प्रकाश मिळतो याबद्दलचं बोलणं इयत्ता पहिलीच्या मुलांबरोबर चाललं होतं. मेणबत्ती, कंदील, लाईट अशी उत्तरं येत होती. अचानक रसियाचं उत्तर आलं,

'काजवा.' शिक्षकाची रूढ प्रतिक्रिया म्हणून ताईंनी हे उत्तर प्रथम फेटाळलं; परंतु विचारांती हे अनोखं उत्तर मान्य करताना त्यांना फार आनंद वाटला.

सृजन-आनंद विद्यालयातील मुलं दररोज आपल्या वर्गात सुशोभन करतात. दररोज सुशोभन अप्रतिम असतं असं नाही; पण कधी कधी आकाशात वीज लखलखावी तसं सुशोभन प्रतिभाभारित (विद्युतभारिच्या चालीवर बरं का!) असतं. काही विषयच पाहा ना सुशोभनाचे--

*फुलपाखरांची शाळा*
*सर्व धर्मांचा नाताळ*
*इंद्रधनुष्याचे रंग फुलांना मिळाले*
*ऊर्जा आणि ऊर्जासाधने*
*पावसातली मज्जा*
*वर्गातले आनंद*
*मोर्चे*

अशी ही सृजन-आनंद विद्यालयातली मुलं आम्हाला जणू सांगतात, "आणखी नवं काहीतरी शोधा ना आम्हाला शिकवायला. नवी कोडी. नवी गाणी. लिहायसाठी नवेनवे विषय. गणितातले खेळ, भाषेचे खेळ, सहली, कविता करणं आणि हो, नवा खाऊ कोणता?" मुलांच्या या सांगण्यामुळं आम्ही सर्वजण सतत शिकत राहतो; केवळ शिकवत राहत नाही हे किती छान आहे ना?

## सार्थकतेच्या डबक्यात साकळलेलं शिक्षण--

आतापर्यंत केलेल्या सगळ्या चर्चेतून आणि दिलेल्या सगळ्या उदाहरणांतून आपल्या हे लक्षात येतं की, शिक्षक आणि विद्यार्थी यांचं परस्परातलं नातं एकमेकांबद्दलच्या आदरभावाचं, प्रेमाचं आणि विश्वासाचं असायला हवं. तसं ते नसलं तर काय होतं? मुंबईतून आलेल्या इयत्ता सातवीतल्या एका मुलाच्या पत्रात त्याचं उत्तर मला सापडलं. वाचूयाच आपण तो मुलगा काय लिहितो ते. "मुलांच्या कल्पनांना शाळेत कोणीही वाव देत नाही. त्यांच्या कल्पनांना, चित्रांना, विचारांना शाळेच्या ठराविक साच्यात टाकलं जातं. जर कोणी शिक्षकांना एखाद्या विषयात आव्हान



दिलं तर आपल्यापेक्षा मुलंच हुशार आहेत हे कळल्यावर त्यांना तो त्यांचा अपमान वाटतो. मग मुलांना वर्गाबाहेर काढणं, थोबाडीत मारणं वगैरे शिक्षा आल्याच. एकदा आम्हाला 'निसर्ग माझा सोबती' या विषयावर दहा ओळी लिहायला सांगितल्या. आमच्या वर्गातील काही मुलांनी १५-२० ओळींचं लेखन केलं. लेखन ५-१० ओळींनी वाढलं म्हणून बाईंनी खिडकीतून ते फेकून दिलं!!" आवश्यक प्रशिक्षणाची झूल एकदा का अंगावर घातली आणि नोकरीत कायम झालं की, ज्ञानाची सारी मिरास आपलीच; प्रश्न फक्त शिक्षकांनीच विचारायचे आणि त्यांची उत्तरं शिक्षकाला अपेक्षित असलेल्या आकारमानाप्रमाणं घोटीव व कातीवच असायला हवीत-- अशा समजुतींचे साखळदंड संपणाऱ्या प्रत्येक वर्षाबरोबर आपण इतके करकचून आवळून घेतो की, आपलं शिकवणं म्हणजे जणू फक्त रवंथच असतं.

सार्थकतेच्या डबक्यात साकळलेल्या शिक्षणाचं रूप काही अपवाद वगळता सर्वच स्तरांवर सर्वसाधारणपणे असंच दिसतं. प्राथमिक, माध्यमिक, उच्च-माध्यमिक, महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय अशा सर्वच पातळ्यांवर इतिकर्तव्यतेची, सार्थकतेची आणि आत्मतृप्तीची इतकी जबरदस्त झापड सर्वसाधारण शिक्षक/प्राध्यापकांच्या डोळ्यांवर आहे की, शिकवणारा नेहमी विद्यार्थीच असतो याचा पुसटसा आठवही आपल्याला राहत नाही. एका बाजूला केवळ वर्गखोल्या, क्रमिक पुस्तकं आणि परीक्षा यांच्याशी करकचून बांधली गेलेली शिक्षणप्रक्रिया आणि दुसऱ्या बाजूला नोकरीतला पगार, बढती आणि हक्क यांच्याशीच नातं ओळखणारा शिक्षक/प्राध्यापकवर्ग यांच्यामुळे कोणत्याच स्तरावर शिक्षणप्रक्रिया मुक्त, आनंदमय, सृजनशील आणि सामाजिक परिवर्तनाला पोषक ठरत नाही. महाविद्यालयीन पातळीवर ट्युटोरियल्स, सेमिनार्स, वर्कशॉप्स, ग्रुप डिस्कशन, पॅनेल डिस्कशन, सेल्फ इव्हॅल्युएशन, स्टडी टूर-- अशा नानाविध बाबी अभ्यासक्रमात समाविष्ट झाल्या आहेत. या सर्व बाबींची तत्त्वतः तपशीलवार तपासणी केली, तर समाजजीवन आणि विषय-अध्यापन यांचा निकटचा संबंध लक्षात घेऊन तो तपासून पाहणं; स्वतःच्या ताकदीवर विषयांश समजून घेऊन तो इतरांपुढं मांडणं, मार्मिक प्रश्नांच्या कानशीनं शिकायचं आशय तपासून पाहणं, तशाच मार्मिक

प्रश्नांना कुणाच्याही मदतीशिवाय तितकीच मार्मिक उत्तरं शोधणं आणि शिक्षक व विद्यार्थी यांनी चर्चात्मक पद्धतीनं एखाद्या विषयाची मांडणी परस्परांपुढं करणं-- अशा हेतूंची पूर्तता करण्यासाठी त्या .बाबी अभ्यासक्रमात समाविष्ट झाल्या असल्या, तरी आजच्या वास्तवात या सोन्याची माती झाल्यासारखीच दिसते. हे बदलायला हवं. शिकवणाऱ्यांनीही सतत शिकायला हवं. शिकणाऱ्यांनाही शिक्षकाला (सुद्धा) शिकवण्याची संधी मिळायला हवी. वर्गहीन समाजरचनेचं स्वप्न पाहणाऱ्या लोकशाही समाजवादी भारतात शिकवणारे आणि शिकणारे असे वर्गही मानण्याचं कारण नाही.



# स्वातंत्र्याचा सराव आणि शाळा

## प्रायोगिकतेची समीकरणं

सृजन-आनंद विद्यालय ही एक मराठी माध्यमाची प्राथमिक प्रायोगिक शाळा आहे, असं समजल्यावर काही मंडळी कुतुहलाने शाळेतल्या सामानाकडं पाहू लागतात. प्रयोग म्हटलं की, प्रयोगशाळेतलं साहित्य बहुधा त्यांच्या डोळ्यांपुढं येत असावं. त्यातही पुनः जेव्हा त्यांना समजतं की, इतर शाळांप्रमाणं शासनमान्य अभ्यासक्रम आणि क्रमिक पुस्तकंच आम्ही वापरतो, तेव्हा तर ती मंडळी अधिकच निरुत्साही दिसू लागतात. शिक्षणक्षेत्रातला प्रयोग म्हटला की, उच्चभ्रू मंडळींच्या डोळ्यांपुढं हृषी व्हॅली किंवा ऑरोविलसारख्या ख्यातनाम संस्था उभ्या राहतात. सृजन-आनंद विद्यालय ही निवासी शैक्षणिक संस्थाही नाही. इतर सर्वसाधारण शाळांप्रमाणचं इथंही मुलं पाच तास असतात आणि वर्षातून चार चाचण्या आणि दोन परीक्षाही घेतल्या जातात, असे तपशील कळल्यावर शाळा 'पाहायला' आलेली मंडळी अगदीच ढेपाळल्यासारखी होतात. शासनमान्य अभ्यासक्रम व क्रमिक पुस्तकं नाकारणं, निवासी शाळा असणं, शाळेत आल्याबरोबर इतर शाळांपेक्षा वेगळं काही साहित्य पाहायला मिळणं अशी प्रायोगिक शाळांविषयीची काही समीकरणं दृढ झाल्यासारखी दिसतात. आमच्यापैकी कुणीतरी त्यांना म्हणतं, "तुम्ही 'शाळा पाहण्याच्या' उद्देशानं आलात ना, इथंच गफलत झाली. आमच्या विद्यालयात 'पाहण्यासारखं' काऽऽही नाही. थोडं-फार जे आहे, ते 'समजून' घेण्यासारखं आहे. तुमचं तुम्हालाच ते समजून घ्यावं लागेल ना?" असा संवाद झाल्यावर काहीजण चिवटपणानं "आवडेल आम्हाला समजून घ्यायला" असं म्हणतात. त्यांच्यापैकी काहींनी जे समजून घेतलं, त्यापैकी थोडं-फार या लेखात मांडलं आहे.

## अशी सापपंचमी--

तो होता सापपंचमीचा दिवस. काय म्हणालात? चुकीचा शब्द वापरलाय? छे छे. विचारपूर्वकच नागपंचमीऐवजी सापपंचमी असं म्हटलंय. नाग हा साप जातीचाच प्राणी आहे; तेव्हा त्या सगळ्या जातीची पहचान व्हावी, म्हणूनच ही पंचमी १९९४ च्या जुलैमध्ये करायचं ठरवलं होतं. त्या दिवशी विद्यालयात बरेच पाहुणे येणार होते. अजगर, गवत्या, नानेटी यांना घेऊन निसर्गमित्र व विज्ञानप्रबोधिनीचे कार्यकर्ते यायचे होते. आलेच बघा ते रिक्षांतून. ही भलीमोठी टोपली कसली? त्या बरणीत सापासारखं काय आहे? ह्या दादांची नावं काय? कितीतरी प्रश्न विचारायचे आहेत; पण मनामनांत मात्र पाकपूक. 'बाप रे! साप!', 'मारा त्याला, सोडू नका' - अशी ऐकलेली वाक्यं वेटोळं घालत आहेत त्या चिमुकल्या मनांना.

विज्ञान जवळ करण्यासाठी योजलेला एक क्रम म्हणूनच सापपंचमीचा उपक्रम आखलेला असल्यानं योजकांच्या मनात काही स्पष्ट उद्देश होते. त्यांपैकी प्रमुख पुढीलप्रमाणं--

१) सापाविषयीची माहिती पुरवून त्या प्राण्याबद्दलचं भय कमी करणं.
२) सापाबद्दलचे अपसमज दूर करणं.
३) निसर्गसाखळीतलं सापांचं महत्त्व लक्षात आणून देणं.
४) सापांची सुंदरता समजून घेणं.
५) डोळे, हात, मेंदू यांचा उपयोग करून साप अनुभवणं.

## समजून घेण्याच्या नाना वाटा--

उपक्रमाचे उद्देश आणि कार्यवाही यांची जुगलबंदी नीट जमायला हवी याची खबरदारी घेतली होती. सापाला कान नसतात, तो डूक धरत नाही, त्याच्या विषाचा उपयोग त्याला अन्नपचनासाठीही होतो, त्याला पापण्या नसल्यानं तो डोळे मिटू शकत नाही, तो कशासाठी जीभ सारखी बाहेर काढतो, साप आपल्याला कसा उपयुक्त आहे, वेगवेगळ्या सापांचे रंग कोणकोणते, त्यांच्या आवडी-निवडी कोणत्या - इत्यादी माहिती उपक्रमापूर्वीच इयत्ता तिसरी व चौथीसाठी मांडली गेली होती. पण समोर



ठेवलेले सारे पदार्थ आपण खातोच असं नाही आणि खाल्लेलं सारं आपल्याला पचतं असंही नाही हे जसं खरं, तसंच वर्गात लावलेलं सर्व साहित्य सारी मुलं वाचतातच असं नाही आणि वाचलेलं सर्व सगळ्याच मुलांना समजतं असंही नसतं. म्हणूनच प्रथमतः इयत्ता तिसरी व चौथीची मुलं 'साप अनुभवायला' क्रीडांगणावर गेली.

क्रीडांगणावर मध्यभागी एक मोठा गोल आखला होता. त्यात सतीश पोतदार, उदयदादा व इतर कार्यकर्ते आणि प्रमुख पाहुणे म्हणजेच साप एकमेकांबरोबर खेळत होते. अजगर, नानेटी, गवत्या तिथं फिरताना, पळताना किंवा कुणाच्या हातात/गळ्यात दिसत होते. विद्यालयातली काही मुलं धिटाईनं "मी धरू का साप?" म्हणत दोन पावलं पुढं जाऊन पुनः चार पावलं मागं येत होती. आजूबाजूचे लोकही 'हे विद्यालय असंच काहीतरी अगोचर करत असतं' अशा भावनेनं लांबनं दिसतंय तेवढं पाहत होती. मुलं आता गोलाकारावर उभं राहून न भिता साप हाताळणाऱ्या सर्व दादांकडं अचंब्यानं पाहत होती. अनेक प्रश्न विचारून साप समजून घेत होती.

"ह्या सापाला दात नसतील! म्हणून तुम्ही घाबरत नाही का?"

"हा साप तुम्ही पाळलाय का?"

"ह्या सापाचं नाव काय?"

"हा साप विषारी नाही हे तुम्हाला कसं कळलं?"

"तुम्हाला तो कुठं मिळाला?"

"आता इथं दुसरा साप आला, तर तुम्हाला भीती वाटेल का?"

"साप म्हणू नये धाकला अशी म्हण का पडली आहे?"

प्रश्नांना उत्तरं दिली जात होती. शंकांची स्पष्टीकरणं केली जात होती. पण मुलांनी जेव्हा जवळून, स्वतःच्या हातात धरून किंवा गळ्याभोवती तो घालून साप 'अनुभवायचा' प्रयत्न केला, तेव्हा खरी मजा आली.

"ईऽऽ अहो दादा, जीभ बघा बाहेर काढतोय. चावायचं आहे का त्याच्या मनात मला?"

"गार आहे."

"मऊ आहे."

"डोळे बारीक मण्यांसारखे आहेत."

"धापा टाकल्यासारखा सतत जीभ का बाहेर काढतोय? का तहान लागली असेल?"

"रंग वेगवेगळे का आहेत यांचे?"

"हा अजगर किती जड आहे. किती किलो वजन असेल हो?"

"हाऽऽ नक्षी काय छान आहे! आपल्यासुद्धा अंगावर असती तर छान दिसलं असतं."

"याचे डोळे आपल्यासारखे मिटत का नाहीत?'

"अय्या! याला पायच नाहीत की!"

"जमिनीवरून सरपटून सरपटून याला खरचटत कसं नाही?"

"ही सापाची कात मला देता?"

क्रीडांगणावर साप समजून घेणं आणि वर्गखोलीत येऊन त्याबद्दल अधिक माहिती ऐकून घेत 'साप आपला मित्र आहे.' हे जाणवणं असा दुहेरी पेड विणला जात होता. पहिली-दुसरीच्या मुलांसाठी सतीशदादांनी सापांची माहिती देणारी छान गोष्ट रचली होती. मोठ्या आवडीनं मुलं ती गोष्ट ऐकत होती. अनेक ताई-दादांना तरी कुठं होती इतकी सारी माहिती सापांबद्दल! आणि त्यांनी तरी कधी जिवंत सापाचा स्पर्श अनुभवला होता! लहान-मोठे असा भेद साप समजून घेताना गळून पडला होता. विज्ञान प्रबोधिनी आणि निसर्गमित्रचे कार्यकर्ते यांना 'शिकवत' होते. 'सा विद्या या विमुक्तये' या ब्रीदवाक्याची एक छोटीशी झलक मिळत होती. सापपंचमीच्या निमित्तानं मिळत असलेली विद्या संबंधितांना सापभयापासून विमुक्त करत होती. विषारी व बिनविषारी साप कसा ओळखावा, याचे आडाखे समजल्यानं आणि निसर्गसाखळीत सापांचं असलेलं महत्त्वपूर्ण स्थान लक्षात आल्यानं 'साप आपला मित्र आहे' हे स्वीकारण्यातला अडसर दूर होत होता. असं सारं होता होता वेळ कसा संपला, हे समजलं नाही. पाहुण्यांना निरोप द्यायची वेळ आली. काही सापपाहुणे टोपलीत, तर काही बरणी-बाटलीत शिरले. रिक्षा आल्या. टर्रटर्र. . . आवाज करत निघून गेल्या. संपलं!

**विज्ञान-- पुस्तकातलं आणि प्रत्यक्षातलं--**

१९९४ च्या एप्रिल महिन्यात लीलाताईंनी पालकांना आवाहन करून



विद्यालय त्यांच्या घरांपर्यंत कितपत व कशा प्रकारानं पोहोचलं आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला होता. लीलाताईंच्या आवाहनाला उत्तरादाखल जी टिपणं आली, ती अभ्यासताना सापपंचमी सुफळ संपूर्ण झाल्यासारखं ताई-दादांना वाटलं. टिपणांतला काही भाग वाचल्यावर ताई-दादांची सफलतेची भावना अवास्तव नाही असं तुम्हालाही वाटेल.

इयत्ता तिसरीतल्या सुरुचीला गत वर्षी दुसऱ्या सत्रात सृजन-आनंद विद्यालय सोडून कऱ्हाडला जावं लागलं. काय करणार? बाबांची बदली झाली ना! पण सुरुची व तिची आई यांनी पत्रानं विद्यालयाशी आपला संबंध टवटवीत ठेवला आहे. तिच्या आईनं पत्रात एक प्रसंग लिहिला आहे तो असा, "परवा आमच्या अंगणात साप आला होता. सुरुची तो पाहत उभी होती. थोडा वेळ निरीक्षण करून ती गडबडीनं आत आली आणि म्हणाली, 'बाहेर साप आला आहे; पण तो बिनविषारी आहे. तू घाबरू नकोस.'"

"योगेशनं सापपंचमीच्या दिवशी साप हातात घेऊन पाहिला होता. तेव्हापासून त्याला कोणताही प्राणी हातात धरून त्याचं निरीक्षण करायचं असतं." असं दुसरीतल्या योगेशच्या आईनं लिहिलं आहे.

शेजाऱ्यांनी साप मारला. मारलेल्या सापाचं निरीक्षण करून विद्यालयात दुसरीत शिकणारा अनिरुद्ध सावंत त्यांना म्हणाला, "कशाला मारलात? हा साप विषारी नव्हता. न मारता निदान उदयदादांना द्यायचात; त्यांनी मुलांना दाखवायला नेला असता!" हा किस्सा अनिरुद्धच्या आईनं नोंदवला आहे. दुसरीतली कश्मिरा, "साप आपला मित्र आहे." असं सगळ्यांना सांगत असते.

विज्ञान शिकवणं म्हणजे क्रमिक पुस्तकं घडाघडा वाचणं, प्रश्नांची उत्तरं पाठ करणं आणि परीक्षेत ती तंतोतंत लिहून मार्कांच्या शिखरावर आरूढ होणं नसून शिकणाऱ्याच्या अंतरंगात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रकाश फाकून त्याच्या वृत्तीत बदल होणं म्हणजे विज्ञान शिकणं अशी श्रद्धा बाळगून सृजन-आनंद विद्यालयातलं कामकाज चालतं. स्वाभाविकच मराठीच्या पुस्तकातले 'बैल झपाटला'सारखे धडे किंवा भूगोलातील ग्रह, तारे ग्रहण समजून घेतानाही वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास हाच हेतू प्रामुख्यानं डोळ्यांपुढं असतो. मधल्या सुटीच्या वेळातल्या संवादातही

काही वेळा अंधश्रद्धांबद्दल मुलं काही विचारत असतात. विविध विषयांतील आशयांचा परस्परांशी सहजतेनं असलेला अनुबंध विकसित करणं, शालेय आणि सहशालेय उपक्रम परस्परांना पोषक आहे असं मानणं, सुटीच्या वेळा म्हणजे न शिकण्याच्या वेळा असा गैरसमज नसणं, कोणतेही प्रश्न केव्हाही आपण ताई-दादांना विचारू शकतो याबद्दल मुलांची खात्री असणं, विविध प्रकारचे गृहपाठ देऊन मुलांच्या शोधकतेला चालना देणं, हस्तकला म्हणजे कौशल्यविकासाचा विषय आणि मराठी म्हणजे बुद्धिविकासाचा विषय अशा तटबंदीत राहून विचार न करणं, खाऊ करणं आणि खाणं हेही 'चित्त विशाल होण्या'साठीचेच प्रयत्न आहेत याची जाणीव असणं - अशा प्रकारचं विद्यालयातलं वातावरण असल्यानं फक्त क्रमिक पुस्तकं शिकवणं म्हणजेच मुलांचा अभ्यास असं समीकरण विद्यालयातले ताई-दादा मानत नसल्यानं वर्तमानपत्रातल्या बातम्या, माहिती, छायाचित्रं यांचा उपयोग नेहमीच केला जातो. मुलांनी निरीक्षण करणं, प्रश्न विचारणं, शोधून काढणं, करून पाहणं असं होत राहतं. अनेक पालकांच्या टिपणांत मुलांच्या या वृत्तीचं प्रतिबिंब पडलेलं आहे. टिपणातील ती प्रतिबिंबं पाहू या.

अर्चिस सबनीसचे अनेक प्रयोग चालू असतात. हळद, दूध, तिखट, कणसाचे केस एकत्र करून तिनं उन्हात ठेवले होते-- उन्हाचा त्यांच्यावर होणारा परिणाम पाहण्यासाठी. सोडा पदार्थात घालणं चांगलं नाही असं विद्यालयात शिकलेली अर्चिस तिची आई सोडा घ्यायला लागल्यावर "घेऊ नको. सोडा खाणं चांगलं नसतं." असं सांगते. केदारची आतेबहीण कॉलेजात जाते. ती एकदा वही आणायला निघाली आणि मांजर आडवं आलं म्हणून परत आली. केदारनं पळत जाऊन वही आणली आणि म्हणाला, "कशाला कॉलेजात जात असतेस? मांजरानं काय दुकान बंद करायला सांगितलं होतं? ही घे वही."

होळी पेटवणं आणि त्यात पोळी टाकणं का गैर आहे याबद्दलच्या वर्तमानपत्रांतल्या बातमीसंबंधी चर्चा झाल्यानंतर चौथीच्या अनेक मुलांनी घरातल्या वडिलधाऱ्यांशी होळी पेटवू नकोस आणि पोळी होळीत टाकण्याऐवजी कामवालीला दे, असा आग्रह धरला होता. गणपतीला नमस्कार करून आई जेव्हा "चांगली बुद्धी दे." असं म्हणाली त्या वेळी



पहिलीतला पुष्कराज तिला विचारतो, "आई, ह्या गणपतीला बुद्धी आहे ना?"

विद्यालयातली मुलं घरच्यांना नाना प्रश्न विचारत असतात. फुलाला रंग कशामुळं मिळतो? सूर्य कुठं झोपतो? भुतं असली, तर आपल्याला दिसत का नाहीत? आईच्या पोटातलं बाळ शी कुठं करत असेल? काश्मीर प्रश्न म्हणजे काय? मदर तेरेसा लवकर बऱ्या होतील ना? खूनी पळून कसे जाऊ शकतात? विद्यालयात पाहिलेलं, बोललेलं, ऐकलेलं, वाचलेलं, समजून घेतलेलं सारं काही त्यांच्या अंतरंगात तरंगत असतं. कधी प्रश्न तर कधी उद्‌गार, अशा रूपानं ते बाहेर हिंदकळतं. प्रौढांना वाटतं, "यांच्या प्रश्नांना काही आगापिछा नाही. किती आणि कसले कसले प्रश्न विचारायचे?"

सृजन-आनंद विद्यालयात सर्वांनी विचार करावा, निरखावं, पारखावं, शोधावं, सांगावं यासाठी अनेक तंत्रांचा वापर केला जातो. कधी वर्तमानपत्रांतल्या बातम्या, जाहिराती, छायाचित्रं ही त्यासाठी निमित्तं असतात. एखाद्या गोष्टीतला आशय किंवा शेवट आपल्याला योग्य वाटतो की अयोग्य, याची चर्चा कधी रंगते. विविध खेळ तयार केले जातात. ते खेळतानाही कोणत्या ना कोणत्या ज्ञानेंद्रियाला ताण बसतो. ग्रह-गोलांविषयी माहिती नाटुकल्याच्या स्वरूपात मांडायची म्हटलं की, खूपच वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून त्या माहितीकडं पाहिलं जातं. एकमेकांचे गुणदोष शोधून आम्ही त्या विशिष्ट व्यक्तीचा किंवा इयत्तेचा परिचय करून देण्यासाठी तोरण बनवतो. कधी सगळे मिळून मनसोक्त अगदी चिंब भिजेपर्यंत रंग खेळतो. एखादा खायचा पदार्थ सगळ्यांनी मिळून विद्यालयात तयार करायचा म्हटला तरी निदान आठवडाभर ती 'हवा' पसरलेली असते. हे जे सारं काही चालतं, त्यामुळं विद्यालयातलं शिक्षण तटस्थ (Neutral) असूच शकत नाही. मुलांची मानसिकता सध्याच्या रूढ तर्कवादाशी (logic) एकरस करून त्या चिल्ल्या-पिल्ल्यांना आजच्या रूढ विचारधारांशी जुळवून घ्यायला शिकवायचं हा विद्यालयाच्या कामकाजाचा हेतूच नसतो. विद्यालयात जे चालतं, त्याचं वर्णन अगदी कमी शब्दांत करायचं झालं, तर 'स्वातंत्र्याचा सराव' असं करता येईल. हा सराव करताना विद्यालयातली मुलं आणि ताई-दादा आजच्या वास्तवाचा

चिकित्सकपणानं आणि सृजनशीलतेनं विचार करता-करता त्या वास्तवाचं परिवर्तन करण्यातही सहभागी होतात. ह्या परिवर्तनाच्या सृजनशील प्रक्रियेत जे जे सहभागी असतात, त्यांच्या अंतर्मनात त्यामुळं काही वेळा खूपच ताण-तणाव, संघर्ष, हलचल आणि क्वचित कोलाहलही माजतो. स्वतः त्या माणसाला किंवा त्या माणसाशी संबंधित असणाऱ्यांनाही एक प्रकारच्या अस्वस्थतेतीची धग सोसावी लागते. त्यामुळंच की काय, सरधोपट मार्गानं आहेत त्या क्रमिक पुस्तकांची घोकंपट्टी करून परीक्षेत मिळणाऱ्या गुणांची बेरीज करत राहणं अनेक पालकांना व विद्यार्थ्यांनाही सुखावह वाटत असावं. अनेकांना स्वातंत्र्याची भीती वाटते. स्वातंत्र्यासाठी साहस करावं लागतं आणि जबाबदारी स्वीकारावी लागते. सृजन-आनंद विद्यालयानं स्वातंत्र्याचा सराव करायला शिकवणारी अध्यापनपद्धती अनुसरली आहे आणि यातच विद्यालयाच्या प्रायोगिकतेचं मर्म आहे. हे मर्म 'दाखवता' येत नाही; 'समजून' घेता येतं. तुम्हीही या ना सृजन-आनंद विद्यालयाची प्रायोगिकता समजून घ्यायला!



# स्वतःला ओळखा आणि दुसऱ्याला जाणून घ्या

स्नेहसंमेलनानंतर पाहुण्यांबरोबर सृजन-आनंद विद्यालयात शिकवणाऱ्या ताई-दादांची बातचीत व्हावी म्हणून आम्ही त्यांच्याबरोबर जेवणाचा कार्यक्रम आखतो. (खर्च ताई-दादाच करतात.) एकदा श्री. यदुनाथ थत्ते प्रमुख पाहुणे होते. जेवणाच्या आधी गप्पा मारताना त्यांनी एक छान खेळ घेतला. आमच्यापैकी प्रत्येकानं हजर असलेल्यांपैकी एकाची ओळख करून द्यायची - गुणदोषांसकट! फार मजा आली. आपल्यातले कोणते पैलू इतरांना प्रेरक, सुखद वाटतात आणि आपले कोणते कंगोरे इतरांना घासतात, याची जाणीव या लहानशा खेळानं सर्वांना करून दिली. सोशिओमेट्री नावाचं एक तंत्र आहे. हा खेळ याच तंत्रावर आधारलेला आहे. खेळात सामील झालेले आम्ही सर्व स्वतःचा व सहकाऱ्यांचा स्वभाव आणि वर्तणूक याबद्दल खेळामुळं अधिक विचारशील झालो. समजा, याच खेळासाठी स्वभाववैशिष्ट्यांची एखादी यादी दिली असती व ज्याची ओळख करून द्यायची त्या व्यक्तीचं यादीवर नाव लिहून, त्याची जी वैशिष्ट्यं स्वतःला जाणवतात त्यावर अशी खूण करायला सांगितली असती तरीही काही प्रमाणात वरील हेतू साध्य झाले असते; परंतु यादीवर नजर टाकून खुणा करणं यावरच लक्ष केंद्रित झालं असतं. आत्मशोध घ्यायचा, भूतकाळातल्या बहुविध घटना मनापुढं तरळून जायच्या आणि ज्यानं त्यानं स्वतःला जाणवणाऱ्या दुसऱ्याच्या गुणदोषांसाठी अचूक शब्द शोधायचे ही प्रक्रिया झाली नसती म्हणून हाच खेळ अधिक सघन करायचा झाल्यास सांगितलेल्या तीन-चार गुणदोषांचे अग्रक्रम स्वतःला जाणवलेल्या महत्त्वानुसार लावायला सांगितले, तर मंडळींना अधिक विचार करणं भाग पडलं असतं. सॉक्रेटिसनं आपल्या शिष्यांना Know Thyself असं सांगितलं होतं. त्याबरोबरच आज Know Others असंही म्हणायला हवं.

## सत्य अवघड फार

आत्मशोधाचं हे तंत्र स्वतःला आणि आपल्याशी संबंधित असलेल्यांनाही अधिक चांगला माणूस करण्यासाठी उपयुक्त आहे हे समजलं, की नेहमीच आपण हा शोध घेत राहतो. चटकन शेरेबाजी करण्याचं प्रमाण कमी होतं. शब्दांचे आपल्या मनातले अर्थ संबंधित व्यक्ती कोणत्या अर्थानं घेऊ शकेल, याबद्दलचा विचार मनात आल्याशिवाय राहत नाही. विनोबाजींच्या गीताईतील श्लोक पुनः पुन्हा आपल्याला सावध करतो. कोणता तो श्लोक?

*गुरु देवादिकी पूजा स्वच्छता वीर्यसंग्रह*
*अहिंसा ऋजुता अंगी देहाचे तप बोलिले।*
*हितार्थ बोलणे सत्य प्रेमाने न खुपेलसे।*
*स्वाध्याय करणे नित्य वाणीचे तप बोलिले।*
*प्रसन्न वृत्ती सौम्यत्व आत्मचिंतन संयम*
*भावना राखणे शुद्ध मनाचे तप बोलिले।*

हा श्लोक वाचायला छान वाटला आणि पाठ करायला अवघड नसला, तरी आचरणात आणायला फार फार कठीण आहे. हितार्थ बोलायचं; पण ते न खुपेल असं. भावना शुद्ध राखायची. अहिंसा आणि ऋजुता अंगी बाणवायची. वृत्ती सौम्य तशीच प्रसन्न राखायची. आत्मचिंतन करायचं. संयम पाळायचा. जितका म्हणून वरील श्लोकासंबंधी आपण विचार करू लागतो, तितकं आपल्याला वाटायला लागतं की, हे काही आपल्यासारख्या साध्यासुध्या माणसाचं काम नाही. यासाठी योगीच हवा.

## असेही शिक्षक--

हा श्लोक ज्यांचा पिच्छा सोडत नाही, त्या व्यक्ती पुनःपुन्हा श्लोकाच्या अर्थाकडं आणि स्वतःच्या व इतरांच्या हातून वेळोवेळी घडलेल्या वर्तनाकडं पाहू लागतात. आठवू लागतात अनेक प्रसंग. निनादू लागतात होऊन गेलेल्या संवादांचे तुकडे त्यांच्या अंतरंगात. ''तुझं अगदी साफ चूक आहे. लष्कराच्या भाकरी कशासाठी भाजायच्या?'' 'लष्कराच्या



भाकरी भाजणं' यात अभिप्रेत असलेला अर्थ असा की, ज्यात स्वतःचा 'फायदा' नाही, असं काम. शिवाय फायद्याचा संबंध बहुधा कामामुळं मिळणारा पैसा, प्रतिष्ठा यांच्याशीच निगडित असतो. आणि लष्कर म्हणजे ते की, ज्यांचा आपला संबंधच नाही असं कोणीतरी किंवा काहीतरी असंही सुचवायचं असतं. या तिन्ही विचारांबद्दल मतभेद संभवत नाहीत का? सृजन-आनंद विद्यालयातलं काम कसलंही आर्थिक मानधन न घेता करणाऱ्या ताई-दादांना बरेचदा वरील प्रश्न विचारला जातो. जे काही करायचं, ते स्वतःच्या मुलांसाठी कर! घरातला महत्त्वाचा वेळ शाळेत जाऊन वाया कशाला घालवायचा? फायदा तरी काय त्याचा? असाच सर्वसाधारण रोख असतो. पण तरीही ताई-दादा शाळेचं काम करत राहतात. समाजातली मुलं म्हणजे माझी-तुमची नसली, तरी आपलीच नाहीत का? असा त्यांचा विचार असतो. ही मुलं म्हणजे लष्कर-परके असं त्यांना वाटत नाही. शिवाय देशाचं रक्षण म्हणजे एक प्रकारचं देशाचं संवर्धनही असतं, असं ते सुचवतात. लष्कराबद्दलचा हा दृष्टिकोन तुम्हाला मान्य झाला तरच तुमची-माझी-त्यांची आणि आपली सर्वांची मुलं ही देशाची अमूल्य संपत्ती आहे, हेही तुम्हाला पटेल. मुलांसाठी जे जे काही करता येईल ते करणं अतिशय महत्त्वाचं आहे असंही तुम्हाला वाटेल. आता फायद्याचंच बोलाल, तर पंचवीस-तीस हजार रुपये डोनेशन म्हणून आणि चार-पाच हजार रुपये फी म्हणून भरूनही शिक्षक-प्रशिक्षणासाठी नाव नोंदवलं तेव्हा किंवा नोंदवायचं झालं, तर एखाद्या शाळेत शिक्षक होऊन मला जे काही मिळालं नाही किंवा मिळणार नाही असं बरंच या शाळेच्या कामात सहभागी झाल्यानं मिळत असल्याचा ताई-दादांचा अनुभव असतो. ज्या ताई-दादांच्या अंगी हितार्थच बोलायचं बाणलेलं असतं, ते प्रेमानं, ऋजुतेनं दुसऱ्यांच्या भावनांचा किंवा विचारांचा उपमर्द न करता स्वतःचे वेगळे विचार, भावना मांडायचा प्रयत्न करतात. ''तू सांगतेस तसाही विचार करणारे लोक आहेत. एका विशिष्ट दृष्टिकोनातून पाहिलं, तर तू म्हणतेस ते बरोबरही असेल; पण मला हा दृष्टिकोन पटत नाही. रागावू नकोस. तुझा मला अपमान करायचा आहे असं समजू नकोस. तुझ्याबद्दल मला अनादर आहे असं मनातसुद्धा आणू नकोस. देशील ना आनंदानं अनुमती मला वेगळा

विचार करायला?'' असं बोलतात. ऐकणारी काही माणसं व्यक्तिभिन्नतेचं व्यवहारात दिसणारं हे रूप आनंदानं मान्य करतात. ''लेट अस अ‍ॅग्री टू डिसअ‍ॅग्री'' असं दिलखुलासपणं सांगतात. काही म्हणतात, ''ठीक आहे. आता मोठी झालीस तू.'' त्यांच्या या म्हणण्यात कुठंतरी नाराजीचा धागा गुंतलेला असतो. काहीजण मात्र मारू किंवा मरू अशा आवेशानं. ''आमचंच तू ऐकायला हवंस. चार पावसाळे जास्त पाहिले आहेत आम्ही. शिवाय तुझं अहित व्हावं म्हणून का सांगतो आहोत?'' असं म्हणून संबंधित व्यक्तीला दाबून, दडपून आपल्या साच्यात कोंबत राहतात; तर काही नाराजीनं पाठच फिरवतात.

व्यक्ती, घटना, संस्था, पुस्तकं, चित्रपट, प्रदर्शन किंवा असंच इतरही काही याबद्दल भिन्न मतं असू शकतात. किंबहुना भिन्न मतं असणं हे मत नसण्यापेक्षा चांगलं नाही का? माणसानं नेहमी आत्मशोध घेत राहायला हवा. मला काय आवडतं? काय आवडत नाही? माझ्या आजूबाजूची माणसं मला कशामुळं प्रिय किंवा अप्रिय वाटतात? माझं काय चुकतं? माझ्यात काय चांगलं आहे? माझा समाज कसा असायला हवा? विचारांच्या हिंदोळ्याचे झोके अनेक; पण अंतिम दिशा एकच. अधिक चांगला माणूस होण्याची धडपड! अधिक चांगल्या माणसांचा समाज निर्माण होण्याबद्दलची असोशी! अगदी प्राथमिक शाळेच्या पातळीवरील विद्यार्थ्यांनाही विचार करण्याची क्षमता असते. या क्षमतेचा विचार करून चांगला माणूस होण्यासाठी आवश्यक असणारा त्यांच्यातील नीरक्षीरविवेक विकसित करण्याची प्रत्येक संधी आपण घ्यायला हवी.

### 'आम्ही कसे?'चं तोरण--

मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य श्री. प्रा. राम जोशी सृजन-आनंद विद्यालयात दोन दिवस येणार होते. ''कशाला येणार आहेत ते?'' काही मुलांनी विचारलं. ''आपली शाळा कशी आहे, आपण शाळेत काय करतो, ते समजून घ्यायला.'' मी उत्तर दिलं. इयत्ता चौथीच्या वर्गाशी नंतर बोलताना मी विचारलं, ''आपण आपला वर्ग कसा आहे हे त्यांना कमी वेळात आणि प्रत्यक्ष न बोलता कसं सांगू शकू?'' स्वागतासाठी तोरण बांधतात हे मुलांनी पाहिलेलं आहे. मी



त्यांना विचारलं, ''चौथीचा वर्ग आणि त्यातली मुलं कशी आहेत हे सांगणारं तोरण तुम्ही करणार का?'' या नव्या कल्पनेनं मुलांच्या मनाची पकड घेतली. त्यांनी विविध पताका केल्या. त्या ओवून त्यांचं तोरण केलं आणि ते आपल्या वर्गात बांधलं. त्यांतल्या काही पताका संख्यात्मक माहिती देणाऱ्या आहेत. वर्गात एकूण मुलं किती, त्यांपैकी मुली किती, एकूण गट किती, प्रत्येक गटात मुलं किती, अशी माहिती त्यांत आहे. काही पताका गटाची माहिती सांगणाऱ्या आहेत. काही पताकांत मुलांनी स्वतःबद्दलच लिहिलं आहे. काही मुलांनी तयार केलेल्या थोड्या पताकाच नमुन्यादाखल वाचू या.

आमच्या गटातील मुले

१) भैरवी - कधी गट्टी फू करीत नाही. ती मनापासून अभ्यास करते. गृहपाठ वेळेवर करते. सुशोभन नियमित करते. तिने प्रयत्न करून अक्षर चांगले केले आहे. कविता छान करते.

२) ओजस - तो हुशार आहे. गृहपाठ करतो. कधमधी खोटे बोलतो. अक्षर छान आहे. जरा आळशी आहे. खेळात चांगला.

३) अरिफ - आमच्या शाळेत नवीनच आला आहे. अक्षर चांगले नाही. पाढे पाठ नाहीत.

४) तबस्सुम - अभ्यास येत नाही.

५) मनोज - फळ्याकडे लक्ष नसते.

६) झुबेर - मांडी घालत नाही.

७) सुधीर - मदत करतो.

८) वीरेंद्र - एकलकोंडा आहे. वर्ग सफाई छान करतो.

आमच्या गटातील मुले

१) आमच्या गटातील फक्त सुप्रिया व श्वेता यांचेच अक्षर चांगले आहे.
२) मितेश व अमोल (सिदनाळे) सुशोभन न करता बोलत असतात. ते गृहपाठ करत नाहीत.
३) संजीवनीचे अक्षर चांगले आहे; पण अनेक वेळा गृहपाठ करीत नाही. मदत करते. चित्र छान काढते. मुलांनी ऐकलं नाही, तर मारते.
४) स्वप्ना काहीच करत नाही.
५) गायत्री - गटप्रमुख आहे. मदत करते. अक्षर छान काढते.
६) निखिल - पेपर चांगला लिहितो. सुशोभन चांगले करतो.
७) राकेश - शेजारच्या मुलाच्या खोड्या काढतो.
८) पराग - कविता छान करतो व खो-खोही चांगला खेळतो.
९) भैरवी - अंगाने बारीक आहे. मी फार बडबडते.

मुलं एकमेकांचा आणि स्वतःचाही शोध किती वस्तुनिष्ठपणे घेऊ शकतात हे पताकांतल्या आशयावरून आपल्याला समजतं. ओजस हुशार आहे वगैरे सांगताना तो कधी कधी खोटं बोलतो हे लिहायला मुलं कचरली नाहीत. तसंच भैरवीचं अक्षर तसं चांगलं नसलं, तरी तिनं प्रयत्न करून अक्षर चांगलं केलं आहे, ही बाब मुलांनी नोंदली आहे. अंगभूत गुण आणि संपादित गुण याची जाण दाखवताना मुलांची ओजस, संजीवनी, सुप्रिया, श्वेता, गायत्री यांच्या अक्षराबद्दलची आणि भैरवीच्या अक्षराबाबतची नोंद लक्षात घेण्यसारखी आहे. अरिफचं अक्षर चांगलं नाही किंवा पाढे पाठ नाहीत असं लिहिताना मुलांनी 'तो आमच्या शाळेत नवीनच आला आहे' असं सांगून जणू त्याला क्षमा केली आहे. कोण, कधीही काही करत नाही, मदत करायला कोण तयार असतं आणि कोण गटातल्या मुलांना मारतं हे मुलांनी स्पष्टपणं नोंदवणं मुलांच्या समजदारीचं द्योतक नाही का वाटत तुम्हाला? वीरेंद्रचा एकलकोंडेपणा, राकेशचं खोड्या करणं आणि दोन-तीन मुलांच्या मदत करण्याबद्दलच्या उल्लेखात स्वतःच्या सहाध्यायांच्या सामाजिकतेचाही विचार मुलांनी केल्याचं आपल्यापर्यंत पोहोचतं. केवळ अभ्यास चांगला असणाराच 'चांगला', अशी मुलांची समजूत नसल्याची उदाहरणं कविता करणं, खो-खो खेळणं, वर्ग सफाई करणं अशा नोंदींतून आपल्याला मिळतात. भैरवीनं तर स्वतःबद्दलचा शारीरिक आणि मानसिक आत्मबोध एकाच वाक्यात ठसठशीतपणं मांडला आहे. माझं तर मन मुलांचं हे तोरण बघून-वाचून, भरून आलं आणि 'खरंच ही लहान लहान मुलं किती समजदार, शहाणी, विवेकी आहेत' असं मला वाटलं. आपण मोठी माणसंच 'त्यांना काही समजत नाही' असं म्हणून आपला असमंजसपणा व्यक्त करीत असतो. गेल्या सात वर्षातल्या अनेक अनुभवांतून एवढं नक्कीच लक्षात आलंय की, जॉन ड्युई या थोर शिक्षणशास्त्रज्ञाचं मत अगदी योग्य आहे. त्यानं म्हटलंय, 'लाईफ इन ऑल इट्स मॅनिफेस्टेशन इज द सब्जेक्ट मॅटर ऑफ एज्युकेशन.' चांगलं शिक्षण म्हणजे माणूसपणाचं शिक्षण. त्या शिक्षणासाठी पुस्तकं आवश्यक असली, तरी शिक्षकानं स्वतःला आणि मुलांना पुस्तकी होण्यापासून वाचवलं पाहिजे. अगदी 'वसई वाचवा' च्या अभिनिवेशानं. आपला आणि मुलांचा असा बचाव करण्यासाठी पुस्तकांच्या जोडीला जीवनातले नाना अनुभव तरी शाळेच्या दारं-खिडक्यांतून आत येऊ दिले पाहिजेत किंवा शाळा तरी दारं-खिडक्यांच्या बाहेर जायला हवी.

# मुलांना विचार करता येतो

## छापाचे गणपती सोपे--

शिक्षणशास्त्रावरची अनेक पुस्तकं वाचताना शिकणं म्हणजे काय याबद्दलची अनेकविध चर्चा वाचली होती. व्यक्तीच्या अंतरंगात बीजरूपानं दडलेले विचार, भावना, कल्पना बाहेर काढणं म्हणजे शिकवणं हे वाचून वाचून पाठ झालं होतं. मात्र याचा प्रत्यय कुठं येत नव्हता. शिकणाऱ्यांच्या मनात जे नाही अशी माहिती, आकडेवारी इत्यादींच्या स्मरणांची कलमं विद्यार्थ्यांच्या मनांवर बांधण्याचा प्रयत्न म्हणजे शिकवणं असं चित्र वास्तवात अगदी पूर्वप्राथमिक पातळीपासून पदव्युत्तर पातळीपर्यंत प्रत्यही नजरेला पडत होतं. शिक्षणशास्त्र शिकलेल्याच मंडळींना शाळेत शिकवायला परवानगी असते. याचाच अर्थ असा की, ते जे शिकतात, त्याचा वापर त्यांनी शिकविताना करावा अशी अपेक्षा असते. मग तरीही शास्त्र व व्यवहार, सिद्धांत आणि वास्तव यांत इतकं अंतर का बरं?

याचं एक कारण असं असू शकेल की छापाचे गणपती तयार करणं तसं सोपं असतं. जो छाप उठवायचा, तो स्वतःच तयार करायचा असंही नाही. रेडिमेड छाप बाजारात तयार मिळतात. विद्यार्थ्यांच्या मनांत ज्या अनोख्या छापाची आकृती तरळत असते, ती शिक्षकाला आधीच कशी समजणार? त्या न समजलेल्या छापाचं पूर्वनियोजन तो कसं करणार? सगळंच अवघड! तेव्हा मग अभ्यासक्रम, क्रमिक पुस्तकं, शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका, गाईड्स, दीपिका - अशा पूर्वनिश्चित छापांत ज्या आकृत्या आहेत, त्या आकृत्यांत विद्यार्थ्यांना दाबून, दडपून कोंबणं शिक्षकांना तुलनात्मकदृष्ट्या सोपं असतं. पालकही शिक्षकांचं काम सोपं करण्यास मदत करतात. पालकांनाही आपलं मूल आपल्या स्वतःसारखं किंवा यांच्यासारखं, नाहीतर त्याच्यासारखं व्हावं अशीच इच्छा असते.



रवींद्रनाथ टागोरांच्या घरात म्हणे एक वही होती. त्या वहीत घरातल्या मुलांबद्दल मोठ्या माणसांना जे काही वाटत होतं ते लहिलेलं होतं, त्या वहीत रवींद्रनाथांच्या आईनं लिहिलेलं होतं, "इतर मुलांच्याबाबत काही आशा आहे; पण रवींद्रनाथाबद्दल काही खरं नाही." आईला असं का बरं वाटलं? इतर मुलं याच्यासारखी, त्याच्यासारखी शाळेत जात होती. इतिहास, गणित शिकत होती. परीक्षा देत होती. रवींद्रनाथ याच्यापैकी काहीच करत नव्हते. त्यांना इतरांच्यासारखं व्हायचंच नव्हतं. त्यांच्या स्वतःच्या मनात जे तरळत होतं, ते शिकविणारा शिक्षक शाळेत भेटत नव्हता. तो शिक्षक त्यांना भेटला नदीकाठी, झुडुपांत, आकाशातील ढगांत आणि सृष्टीत. त्या शिक्षकाचं शिकवणं त्यांनी मानलं.

## शाळेतल्या वर्गात आणि विचार करणं?--

शिकणं म्हणजे विचार करणं असं म्हटलं, तर ज्याच्या त्याचा विचार वेगवेगळा असणार आणि तो करण्याची प्रक्रिया तर वर्गातच व्हायला हवी. वर्गात ४०-५० विद्यार्थी असतात. ४०-५० विद्यार्थ्यांचं विचार करणं शिक्षकानं कसं नियंत्रित करायचं? त्यांच्या विचारात सुसूत्रता कशी आणायची? शिक्षक व शिक्षण याविषयी आपल्या ज्या ठाशीव, साचेबंद संकल्पना आहेत, त्यामुळंच आपलं मन शंकाकुल होतं. एकदा काय झालं की, इचलकरंजीत इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आम्हाला एक सृजन-आनंद शिक्षणवर्ग घ्यायचा होता. वर्गात सहभागी होणाऱ्या ताई-दादांनी कसं शिकवायचं, काय शिकवायचं, याबद्दल चर्चा करणाऱ्या दोन-तीन सभा वर्गापूर्वी झाल्या. ज्या ताई गणित शिकवणार होत्या, त्या बी. एससी., एम. एड. आहेत. त्या म्हणाल्या, "माझ्या नावावरचे दोन्ही गणिताचे तास मी अगदी चांगले घेईन याची मला खात्री वाटते; पण गणित शिकवणं म्हणजे विचार करायला शिकवणं हे तुम्ही म्हणता ते जमणार नाही." कसंबसं त्या ताईंना राजी केलं आणि गंमत म्हणजे त्यांनाही आता पटलं की, शिकणं म्हणजे विचार करणं. प्रत्यक्ष वर्गात काय घडलं, त्याचीच नोंद आपण पाहू.

विद्यार्थ्यांनी पुढील गणित करायचं व त्या गणितांना प्रश्नही विचारायचे होते. गणित असं होतं -

महाराष्ट्रात दर दहा मुलांमागं एक मूल इयत्ता ७ वी पर्यंतचं शिक्षण पूर्ण करतं. शिक्षण पूर्ण करणाऱ्या मुलांची शेकडेवारी काढा.

विद्यार्थ्यांना असं सांगितलं की, पहिल्यांदा आपण गणित सोडवायचंच नाही. हे वाक्य ऐकताच आकडेमोडीला सरावलेले विद्यार्थी अवाक्‌च झाले, सोडवण्याशिवाय गणिताचं दुसरं काय करायचं, असा मोठाच पेच त्यांच्यापुढं उभा राहिला. शिकविणाऱ्या ताईंनी त्यांना सांगितलं, "तुम्ही गणित वाचा. त्याचा अर्थ समजून घ्या आणि गणिताला प्रश्न विचारा." एखादं नवीन खेळणं हातात यावं तशा उत्सुकतेनं विद्यार्थ्यांनी पुढील काम केलं. त्यांनी जे प्रश्न विचारले ते त्यांची समजशक्ती, विचारशक्ती दाखविणारे आहेत. ते प्रश्न वाचू या.

१) उरलेली ९० टक्के मुलं पुढं काय करतात?

२) ९० टक्के मुलं शिक्षण पुरं करत नाहीत, तर महाराष्ट्र राज्य प्रगत आहे असं म्हणता येईल का?

३) मुलांनी शिक्षण पूर्ण न करण्याची कारणं कोणती?

४) अशी शिक्षणपद्धती राहिली तर महाराष्ट्र राज्य पूर्णपणे साक्षर होईल काय?

५) महाराष्ट्र सरकारने यासाठी कोणते उपाय केले आहेत?

६) शाळेत न जाणारी मुलं मग करतात तरी काय?

इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांत नवीन पाच प्रश्नांची भर घाला असं प्रौढांना सांगितलं, तर किती प्रश्न त्यांना सुचतील? किंबहुना वरील सहा प्रश्न वाचायला न देता त्याच गणिताला प्रश्न विचारायला सांगितलं तर किती प्रौढ किती आणि कोणते प्रश्न विचारतील? विद्यार्थ्यांनी किती मर्मभेदक प्रश्न विचारले आहेत! गणिताच्या आशयात लपलेल्या वास्तवाचं किती समग्र आकलन त्यांना झालं आणि जे अधिक काही माहीत व्हावं असं त्यांना वाटलं, त्यासाठी किती सुस्पष्ट प्रश्न त्यांनी विचारले.

सृजन-आनंद शिक्षणवर्गात हे जे घडलं, त्या घटनेचा अन्वयार्थ



अधिक तपासून पाहू लागलो की, पुढील गोष्टी आपल्या लक्षात येतात.

१) गणित आणि वास्तव जीवन यांचा दुवा जोडल्यास गणित शिकता-शिकताच विद्यार्थ्यांपुढं देशातील वास्तव उभं राहतं.

२) गणित समजून घ्यायचं म्हणजे त्यातील आकड्यांबरोबर आशयही समजून घ्यायचा, हे त्यांना समजतं.

३) गणितातील आकड्यांना वास्तवाचं अस्तर लावल्यानं त्याच आकड्यांना अर्थ प्राप्त होतो.

४) आकडे व आशय एकत्र रीतीनं समजून घेतल्यामुळं आणि 'गणिताला प्रश्न विचारा' असं आवाहन असल्यानं विद्यार्थी प्रश्न विचारायला - म्हणजे स्वतःच्या विचार मांडायला - उद्युक्त होतात.

५) विचारलेल्या प्रश्नांच्या संदर्भात शिकणारा व शिकविणारा यांच्यात काही संवाद होतो, चर्चा होते आणि त्यातून वास्तवाचं अधिक समग्र दर्शन विद्यार्थ्यांना होतं.

६) वर्गात हे जे काही झालं, त्याच्या प्रकाशात वर्गाबाहेर दिसणारं वास्तव न्याहाळण्याची संधी गृहपाठांमुळं विद्यार्थ्याला मिळते. "तुमच्या आजूबाजूला इयत्ता ७ वी नंतर किंवा त्यापूर्वी शिक्षण सोडून देणारी जी मुलं आहेत, ती काय करतात याचा शोध घ्या." हा गृहपाठ करता-करता विद्यार्थ्यांपुढचं वास्तव अधिक गडद होतं.

विद्यार्थी विचार करायला शिकू लागले की, जिथं तिथं त्यांना "असं का?", "तसं का नाही?", "आपण असं करू या का?" असे नानाविध प्रश्न पडतात. अभ्यासक्रमात, क्रमिक पुस्तकांत जे नाही आणि जे परीक्षेत विचारलं जाण्याची शक्यता नाही, ते सर्व निरुपयोगी असतं - अशी ठाम समजूत असलेला पालक आणि शिक्षक यांनी अशा विद्यार्थ्यांचा मार्ग अडवून धरला नाही तर विचारपथावरील विद्यार्थ्यांची दौड चालू असते.

## लहान मूल काय विचार करणार?--

'लहान मुलं ती, विचार काय करणार?' असा प्रश्न अनेक वेळा विचारला जातो. या प्रश्नामागं दडलेला तर्क असा की, एका विशिष्ट वयानंतरच माणूस विचार करू शकतो. हे खरं आहे का हो? परवाच

आमच्या सिंधूताईंचा नातू निषाद आजीकडं राहायला आला होता. एकदा त्याचा मामा त्याला बाहेर घेऊन गेला व त्यानं त्याला खाऊ घेऊन दिला. घरी आल्यावर सिंधूताईंनी त्याला विचारलं, "कुणी दिला तुला हा खाऊ?" निषादनं उत्तर दिलं, "दुकानदारानं." मामाच्या अहंकाराला टाचणी लागली. तो म्हणाला, "जावयाचं पोर, हरामखोर. मी नाही दिला होय रे तुला खाऊ?" निषाद अजूनही आपल्या 'नाही' उत्तरावर ठाम होता. शेवटी हताश होऊन मामानं विचारलं, "दुकानदाराला पैसे कुणी दिले?" निषादनं तत्परतेनं उत्तर दिलं, "तू." निषादचा विचार किती तर्कशुद्ध आहे पाहा - मामानं पैसे दिले; दुकानदारानं खाऊ दिला.

विचार करणं ही काहीतरी अमूर्त, अवघड व फक्त प्रौढांना जमू शकेल अशी प्रक्रिया आहे हा सर्वसाधारण दिसणारा समज अपसमज आहे. पहिल्या तीन वर्षांपर्यंत होणारी मेंदूची वाढ - म्हणजेच स्मरण, विचार, कल्पना इत्यादी क्षमतांची वाढ - एकूण आयुष्यात होणाऱ्या मेंदूच्या वाढीपेक्षा कितीतरी जास्त असते असं संशोधनानं सिद्ध झालेलं सत्य नाकारून आपण लहान मुलांना विचार करता येत नसावा असा सोयीस्कर समज करून घेऊन आपले विचार त्यांच्यावर ओतत असतो. चित्रवर्णन करताना तर मुलं किती बारीक निरीक्षण करतात, आपल्या लक्षात न येणाऱ्या बाबी त्यांच्या कशा लक्षात येतात, चित्राच्या अनुषंगानं किती तर्क करू शकतात आणि आपल्या कल्पना, विचार, भावना शब्दांत पकडायला मुलं किती उत्सुक असतात हे अनुभवलं म्हणजे शिकणं म्हणजे विचार करणं याबद्दलचा विश्वास दृढ होत जातो.

## एक सूर : एक विचार--

मध्यंतरी काही काळ शाळाशाळांत समूहगीतं शिकवण्याची लाट आली होती. 'एक सूर, एक ताल, एक विचार' असा त्यामागचा हेतू होता. दिवसेंदिवस मुलांना एकच गाणं शिकवलं जायचं. संगीतशिक्षकांच्या ताब्यात मुलं असत. गंमत अशी की ज्या विचारप्रसारणासाठी हा उपाय शोधला होता, त्याचा मागमूसही शिकण्या-शिकवण्यात राहिला नाही. शिकवणाऱ्या साऱ्या संगीत-शिक्षकांना तरी गीतांचा अर्थ कुठं माहीत होता? अर्थ सांगायचा



मुद्दा आला की, मराठीचा शिक्षक हवा. गाण्यात काही पौराणिक, ऐतिहासिक, भौगोलिक संदर्भ आले की, आणखीच पंचाईत! असं होता होता शेवटी उरे ते समूहगायन! समूहमन तयार होण्याचं एक साधन म्हणून समूहगायन असा दृष्टिकोन असेल, तर गीताचा विचार सर्व अंगांनी व्हायला हवा. एकात्मतेचं बीज रुजवण्यासाठी काही गुजराथी, कानडी गीतंही निवडली होती. अनेकांना आपण काय म्हणतो आहोत, याचा पत्ताच नव्हता. जे आडात नाही ते पोहऱ्यात कसं येणार? विद्यार्थ्यांपर्यंत त्या गीतांचे अर्थ झिरपलेच नाहीत. 'वदनी कवळ घेता नाम घ्या मातृभूचे' हा श्लोक म्हणतानाही सृजन-आनंद विद्यालयातील जी मुलं 'मात्रभूचे' म्हणतात, त्यांना ते का चूक आहे हे समजावून सांगावं लागतं. याबद्दल काही लोक उदासीन असतात, "लहान मुलं, त्यांना काय समजतंय?" असा सूर असतो. लहान मुलांनी हा श्लोक म्हणावा या पाठीमागं काही विचार असेल, तर तो अर्थ समजावून सांगणं हे प्रौढांचं कर्तव्यच नाही का? परंतु विचार करण्यासाठी चित्र किंवा गीत ही माध्यमं असू शकतात व हसत-खेळत विचार करता येतो यावर तरी आमचा विश्वास कुठं आहे? कुणी लांब चेहरा करून बसला, तरच आम्ही "कसला विचार करतोस?" असं म्हणणार. पण शिक्षक शिकवत असताना खिडकीबाहेर पाहणारा विद्यार्थी विचार करत असेल असं सहसा आपल्याला वाटत नाही. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र यांसारखे महाविद्यालयीन पातळीवर घेतले जाणारे विषय किंवा गणित, विज्ञान यांसारखे शालेय पातळीवरचे विषय शिकवितानाच फक्त विचार करावा लागतो, असाही एक अपसमज आहे. कविता शिकता-शिकविताना मुलं व शिक्षक विचारच करत असतात, हे चटकन काहींना मान्य होत नाही. तेव्हा विचार करणं या प्रक्रियेबद्दल व लहान मुलांनाही विचार करता येतो या संकल्पनेबद्दल आणि विचारप्रवर्तन व संक्रमणाच्या पद्धतींबद्दल अनेक समज-गैरसमज आहेत. सध्या आपण एवढेच म्हणूया -

*विचार करायला शिकूया*
*जगणं आपलं शोधूया.*

# मीपण ज्यांचे पक्व फळापरी गळले हो!

कॅलिडिओस्कोप मला फार आवडतो. एवढासा आकार. हातात धरून आत बघितलं की, एखादी छानशी आकृती दिसते. तोच कॅलिडिओस्कोप जरासा फिरवला की, जादू झाल्यासारखी पहिली आकृती बदलते आणि दुसरीच मनोहर आकृती डोळ्यांपुढं साकारते. छोट्याशा हेलकाव्यामुळं आतले काचेचे तुकडे वेगळ्या प्रकारे जुळतात आणि आकृतीत बदल होतो हे सत्य माहीत असूनही माझं कॅलिडिओस्कोपबद्दलचं आकर्षण अजूनही कमी झालेलं नाही. तसं पाहिलं, तर जे रंगीबेरंगी तुकडे आत असतात, त्यांच्यात त्या साऱ्या आकृत्या असतातच की! हवा असतो तो हेलकावा; त्यामुळं होणारी फेरजुळणी!

सृजन-आनंद विद्यालयात काम करतानाही ह्या हेलकाव्यांचं, ह्या फेरजुळणीचं महत्त्व अनेकदा प्रत्ययाला येतं. २६ जानेवारी किंवा १५ ऑगस्ट हे दिवस नुसते 'सलाम ठोकायचे' नसून 'मूलभूत शिक्षणाचे' आहेत अशी दृढ श्रद्धा असल्यानं काही विशेष योजना असतात. १९९४ च्या २६ जानेवारीला क्रीडास्पर्धा घ्यायच्या ठरवलं होतं. इतर विविध आयटेम्सबरोबरच रॅपलिंगचाही एक आयेटम होता. खरं तर रॅपलिंग म्हणजे काय, हे पाहायची ही संधी मुलांना कधी मिळालेली नव्हती. त्याचं प्रशिक्षण तर मुळीच दिलेलं नव्हतं. रॅपलिंगसाठी दोर बांधायचीही चांगली सोय शाळेत होती. असं नाही; परंतु विद्यालयाचे उत्साही क्रीडाशिक्षक श्री. सुतार व कुठलीही अडचण ओलांडायची कशी याबद्दल विचार करू शकणाऱ्या सुचितातार्ई यांनी आढ्याजवळच्या लोखंडी कैचीला जाड दोर आडवा बांधून जमिनीपर्यंत त्याचा एक भाग लोंबता ठेवला. "दोर पायांत पकडून वरवर जायचं आणि आडव्या बांधलेल्या दोराच्या या टोकापासून त्या टोकाला जाताना दोर मुठीत धरत-धरत उडी मारून खाली यायचं." एवढंच मुलांना सांगितलं. रॅपलिंग हा शब्दही न



ऐकलेल्या मुलांना 'हे काहीतरी नवीन करून बघायला मिळणार' असं वाटलं असेल. 'आपल्या मुलांना हे जमणार नाही' अशी भावना बऱ्याच ताई-दादांच्या चेहऱ्यांवर दिसत होती. इयत्ता चौथीतल्या आसावरी नावाच्या एका लहानशा चणीच्या मुलीनं "मी चढते." असं म्हणून दोर हातात धरला, तेव्हा "आसावरी, जमेल का तुला हे?" असंही कुणीतरी म्हणालं. पण एखादी खार ज्या सहजतेनं बुंध्यापासून शेंड्यापर्यंत सरसर जाते तितक्याच सहजतेनं आसावरी पायांत दोर धरून वर चढली आणि नंतर आपल्या चिमुकल्या मुठीत दोर पकडत आडव्या बांधलेल्या दोराच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत जाऊन तिनं खाली उडी मारली. इतर काही मुलंही रॅपलिंगचा कमी-अधिक यशस्वी प्रयत्न करत होती. कुणी शिकवलं हे आमच्या मुलांना? स्पर्धेच्या वातावरणाच्या हेलकाव्यानं? आसावरीच्या व्यक्तिमत्त्वातले कोणते तुकडे या हेलकाव्यानं जुळले आणि त्याचा सुंदर आविष्कार आम्हाला पाहायला मिळाला? या आविष्काराची प्रभा आसावरीच्या वर्तनात पुढील तीन-चार महिनेही दिसत होती.

विद्यालयात काम करताना अनेकदा प्रश्न पडतो की, ज्याला आपण शिक्षण म्हणतो, ते नेमकं कशामुळं साकारतं? कशामुळं रुजतं? कशामुळं अंकुरतं? इतकी वर्षं वाचलेल्या पुस्तकांत या प्रश्नांचा ऊहापोह सापडलेला नाही असं नाही; मात्र तरीही याची नेमकी उत्तरं मिळाली आहेत असं वाटत नाही आणि मग ज्याला 'शिक्षण' म्हणून संबोधता येईल. त्याचं जित-जागतं रूप समोर ठाकलं की, मी त्याचे धागेदोरे शोधत बसते. आमच्या प्रीतीनंही मला असाच विचार करायला लावला. इयत्ता चौथीत शिकणारी ही मुलगी हुशार, पण बडबडी म्हणून आम्हा साऱ्यांना माहीत होती; पण तिच्या ठिकाणी काही विलक्षण असामान्यत्व आहे असं कधी जाणवलं नव्हतं. विद्यालयातल्या काही मुलांनी पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्तीच्या परीक्षेला बसायचं ठरवलं. प्रीतीही त्यात एक होती. परीक्षेच्या पहिल्याच दिवशी प्रीतीच्या हॉलमध्ये सुपरवायझर दुसऱ्या एका मुलीला सारखी उत्तरं सांगत होते. प्रीतीला ते आवडलं नव्हतं. तिनं एक-दोनदा त्या सरांकडं पाहिलं. शेवटी न राहवून ती त्यांना म्हणाली, "अशी उत्तरं सांगायची नसतात ना? तुम्ही का सांगताय त्या मुलीला?" प्रीतीचा हा आगाऊपणा सरांना मुळीच आवडला नाही. "तुला काय

करायचंय? तुझा तू पेपर लिही.'' असं म्हणून त्यांनी आपला आचारधर्म पुढं चालू ठेवला. हे सारं पाहणं व सहन करणं अवघड होत असतानाच आणखी एक दुसरे सर तिथं आले. प्रीती त्यांना म्हणाली, ''हे सर त्या मुलीला सारखी उत्तरं सांगत आहेत. असं करू नका असंही मी त्यांना सांगितलं; पण ते माझं ऐकत नाहीत. आता तुम्हीच त्यांना सांगा.'' इतक्या छोट्या मुलीचा हा स्पष्टवक्तेपणा व अन्यायाविरुद्ध दाद मागण्याची तयारी पाहून बहुधा त्या दुसऱ्या सुपरवायझरांनी योग्य त्या सूचना संबंधितांना दिल्या असाव्यात. प्रीतीची तगमग थांबली आणि नंतर तिनं आपला पेपर शांतपणं लिहिला. दुसऱ्या दिवशी तिन मला जेव्हा हा प्रसंग सांगितला, तेव्हा मी तिला म्हटलं, ''शाब्बास. प्रीती, तू त्या परीक्षेत जरी नापास झालीस ना, तरी एका फार मोठ्या परीक्षेत तू खूप वरचा नंबर मिळवला आहेस. मला तुझा अभिमान वाटतो.'' प्रीतीला माझं बोलणं कितपत समजलं, कुणास ठाऊक; पण घरटा नेण्याबद्दलची तक्रार करणारी चिमणी किंवा आरामात पिंजऱ्यात राहायचं नाकारणारी चिमणी असे क्रमिक पुस्तकातले कितीतरी धडे शिकवताना विद्यालयात 'शिक्षण' देण्याचा जो प्रयत्न केला होता, तो प्रीतीच्या अंतरंगापर्यंत पोहोचून त्यातून तिच्या व्यक्तिमत्त्वाचे ताणेबाणे तिचे तिनंच विणले होते. परीक्षेच्या निमित्तानं त्या ताण्या-बाण्यांचं मनोहर रूप दृग्गोचर झालं होतं, इतकंच! गेली नऊ वर्षं अनेकविध अडचणींना सामोरं जात जात सृजन-आनंद विद्यालय चालतं ठेवण्याचं सार्थक आम्हा सर्वांना त्या दिवशी वाटलं.

क्रमिक पुस्तक हे शिक्षणाचं एकमेव माध्यम नसून केवळ एक माध्यम आहे, अशी निष्ठा ठेवून सृजन-आनंद विद्यालयात काम केलं जातं. साहजिकच वर्तमानपत्रांतल्या बातम्यांबद्दल अनेकदा मुलांशी संवाद होतो. उमरगा, किल्लारीतील भूकंपाच्या वेळी त्या बातम्या सांगणं, नकाशात ती गावं पाहणं, बातम्यांबरोबर येणारी छायाचित्रं पाहणं होत असे. दिवाळीची सुटटी जवळ आली होती. ''भूकंप झालेल्या ठिकाणच्या लोकांना धड भाकरी-भाजीही मिळत नाही. आपण या वर्षी साधेपणानं दिवाळी करायची. फक्त एकच गोड व एकच तिखट पदार्थ आपण खायचा.'' असं आवाहन काही ताईंनी केलं होतं. हे सारं बोलताना मला



तर गोड कमी खावं हे एका मुलाला सांगण्यासाठी तुकाराम महाराजांनी आठ दिवस स्वतः गोड कमी खाऊन ते किती अवघड आहे याचा अनुभव घेतला होता, तो प्रसंग सारखा डोळ्यांसमोर येत होता. मुलांना आपण जे सांगतोय, ते स्वतः तंतोतंत पाळण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, हे जाणवत होतं. सुट्टीनंतर अनेक आई-बाबांनी आम्हाला सांगितलं की, आमच्या आवाहनाला मुलांनी फार सुरेख प्रतिसाद दिला होता. देणगीच्या बाबतीतही मुलांनी अपेक्षेपेक्षा वेगळा प्रतिसाद दिला. भूकंपग्रस्तांसाठी आपल्याही मदतीचा खारीचा वाटा पाठवावा म्हणून विद्यालयातल्या प्रत्येक विद्यार्थ्यानं दोन रुपये द्यावेत असं सांगितलं गेलं; पण तिसरीतल्या रसियानं ''माझ्या वाढदिवसासाठी ठेवलेले दोनशे रुपये मी भूकंपनिधीला देणार. तू माझा वाढदिवस करू नकोस.'' असं आईला सांगून आपले दोनशे रुपये सकाळ कार्यालयात नेऊन दिले. चौथीतल्या प्रीतीनं तर बालचित्रवाणीच्या कार्यक्रमातल्या सहभागाबद्दल तिला मिळालेली संपूर्ण शंभर रुपयांची रक्कम विद्यालयात शंकरदादांकडं जमा केली. हे पाहताना मला लहानपणी आईकडून ऐकलेली 'खुलभर दुधाची कहाणी' सारखी आठवण होती. मृताच्या टाळूवरचं लोणी खाल्लं जाण्याच्या आजच्या दिवसांत कुणाची तरी वेदना मनाला भिडल्यानं समोर दिसणारं स्वतःचंच असलेलं लोणी खायचं नाकारणं ही बाब तशी लहानसहान नाही.

मुलांबरोबर बोलताना कुठला विषय आणि कुठली वाक्यं त्यांच्या पार अंतरंगापर्यंत पोहोचतात, हे आपल्याला त्या वेळी समजत नाही. इयत्ता पहिलीत कधीतरी उंटांच्या रेसमध्ये त्यांच्या शेपटीला छोटी छोटी मुलं बांधतात आणि उंटांना जोरात पिटाळतात हे किती भयानक आहे याबद्दल बोललं गेलं होतं. पहिलीतल्या नवज्योतच्या आईनं सांगितलं की, ते ऐकल्यापासून त्याला उंट हा प्राणीच आवडत नाही.

दुसरीतल्या अर्चिस सबनीसच्या आईनंही तिच्या घरातल्या वागण्या-बोलण्याबद्दलचं टिपण शाळेत दिलं आहे. त्यात काही फार सुंदर प्रसंग आहेत. ते वाचू या.

एकदा कामवाल्या बाई अर्चिसला सांगत होत्या, ''अगं, एक आजीबाई पडली. खूप मज्जा झाली. मी इतकी हसले.'' अर्चिस त्यांना

म्हणाली, "हसता काय? कुणी पडलं तर हसायचं नाही; कुठं लागलं का ते पाहायचं."

अर्चिसचे आजोबा त्यांच्याकडंच राहतात. "आजोबा जेवले? ते काय करतायत? कंटाळलेत का? पत्ते खेळू का त्यांच्याबरोबर?" असं ती सतत विचारत असते. घरात कुणी आजारी असलं, तर जवळ जाऊन बसणं, डोकं दाबून देणं, दारावरची किंवा फोनची घंटा वाजली तर स्वतःच त्याकडं लक्ष देणं असं अर्चिस सहजतेनं करत असते.

गतवर्षीचा चौथीचा निरोप-समारंभ झाला. त्या दिवशी रात्री दुसरीतल्या गुणालीच्या घरी तिचा आवडीचा गोड पदार्थ केला होता; पण गुणालीने तो मुळीच खाल्ला नाही. आईनं त्याबद्दल विचारताच ती म्हणाली, "माझे इतके मित्र-मैत्रिणी शाळा सोडून जाणार हे कळल्यावर मला वाईट नाही का वाटणार?"

एका अपघातात दोन्ही हात व दोन्ही पाय गमवावे लागलेल्या महेश देशपांडेला या वर्षी आम्ही विद्यालयात निमंत्रित केलं होतं. हात नाहीत म्हणून तो तोंडात पेन धरून लिहितो हे मुलांनी प्रत्यक्ष पाहिलं. तो दैनंदिन व्यवहार कशा प्रकारे पार पाडतो, याबद्दल ऐकलं. हा अनुभव घेतल्यानंतर इयत्ता दुसरीतला हृषिकेश स्वतःला हातच नाहीत असं मानून शर्टाच्या बाहीच्या बाहेर हात न काढता शर्टाच्या आतच हात ठेवून बटणं लावून घरात फिरत असे, असं त्याच्या आईनं सांगितलं. हृषीनं असं का केलं असेल? केवळ गंमत म्हणून? की महेशला किती त्रास होत असेल हे समजून घेण्यासाठी?

कश्मिरा इयत्ता दुसरीतली मुलगी. छोटीशी. बरीचशी अबोल. बुजरी. तिचे वडील धान्याचा व्यापार करतात. भूकंपग्रस्तांना धान्यवाटप करण्यासाठी ते ट्रक घेऊन जाणार आहेत असं कळल्यावर कश्मिरानं त्या लोकांना देण्यासाठी आपल्या बाबांजवळ स्वतः लिहिलेलं एक पत्र दिलं. आपली सहसंवेदना दूर अंतरावरच्या माणसांपर्यंत पत्रातून पोचवता येते ही जाणीव आणि स्वतःच्या सहवेदनेचा (empathy) आविष्कार करण्याची इच्छा कश्मिराला विद्यालयातल्या नेमक्या कोणत्या व्यक्तीमुळं आणि कोणत्या प्रसंगानं मिळाली हे समजणं शक्यच नाही; पण तिच्या ह्या लहानशा महत्त्वपूर्ण कृतीत विद्यालयाचा वाटाही असेल असं तिच्या



आईला वाटून आणि तिनं ते आमच्यापर्यंत पोहोचवून आमचं कामाबद्दलचं मनोबल वाढवावं हे किती दिलासा देणारं आहे ना?'मी-माझं' हे सीमित वर्तुळ ओलांडणं तसं सोपं नाही, याचा अनुभव अनेकदा आपण घेतो; पण बऱ्याच पालकांच्या टिपणांतून मुलं हे वर्तुळ ओलांडायच्या प्रयत्नांत आहेत असा सुखद स्वर ऐकायला मिळतो. इयत्ता दुसरीतल्या सागर जाधवच्या आईनं लिहिलं आहे की, वर्गातल्या कुणाला लागली, तर देता यावी म्हणून सागर जादा पेन्सिली दप्तरात ठेवतो. त्याच वर्गातली अर्चिस कुलकर्णी स्केचपेनचा भलामोठा सेट शाळेत आणते आणि आपल्या जवळपास बसलेल्यांना ती लक्झर स्केचपेन्स वापरायला देताना तिला एक प्रकारचा आनंद होत असतो. सर्व इयत्तांतली अनेक मुलं स्वतःचं कोणतंही शालेय साहित्य ज्यांच्याजवळ ते नाही त्यांच्याबरोबर विभागून घ्यायला खुशीनं तयार असतात. एखाद्या विद्यार्थ्यानं मधल्या वेळेसाठी डबा आणला नसेल, तर तो कधी उपाशी राहत नाही. त्याचे सहाध्यायी आपल्या डब्यातला काही भाग त्याला तत्परतेनं देतात. मात्र असं सर्वसाधारण चित्र असलं, तरी पाण्यात घातलेल्या कडधान्यात न भिजणारं कडधान्यही, असतं तशीही काही मुलं असतात. गेली दोन वर्षं ओंकार आमच्या विद्यालयात आहे. पहिल्या वर्षी तो आपली कोणतीही वस्तू कोणालाही देत नसे. 'दे रे थोडा वेळ.' म्हटलं की, स्वारीचे डोळे डबडबून यायचे. ताईंनी जरी त्याचं पुस्तक थोड्या वेळासाठी घेतलं तरी तो अगदी घाबरा-घुबरा व्हायचा. पुस्तक परत स्वतःच्या हातात पडेपर्यंत त्याचं लक्ष अभ्यासाकडं नसायचं. ताई सतत याबद्दल त्याच्याशी बोलायच्या. अर्चिस, सागर यांसारख्या मुलांना "छान! थोडा वेळ दिलंस ना त्याला वापरायला. Good" असं म्हणायच्या. 'मागोवा' अहवालात ओंकारचा हा स्वभावविशेष स्वाभाविकच नोंदला गेला आणि त्याच्या पालकांशीही त्याबद्दल चर्चा झाली. या वर्षीच्या शेवटी-शेवटी ओंकार आपल्या वस्तू इतरांना जरूर असेल, तर देऊ लागला आहे; परंतु अजून त्यात पुरेशी मनःपूर्वकता किंवा उत्स्फूर्तता नाही. पण आमची खात्री आहे की, अजून पुढच्या दोन वर्षांत ओंकार 'माझं दप्तर' पासून 'माझे वर्गमित्र' इथपर्यंत नक्की पोहोचेल. त्याचे पालकही आम्हाला त्यासाठी पुरेशी साथ देत आहेत. मात्र

ओंकारमध्ये अपेक्षित असलेला हा बदल धसमुसळेपणानं मुळीच व्हायला नको आहे. एखाद्या कळीचं जसं सहजतेनं फुलात रूपांतर होतं, तसं त्याच्या अंतरंगाचा बराच भाग 'मी'बरोबरच 'आपण'ने व्याप्त व्हायला हवा आहे.

कविवर्य श्री. बोरकरांच्या पुढी दोन पंक्ती या संदर्भात आठवतात.

*"जीवन त्यांना कळले हो*
*मीपण ज्यांचे पक्व फळापरी गळले हो."*

तुम्ही म्हणाल, "केवढीशी मुलं आणि जीवन काय, मीपण काय - लीलाताई काय बोलतील, नेम नाही." पण खरंच सांगते, लहान मुलं झाली म्हणून काय झालं? त्यांचंही एक स्वतंत्र जीवन असतं. त्यांचंही मीपण असतं आणि ते मीपणाचं लहानसं फळही त्याच्या त्याच्या परीनं पक्व होत नाही का? तसं नसतं तर या लहानग्यांचं हे 'मीपण' पक्व झाल्याचे असे छोटे-छोटे अनुभव सांगताच आले नसते. आणि हो - सांगायचं राहतच होतं. या छोटुकल्यांच्या आई-बाबांचं मीपणही सृजन-आनंद विद्यालयात मिळणाऱ्या विविध हेलकाव्यांमुळं अधिक पक्व होतंय बरं का. सांगू उदाहरण? इयत्ता पहिलीत मंदार आणि शंतनू नावाची जुळी मुलं आहेत. त्यांच्या आई स्वतःच्या टिपणात लिहितात, "अलीकडं शुभंकरोति म्हणताना घरातली पीडा नाहीशी होऊ दे असं न म्हणता आम्ही जगातली पीडा जाऊ दे असं म्हणतो." त्यांची ही वाक्यं वाचताच मी म्हटलं, "व्वा! क्या बात है!"



# थेंबे थेंबे वृत्तिविकास

## शिक्षणाचा केंद्रबिंदू कोणता?

शिकायचं म्हणजे काय, या प्रश्नाची अनेक उत्तरं ऐकायला मिळतात. परीक्षा पास होण्यासाठी सरकारमान्य पुस्तकं शिक्षकांकडून ऐकायची, ती लक्षात ठेवायची आणि लक्षात ठेवलेलं परीक्षेत लिहून टाकायचं म्हणजे शिकायचं हे सर्वसामान्य रूढ उत्तर. शिकणाऱ्याला आणि शिकवणाऱ्याला हे उत्तर फार सोयिस्कर वाटतं. मळलेल्या रेखीव वाटांवरून चालण्यासारखं हे शिकणं बिनत्रासाचं असतं. समजलं का? जे समजण्यासारखं वाटतं ते आजूबाजूच्या वास्तवाच्या निकषावर तपासून बघितलं का? तसं बघितल्यावर पुनः नव्यानं काय समजलं? असल्या प्रश्नांचा शोध मग घ्यावा लागत नाही. परंतु सृजन-आनंद शिक्षण केंद्रात किंवा सृजन-आनंद विद्यालयात काम करताना आमचा प्रयत्न मुला-मुलींना वास्तवाकडं सजगतेनं पाहायला, जे दिसतं त्याचा अर्थ शोधायला; आणि जो अर्थ लक्षात येतो त्यावरून सत्यासत्य, योग्यायोग्य टरवायला समर्थ करणं हाच असतो. शिकण्याचा परिणाम म्हणून त्यांच्या ठिकाणी आत्मनिर्भरता जशी निर्माण व्हायला हवी तशीच स्वतः झीज सोसून इतरांवर प्रेम करण्याची वृत्ती विकसित व्हायला हवी. निर्भय मन आणि उन्नत माथा होणं जसं आवश्यक, तसंच दुसऱ्यांना अकारण त्रास देण्याबद्दलचं भय आणि योग्य तिथं विनम्र माथाही असणं जरूर आहे. विचारनिष्ठता म्हणजे विचारकर्कशता नव्हे, याचा प्रत्ययही यायला हवा. व्यक्ती आणि समाज या दुहेरी विणीच्या नात्यांची जाणीव आवश्यक असते. थोडक्यात सांगायचं झालं, तर शब्दांना भेदून त्यांतल्या अर्थाचा, वास्तवाचा आणि संभाव्यतेचा गाभा हरतऱ्हांनी शिकणाऱ्यांपर्यंत झिरपायला हवा. हे व्हावं असं वाटणं आणि ते तसं होणं यातलं अंतर कमी करण्यासाठी हेतुपूर्वक नाना उपक्रम योजावे लागतात. त्या उपक्रमांपैकी काही दैनंदिन असतात, तर काही नैमित्तिक असतात. काही सर्वांनी मिळून करायचे,

तर काही इयत्तावार होतात. काही ताई-दादांनी करून दाखवायचे आणि मुलांनी पाहायचे, काही मुलांनी करायचे आणि ताई-दादांनी पाहायचे; पण प्रत्येक उपक्रमाचा केंद्रबिंदू मुलाची निकोप वृत्ती हाच असतो.

**पिठलं-भाताचा खाऊ--**

सृजन-आनंद विद्यालयाच्या अगदी पहिल्या वर्षापासून आतापर्यंत आम्ही शाळेत खाऊ करीत असतो. क्रियापद लक्षात घेतलं ना? 'करीत असतो.' तयार खाऊ आम्ही कधीच आणत नाही. तयार खाऊ आणला की, तो 'माल' असतो. तो तोंडात गेला की, संपतो. पण केलेला खाऊ माल नसतो. खाल्ल्यानंतर कितीतरी दिवस त्याची चव, वास, रूप आपल्या अंतरंगात दरवळत असतं. शाळेत केल्या जाणाऱ्या खाऊचं महत्त्व त्याच्या किमतीवरून किंवा बाह्य वेष्टनावरून ठरत नाही. आता अगदी पहिल्या वर्षीच्या खाऊचंच उदाहरण घ्या ना! 'शाळेत आपण काहीतरी खायचा पदार्थ बनवू या', असं म्हटल्यावर मुलांना मजा वाटली. शाळेत असलं काही असू शकतं याबद्दलच्या त्यांच्या पूर्वकल्पनांना छेद बसला. मग चर्चा सुरू झाली, काय करायचं याची. पहिलीतली ती मुलं स्वतःला आवडणारा एकेक पदार्थ सांगू लागली. गुलाबजाम, जिलबी, लाडू. . . मी जेव्हा 'पिठलं-भात' हा खाऊ सुचवला, तेव्हा बऱ्याच मुलांनी ''शीऽऽ तो कसला खाऊ!'' असंही म्हटलं. बऱ्याच चर्चेनंतर पिठलं-भातावर शिक्कामोर्तब झालं. आमच्या घरचे जिरेसाळ तांदूळ आणि तूप मी नेलं होतं. बाकीचे सारे पदार्थही शाळेत आणले होते. तांदूळ निवडणं, धुणं, स्टोव्ह पेटवणं, मोठ्या पातेल्यात भातासाठी पाणी ठेवणं, तांदूळ वैरणं, रटारटा भात शिजवणं. . . हे सारं मुलं करत होती; त्याबद्दल बोलत होती; बोललेलं ऐकत होती. कांदा चिरताना डोळ्यांना पाणी येतं, हात कापतो, कोथिंबिर बारीक चिरणं अवघड असतं अशा साऱ्याचा प्रत्यय घेत होती. फक्त पिठलं-भात करताना इतकं सारं करावं लागतं, तर ताटभर वाढले जाणारे विविध पदार्थ करणाऱ्या आईला किती त्रास होत असेल, असा विचार त्यांच्या मनांना चाटून जात होता. बोट कापल्यावर ताईंनी औषध लावून पट्टी बांधली. आई मात्र गडबडीत कापलेलं बोट नळाखाली धरून पुन्हा कामाला लागते अशी तुलना कुठंतरी डोकावत होती. शाळेतल्या ताई जशा सारी कामं पुढं होऊन करत आहेत,



तसेच दादाही झाडणं, चिरणं, घासणं, वाढणं अशा कोणत्याच कामात मागं नाहीत हे पाहून नकळत आई-ताई काम करताना पेपर वाचत बसणारे बाबा डोळ्यांपुढं येत होते. कितीतरी नामं, विशेषणं, क्रियाविशेषणं आणि क्रियापदं मुलं त्या दिवशी खऱ्या अर्थी शिकली. पिठलं-भात हासुद्धा एक उत्तम खाऊ आहे, अशा वृत्तीचा एक पातळ पापुद्रा त्यांच्या मनावर तयार झाला. एकत्रित, सगळ्यांनी मिळून काम करण्यात मजा असते, याचा अनुभव त्यांनी घेतला. मुलगे आणि मुली किंवा दादा आणि ताई यांच्या कामांची वाटणी लिंगभेदावर आधारित नाही हे त्यांना जाणवत होतं. विकत आणलेला खाऊ खाऊन टाकण्यापेक्षा साधासा, कमी खर्चाचा खाऊ शाळेत तयार करता-करता आपण कविता करतो, चित्र काढतो, पदार्थांच्या नावाच्या याद्या लिहितो. . . आणि या साऱ्याची खूपच मजा वाटते हे मुलांच्या अंतरंगापर्यंत पोहोचत होतं. त्या वर्षानंतर आजवर आम्ही दर वर्षी निदान दोनदा शाळेत खाऊ करतच असतो. खाऊ करायचं ठरवताना त्यात कोणकोणत्या प्रक्रिया अंतर्भूत आहेत, मुलांना किती प्रकारचे अनुभव त्यातून मिळतील, आहार, आचार, विचार याबद्दलचे कोणते (अप)समज खाऊ करता-करता दूर होऊ शकतील, असा विचार प्रामुख्यानं केला जातो.

**सबल मानसिकतेसाठी--**

शाळेत करायची कोणतीही बाब ही अत्यंत विचारपूर्वक योजावी लागते. 'काय केलं' यापेक्षा ते 'कसं साकारलं' याला महत्त्व असतं. निरोप-समारंभासारखी नेहमीच शाळेत घडणारी घटना उदाहरणादाखल घ्या. शाळेतून बाहेर पडणाऱ्या मुलांसाठी निरोप-समारंभ करायचा हा नेहमीचाच रिवाज. सृजन-आनंद विद्यालयात हा केवळ रिवाज नाही; त्याचाही उपयोग मुलांनी आणि ताई-दादांनी शिकण्या-शिकवण्यासाठी कसा होऊ शकेल याचा शोध घेतला जातो. प्रत्येक वेळी हाती यशच लागतं असं नाही; पण प्रायोगिक कामात 'अमुक वाटेनं गेल्यास गोंधळ होतो, मनापुढं असलेले हेतू साध्य होत नाहीत.' हे समजणं हीसुद्धा प्रायोगिक कामाची एक महत्त्वाची फलनिष्पत्तीच असते. एका वर्षी आम्ही असा विचार केला की, निरोप-समारंभ म्हणजे प्रेमभावनेची उत्कट देवाण-घेवाण. इयत्ता चौथीतला जो विद्यार्थी पहिली ते तिसरीपर्यंतच्या विद्यार्थ्याला आवडतो, त्याच्यासाठी त्यानं भेटवस्तू

करावी. मनसुबा खूप छान; पण घडलं काय? खूपसा गोंधळ! शिवाय चौथीच्या ज्या वर्गताई बोलायला उभ्या राहिल्या, त्यांना रडू अनावर झालं. त्यांचा चेहरा भावनांनी ताणला गेला. आवाज बाहेर पडेना. हे सारं पाहताना काही मुलं हसत होती, तर काहींना वाईट वाटत होतं. 'प्रौढत्वे निज शैशवास जपणे' या न्यायानं ताईंचं हे वागणं ठीक असलं, तरी भावनांना विवेकाचा लगाम कसा घालावा याचा वस्तुपाठ मुलांना दिसला असता, तर त्यांच्या भावी जीवनाच्या दृष्टीनं ते बरं झालं असतं असं आम्हाला वाटलं. चौथीच्या मुलांना त्या दिवशी आपण कोणीतरी मोठे आहोत असं एकीकडं वाटत असतं, तर दुसरीकडं सृजन-आनंद विद्यालय सोडताना त्यांच्या जिवावर आलेलं असतं. आणखी एका वर्षी निरोप-समारंभाच्या वेळी आम्ही असा विचार केला की, दुसऱ्या शाळेत जाण्यासाठी जी मानसिकता - फार प्रश्न न विचारणं, मोठ्या वयाच्या माणसांना-शिक्षकांना उलट न बोलणं, शाळेत पट्टी बसली तर ती सोसून घेणं, गृहपाठाचा कंटाळा न करणं, शिक्षकांच्या शरीराला जवळ जाऊन हात न लावणं - आवश्यक आहे, तीच एका वेगळ्या प्रकारानं मुलांपर्यंत संक्रमित करावी. त्यासाठी वनस्पतिशास्त्रात तज्ज्ञ असलेल्या प्राध्यापक कांचनताई आम्ही निवडल्या. भोवतालच्या परिस्थितीत 'टिकून' राहण्यासाठी वनस्पती स्वतःच्या शरीरात कसे बदल करतात, हे अनेक वनस्पती दाखवून त्यांनी वर्णन केलं. आम्हाला जे अपेक्षित होतं ते सूचित झालं असलं, तरी तात्पर्याचा गोळा काढून मुलांच्या हाती आम्ही मुद्दामच दिला नाही. विविध व्यक्ती आणि संस्था यांच्यातलं भलं-बुरं स्वतःच जाणून घेऊन आपल्या विकासाच्या वाटेवर त्यांचा कमी-अधिक उपयोग कसा करून घेता येईल याबद्दल मुलांना उपदेशाचे डोस पाजणं, इतर शाळांची निर्भर्त्सना करत आपली शाळा कशी चांगली आहे हे त्यांच्या मनावर बिंबवावं, असलं काही आम्हाला करायचंच नव्हतं. मुलं चौथीत आली की, अधूनमधून श्रुतलेखन, चर्चा, मुलांचं लेखन अशी निमित्तं साधून आम्ही दुसऱ्या शाळेत जाण्यासाठी त्यांची मानसिकता तयार करण्याच्या प्रयत्नांत असतोच. विविध चवींनं अन्नाचं परब्रह्म होतं. जीवनपटही विविध प्रकारच्या व्यक्ती, घटना, संस्था यांच्या उभ्या-आडव्या धाग्यांनी बनलेला असतो. विकासाचा एक टप्पा चौथीच्या निरोप-समारंभाच्या निमित्तानं मुलं ओलांडत असतात. तो टप्पा जितक्या सहज रीतीनं मुलं ओलांडतील,



तितक्या सहजतेनं भावी जीवनातील चढ-उतारांकडं ती पाहू शकतील असं आम्हा साऱ्यांना वाटतं. एकाच मापानं साऱ्या व्यक्ती किंवा संस्था न मोजता स्वतःच्या विकासासाठी हंसक्षीरन्यायानं आवश्यक ते स्वीकारणं आणि नकोशा वाटणाऱ्या बाबी काही काळ सोसणं किंवा त्याग करणं आवश्यकच असतं ना?

**स्नेहसंमेलन : मेंदू, मन आणि मनगट--**

शाळेच्या वर्षभराचं जे ऋतुचक्र सामान्यपणं असतं, त्यात स्नेहसंमेलन हा ऋतु असतोच. सृजन-आनंद विद्यालयही याला अपवाद नाही. वर्षभरातले साधारणपणानं पंधरा ते वीस दिवस विद्यालयात स्नेहसंमेलनाचे वारे घुमत असतात. प्रदर्शन, विविध कार्यक्रम, पाहुण्यांना द्यायच्या भेटवस्तू यांच्या तयारीत मुलं व ताई-दादा रंगलेले असतात. मात्र इथंही चकचकीतपणा, गुळगुळीतपणा आणि बिनचूकता यांवर विद्यालयाचा भर नसतो. मुलांतील आत्मविश्वास जागृत करणं, त्यांना आत्मसन्मानाचा अनमोल प्रत्यय मिळणं, त्यांच्यातील सृजनशीलतेच्या आविष्काराला नव्या वाटा मिळवून देणं आणि एकंदरीतच सादर होणाऱ्या कार्यक्रमांकडं Product म्हणून न पाहता त्यांच्याकडं Process म्हणून पाहणं असा आमचा प्रयत्न असतो. यामुळं काय होतं? कोणीतरी लिहिलेलं नाटक मुलं पाठ करत नाहीत. वर्षभरात शिकलेले धडे, केलेले प्रकल्प, म्हटलेली गाणी, ऐकलेल्या गोष्टी, केलेले प्रयोग या साऱ्यांपैकी जे फार आवडलं, त्यावर कार्यक्रम करायचं ठरतं. 'आभाळाचा निरोप'सारखा धडा नाटकरूपानं सादर करताना धड्यात नसलेल्या कितीतरी आशयाची भर मुलं घालतात. धड्यात न आलेली नवी पात्रं त्यांच्या नाटकात येतात. ती पात्रं काय बोलतील, याचा विचार मुलंच करतात. कोणत्या पात्राचं काम कोणाकडं द्यावं, याच्याही चर्चा होतात. नाटकाला संहिताच नसल्यानं ती पाठ करण्याचा प्रश्नच नसतो. त्यामुळं कार्यक्रम सादर करताना कोणाचं काही चुकलं, तर इतर मुलं गोष्टीतले संदर्भ लक्षात घेऊन जोडाजोड करतात. स्नेहसंमेलनासाठी कोणी नवे ड्रेस विकत आणायचे नसतात. नेहमीच्या गणवेषातच मुलं रंगमंचावर असतात. मात्र विविधरंगी कागदांचा उपयोग करून 'नटण्याचं' त्यांना आवाहन असतं. अशा प्रकारे नटताना मुलांबरोबर पालकही त्यात सामील होतात. 'तैय्यार'

ड्रेस आणताना पालकाचा 'खिसा' रिकामा होतो; कागदाचा ड्रेस किंवा अलंकार करताना मुलं आणि पालक यांची 'मनं' सृजनशीलतेच्या आनंदानं 'भरून' जातात. पात्राचं स्वरूप लक्षात घेऊन किती मेहनतीनं व किती सुंदर वेषभूषा आणि अलंकार तयार केले जातात! शाळेतल्या जवळ-जवळ सर्वच मुला-मुलींना रंगमंचावर येण्याची संधी मिळायला हवी याबद्दल ताई-दादा प्रयत्नशील असतात. प्रख्यात अभिनेत्री स्मिता पाटील यांनी एका समारंभात सांगितलं होतं की, त्या सावळ्या होत्या म्हणून त्यांना स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात घेतलं नव्हतं. स्मिताचं हे वाक्य माझ्या मनात रुतलं आहे. रंग, उंची, बांधा अशा शारीरिक किंवा जात-पात, धर्म, लिंग यांसारख्या सामाजिक भेदांमुळं मनोरंजन कार्यक्रमांत मुलांना न घेण्याची चूक आपल्या हातून घडू नये याबद्दल आम्ही दक्ष असतो. विद्यार्थ्यांची श्रेष्ठता केवळ परीक्षेतल्या मार्कांनी ठरत नाही असंही मुलांना आणि पालकांना आम्हाला सूचित करायचं असतं. त्यामुळंच मग ज्या सुहासचं वैशिष्ट्य म्हणजे सहजतेनं घोड्याचं सुंदर चित्र काढणं, तो सुहास रंगमंचावर ठेवलेल्या फलकावर ऐटदार घोडा काढतो, असाही एक कार्यक्रम सादर होतो. शिवाय 'छान छान'सारखा कार्यक्रमही त्यासाठीच होतो. बौद्धिक, भावनिक आणि क्रियात्मक बाबतीत कोणत्या मुलाचं काय छान आहे, याची इयत्तावार यादी करून ती वाचली जाते आणि संबंधित मूल ताठपणानं क्षणभर रंगमंचावर उभं राहतं. माणसा-माणसांतील ज्येष्ठ-कनिष्ठतेच्या भिंतीही ढासळवण्याचा आमचा जाणीवपूर्वक प्रयत्न असतो. त्यामुळंच मग शाळेच्या वर्षभराच्या कामाचा अहवाल कोणी ड्डाचार्य ताई किंवा दादा न वाचता आमच्या शालीन व शहाण्या सेविका विजयाताई वाचतात. आमचे हे प्रयत्न फार तोकडे आहेत. आजूबाजूचं दिखाऊ वास्तव तोडण्याची त्या प्रयत्नांत शक्ती नाही हे आम्हाला पूर्णपणानं माहीत आहे. तरीही सृजन-आनंद विद्यालयात मुलांच्या आणि ताई-दादांच्या वृत्तिविकासाचे प्रयत्न जारीच असतात. त्यामुळंच रंगमंचावर आपण कधी उभ्या राहू असं ज्यांना वाटलं नसेल, अशा वासंतीताई व वसुधाताई आत्मविश्वासानं आपली भूमिका पार पाडतात, तेव्हा त्यांना स्वतःला मिळणारा आत्मसन्मान व आत्मविश्वास अमोल असतो. विद्यालयात काम करू लागल्यापासून निमाताई कवितांच्या बाबतीत 'बहुप्रसवा' झाल्या आहेत. याचंही कारण 'आव्हानं' अंगावर घ्यायला



शिकवणारं सृजन-आनंद विद्यालय हेही आहे. शाळेच्या कामाचं नियोजन करता-करता आशाताई, रोहिणीताई, सुचिताताई यांच्यासारख्या ताई 'अव्वल नियोजक' बनल्या आहेत. स्वतःत सुप्त रूपानं असलेलं हस्तकलाकौशल्य आता ज्यांचं वैशिष्ट्य झालं आहे, त्या नंदिताताईंनाही विद्यालयाच्या विविध कामांतूनच ते प्राप्त झालं आहे. श्रेष्ठश्रेष्ठतेच्या संकल्पनांनी बांधलेली माणसं एक तर अहंकारानं फुगलेली असतात किंवा आत्मसन्मान भावनेच्या अभावी दबलेली असतात. असं होता कामा नये याबद्दल विद्यालयाचा कटाक्ष असतो. स्नेहसंमेलनाच्या सर्व कार्यक्रमांचं सूत्रसंचालन मुलं करतात आणि पाहुण्यांच्या जोडीनं रंगमंचावर ऐटीत खुर्चीत बसतात. इतक्या लहान वयात अशी महत्त्वाची जबाबदारी मुलं पेलू शकतील का अशी शंका ज्या लोकांना वाटते त्या लोकांनी सृजन-आनंद विद्यालयाचं स्नेहसंमेलन पाहावं. स्नेहसंमलेन हे अध्ययन-अध्यापनासाठी एक निमित्त आहे आणि शिकण्या-शिकवण्याचे केंद्रबिंदू मेंदूबरोबर मन आणि मनगट हेही आहेत, याचं विस्मरण होऊ न देण्याची खबरदारी आम्ही घेतो.

## मूल्यशिक्षण आणि अध्यापन--

मूल्यशिक्षणाच्या प्रयत्नांतून वृत्तिविकास होतो. मूल्यशिक्षण अशी वेगळी तासिका असल्याशिवाय वृत्तिविकासाला खतपाणी मिळणार नाही असं निदान आम्हाला तरी वाटत नाही. शाळेच्या अगदी पहिल्या-दुसऱ्या वर्षी स्मिताताईंनी गोष्ट सांगताना "मुंगी कशी पोपटाचा मित्र असू शकेल?" असा प्रश्न मुलांनी विचारला होता. प्रश्नाचा दुवा साधून स्मिताताईंनी वर्ण, धर्म, जात, लिंग किंवा श्रीमंती, गरीबी मैत्रीला अटकाव करू शकत नाही, हे स्पष्ट केलं होतं. मुलांचं काम पाहण्यासाठी वर्गातून फिरताना एका मुलाला एकदा ताईंचा पाय लागला. ताई म्हणाल्या, "सॉरी हं." मुलगा त्यांना म्हणाला, "लहान मुलाला कसलं सॉरी म्हणायचं?" ताई म्हणाल्या, "अरे, लहान मूलसुद्धा माणूसच असतं. मोठ्या माणसाची चूक झाली तर लहान मुलालाही त्यानं सॉरी म्हणायलाच पाहिजे." अगदी परवा-परवाचं आणखी एक उदाहरण अगदी बोलकं आहे. रेखाताई गणित शिकवत होत्या. जमाखर्चाचं एक गणित होतं. जमेच्या बाजूच्या आकड्यांत बाबांचा आणि आईचा पगार लिहिलेला होता. आईच्या पगाराचा आकडा बाबांच्या पगारापेक्षा

जास्त होता. केवळ आकडेमोड म्हणजे गणित नव्हे, हे समजलेल्या सृजन-आनंद विद्यालयातल्या मुलांनी गणित वाचल्यावर त्याचा अन्वयार्थ लावला आणि रेखाताईंना विचारलं, "आईचा पगार बाबांपेक्षा कसा जास्त असेल?" अहितकारक वृत्तीला छेद देण्याचा रेखाताईंचा हेतू सफल झाला. आई-बाबांचं शिक्षण, त्यांची कार्यक्षमता यांवर त्यांचे पगार अवलंबून असतात आणि त्यामुळंच आईचा पगार जास्त असू शकतो, अशा स्पष्टीकरणानंतर आपोआपच परस्परांत बोलताना मुलं घरातल्या कामाची वाटणीसुद्धा स्त्री की पुरुष यावर न ठरता कोणाला कोणती कामं करायला किती वेळ आहे यावर ठरावी असं बोलत होती. मूल्यशिक्षणासाठी विषय, आशय, स्थल, काल - अशांसारख्या मर्यादा नसतात. जीवनातल्या अणु-रेणूंत मूल्यविकासासाठी सुयोग्य संधी सुप्तावस्थेत असतात. घटना, प्रसंग किंवा अध्ययनविषय यांची शाब्दिक फोलफटं दूर केल्यावरच मूल्यांचा रसरशीत दाणा हाती लागतो. मूल्यांचं दर्शन व स्पर्श अनेक वेळा होत-होत त्याबद्दलची समजूत सखोल होत जाते व वृत्तिविकास होतो. "माझ्या विकासाच्या आड शिक्षण आलं." असं एका सुप्रसिद्ध आंग्ल लेखकानं एके ठिकाणी म्हटलं आहे. मार्गारेट मीड यांच्या आजीनंही त्यांचं 'शिक्षण व्हावं' म्हणून त्यांना शाळेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. निष्प्राण माहितीची चिलखतं अंगावर चढवून केवळ 'जिवंत राहायचं' असेल, तर त्यासाठी मिळवलेल्या पदव्यांची श्रेणी, पगाराचे आकडे आणि बँकेतल्या ठेवी अशा बाबी पुरेशा ठरतील; परंतु वृत्तिविकास हा केंद्रबिंदू मानून शिक्षण देणाऱ्या आणि घेणाऱ्या व्यक्तींना केवळ 'जिवंत' राहण्यापेक्षा 'जगणं' महत्त्वाचं वाटतं. सार्थ जगण्यासाठी वृत्तिविकास आवश्यक असतो. वृत्तिविकास रंगाचे पट्टे ओढल्यासारखा भराभरा होत नाही. आतपर्यंत रुजून वृत्तींचे रंग शरीर-मनाच्या सर्व व्यापारांवर पसरत जातात, थेंबाथेंबानं ते साकारतात. म्हणूनच वृत्तिविकासाचं सौंदर्य पाहायचं असेल, तर थेंबे थेंबे तळे साचे यावर विश्वास ठेवायला हवा.



# रंग रंग मिसळुनी, एक रंग हा जुळे

## संकुलात आज काय हे वेगळं?

भारताचा बेचाळिसावा प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी १९९१. वेळ भरदुपारी एक वाजताची. कोल्हापुरच्या बालकल्याण संकुलाच्या फाटकापाशी सायकली, रिक्षा, स्कूटर्स, मोटारी येऊन थडकल्या होत्या. झेंडावंदन तर सकाळीच होऊन गेलं. आता ही वाहनं कशासाठी आली असतील, अशा कुतुहलानं शेजार-पाजारची माणसं वाहनांकडं पाहत होती. तपकिरी रंगाची अर्धी विजार आणि किंचित गुलाबी रंगाचा शर्ट घातलेली मुलं वाहनांतून उतरत होती. प्रत्येकाच्या हातात पिशवी आणि कागदाच्या वेगवेगळ्या वस्तू होत्या. मुलांबरोबर काही प्रौढ मंडळीही होती. बहुधा त्यांचे आई-वडील असावेत. दृश्य पाहणारी मंडळी दिसणाऱ्या बाबींचा अर्थ स्वतःच लावत होती; पण तरीही त्यांच्या चेहऱ्यांवरील विस्मय ओसरत नव्हता. बालकल्याण संकुलापुढं वाहनं लागणं, त्यातून बडी मंडळी उतरणं, त्यांचं फाटकापासूनच स्वागत होत राहणं, फोटोसाठी फ्लॅश उडणं, कुणी मंडळींनी खाऊचे डबेच्या डबे आणणं हे सारं शेजारच्या लोकांना माहीत होतं; पण आज यांपैकी काहीच होत नसल्यामुळं पाहणाऱ्यांना उलगडा होत नसावा.

## तुम्ही स्वतःलाच दिलंत--

त्याच दिवशीची पावणेपाचची वेळ. बालकल्याण संकुलातली मुलं-मुली संकुलाच्या मधल्या फरसबंद अंगणात खेळत होती. एकमेकांशी बोलत होती. इकडून तिकडं हातात हात घालून फिरत होती. संकुलातल्या वरच्या मजल्यावर डॉ. लवटे सृजन-आनंद विद्यालयाचे

ताई-दादा व कार्यक्रमात सहभागी झालेले सृजन-आनंद विद्यालयातल्या मुलांचे पालक यांच्याशी बोलत होते, "आजचा प्रजासत्ताक दिन संकुलाच्या लक्षात राहील. आमच्याकडं येणारी मंडळी. स्वतःचं बॅनर घेऊन येतात, फोटोची व्यवस्था करायला सांगतात आणि दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रांत बातमी येण्याची तजवीज झाली आहे ना, असं विचारतात. थोडा वेळ येतात. कोणी वस्तू देतात, कोणी पैसे देतात. यांपैकी तुम्ही काहीच केलं नाही; पण तुम्ही संकुलातल्या मुलांना स्वतःलाच दिलंत! भरभरून दिलंत. प्रेमानं दिलंत. तुम्ही आमच्यात मिसळून गेलात."

## इष्ट संभवासाठी--

१९९० हे वर्ष शिक्षणाच्या दृष्टीनं खूप खूप मोलाचं होतं. बालिका वर्ष, महात्मा ज्योतिबा फुले स्मृतिशताब्दी वर्ष. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी वर्ष आणि सामाजिक न्याय वर्ष अशा साऱ्यांचं हे वर्ष होतं. शिक्षण म्हणजे वास्तव आणि इष्ट संभव यातलं अंतर तोडण्याचा केलेला प्रयत्न. शिक्षण म्हणजे मूल्यांचा विकास. शिक्षण म्हणजे विचार करायला शिकणं. शिक्षणाच्या कितीतरी व्याख्या ह्या एकाच वर्षातील बारा महिन्यांत झालेली वरील मांदियाळी पाहता-पाहता मनात तरळून जातात आणि त्याच वेळी शाळाशाळांतील वरील प्रकारच्या व्याख्यांसंदर्भात असणारं वास्तव एखादं धारदार पातं आरपार घुसावं तसं मनात घुसतं. महाराष्ट्रातल्या किती शाळांत बालिका वर्षाची सुसंधी घेऊन आपल्या विद्यार्थ्यांत आणि त्यांच्याकरवी त्यांच्या पालकांतही समतेचा आग्रह रुजवला? किती शाळांत जात-पात, धर्म, लिंग यांच्या विघटनवादी शक्ती दूर करण्याच्या इराद्यानं मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील बहुविध कार्यक्रमांचा केंद्रबिंदू म्हणून डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी लक्षात घेतली? आजूबाजूला कोण काय करतंय आणि कोणत्या प्रकारच्या कार्यक्रमाचा 'भाव' वधारलाय याकडं लक्ष न देता शिक्षणाचा झोत आजचं वर्तमान समजून घेता-घेता इष्ट संभवाकडं वळवण्याचा अल्पसा प्रयत्न आपल्या छोट्या-छोट्या मुलांसाठी करायचा असा आग्रह सृजन-आनंद विद्यालयानं प्रथमपासूनच धरला आहे. या आग्रहाचाच इ.



स. १९९०-९१ मधील एक आविष्कार म्हणजे बालकल्याण संकुलातील इयत्ता एक ते चारची मुलं आणि सृजन-आनंद विद्यालयाची मुलं यांनी एकत्रितरीत्या उपभोगलेला प्रजासत्ताक दिन!

## इतरांवर प्रेम करायला शिकावं लागतं--

कोल्हापुरातल्या बालकल्याण संकुलातल्या मुलांबरोबर एक संपूर्ण दिवस आपण असणं हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीनं टाकलेलं एक चिमुकलं पाऊल ठरू शकेल, असं कार्यक्रमाबद्दल शिक्षकसभेत लीलाताईंनी मांडलं होतं. मात्र सृजन-आनंद विद्यालयामधल्या मुलांचा वयोगट लक्षात घेता त्यांना संकुलातली मुलं संस्थाश्रयी का आहेत याबाबत काहीच बोलू नये असंही ठरलं. किंबहुना आपण त्यांच्यासाठी काही करायला जातोय असं न मानता आपल्यासारख्याच कुणीतरी त्या मुलांवर जो अन्याय केला आहे, त्याचं थोडं-फार परिमार्जन करण्याचा प्रयत्न या निमित्तानं करणार आहोत, अशी भावना शिक्षकसभेत पुन्हापुन्हा उच्चारली गेली. सृजन-आनंद विद्यालयात दर वर्षी सामुदायिक वाढदिवस साजरा होतो. प्रत्येक मूल आपल्या आई-वडिलांना प्यारं असतं, लाख मोलाचं असतं; पण एक दिवस असा नाही का असणार की ज्या दिवशी विद्यालयातल्या साऱ्या मुलांचा, ताई-दादांचा, मुलांच्या पालकांचा आणि शाळेचासुद्धा वाढदिवस असेल? आपण सारे आज एका वर्षानं मोठे झालो असं म्हणत शाळेच्या एकाच धाग्यानं आपण एकमेकांशी अधिक निगडित होऊ शकू का? साऱ्यांच्या आनंदाचा एकच दिवस, संकल्पाचा एकच दिवस. परस्परांना स्वतः तयार केलेल्या कागदाच्या वस्तू भेटी देण्याचा एकच दिवस. नात्यातल्या व्यक्तींवर प्रेम करणं हे नैसर्गिक समजलं जातं; पण इतर व्यक्ती, संस्था, समाज, देश यांच्यावर प्रेम करायला थोडंसं शिकावं लागतं. या दिशेनं एक प्रयत्न म्हणून सामुदायिक वाढदिवस गेली तीन वर्षं विद्यालयात होतो. या वर्षीचा सामुदायिक वाढदिवस आपण बालकल्याण संकुलातल्या मुलांसमवेत करू या. त्यांच्याबरोबर चार-पाच तास प्रेमानं राहू या. सामाजिक न्याय वर्षाच्या दृष्टीनं ते योग्य ठरेल असं मानून कार्यक्रमाची आखणी सुरू झाली.

## नॉन इन्स्ट्रक्शनल? छे!

१५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी हे दोन राष्ट्रीय महत्त्वाचे दिन बऱ्याच शिक्षणसंस्थांत 'नॉन इन्स्ट्रक्शनल डेज'-- न शिकवायचे दिवस - म्हणून समजले जातात. ध्वजवंदन, खाऊवाटप, कोणाचं तरी मुलांना न समजणारं आणि त्यांना लक्षात न घेता केलेलं भाषण असा या दिवसांचा सर्वसाधारणपणं घाट असतो. सृजन-आनंद विद्यालयानं तरी हे दिवस म्हणजे अध्यापनाची-- वृत्तिविकासाची - एक सुसंधी मानली आहे. मात्र या वर्षी मुलं आणि ताई सकाळी विद्यालयात ध्वजवंदनाला आल्या तर दुपारी बालकल्याण संकुलात त्यांना येणं अवघड ठरेल असं वाटल्यानं ''आपण आपल्या झेंड्याची आठवण करून घरातच ध्वजवंदन करू आणि दुपारी एक वाजता बालकल्याण संकुलात येऊ'' असं मुलांना सांगितलं गेलं. दुपारी एक ते सायंकाळी सहा असा पाच तासांचा कार्यक्रम आखला गेला. कार्यक्रमाचे प्रमुख भाग खालीलप्रमाणं असतील असं शिक्षकसभेत मांडलं गेलं.

१) सृजन-आनंद विद्यालय व बालकल्याण संकुल या दोन संस्थांतील मुलांनी व कार्यकर्त्यांनी एकमेकांशी जवळीक साधणं.

२) प्रजासत्ताक म्हणजे काय, हे समजून घेणं.

३) सामुदायिक वाढदिवस साजरा करणं.

४) जमल्यास दोन्ही संस्थांतील मुलांची पत्रमैत्री सुरू करून आज नाही, तर उद्या केव्हातरी त्यांचं परस्परांकडं येणं-जाणं सुरू करणं.

## बोलके अहवाल--

या भागांपैकी क्रमांक एक व चारचा भाग कितपत यशस्वी झाला हे आताच नाही सांगता येणार; पण दोन आणि तीन या भागांबद्दल थोडंसं सांगता येईल. यासंबंधी सहभागी ताई (शिक्षक), पालक व शाळेच्या परिवारातील ताई यांनी आपापल्या अहवालात काय लिहलंय ते पाहू या.

''सामाजिक न्याय वर्षा'निमित्त बालकल्याण संकुलातील मुलं व सृजन-आनंद विद्यालयातली मुलं यांचा एकत्र वाढदिवस साजरा करायचा ही कल्पनाच फार सुंदर आहे. मुळात आज-काल घरोघरी वाढदिवस धडाक्यात साजरे करायचं जे पेव फुटलं, त्यामुळं हा कार्यक्रम सर्वार्थानं वेगळा, नवीन विचार देणारा, वास्तवाचं भान देणारा ठरला यात संशय नाही. त्यात आणि पुनः अधिक खर्च करून वाढदिवस साजरा करण्यासाठी वेगवेगळ्या आई-वडिलांची जणू स्पर्धा! येणाऱ्यांनापण विनाकारण भुर्दंड! असा वेगळ्या प्रकारांनी वाढदिवस साजरा करायला प्रत्येकजण कधी बरं शिकेल?'' (निमाताई - सृजन-आनंद विद्यालयातील शिक्षक.)

''नवी मैत्री रुजवायला, फुलवायला, काही द्यायला, काही घ्यायला आणि काही जागवायलाही योजलेला हा जोड कार्यक्रम.'' (मंदाताई - सृजन-आनंद विद्यालयाच्या परिवारातील ताई)

''प्रार्थना, शैक्षणिक खेळ, सामुदायिक वाढदिवस, अल्पोपाहार अशा वरवर दिसता स्थूल वाटणाऱ्या कार्यक्रमामागं दीर्घ चिंतन व सूक्ष्म नियोजन जसं होतं, तशीच संवेदनेची गहरी डूबही होती. बालकल्याण संकुलातली मुलं, त्यांचं अनुभवविश्व, जाणिवा, परिस्थिती याचा थोडाफार बोध संपन्न व सुखी परिवारातील मुलांना करून देणं, बालकल्याण संकुलाच्या मुलांतील एकटेपणाची जाणीव दूर करणं असे या कार्यक्रमाचे प्रमुख उद्देश होते.'' (डॉ. सुनीलकुमार लवटे - मानद कार्यवाह, बालकल्याण संकुल)

## एकमेकांत मिसळणं की औपचारिक ओळख?--

काही ताईंनी आपल्या अहवालात म्हटलं आहे की, त्या आणि ह्या मुलांचा परस्पर परिचय-- नाव, गाव, आई-वडील इत्यादी - व्हायला वेळच नव्हता; पण मला तसं वाटत नाही. मुलं जेव्हा परस्परांना भेटवस्तू देत होती, एकत्र येऊन खेळ खेळत होती, हातात हात घालून इकडं-तिकडं जात-येत होती, तो परिचयच नाही का? खेळताना सारी औपचारिकता गळून पडते. उरतो तो द्यायचा-घ्यायचा आनंद!

अगदी पहिलाच खेळ 'आला आला गाडा' हा होता. चिठ्ठी उचलून गाडा कशाचा, हे ठरत होतं. चिठ्ठी उचलणारी चार मुलं मग ना सृजनची राहायची, ना संकुलाची. त्यांचा व्हायचा गट. मग ती त्या चिठ्ठीवरून काय काय सांगायची. मोराचा गाडा पहिलीतल्या मुलांचा होता. रंगीबेरंगी

पिसं आवडतात, मोर रानात राहतो, अळ्या-किडे खातो, तो पक्षी आहे, छान नाचतो. त्याची पिसं पुस्तकात ठेवतात, अशी वाक्यं आयत्या वेळी तीन-साडेतीनशे मंडळी, तीही ओळखीची व अनोळखी सभोवार असताना बोलणं सोपं नसतं महाराज! नाचूनसुद्धा दाखवलं मुलांनी मोरासारखं! आर्थिक, सांस्कृतिक आणि लिंगभेदही गळून पडले. इतर आठ-दहा खेळ खेळताना हेच दृश्य दिसलं. आणि ओळखीचं म्हणाल, तर हाती असणारा वेळ अपुरा होता हे माहीतच होतं. जेव्हा विचार झाला की, औपचारिक ओळखीपेक्षा अनौपचारिकपणं मिसळून जाण्यावर भर द्यावा. मुलांइतकी प्रौढांची जवळीक सहजतेनं होणं कठीण असतं. तरीपण या कार्यक्रमाच्या नियोजनात्मक ज्या तीन सभा झाल्या, त्या निमित्तानं ह्या दोन संस्थांतलं अंतर निश्चितच कमी झालं. आशाताई प्रथम संकुलात गेल्यावर तिथली एक छोटी मुलगी त्यांना बिलगली. त्या प्रसंगानं त्या इतक्या हेलावल्या की, परगावी असणाऱ्या आपल्या मुलांना त्यांनी फोनवरून सांगितलं, "नववर्षाची सर्वांत सुंदर भेट म्हणजे माझ्या गळ्यात विश्वासानं हात टाकणारी; पण जिचं खरं तर नाव-गावही मला माहीत नाही - अशी ती मुलगी!" सृजन-आनंदच्या काही मुलांनी संकुलातल्या मुलांची नावं लिहून आणली आहेत - पत्र पाठवण्यासाठी. त्यांच्याकडून ते घडावं म्हणून आता ताईंनीच त्यांना त्याबद्दल आठवण द्यायला हवी!

## प्रजा कोण? सत्ता कुणाची?--

प्रजासत्ताक दिन ही अवघड संकल्पना इयत्ता एक ते चारच्या तीन-सव्वातीनशे मुलांना सांगणं तसं फार कठीण; पण लीलाताईंनी भाषण केलंच नाही. त्यांनी केली प्रश्नोत्तरं. ती आपण थोडी ऐकू या का?

"प्रजा म्हणजे कोण कोण?"

"मुलं, आई-वडील, ताई-दादा इतर नातेवाईक, आणि सैनिकही."

"आपण कुणाची प्रजा?"

"भारताची."

"तुमच्यावर घरात आणि शाळेत सत्ता कुणाची चालते?"



"आई-वडिलांची, ताई-दादांची."

"पण काही वेळा तुम्हीही आई-वडिलांवर किंवा शाळेतल्या ताई-दादांवर सत्ता गाजवता का?"

"हो तर."

"स्वातंत्र्यापूर्वी आपल्यावर ब्रिटिशांची सत्ता होती; पण महात्माजींनी मोर्चे, उपोषणं, सत्याग्रह आणि चळवळी करून ती उलथवली. भारत स्वतंत्र झाला आणि मग आपण प्रजासत्ताक दिन पाळू लागलो. आपण सारेजण जर प्रजा, तर आपला राजा कोण?"

"कोणी नाही. लोकांचंच राज्य. पंतप्रधान आणि इतर मंत्री यांना आपणच निवडून देतो."

साधारणपणं अशा प्रकारचं काही बोलत-बोलत त्यांनी निदान इयत्ता तिसरी-चौथीच्या मुलांच्या व ताई-दादांच्या विचारांना एक हेलकावा दिला.

## डोळ्यांत वाच माझ्या--

सामुदायिक वाढदिवसाच्या सृजन-आनंदच्या प्रथेला १९९० च्या सामाजिक न्याय वर्षाच्या निमित्तानं किती वेगळी उंची आली. वाढदिवस होणं, कुणीतरी डोळ्यांतल्या पंचारतींनी ओवाळताना सदिच्छांच्या अक्षता टाकणं, प्रत्येकासाठी अगत्यपूर्वक काढलेल्या रांगोळींनी सजलेल्या पानावर उपहार घेणं आणि प्रत्येकाला भेट मिळणं या गोष्टींनी संकुलातली मुलं भारावून गेली होती. पुन्हा पुन्हा औक्षण करून ओवाळायला सांगत होती. आम्हा सर्वांचीही अंतःकरणं भरून आली होती. लीलाताईंनी औक्षणाबद्दल सांगितलेलं सारं काही मुलांच्या लक्षात राहिलं की नाही माहीत नाही; पण एकमेकांच्या डोळ्यांत प्रेमाऽऽनं बघत ओवाळायचं आणि ओवाळून घ्यायचं' हे वाक्य मात्र साऱ्यांच्या मुद्रांवर जणू अंकित झालं होतं. एवढ्या मोठ्या हॉलमध्ये पंधरा-वीस व्यक्ती - हो, काही पुरुषही. गुलजारबानूचे वडीलही सामील होते-- तबक धरून ओवाळतायत. मोठा अपूर्व असा प्रसंग होता तो! उपहाराचं वाटप करायला सृजन-आनंदचे स्त्री-पुरुष, पालक, ताई-दादा, संकुलातील कार्यकर्ते असे सारेच होते. सारी मुलं मज्जेत खात होती. पुनःपुन्हा मागत होती. ते सारं डोळे भरून पाहणंही आनंददायक होतं. हे सारं

आयोजल्याचं समाधान वाटत होतं.

**मूल्य आणि मापन--**

संकुलातला कार्यक्रम आटोपून एक-दोन दिवस झाल्यावर चवथीला शिकवताना लीलाताईंनी मुलांना विचारलं, "तुम्हाला तिथं काय काय आवडलं?" मोठी इमारत, खेळायचा चौक, आरती, खाऊ, आमचे खेळ, सगळ्यांचा सहवास, आमच्या पालकांनी कार्यक्रमात भाग घेणं, मिळालेली नवी माहिती, तिथल्या टाईम-टेबलात असणारा बागकामाचा तास, मिळालेल्या भेटी, वाचायसाठी ठेवलेली पुस्तकं, मासिकं. बघितलंत? आम्हाला वाटतंय, मुलांना धड काही पाहायलाही वेळ मिळाला नाही! पण झाडाची मुळं जशी पाणी शोधत जातात तशी मुलं काय काय पाहत, टिपत, साठवत असतात याचा आपल्याला पत्ताही नसतो! ताईंनीही अहवालात स्वतःला काय मिळालं याची नोंद केली आहे. "या एका वाढदिवसाला मला मिळालेल्या भेटवस्तू मी अशाच जपून नेते आहे. एक म्हणजे खेळ, खेळताना उत्तरं सापडल्यावर मुलांच्या मुद्रा उजळून टाकणारं ते बोलकं स्मित आणि दुसरी भेट म्हणजे प्रेमानं एकमेकांच्या डोळ्यांत बघत ओवाळताना संकुलाच्या मुलांच्या जळलेल्या प्रेमज्योती." असं मंदाताईंनी मोठ्या मार्मिकतेनं टिपलं आहे. कार्यक्रमाच्या सफलतेचं मोजमाप काय? फार अवघड आहे सांगणं; पण डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी अतिशय समर्पक आणि भावोत्कट शब्दांत कार्यक्रमाविषयी व्यक्त केलेली उत्स्फूर्त दाद म्हणजेसुद्धा साफल्यच की! शिवाय आपल्याला मिळालेल्या भेटवस्तूंना जपत बागडणारी मुलं म्हणजे साफल्य नव्हे का? त्या भेटवस्तूंविषयी वाटणारा अभिमान त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता." "माझ्याविषयी म्हणाल, तर जेव्हा जेव्हा मी सृजन-आनंद विद्यालयामधील कार्यक्रमांत सहभागी होतो, तेव्हा तेव्हा मी माझ्या सर्व चिंता व प्रश्न काही काळ का होईना पूर्ण विसरून जातो." असं सृजन-आनंद विद्यालयातील धनुकचे पालक श्री. रवी मुळीक यांनी लिहिलं आहे. सृजन-आनंदमधल्या इयत्ता चवथीतल्या स्वप्निलनं तर प्रौढ काय करतील असं मर्मवेधक लिखाण अहवालात केलं आहे. "एका गोष्टीचा खूप आनंद झाला की, या मुलांचा आज वाढदिवस साजरा



झाला. त्यांना आम्ही एक आनंदाचा दिवस दिला; पण एक गोष्टीची मला शंका राहिली की खेळ, ओवाळणं, खाणं, आम्ही येणं या गोष्टींचा तिथल्या मुलांना आनंद झाला असेल ना?"

मला आठवतंय की श्री. नानासाहेब गोरे यांना सामाजिक न्याय पुरस्कार मिळाल्यावर सृजन-आनंद विद्यालयाच्या काही मुलांनी त्यांना पत्रं लिहिली होती. "सामाजिक न्याय म्हणजे काय?" "इतकी वर्षं तुम्ही तुरुंगात होतात तरी अजून कसा अन्याय शिल्लक आहे?" असे काही प्रश्न मुलांच्या पत्रांत मी वाचले होते. अशा काही प्रश्नांची उत्तरं सृजन-आनंद विद्यालय व बालकल्याण संकुल, आम्ही ताई-दादा-पालक आणि ते कार्यकर्ते, ही मुलं आणि ती मुलं २६ जानेवारी १९९१ रोजी जे पाच-सहा तास एकत्र राहिलो, त्यातून मिळाली असावीत. त्या उत्तरांच्या विविध रंगांच्या मिसळणीतून जो एकात्म, सुंदर रंगीत प्रकाश तयार झाला त्यातून मुलांपर्यंत आणि प्रौढांपर्यंत सामाजिक न्यायासंबंधीचे काही विचार प्रवाहित झाले असतील का?

# शाळाशाळांत एडिसन कसे निर्माण होतील?

विज्ञान-अध्यापन कार्यशाळेत माझ्यासारख्या अवैज्ञानिक व्यक्तीनं बोलायचं म्हणजे जरा कठीणच होतं. तरीपण सारा धीर गोळा करून विज्ञानाच्या क्रमिक पुस्तकांचा अभ्यास सुरू केला. तो अभ्यास करता-करता मला खूपच शिकायला मिळालं. विज्ञानाची पुस्तकं कशी संदिग्ध भाषेत लिहिलेली आहेत, किती अपुरी आहेत, विद्यार्थ्यांच्या कृतींना चालना देण्याची त्यांची शक्ती किती मर्यादित आहे, आणि मुख्य म्हणजे ती पुस्तकं कशी केवळ नोट्सवजा आहेत हे समजत गेलं. क्रमिक पुस्तकांच्या वाचनानं जशा मला या गोष्टी समजल्या, तशाच काही अतिशय महत्त्वाच्या बाबी क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त मी जे वाचन केलं त्यातून लक्षात आल्या. एकच उदाहरण सांगितलं तरी पुरेसं होईल. 'स्पॅन' या मासिकाच्या सप्टेंबर १९९० चा अंक माझ्याकडं येऊन तसं म्हटलं तर बरेच दिवस झाले होते. विज्ञानाबद्दल बोलायचं म्हटल्यावर माझ्याकडं येणारी नियतकालिकं मी त्या दृष्टीनं धुंडाळायला लागले. आणि काय आश्चर्य! 'स्पॅन'मध्ये विज्ञानाबद्दलचा एक अप्रतिम लेख मला मिळाला. तो लेख इतका सुंदर आहे आणि त्यातून मी जे शिकले ते इतकं महत्त्वाचं आहे की, त्यात तुम्हाला सहभागी करून घेतल्याशिवाय मला बरं वाटणार नाही.

**एडिसन पुनः जन्मला--**

विज्ञानाचं अध्यापन कुणी, केव्हा, कसं आणि कुठं करावं याची उत्तरं शालेय वेळापत्रकात मिळतात; परंतु याचा अर्थ त्या चौकटीबाहेर विज्ञानाचं अध्यापन होऊ नये किंवा होऊ शकत नाही असा थोडाच आहे? अमेरिकेमध्ये विल्सन नावाचे एक औद्योगिक कलाशिक्षक इ. स. १९८३ मध्ये सेवानिवृत्त झाले. गेली सात वर्षं हे गृहस्थ 'विल्सन' नसून 'एडिसन' आहेत. तो महान संशोधक एडिसन, तो जगद्विख्यात संशोधक की, ज्यानं १०९३ संशोधनांचं श्रेय मिळवलं आहे. हा संशोधक एडिसन इ. स. १९३१ मध्येच



मृत्यू पावला. मग आता इतक्या वर्षांनंतर तो पुन्हा कसा आला? त्याचं काय आहे की, विल्सनमहाशय दूरचित्रवाणीवर एडिसन बनतात आणि एडिसननं लावलेले शोध दूरचित्रवाणीवर सादर करतात. गेली सात वर्षं त्यांच्या या कार्यक्रमांची लोकप्रियता वाढतच आहे.

**शोधकतेतील अडसर--**

विज्ञानाचा अभ्यास किंवा छोटे छोटे वैज्ञानिक संशोधन आणि विद्यार्थी किंवा सर्वसाधारण व्यक्ती यांच्यामधील महत्त्वाचा अडसर विल्सननी फार मजेदारपणं दूर केला. त्यांनी सांगितलं, "एडिसननं १०९३ शोध लावले. एडिसनचा हा विक्रम अजून कोणीही मोडलेला नाही. एडिसन हा थोर संशोधक आहे यात वादच नाही; पण किती लोकांना हे माहीत आहे की, बल्बचा शोध लावण्यापूर्वी एडिसनला ८९९९ वेळा अपयश आलं?" विल्सन जेव्हा असं सांगतात आणि एडिसनला सर्वसाधारण माणसाच्या पातळीवर आणतात, त्या वेळी श्रोतृवर्गाला एडिसनमध्ये एक सामान्य धडपडणारा माणूस दिसू लागतो. त्यांना वाटतं की, 'तो'सुद्धा इतक्या वेळा अपयशी झाला आणि मग त्याला यश मिळालं. स्वतः एडिसननंच नव्हतं का एकदा म्हटलं की, 'जिनियस' म्हणजे ९९% घाम व १ % स्फूर्ती. असं सारं सांगून विल्सन सांगतात, "चला, आता कामाला लागू या. नवे नवे शोध लावू या."

**काही मजेशीर शोध--**

विल्सनरूपी एडिसन शिक्षकांना आणि मुलांना आवाहन करतात की, तुम्हीही काहीतरी शोधून काढा. या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळतो. मुलांचे काही प्रतिसादच आपण पाहू या. चौथीतल्या एका मुलानं त्याच्या एका 'शोधा'बद्दल विल्सनना जे पत्र पाठवलं आहे, त्यात तो लिहितो, "माझ्या बहिणीची दृष्टी अधू आहे. आंधळे किंवा दृष्टी अधू असलेले लोक जिन्यावरून चढता-उतरताना पडण्याची शक्यता असते. याचं एक कारण असं की, जिना कुठं सुरू होतो व कुठं संपतो ते त्यांना समजत नाही. म्हणून मी असा शोध लावला आहे की जिना उतरताना जी शेवटची पायरी असते त्या पायरीपाशी जिन्याच्या कठड्यावर उंचवटा ठेवायचा."

विल्सन हे जे कार्यक्रम सादर करतात, त्याचं नाव आहे 'एडिसनचा संशोधन कारखाना. अशा कार्यक्रमानं प्रेरित होऊन विल्सनना शेकडो पत्रं येतात. अशा पत्रांत काही मुलं रेखाचित्रं काढतात आणि काही आपली कल्पना विल्सनना समजावून सांगतात हँगरबद्दल एक मुलगा लिहितो की, तो हँगरला दोन हुक ठेवेन. एक खूप लांब आणि दुसरा नेहमीसारखा. लांब हुक वापरून ठेंगण्या माणसालाही कपडे अडकवता येतील. दुसरा एक मुलगा लिहितो की, बुटाला आतून स्प्रिंग बसवल्या, तर जलद पळता येईल. आणखी एका मुलानं लिहिलं आहे की, बागेतलं 'लॉन' कापायचं भारी जिवावर येतं. असं गवत शोधावं की जे पाहिजे तेवढंच वाढेल व सुंदर दिसेल आणि नंतर वाढायचं थांबून जाईल.

**संशोधकतेची रेसिपि--**

लेख वाचत असताना सारखं वाटत राहिलं की, शाळाशाळांतल्या विज्ञान-अध्यापनाची दिशा थोडीशी संशोधनाकडं वळवता येईल का? शिक्षणक्षेत्रातली तज्ज्ञ मंडळी मला बहुधा 'रिप व्हॅन विंकल'-- वास्तवाच्या शंभर वर्ष मागं असणारी व्यक्ती - समजतील! ते मला सांगतील, "अहो, आता जिल्हा, राज्य व केंद्र पातळीवर विज्ञान-प्रदर्शनं भरवली जातात. शाळाशाळांतली मुलं तिथं वैज्ञानिक उपकरणं ठेवतात. जिथं प्रदर्शन भरतात, तिथं मुलं व शिक्षक उपकरणं घेऊन जातात व तिथं ही उपकरणं कशी चालतात हे स्पष्ट करतात. तुम्हाला नवं काही माहीत नाही आणि आल्या आहेत सांगायला नवीन म्हणून काही कल्पना!" पण खरंच कशावर हात ठेवून सांगू की, मला हे माहीत आहे. गळा, गीता की कुराण? पण अगदी खरं सांगते की मला हे माहीत आहे आणि ते माहीत असल्यामुळंच मी म्हणते आहे की, शिक्षणसंस्थांतल्या विज्ञानअध्यापनाची दिशा थोडीशी संशोधनाकडं वळवली, तर बरं होईल. विज्ञान प्रदर्शनात ठेवली जाणारी बहुतेक उपकरणं म्हणजे कोणत्या तरी उपकरणाच्या 'रेसिपी'चं तंतोतंत अनुकरण असतं; संशोधन नव्हे. विद्यार्थ्यांतील संशोधन-परता संवर्धित करण्यासाठी विद्यार्थ्याला प्रथम हे सांगायला हवं की, तुला स्वतःला ज्यात सुधारणा करण्याची गरज वाटते अशी एखादी बाब शोधून काढ आणि मग ती सुधारण्यासाठी शोध लाव. मात्र हे लक्षात ठेव की, गरज ही शोधाची



आई आहे, तर परिश्रम हा शोधाचा बाप आहे. शोध लावायचा म्हणजे खूप परिश्रम करायला हवेत, कामाचा कंटाळा करून चालणार नाही. शिवाय एकदम मोठं संशोधन करण्याच्या भरीस न पडता छोट्या-छोट्या शोधांवर लक्ष केंद्रित करायला हवं. त्यासाठी फार मोठं साहित्य लागतं असं नाही. पहिलं महत्त्वाचं साहित्य म्हणजे तुझ्या शोधाबाबतची तुझी स्वतःची कल्पना आणि कागद, पेन्सिल, रबर, डिंक, पुठ्ठा, छोटे खिळे, हातोडी - असलंच सटर-फटर साहित्य हवं. मुलांना हेन्री फोर्डचीही गोष्ट सांगायला पाहिजे. फोर्डसाहेबांनी आपली पहिली मोटार तयार केली ती विटांच्या पडवीत. मोटार तयार झाल्यावर तिची चाचणी घेण्यासाठी मोटार बाहेर काढायला लागल्यावर लक्षात आलं की, त्या पडवीचं दार खूप लहान आहे. मोटार बाहेर काढण्यासाठी मोठा हातोडा घेऊन दार तोडावं लागलं. ही गोष्ट ऐकल्यावर मुलांना आपल्या संशोधनाचं रेखाटन करण्यासाठी मोजपट्टी वापरावी लागते हे लक्षात येईल. आपण जे काही, करायचं मनात घेतलं आहे त्यासाठी दोन निकष लावून पाहिले पाहिजेत. पहिला निकष हा की, आपल्या शोधामुळं शक्तीची बचत होते का? दुसरा निकष म्हणजे सुरक्षिततेच्या दृष्टीनं आपल्या शोधात काही कमतरता तर राहिली नाही ना? शिवाय आणखीही एक दक्षता घ्यायला पहिजे. ती म्हणजे KISS पद्धतीचा वापर. म्हणजे ही आणखी कोणती नवीन पद्धती? आपल्याला सांगते, खुळ्या सारं सोपं करं. Keep It Simple. Stupid! आता मुलं असं कदाचित विचारतील की. हे सगळं समजलं. आता कामाला सुरुवात कधी करायची? कधी म्हणजे काय? आताच. या क्षणीच.

**पूर्वीही बालसंशोधक होतेच--**

'स्पॅन'मधला लेख वाचताना असं वाटायला नको की, विल्सन महाशयांनी एडिसनचा संशोधनाचा कारखाना दूरचित्रवाणीवरून आणल्यापासून मुलं विज्ञानात रस घेऊ लागली किंवा छोटे-छोटे शोध लावू लागली. त्यासाठी या लेखात एका पंधरा वर्षाच्या मुलाबद्दल लिहिलं आहे. इ. स. १८७३ साली पंधराव्या वर्षाच्या वाढदिवसाला त्या मुलाला बर्फावरून घसरण्यासाठी 'स्केट' मिळाले. त्या मुलाला स्केटिंग करायला खूप आवडायचं. पण व्हायचं काय की, थोडा वेळ स्केटिंग केलं की, त्याची

कानशिलं इतकी थंडगार व्हायची की घरात येऊन कानशिलं उबदार होईपर्यंत त्याला थांबावं लागे. आत-बाहेर, बाहेर-आत करण्यात खूप वेळ जाई. या पळापळीचा त्याला खूप कंटाळा आला आणि त्यातूनच त्याला एक कल्पना सुचली. त्या मुलानं स्वतःच्या कानाच्या मापापेक्षा थोडी जास्त लांब तार घेतली. त्या तारेच्या कानाभोवती घालता येतील अशा गुंडाळ्या केल्या. आजीला सांगितलं, त्या गुंडाळ्यांच्या मापाचे गरम कापडाचे तुकडे कापून त्या गुंडाळ्यांवर शीव. झाले त्या मुलाचे कानमोजे तयार. हे कानमोजे पाहिल्यावर इतर मुलं असले कानमोजे आम्हालाही तयार करून दे, असं म्हणू लागली. त्यासाठी पैसे देऊ लागली. लवकरच त्या मुलाच्या असं लक्षात आलं की, आजी पुरणार नाही; त्यासाठी यंत्रच हवं. १८ व्या वर्षी या मुलानं चेस्टर-- ग्रीनवुडनं - कानमोज्यांचा कारखाना सुरू केला.

### प्रौढांचं काम फक्त--

थोडक्यात काय, तर प्रत्येक मुलात एक वैज्ञानिक लपलेला असतो हे आपण लक्षात घ्यायला हवं. मुलाच्या वैज्ञानिकतेला पुरेशी प्रेरणा देणं, त्या प्रेरणेतून तो जे काही करू म्हणेल त्यासाठी आवश्यक ते साहित्य पुरवणं, त्याला चुकायला संधी देणं आणि त्याच जिद्द कोमेजू न देणं एवढंच खरं तर प्रौढांचं काम आहे. मुलांना सुचलेल्या कोणत्याही नवीन कल्पनेची हेटाळणी न करता ती कल्पना साकार करायला त्याला उत्तेजन दिलं तर अनेक नव्या कल्पना-- ज्यात नवे शोध लपले आहेत - मुलं सुचवतील. आज जपानमध्ये गुणवत्ता मंडळाचा जो उपक्रम चालवला जातो, त्याचा गाभा कारखान्यातल्या विविध पातळ्यांवर काम करणाऱ्या कोणत्याही लहान-मोठ्या व्यक्तीला त्या कारखान्याच्या मालाची गुणवत्ता वाढवण्यासाठी किंवा वेळ, शक्ती व पैसा यांची बचत करण्यासाठी नवनव्या कल्पना सुचू शकतात यावरचा प्रचंड विश्वास हाच आहे. शाळाशाळांतील अध्ययनाची गुणवत्ता वाढवण्याची आज चर्चा चालू असताना आपणही विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेवर विश्वास ठेवू या. त्यांना विविध विषयांत ज्या नवनव्या कल्पना सुचतात, त्यांचा स्वीकार करू या. मुलांना त्यांचे शोध लावायला उत्तेजन देऊ या.



# प्रदूषण : मनांचं

### प्रदूषण रोखण्यासाठी नुसत्या मलमपट्ट्या--

प्रदूषणाबद्दलची सजगता निर्माण करण्याचे प्रयत्न अनेक संस्था व व्यक्ती करीत असतात. त्या प्रयत्नांची नितांत आवश्यकता मान्य करायलाच हवी. पाणी, हवा व ध्वनी यांबाबतच्या प्रदूषणाची स्थिती विचारी माणसानं सतत चिंतित व्हावं अशीच आहे. साधं पाण्याचंच उदाहरण घ्या ना. स्वतःची भौतिक प्रगती करण्यासाठी माणसं नाना प्रकारचे कारखाने उभे करतात. कारखान्यांत वापरून सोडलेलं पाणी नदीत मिसळतं. नदीचं पाणी नळांतून घरात जातं. मुलं-माणसं तेच पाणी पितात. नदीतले मासे व जलचर यांच्यावर त्याचा परिणाम होतो. नदीतलं पाणी शेतातल्या पिकांना दिलं जातं. गुरंढोरं तेच पाणी पितात. समुद्रात तेच पाणी हळूहळू पोहोचतं. नदीतलं पाणी विहिरीतही उतरतं. किती प्रकारांनी केवळ कारखान्यातलं सांडपाणी प्राणी-जीवनाची हानी करू शकतं याचं चित्र आज-काल पुस्तकं, प्रदर्शनं, दूरचित्रवाणी, आकाशवाणी, व्याख्यानं यांसारख्या अनेक माध्यमांतून सर्वांपुढं उभं करण्याचे प्रयत्न होत असतात. निदर्शनं, घेराव, मोर्चे यांचाही अवलंब त्यासाठी केला जातो. लोकआंदोलन उभं करण्यासाठी कार्यकर्ते कंबरा कसतात. या साऱ्या प्रयत्नांबरोबरच आणखीही एक महत्त्वपूर्ण प्रयत्न होत असतो आणि तो अजूनही जास्त प्रमाणात व्हायला हवाय. पूर्वप्राथमिक ते पदव्युत्तर पातळीपर्यंत शिक्षणाच्या साऱ्या स्तरांवर त्या त्या वयोगटाला योग्य अशा प्रकारानं विद्यार्थ्यांची मनं प्रदूषणाबाबत जागी करणं हाच तो प्रयत्न. असे प्रयत्न केवळ शाब्दिक मलमपट्टीचे असले, तर फारसा अपेक्षित परिणाम होईलच असं नाही. मात्र पाहणं, शोधणं, समजावून घेणं, विचार करणं, तर्क करणं, तर्क पडताळून पाहणं, जे समजलं त्याप्रमाणं वागणं यांसारख्या अनेकविध कृतींतून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतले, तर त्यांची बुद्धी प्रदूषण आणि मानवी जीवन यांबाबत विचारशील तर होईलच; पण त्यांच्या

हृदयाचा कलही स्वतःकडून प्रदूषणाला पोषक असं काही घडणार नाही, याकडं जसा राहील तसा प्रदूषणविरोधी सामाजिक प्रयत्नांनाही हातभार लावण्याकडं स्वाभाविकच वळेल.

**मानसिक प्रदूषण--**

प्रदूषण म्हटलं की हवा, पाणी किंवा ध्वनी या बाबी आज अनेकांना निदान माहीत झाल्या आहेत. परंतु प्रदूषणाचा आणखी एक प्रकार आपल्याला तीव्रतेनं जाणवायला हवा आहे. लिंग, जात, धर्म, भाषा, प्रांत यांसारख्या बाबींमुळं निर्माण होणारं मानसिक प्रदूषण मला सूचित करायचं आहे. भारत देश स्वतंत्र होऊन भारताची घटना तयार झाल्याला आज सत्तेचाळीस वर्षे लोटली असली, तरी अजूनही भिन्नतेत अभिन्नत्व जोपासण्यात आपण फारसं यश मिळवलेलं नाही. किंबहुना गेल्या दोन दशकांत तर अभिन्नतेपेक्षा भिन्नतेचेच उद्रेक ठिकठिकाणी उसळत आहेत. म्हणूनच आपण पुढील काही साध्यासुध्या बाबी नित्याच्या वागण्यात आणू शकू का, याचा विचार करू.

१) पुस्तकातला किंवा बोलण्यातला आशय बरेचदा आपण दुर्लक्षित करतो किंवा मनावरून तो ओघळून जाऊ देतो. "काय मांगाच्या हृदयाचा आहेस रे!" किंवा "भटाला जेवणाशिवाय दुसरं काय सुचणार?" अशी जातिवाचक वाक्यं अजूनही बोलली जातात आणि ती निमूटपणानं ऐकूनही घेतली जातात. अशी वाक्यं बोलून किंवा लिहून जातिविषयक प्रदूषण आपण स्वतः फैलावणार तर नाहीच; पण अन्य कोणी अशी वाक्यं बोलेल किंवा लिहील तेव्हा आपला त्याबद्दलचा विरोध आपण तत्परतनं नोंदवून त्याच्या फैलावास अटकावही करण्यास कचरता कामा नये. लमाण चोरटे असतात किंवा ब्राह्मण हुशार असतात असल्या बिनबुडाच्या कल्पना आपल्या वागण्या-बोलण्यातून आपली मुलं किंवा विद्यार्थी यांच्यात झिरपणार नाहीत याबद्दल पालक आणि शिक्षक यांनी सावध असायला हवं.

२) कानडी भाषा कठोर आहे, भांगडा नृत्य म्हणजे धांगडधिंगा अशी भाषा टाळायला हवी. भारताचा समृद्ध वारसा विविध राज्यांच्या भाषा, चाली-रीती, प्रथा-परंपरा, कला, साहित्य आपल्यापर्यंत कशा पोहोचवतात, या नानाविध आविष्कारांत वेगवेगळ्या प्रकारचं सौंदर्य कसं आहे, निदान जवळच्या राज्यांच्या भाषा आपण का शिकायला हव्यात हे सारं समजून



देणारं वातावरण आपल्या घरांतून आणि शाळांमधून असलं, तर मुलं मोठी होत असतानाच भारताच्या काही भाषांतील गाणी शिकतील, काही प्रांतांचे खाद्यपदार्थ करून चाखतील, कोणा परभाषिकाशी पत्रमैत्री जमवतील, काही राज्यांची अधिक तपशीलवार माहिती करून घेण्यासाठी पुस्तकं वाचतील, व्याख्यानं ऐकतील. लहान-मोठ्या रक्तवाहिन्यांतून आपल्या शरीरात जसं रक्त इकडून तिकडं पोहोचत असतं, तसं लहान-मोठ्या वेगवेगळ्या माध्यमांतून 'भारताचं भारतीयत्व' प्रत्येकाच्या हृदयापर्यंत पोचायला हवं. पालक व शिक्षकांचे हात या कामासाठी एकत्र आले, तर खूप काही सहजतेनं साकारेल.

३) मुलांचा दृष्टिकोन humane होण्यासाठी आपली घरं आणि शाळांमध्ये मुलांचा नाना प्रकारच्या व्यक्तींशी आणि संस्थांशी संवाद व सहवास घडायला हवा.

४) शहरीपण, सुखवस्तूपण यांसारख्या भावनांचा एवढा पराकोट आपण आपल्याभोवती उभा करतो की, त्या पलीकडचं इतर तुच्छ, कमी प्रतीचं मानण्याकडं आपला कल होतो. बालकल्याण संकुलातल्या मुलांना अनाथ म्हणताना त्यांच्या अनाथपणाला पर्यायानं आपण जबाबदार आहोत याचा आपल्याला सोयिस्कर विसर पडतो. खेड्यातल्या माणसांची 'गावंढळ' म्हणून संभावना करण्याला जीभ सरावलेली असते. असले परकोट ढासळवून टाकण्यासाठी आपल्याला स्वतःशीच मुकाबला करावा लागेल. "तुझ्या बापानं कधी धरलं होतं का पुस्तक हातात?" असं मुलाला म्हणून आपण त्या कुटुंबाची निरक्षरतेची नाळ घट्ट करण्याचेच प्रयत्न करत आहोत, याचा दाहक आत्मशोध आपण घ्यायला हवा. शहर किंवा खेडेगाव, श्रीमंती किंवा दारिद्र्य या बाबी जशा शहाणं होण्याच्या मूलाधार नव्हेत, तसंच मुलाचा जन्म कुमारी मातेच्या पोटी झाला की सौभाग्यवतीच्या, हा मुलाच्या शिकण्याच्या मार्गातला अडथळा ठरता कामा नये. घरातल्या माणसांचं किंवा शाळांतल्या मुलांचं वेगळेपण आणि प्रत्येकाजवळ काही ना काही अतिशय मूल्यवान असं जे आहे त्याकडं आदरानं पाहता येणं महत्त्वाचं आहे. स्वतःपेक्षा वेगळं म्हणजे वाईट, शहाणपणाचं किंवा बुद्धीचं माप एकच असतं, सौंदर्य एकाच साच्याचं असतं या प्रकारच्या संकल्पनांनी मनांचं प्रदूषण होऊ नये यासाठी आपण येणाऱ्या प्रत्येक संधीचा जास्तीत जास्त

उपयोग करायला हवा.

६) स्त्री आणि पुरुष ह्या लिंगभेदाची कीड समाजाला लागल्यानं मनांच्या निकोप विकासात हरघडी अडसर येत असतात. पुरुषांची कामं आणि स्त्रियांचे स्वभाव अशा रोगणाची लिंपणं मनांवर रुतली की, लिंगनिरपेक्ष विचारांच्या खुल्या हवेचं वारं आत शिरायला अटकाव होतो. याबाबतही आपले विचार, उच्चार आणि आचार अशा तिन्ही दिशांनी आपण स्वतःला आणि इतरांना जपायला हवं.

७) मनांचं प्रदूषण करणारी किंवा वाढवणारी कोणतीही घटना, नियतकालिकांतल्या बातम्या, गोष्टी इत्यादी किंवा प्रसारमाध्यमांचे कार्यक्रम, सार्वजनिक व्याख्यानं अथवा प्रदर्शनांसारखे उपक्रम घडल्यास त्याबद्दल घरांत आणि शाळांत शक्य तेव्हा चर्चा व्हायला हव्यात. एवढंच नव्हे, तर आपल्याला न पटलेला विचार संबंधित व्यक्तींपर्यंतच नव्हे, तर काही वेळा इतरांपर्यंतही पोचवण्यासाठी आपण व आपल्या मुलांनी पत्रांसारख्या कमी खर्चिक व सहज उपलब्ध; पण महत्त्वाच्या साधनांचा विनाविलंब अवलंब करायला हवा.

**उपाय काय?--**

मनांचं हे नाना प्रकारांनी होणारं प्रदूषण जाणणारी बुद्धी, ते प्रदूषण ओळखणारं मन, ते प्रदूषण ढकलणारे हात-पाय आपल्याला आज निकडीनं हवे आहेत. मात्र त्यासाठी कसलीही 'आयात' करण्याचं कारण नाही. गरज आहे ती प्रदूषित विचार, उच्चार आणि आचार निर्गमित करण्याची. यासाठी आपण महाकवी रवींद्रनाथांची पुढील प्रार्थना स्मरू या,

*अंतर मम विकसित करो*
*अंतरतर हे*
*निर्मल करो, उज्ज्वल करो*
*सुंदर करो हे!*
*मुक्त करो हे सबार संगे*
*मुक्त करो हे बंध*
*संचार करो सकल कर्मे*
*शांत तोमार छंद. . .*



# खुरटवणारं प्रेम

आई-वडिलांचं आपल्या अपत्यांवर प्रेम नसतं असं कोण म्हणेल? पण काही वेळा हेच प्रेम मुलांना खुरटवून टाकायला कारणीभूत होतं. म्हणूनच अधिक डोळसपणानं पालकांनी आपल्या अपत्यप्रेमाचा विचार करायला हवा.

''बघ ना त्याची ती हनुवटी! पुरुषीपणाचा सारा तोरा त्या हनुवटीत जणू भरलाय.''

''किती नाजूक आणि सुंदर आहे ग तुझी छोकरी!''

''दोन दिवसांचा तर आहे, पण डोळे बघ कसे भेदक! अगदी वडिलांसारखा साऱ्यांना आपल्या तालावर नाचवणार हा!''

कुठली हनुवटी, कसले डोळे अन् कुठला नाजुकपणा. बाळंतिणींच्या खोल्यांत ऐकू येणारे हे संवाद प्रत्यक्षाचे निदर्शक नसतात, तर नवजात अर्भकाकडं त्याच्या लिंगानुसार पाहण्याच्या आपल्या दृष्टिकोनाचे प्रतीक असतात. गंमत म्हणजे ज्यांना ते मूल मुलगा आहे की मुलगी आहे, हे माहीत नसतं, ते कित्येकदा वरील वाक्यांची आलटा-पालटही करतात. नाजूक वाटणारी छोकरी चांगली आठ पौंड असते, तर दणकट वाटणारा छोकरा फक्त सात पौंडांचा असतो हे बोलणाऱ्याला माहीत नसतं! जन्मल्यापासूनच मुलाला व्यक्ती म्हणून वाढू द्यायचं की मुलगा/मुलगीपणाच्या साच्यात त्याला अडकवून त्याची वाढ खुरटवून टाकायची, हा विचार केवळ पालकांनीच नव्हे, तर साऱ्यांनीच करायला हवा.

काही संशोधनांत हाती आलेले निष्कर्ष लक्षात घेण्यासारखे आहेत. त्यांपैकी महत्त्वाचे निष्कर्ष असे -

१) माता आपल्या मुलीशी सौम्य स्वरात बोलतात. मुलाशी बोलताना मात्र त्याला अनेक प्रश्न विचारतात, स्वतःची स्पष्टीकरणं देतात

आणि संख्यांचा वापर जास्त करतात.

२) काही करून पाहताना, सोडवून दाखवताना मुलीच्या जवळ बसून तिला ते सोडवायला पालक मदत करतात. "तू बघ ना करून." असं मुलाला सांगण्याकडं पालकांचा कल असतो.

३) मुलानं परिस्थितीवर पकड घ्यावी, स्वावलंबी असावं, यशस्वी व्हावं, अशा रीतीनं पालकांचं वागण-बोलणं असतं. मुलीनं मदत मागितली तर मात्र ते नैसर्गिक मानलं जातं.

४) जवळ घेणं, कुरवाळणं हे मुलींच्या बाबतीत अधिक घडतं. दुखापत झालेल्या किंवा अपयशानं निराश झालेल्या मुलाला "रडतोस काय बाईसारखा? पूस ते डोळे." असं सांगितलं जातं.

५) रागाव्यतिरिक्त स्वतःच्या अन्य भावना मुलाला दाखवणं योग्य नव्हे असंच जणू त्याला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या शिकवलं जातं.

६) यांत्रिकी किंवा वैज्ञानिकी खेळणी, ज्यांच्यावर चढायचं किंवा ज्यांच्यावर बसून ती चालवायची - मोटारी, ट्रक्स, इंजिनं, सायकली, स्कूटर्स, गिर्यारोहणाची छोटी साधनं - अशी खेळणी बहुधा मुलाला दिली जातात. छोटी घरं आणि त्यातल्या वस्तू, बाहुल्या, प्राण्यांच्या प्रतिकृती अशासारखी खेळणी मुलाला देऊन आपण जणू तिला 'तू यांच्यावर प्रेम करायचं, यांची काळजी घ्यायची.' असं सांगतो.

७) मुलं आणि मुली यांच्याशी पूर्वप्राथमिक शाळांतील शिक्षकांचं असणारं वर्तन बरेचदा लिंगनिहाय असतं. मुलांच्या आक्रमकपणाचं कौतुक होतं. मुलींनी मात्र इतरांवर अवलंबून असावं, मदत मागावी असं सुचवलं जातं.

८) शाळांत मुलांच्या आणि मुलींच्या बसण्याचा रांगा अलग अलग असतात. मुले आणि मुली वेगवेगळ्या असतात असंच जणू त्या रांगा दर्शवतात.

९) मुलींच्या यशाचं श्रेय त्यांच्या अधिक अभ्यास करण्याला व मुलांचं त्यांच्या हुशारीला दिलं जातं.

१०) क्रमिक पुस्तकांतल्या चित्रांत आणि आशयात घराबाहेरच्या जगात वेगवेगळी कामं करणारे पुरुष दिसतात. घरातली कामं, मुलंबाळं, बाग-बगीचा यांत गुंतून गेलेल्या बायका त्या पुस्तकांतून सतत भेटतात.



वरील प्रकारच्या शाब्दिक अथवा अशाब्दिक 'शिक्षणाचा' प्रभाव मुलांवर फार पडतो. मुलां-मुलींनी आपापल्या क्षमतांचा विकास करावा असं वाटत असेल, तर मुलगा आणि मुलगी यांच्याबद्दलची आपली गृहीतकं कोणती आहेत व स्वतःची जीवनरीत कोणती आहे हे आपण तपासून पाहायला हवं. पुरुषांनी पैसे मिळवावे व इतरांना स्वतःच्या वर्चस्वाखाली ठेवावं; बाईनं घर, संसार सांभाळावा किंवा घराची आर्थिक ओढाताण कमी करण्यासाठी फार तर नोकरी करावी; पण जीवनध्येय (Career) म्हणून काही करू नये असं तुम्हाला वाटत असेल, तर स्वाभाविकपणंच मुलीला छोटा प्रेशर कुकर आणि मुलाला स्केटर्स आणून द्याल. घरच्या कर्त्या पुरुषाचा बडेजाव पाहून छोटा मुलगा अरेरावी करायला लागतो यात नवल ते काय? पण बाबा अधूनमधून स्वयंपाक करतात, फरशी पुसतात, बाळाला आंघोळ घालतात आणि स्वतःला आवडत नसली तरी घरातल्या इतर कुणाला तरी आवडते म्हणून केलेली भाजी बिनतक्रार खातात असं पाहणारा मुलगा लिंगनिहाय वर्तन-नमुन्यांनी बंदिस्त होत नाही. स्कूटर किंवा मोटार आई-बाबा दोघंही चालवतात, दोघांकडंही 'कामासाठी' माणसं येतात आणि दोघांनाही 'कामा'साठी बाहेर जावं लागतं हे पाहणारे मुलं आणि मुली स्त्री-पुरुषांच्या कामांबद्दलचा खुल्या मनानं विचार करू शकतील. याबद्दलचं एक फार मार्मिक वाक्य आपण लक्षात ठेवण्यासारखं आहे. ते वाक्य असं - Gender is a fact. Sex roles are invented and must be learned. स्वतःचं लिंग आनंदानं स्वीकारूनही या लिंगामुळं स्वतःचं वर्तन अगर आशा-आकांक्षा यांना बांध न घालायला आपल्याला मुलांना उद्युक्त करायचं असेल, तर मुले आणि मुली या दोघांनाही वाढवताना पुढील बाबींचे अनुभव व सराव त्यांना मिळेल असे जाणीवपूर्वक प्रयत्न हवेत.

१) स्वतःचा कस लागेल असं काम करणं.

२) स्पर्धा करणं.

३) गणित व विज्ञानाची आवड असणं.

४) स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवणं.

५) स्वतःचं भविष्य आपण घडवू शकतो यावर श्रद्धा ठेवणं.

६) नेतृत्व करणं.

६) वाचनक्षमतेचा विकास करणं.

८) कला, नृत्य आणि संगीत यांची आवड असणं.

९) इतरांवर प्रेम करणं.

१०) मुलांना खेळवणं.

११) स्वयंपाक, सफाई आणि दुरुस्ती करणं.

१२) मदत करणं.

१३) आपल्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची बूज राखणं.

व्यक्तीला जे लिंग मिळतं, ते निसर्गतः असतं. लिंगानुसार वर्तनप्रकार मात्र आपण निर्माण करतो आणि म्हणूनच आपण त्या वर्तनप्रकारांना छेद द्यायला हवा. अपत्याचं वर्तन खुरटवून टाकणारं आपलं लिंगदूषित प्रेम स्वच्छ करायला हवं.



# हुशार मुलं

## फार हुशार आहे हा!--

कोणताही आखलेला बेत अर्धवट फिसकटला कि अगदी वैतागायला होतं. हल्लीच्या भाषेत बोलायचं झालं, तर 'मूड ऑफ' होतो. १२ जुलै १९९२ या दिवशी आमचंही असंच झालं होतं. सुट्टी पाहून चांगला घाट घातला होता पालक-शिबिराचा. ११ जुलैचा शिबिराचा दिवस छान पार पडला. दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच दंगल, जाळपोळ सुरू झाली. शिबिराचे स्थानिक संयोजक परांजपे कुटुंबीय व शिबिर घेण्यासाठी गेलेलो आम्ही उद्विग्न अवस्थेत बसलो होतो. सकाळी अकरापर्यंत परिस्थिती निवळेल असं वाटलं होतं; पण तसं घडलं नाही. कुणी शिबिरार्थी शिबिरस्थळी आले, तर आपल्यापैकी कुणी तिथं हवं या टोचणीमुळं श्री. उदय परांजपे 'मी पाहून येतो' म्हणून बाहेर पडले. बाहेरच्या पडलेल्या उदयदादांच्या सुरक्षिततेच्या काळजीनं आमची उद्विग्नता अधिकच वाढली. इतक्यात एक गोरागोमटा, गुबगुबीत बारा-तेरा वर्षांचा मुलगा आत आला. "काकू, उंदरांचा पिंजरा आहे का? जाम माजलेत आमच्याकडचे उंदीर!" असं म्हणत तो उमाताईकडं प्रश्नार्थक नजरेनं पाहत राहिला. उमाताई त्याला म्हणाल्या, "पिंजरा आहे रे; पण अगदी कंटाळा आला आहे बघ. बस थोडा वेळ. मग देते." तो मुलगा आमच्या घोळक्यातच बसला. मुलाची आमच्याशी ओळख करून देत उमाताई आम्हाला म्हणाल्या, "फार हुशार आहे हं!" हे वाक्य ऐकताच मरगळलेल्या माझ्या मनाला पाण्याचा शिपकारा मारल्यासारखं झालं. मी त्याला म्हटलं, "हुशार मुलं कशी असतात, हे सांगू शकशील का?"

## अशी असतात हुशार मुलं--

क्रमिक पुस्तकाच्या आशयात ज्याचं उत्तर नाही व परीक्षेत जो प्रश्न विचारत नाहीत असा तो माझा प्रश्न ऐकून तो मुलगा जरा चमकला. तरीपण थांबत, थबकत, विचार करत त्यानं मला बरंच काही सांगितलं.

त्याची उत्तरं त्याच्याच शब्दांत पाहू या. तो मुलगा म्हणाला,

१) हा, त्यांना चष्मा असतो. (उत्तर देणाऱ्याला चष्मा होता.) २) अशा मुलाच्या चेहऱ्यावर तेज असतं. ३) शारीरिक खेळांत अशी मुलं पुढं नसतात. ४) बोलण्यात चतुर असतात. ५) डोकं फारसं ठिकाणावर नसतं. ६) थापा मारू शकतात. ७) परीक्षेत भरपूर मार्क मिळवतात.

शिबिरासाठी मुंडले कुटुंबीय मुंबईहून आले होते. त्यांची सई नावाची मुलगी पिंजरा मागायला आलेल्या मुलाच्या वयाचीच होती. तिनं मध्येच घुसून आणखी काही सांगितलं. ती म्हणाली,

८) हुशार मुलं हजरजबाबी असतात.

९) ती पोपटपंची करत नाही.

आमच्यातल्या प्रौढांनाही या विषयामुळं एखादं नवं खेळणं हातात मिळाल्यासारखं वाटलं. प्रौढपणाचा झगा झटकून तेही संभाषणात सामील झाले. त्यांनी सांगितलं,

१०) हुशार मुलांचं सामान्यज्ञान (म्हणजे काय कुणास ठाऊक) चांगलं असतं.

११) त्यांना वाचनाची आवड असते.

१२) सांगितलेलं चटकन समजतं. (म्हणजे हुशार मुलं आपलं ऐकत नाहीत ही गोष्ट वेगळी हो! समजणं आणि ऐकणं - म्हणजे त्याप्रमाणं वागणं - ह्या शिक्षणाच्या भाषेत दोन भिन्न भिन्न क्षमता नाहीत का?)

१३) त्यांच्या लक्षात राहतं.

आमचं हे संभाषण आणखी किती वेळ घरंगळत राहिलं असतं कुणास ठाऊक! उदयदादांनी बातमी आणली की, 'आज शिबिर होणं शक्य नाही.' आमचे विचार मग दुसऱ्याच दिशेनं धावले. हुशार मुलगा व पिंजरा हे दोन्ही विषय विसरून आम्ही मग परत घरी कसं जायचं याचा विचार करू लागलो. परंतु परतीच्या प्रवासातही हुशार मुलांसंबंधींचा किडा डोक्यात वळवळतच राहिला.

पुढं एक-दोन दिवसांनी सृजन-आनंद विद्यालयाची आता दुसऱ्या शाळेत गेलेली काही मुलं घरी आली होती. त्यांना पाहताच डोक्यातला किडा वर सरसरला. अनुपमा, शमीन, मयूरा अशा तिघी मुलींना मी विचारलं, "काय ग! हुशार मुलं कशी असतात हे सांगता येईल तुम्हाला?"



त्यांनीही काही उत्तरं दिली. ती अशी,

१४) प्रत्येक विषयात अशा मुलांना समजतं.

१५) घमेंडखोर असतात. इतरांत मिसळत नाहीत.

१६) एका जागी ठरत नाहीत.

१७) नुसती पुस्तकातले किडे असतात.

१८) फार मूडी असतात.

१९) आपलाच हट्ट धरून बसतात.

२०) स्वतंत्र वृत्तीची असतात.

२१) इतरांशी वाद घालतात.

२२) कल्पक असतात.

हुशार मुलांसंबंधी लहानांच्या व प्रौढांच्या विचारांचे कवडसे वरील बावीस उत्तरांत चमकताना दिसतात. हल्लीच्या भाषेत बोलायचं झालं, तर जो बुद्धिमापन चाचणीत ठराविक बुद्ध्यांकाच्यावर गुण मिळवतो, तो हुशार! हुशाराहूनही हुशार म्हणजे जीनियस. परंतु आपण इथं जीनियसबद्दल बोलत नाही. सर्वसाधारण बुद्धिमत्तेपेक्षा जो वरच्या दर्जाचा आहे, अशा हुशार मुलांच्याबद्दल आपण बोलतोय.

## हुशारीचे निकष कोणते? - -

कोणत्या निकषांवर हुशारी मोजली जाते यावरूनही कोण हुशार हे ठरणार नाही का? शिक्षणतज्ज्ञ अनुताई वाघ म्हणत असत की, सरसर झाडावर चढणं, खूप अंतर न थकता भराभर चालणं, अंगण लख्ख झाडून काढणं, न घाबरता अंधारात जाणं, कोणती फळं कोणत्या दिवसांत मिळतात हे सांगणं, पक्षी ओळखणं, पाखरं पकडणं अशा कितीतरी बाबतीत आदिवासी मुलं फार हुशार असतात. या निकषांवर आमची शमीन, अनुपमा किंवा तो पिंजरा मागायला आलेला मुलगा हुशार ठरतील का? एवढंच कशाला, अगदी सत्त्याण्णव टक्के मार्क मिळवणारी दहावी आणि बारावी परीक्षेतली मुलं आदिवासी मुलांच्या त्या हुशारीची बरोबरी करू शकतील? जरा धक्का लागला की रडणारी पण परीक्षेत मार्क मिळवणारी ही मुलं हुशार म्हणायची की, जीवनसंघर्षाला चतुराईनं, आनंदानं आणि साहसानं तोंड देत राहणारी आदिवासी मुलं हुशार म्हणायची? या प्रश्नाचं उत्तर देण्याइतकी हुशारी माझ्यात कुठं आहे? मात्र तुम्हाला विनंती

अशी करावी वाटते की, हुशारीचे परंपरागत निकष, बुद्धिजीवी वर्गाचे निकष, दलित वर्गाचे निकष, विज्ञानाच्या प्रस्फोटाच्या काळात टिकू शकणारे हुशारीचे निकष यांचा आपला पुनर्विचार करायला हवा. सब घोडे बारा टक्के हे तत्त्व वर्गीकरण करण्यासाठी सोपं असलं, तरी अन्यायकारक नक्कीच आहे. कविश्रेष्ठ श्री. बा. भ. बोरकर आपल्या 'रूपकळा' या कवितेत म्हणतात,

*प्रति एक झाडा माडा त्याची त्याची रूपकळा*
*प्रति एक पानां फुलां त्याचा त्याचा तोंडवळा*
*असो पाखरू, मासोळी, जीव जिवार मुंगळी*
*प्रत्येकाची ठेवटीत काही आगळीवेगळी.*
*असो ढग, असो नग त्याच अद्‌भुत रेखणी*
*जी जी उगवे चांदणी तिच्या परीने देखणी*
*उठे, फुटे जी ती लाट तिचा अपूर्वच थाट*
*फुटे मिटे जी जी वाट तिचा अद्वितीय घाट*

## हुशारीची रूपकळा एकच? - -

वनस्पती, पशुपक्षी, ढग, लाटा, वाटा किंवा चांदण्या यांच्या सौंदर्याचे निकष सब घोडे बारा टक्के मानतो का आपण? अगदी सुगंधी फुलांचा विचार केला तरी निशिगंध, सोनचाफा, बकुळी यांच्यात श्रेष्ठ-कनिष्ठता कशी ठरवायची? कुणाला गुण जास्त द्यायचे? बकुळीची फुलं वळेसरात छान ओवता येतात, चाफ्याच्या फुलांची छान वेणी गुंफता येते आणि निशिगंधाची फुलं फुलदाणीत दिमाखदार उभी राहतात. मग या फुलांतलं श्रेष्ठ कोण? वेगवेगळ्या निकषांनुसार वरील तिन्ही फुलं श्रेष्ठच नाही का?

माणसाच्या बुद्धीच्या बाबतीत मात्र 'प्रति एक झाडा माडा त्याची रूपकळा' हे तत्त्व आपण विसरलो आहोत. वस्तुतः ज्यावरून हुशारी मोजली जाते, त्या बुद्धीचे एकशेवीस पैलू आहेत. आपण त्या एकशेवीस पैलूंपैकी दोन-चार पैलूच पकडून बुद्धीचं म्हणजेच पर्यायानं हुशारीचं मोजमाप करतो. एका विशिष्ट वर्गानं बुद्धिवैभवावर कब्जा मिळवण्याच्या प्रयत्नांतून 'एकलव्याची' परंपरा निर्माण केली. आजही वेगळ्या मार्गानं आपण तेच करत आहोत. हे थांबवायला हवं. हुशार (सावध) होऊन आपण हुशार (बुद्धिमान) मुलं कशी असतात याचा शोध घ्यायला हवा.



# शुभंकरोति

एका सुशिक्षित, सुखवस्तू घरात पाहिलेला प्रसंग कसा मनावर कोरल्यासारखा झाला आहे. नेहमीचे व्यवहार चालू असता मध्येच केव्हातरी अजूनही तो प्रसंग माझ्या मनापुढं जणू प्रत्यक्ष घडत असल्याप्रमाणं साकारतो. तिन्हीसांजेच्या वेळी एका गोऱ्यागोमट्या बोबडकांद्याला एक आजी श्लोक शिकवत होत्या, "हं. म्हण. मी म्हणते तसं म्हण -" असं सांगत श्लोकाच्या या चरणावरून त्या चरणाकडं त्याला वळवत होत्या. त्यांची 'शिकवणी' चालू असता अनाहूतपणानं मी टपकले होते. बोबडोबा माझ्याकडं पाहत पाहत आजी सांगेल ते म्हणत होता. श्लोकाच्या शेवटच्या चरणाशी आजी आल्यानं त्यांनाही सुटल्यासारखं वाटत असावं. त्या म्हणाल्या, "हं म्हण लवकर,

*घरातली लक्ष्मी घरात राहो*
*बाहेरची लक्ष्मी घरात येवो*
*घरातली इडापिडा बाहेर जावो*
*घरच्या धन्याला उदंड आयुष्य लाभो."*

'इडापिडा'पर्यंत बोबडोबांची गाडी येऊन थांबली ती हलेना. त्यानं विचारलं, "इडापिडा म्हंजे काय?" आजीनं पुन्हः शिकवणीचं अवसान गोळा करत म्हटलं, "इडापिडा म्हणजे त्रास, कटकट, आजारपण." त्या छोट्या मुलानं पुन्हः प्रश्न केला, "इडापिडा बाहेर कुठं जाणार?" आता आजी थोड्याशा वैतागल्या. त्या म्हणाल्या, "अरे, बाहेर म्हणजे घराबाहेर. रस्त्यावर." छोटा आणखीनंच विचारात पडल्यासारखा दिसला. तो म्हणाला, "रस्त्यावर नको. रस्त्यावर बबी आहे. ती आजारी पडली म्हंजे?" छोटाबांची अडलेली गाडी सुरू करणं अवघड आहे हे ओळखून आजीनं आवरतं घेत म्हटलं, "बरं, आता पुरे. नमस्कार कर देवाला, आईला."

मुलगा निघून गेल्यावर आजी माझ्याकडं वळल्या. आवाज मोठा करत त्यांनी सुनेला तिची मैत्रीण आल्याचं सांगितलं आणि म्हणाल्या, "आजकालची ही मुलं फार बडबडतात. श्लोक म्हण म्हटलं, तर नाना प्रश्न. आता असले प्रश्न आणि श्लोक म्हणणं यांचा काही संबंध आहे का?" आजींच्या प्रश्नाला थोडी बगल देत मी विचारलं, "ही बबी कोण?" "अहो, ती आमच्या वॉचमनची मुलगी. रस्त्यालगतच्या झोपडीत राहते. हजारदा सांगितलं, तिच्याकडं जात जाऊ नकोस. दांडगोबा ऐकेल तर ना!" आजी म्हणाल्या. आजींचं बोलणं ऐकल्यावर बराच गुंता उलगडल्यासारखं मला वाटलं. आमचं एवढं बोलणं होई तो छोटोबांची आई बाहेर आली आणि मग तो विषय तेवढ्यावरच राहिला.

हाच तो प्रसंग जो मधून-मधून मनातून उसळी घेऊन वर येतो. मुलांवर संस्कार करण्याचा विषय कुठंही आणि कुणीही काढला की, हा प्रसंग मनाच्या तळातनं वर येतो आणि जणू मला कुणी म्हणतं, "सांग ना, सांग. छोटाबांच्या प्रश्नाचं उत्तर सांग." प्रश्नाचं नेटकं उत्तर मला सापडलं आहे असं नाही; परंतु या निमित्तानं माझ्या मनात ज्या विचारांनी ठाण मांडलं आहे ते तुम्हाला सांगते. आपण स्वतःलाच असा प्रश्न करू या की, आजी छोट्याला हा श्लोक का शिकवत असतील? वेळ जात नाही म्हणून? छोट्या खेळवण्याचा एक प्रकार म्हणून? छे, चुकलात. साफ चुकलात. छोट्याच्या मनावर चांगले संस्कार व्हावेत, त्याला चांगलं वळण लागावं म्हणून. आजींच्या लहानपणी आजींनी हा श्लोक कदाचित कंदिलाच्या प्रकाशात बसून, अंगणातल्या तुळशीजवळ त्यांच्या आईनं केलेली सांजवात बघत-बघत म्हटला असेल. दिव्यात तेल-वात घालण्याचं नित्याचं काम लहान मुलगी या नात्यानं आजच्या आजींनी कदाचित केलंही असेल. त्यांच्या घराच्या गोठ्यात एखादी गाय, म्हैस हंबरतानाचा आवाज आणि आई मेढीला दोरी लावून ताकाची चरवी घुसळतानाचा आवाज त्यांनी ऐकलाही असेल. रात्रभर देवापुढं तेवणाऱ्या दिव्याच्या वातीनं रात्री झोपेतून जाग आल्यावर त्यांची सोबत केली असेल. लहानपणी आजींनी पाहिलेल्या वास्तवाचं हे चित्र कसं शांत, स्तब्ध, उबदार, संरक्षित होतं. आज छोट्याला दिसणारं वास्तव असं आहे का?



छोट्या टी. व्ही. वर बघतो इराक-इराणचं युद्ध. सिनेमा लागला तरी त्यातसुद्धा बंदुका, रामपुरी चाकू, सुरे असतात. ढिश्यांव करायचं आणि नको असलेली ठार मारायचं. शत्रुबुद्धीचा विनाश करण्यासाठी दिव्याच्या ज्योतीला कशाचा नमस्कार करायचा? छोट्याच्या घरात देव आहेत. नाहीत असं नाही. पण आहेत आपले एका कोपऱ्यात ठेवलेले! छोट्याची आजी त्या देवांची पूजा करते. पण ती गावाला गेली की कोऽऽणी करत नाही देवाची पूजा! दोन-चार सुकलेल्या फुला-पानांच्या पुड्याची गुंडाळी सोडत आजी काही वेळा पुटपुटत असते, "बाबा, ते होते तेव्हा परडीभर फुलं मिळायची तुला. प्रसाद, पंचामृत सारं कसं साग्रसंगीत व्हायचं. आता ह्या सुकलेल्या फुलांना ना वास ना रूप. गोड मानून घे बाबा." काही वेळा छोट्या तिथं असला की विचारायचा, "आजी, कुणाशी बोलतेस? काय सांगतेस?" आजी बरेचदा उत्तर द्यायची नाही. श्लोकातला दिवा माध्यान्हरात तेवत राहतो; पण आता महागाई कसली झालीय! दह्या-दुधाचा डेरा डोळ्यांनी तरी कधी बघितलाय का आजच्या पोरांनी? अकरा रुपये पन्नास पैशाला एक लिटर दूध पिशवीतनं आणायचे हे दिवस! कुठला आलाय गाई-म्हशींचा गोठा आणि दह्या-दुधाचा डेरा!

छोटा आणखी थोडा मोठा झाला की, आणखीही एक प्रश्न त्याला सतावणार आहे. घरातली इडापिडा बाहेर घालवायची आणि बाहेरची लक्ष्मी मात्र आपल्या घरात ओढायची इच्छा धरायची. असं कसं? घर आणि बाहेर म्हणजे नक्की काय बरं? बाहेरही घरं असतात ना? आपण बबीच्या घराला बाहेर म्हटलं, तर बबी आपल्या घराला बाहेर म्हणणार नाही का? मग बबीच्या घरातली इडापिडा आपल्या घरात येणार! बाप रे! काय म्हणाली होती आजी? इडापिडा म्हणजे त्रास, कटकट! बबीचे बाबा तिच्या आईला मारतात. आपले बाबासुद्धा आपल्या आईला मारतील का? बबीच्या घरात जेवताना फक्त भाकरी आणि कांदा असतो. बबीच्या घरातली इडापिडा आपल्या घरात आली, तर मी कसा जेवू तूप-साखरेशिवाय? श्लोकाच्या शेवटच्या ओळीवरसुद्धा आज ना उद्या छोट्या अडखळणार. म्हणे 'घरच्या धन्याला उदंड आयुष्य लाभो.' घरचा धनी म्हणजे कोण बरं? आजी सांगते बाबा म्हणजे घरचे धनी, मालक.

ते तेवढे मालक आणि आम्ही सगळे काय नोकर आहोत? बाबांनी तेवढं उदंड म्हणजे खूप खूप वर्षं जगायचं का? ते पैसे मिळवतात म्हणून? ते मालक आहेत म्हणून? छोट्याला वाटणार की माझी आजी, आई, बहीण, एवढंच काय, पण माझी लाडकी सोनी कुत्री आणि बबीसुद्धा खूप खूप वर्षं जगायला पाहिजेत. मी तरी काय, लवकर मरणार? मुळीच नाही.

प्रत्यक्षात छोट्यानं आजीला एकच प्रश्न विचारला. पण मला दिसतात अशी अनेक छोटी मुलं, जी घराघरात असे प्रश्न विचारत असतात. एकदा आठवीतल्या एका विद्यार्थ्यानं असाच एक प्रश्न विचारला होता. 'भिंती बोलक्या करायच्या' या सरकारी फर्मानानुसार शाळेतल्या भिंतींवर वेगवेगळे 'सुविचार' लटकत होते. 'जगी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे। जगी वंद्य ते सर्व भावे करावे।' हाही त्यांपैकीच एक सुविचार. मुलानं मला विचारलं, "ही वाक्यं बरोबर आहेत किंवा हा सुविचार आहे असं तुम्हाला वाटतं का?" त्याचं मत जाणून घ्यावं म्हणून मी प्रतिप्रश्न केला, "तुला काय वाटतं?" तो उसळून म्हणाला, "हे चुकीचं आहे. आजवर जे जे शोध लागले आहेत ते जगी वंद्य आहे ते वंद्य असलेच पाहिजे असं न मानल्यामुळंच. एवढंच नाही, तर दलित वर्ग किंवा स्त्रिया यांना नीच मानण्याची आमची वंद्य परंपरा कुणीतरी निंद्य मानण्याचं धैर्य दाखवलं म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतंत्र भारताचे घटनाकार होऊ शकले." तो विद्यार्थी बोलत असता त्याच्या डोळ्यांत जे तेज पसरलं होतं, त्या तेजानं मी रोमांचित झाले. शिक्षक या नात्यानं मला तीव्रतेनं जाणवलं की, संस्कार म्हणजे काही गंडेदोरे नव्हेत. बांधला ताईत की, झाला मुलगा सद्वर्तनी! रामदासांचे श्लोक, तुकारामांचे अभंग, गीतेचे अध्याय पाठ म्हणण्यानं जर माणसं सुसंस्कारित होत असती, तर सारं किती सोपं झालं असतं ना? वास्तव आणि संभव यांच्यातलं सत् तसंच असत् समजून घेत घेत, त्याबद्दल विचार करत-करत सत्कडं मनाचा आणि आचाराचा कल होत जाणं म्हणजेच संस्कार. पाठांतरानं किंवा एका अनुभवाच्या फटकाऱ्यानं संस्कार होत नाहीत. विविध अनुभूतींच्या आवर्त-प्रत्यावर्तातनं मन सैरभैर होतं. विचारांचं वादळ घोंघावतं. पुढली वाट धुक्यात हरवल्यासारखी होते. अशा वेळी जे जे पाहिलं, ऐकलं, वाचलं, लिहिलं, शोधलं आणि सापडलं त्या सर्वांच्या साकल्यानं विचार करत आपण जो आचारधर्म स्वीकारतो तो. आपल्या संस्कारांचा परिणाम असतो. संस्कारांची पहिली पायरी कदाचित अनुकरण ही असली, तरी ती अखेरची पायरी निश्चितच नव्हे. पाठांतर होतं, उच्चारशुद्धता येते यासाठी काही गद्य-पद्यरचना म्हणण्याचा काही मर्यादित स्वरूपात सदुपयोग असेलही; परंतु जीभ आणि हात किंवा मेंदू आणि हृदय या दोन इंद्रियांत द्वैत निर्माण करणारी बाब आचाराला इष्ट वळण देण्यास उपयोगी पडू शकणार नाही. शिवाय व्यक्ती आणि समष्टी यांचा एकत्रित विचार करूनच इष्टानिष्टतेचे निकष ठरवावे लागतील; नाहीतर 'घरातली इडापिडा बाहेर जावो' या ओळीबद्दलचा छोटूचा प्रश्न अनिर्णितच राहायचा!

# बाहेर काढणं

**बाहेर हो--**

कोणत्याही शाळेत गेलं तरी मुलांना दिल्या जाणाऱ्या शिक्षेचा एक प्रकार सर्रास लक्षा येतो - 'बाहेर काढणं.' विषयशिक्षक मुलांना 'वर्गाबाहेर' काढतात. मुख्याध्यापक 'शाळेबाहेर' काढतात, परीक्षा घेणाऱ्या संस्था मुलांना 'शिक्षणाबाहेर' काढतात. जे कोणी मुलांना बाहेर काढतात त्यांची कारणं कायदेशीर व समाजमान्य असतात. उशिरा येणं, गृहपाठ न करणं, शिक्षक शिकवीत असता जवळच्या मुलाशी बोलणं, वेळेवर फी न आणणं, विषयाची पुस्तकं किंवा वह्या न आणणं, समजलं नाही म्हणणं - असे कितीतरी गुन्हे मुलं करतात व त्यासाठी वर्गशिक्षक मुलांना वर्गाबाहेर काढतात. वाह्यातपणं वागणं, पुन्हा पुन्हा नापास होणं अशा प्रकारच्या तक्रारी मुख्याध्यापकांकडं गेल्या की, दाखला देऊन ते ती 'ब्याद' आपल्या शाळेबाहेर घालवतात. परीक्षाविषयक गंभीर गुन्ह्यांची जी यादी आहे, त्यात मुलं सापडली की, त्यांना अमुक इतकी वर्षं 'परीक्षेबाहेर' काढलं जातं. असं हे मुलांना बाहेर काढणं चालू असतं. पालकांना ते माहीत असतं. समाजालाही त्याची कल्पना असते. गुन्हेगाराला शासन व्हायलाच हवं अशी सर्वसाधारण धारणा असते.

**शिक्षकांची कर्तूत--**

आपल्याला वाटतं, ठीक आहे. शिक्षणसंस्थांत असणाऱ्या आपल्या मुलांनी 'असल्या गुन्हेगारीत' अडकू नये याबद्दल आपण जागरूक राहतो. मुलं-बाळं शाळांत जात-येत राहतात. सगळं आलबेल आहे असं आपण मानतो. परंतु कधीतरी असं काही घडतं की, आपण खडबडून जागे होतो. आपलं मूल 'शिक्षणप्रवाहा'च्याच बाहेर फेकलं गेलेलं असतं. एखाद्या छुप्या रोगानं शरीरात आपलं बस्तान बसवल्यानंतर आपल्याला



समजावं अशी स्थिती होते. अधिक डोळसपणानं आपण पाहू लागलो तर हे असं का घडलं असावं, याचा अंदाज आपण करू शकतो. शिकवणारी मंडळी शिकणाऱ्यांपैकी काहीजणांशी कशी वागतात त्याच्या काही नोंदी आपण करू.

१) उत्तर देण्यासाठी हात वर केल्यानंतर 'त्यांच्या'कडं दुर्लक्ष करणं.

२) वर्गातील इतर मुलांना शिक्षक काही ना काही कारणांस्तव स्पर्श करत असूनही 'त्यांना' स्वतःच्या स्पर्शापासून वंचित ठेवणं. 'त्यांच्या'कडं पाहून स्मितहास्यही न करणं.

३) इतरांचं ऐकूण घेणं; पण 'त्यांचं' न ऐकणं.

४) 'त्यांच्या'वर लगेच टीकास्त्र उपसणं आणि 'त्यांना' क्षमा करण्याची टाळाटाळ करणं.

५) एकूण वर्गासाठी कामांची योजना करताना 'त्यांना' करता येतील अशा कामांचा त्यांत जाणीवपूर्वक अंतर्भाव करण्याची जबाबदारी न घेणं.

६) 'त्यांच्या' कृती इतरांत नाराजी किंवा नावड निर्माण करतात हे त्यांना सतत जाणवून देणं.

७) इतरांबरोबर 'त्यांची' नेहमी तुलना करणं.

८) चांगली मुलं 'तुमच्या'सारखं वागत नाहीत अशा प्रकारच्या आशयाची वाक्यं त्यांना सतत सुनावणं.

९) 'त्यांची' काही कामं चांगली होऊनही त्याबद्दल प्रशंसा न करणं.

१०) इतर मुलांनी 'त्यांच्या'वर केलेल्या शाब्दिक हल्ल्यांकडं किंवा त्यांच्या मुद्दाम काढलेल्या खोड्यांकडं दुर्लक्ष करणं.

११) कोणत्याही विशेष कामात 'त्यांना' सहभागी करून न घेणं.

१२) स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, तिळगूळ समारंभ अशा काही विशेष कार्यक्रमांत सहकार्य करण्यासाठी, इतर पालकांना बोलावण्याची प्रथा असूनही 'त्यांच्या' पालकांना न बोलावणं.

आता आपण ज्या बारा बाबी बघितल्या, त्या वाचल्यावर काहीजण म्हणतील की यामुळं विद्यार्थ्यांचं काय नुकसान होणार? विद्यार्थ्यांना ना वर्गातून बाहेर काढलेलं, ना परीक्षेतून हाकललेलं! शिक्षकांच्या या कृती विद्यार्थ्यांत कसली वंचितता निर्माण करणार? वर-वर पाहता हा दृष्टिकोन बरोबर वाटेलही; परंतु खरं तर वरील बाबींमुळं निर्माण होणारी वंचितता

फार गंभीर प्रकारची आहे. असे विद्यार्थी आत्मसन्मानालाच (Self esteem) वंचित होतात. मी 'त्यांच्यासारखा' नसलो, तरी मी 'माझ्यासारखा' आहे आणि त्याचा मला रास्त अभिमान आहे ही भावना व्यक्तीच्या विकासाला खूप पूरक असते. परंतु काही विद्यार्थ्यांची शिक्षकानं इतर विद्यार्थ्यांशी सतत तुलना करणं, त्यांच्यावर नेहमीच टीकास्त्र उपसणं, कोणत्याही विशेष कामांत त्यांना सहभागी करून न घेणं, त्या विद्यार्थ्यांना कायमपणेच प्रशंसा, स्मितहास्य किंवा स्पर्श नाकारणं, यामुळं ते विद्यार्थी स्वत्वभावनेतूनच बाहेर फेकले जातात.

## आत्मविकासाच्या पायऱ्या--

आत्मविकासाच्या ज्या पायऱ्या आहेत, त्यात कुतूहल, साहस आणि आत्मविश्वास असे तीन अतिशय महत्त्वपूर्ण टप्पे आहेत. परंतु ज्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारायला, स्वतःचं मत किंवा निरीक्षण मांडायला संधीच मिळत नाही त्यांच्यात साहस निर्माण तरी कसं होणार? साहस दाखवायलासुद्धा संधी द्यावी लागते. ही संधीच या विद्यार्थ्यांना शिक्षक नाकारतात. कुतूहलपूर्तीसाठी केलेल्या साहसातून व्यक्तीला आत्मविश्वासाचा लाभ होतो आणि असे महत्त्वपूर्ण टप्पे पार केलेला विद्यार्थी विकासक्षम बनतो. शिक्षणशास्त्रावरची पुस्तकं सर्वांगीण व्यक्तिमत्त्वविकासाचा टाहो फोडत असतात. प्रशिक्षित शिक्षकांना सर्वांगीण व्यक्तिमत्त्वविकासाची ओळख पुस्तकांतूनच झालेली असते. प्रशिक्षित शिक्षकच शाळाशाळांतून शिकवत असतात. अर्थातच सर्व शाळांत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वविकासाची बूज राखली जाते असा निष्कर्ष तर्कशास्त्रदृष्ट्या योग्य ठरला, तरी व्यवहारात तो खरा नाही हे दारुण सत्य आहे. जे दिसतं ते पाहायचं नाही, जे कानांवर पडतं ते ऐकायचं नाही आणि जे मनात उसळतं ते बोलायचं नाही अशी नीती बाळगून आपण आजवर शाळाशाळांतून अनेक प्रकारांनी 'बाहेर काढल्या जाणाऱ्या' विद्यार्थ्यांचा प्रश्न अस्तित्वातच नाही असं मानलं; पण हा प्रश्न फार गंभीर आहे.

## प्रश्नाचं गांभीर्य--

किती तऱ्हांनी आपण विद्यार्थ्यांना बाहेर काढतो हे आकडेवारीनं



समजावून सांगितलं, तर कदाचित त्याचं गांभीर्य समजून येईल. अगदी अलीकडील आकडेवारीनुसार शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांपैकी पंचेचाळीस टक्के विद्यार्थी एक ते पाच इयत्तांचे शिक्षण पूर्ण करत नाहीत. दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी तीस ते चाळीस टक्के विद्यार्थी बरेचदा गैरहजर असतात असं दिसतं. स्वाभाविकच ते नापास तरी होतात किंवा शाळा सोडून जातात. जे पंचेचाळीस टक्के विद्यार्थी शाळेच्या प्रवाहाबाहेर फेकले जातात, ते बहुधा पहिल्या एक-दोन इयत्तांतच. याची कारणं केवळ विद्यार्थ्यांच्या भौतिक परिस्थितीतच असतात असं नाही. शिक्षकाच्या शिकवण्याशी व वागण्याशीही त्यांचा दाट संबंध असतो. याशिवाय विचार करण्याचा आणखीही एक पैलू आहे. शाळेतून बाहेर फेकलेल्या मुलांचे प्रमाण एकोणसाठ टक्के, तर मुलींचे प्रमाण सदुसष्ट टक्के आहे. 'ओशिन' नावाची जी जपानी मालिका सध्या दूरदर्शनवर दाखविली जात आहे, त्यात मूल सांभाळण्यासाठी मालकाकडे वर्षभराच्या कराराने ठेवल्या गेलेल्या ओशिनला 'शाळा' शिकायची आवड असते. 'आपलं अस्तित्व मुलांना 'शाळेबाहेर' काढण्यासाठी नसून त्यांना शाळेत आणण्यासाठी आहे' असं मानणारे एक सहृदय शिक्षक ओशिनला भेटतात. मालकाचं मन वळवताना ते सांगतात, "मूल सांभाळत-सांभाळत ओशिन शिकेल." पाठीवर मूल बांधून उत्फुल्ल मनानं ओशिन शाळेत येते. ज्याला सांभाळायचं असतं ते मूल निसर्गक्रमानुसार शी, शू करतंच. 'शाळेतली मुलं' नाना तऱ्हांनी त्याबद्दलची नाराजी व्यक्त करतात. पाठीवर मूल बांधून शाळेत यायचं, त्या मुलांनं रडायचं, शी-शू करायची हे सारं शाळेच्या 'प्रस्थापित' प्रतिमेत बसत नाही असा मुलांचा ठाम समज असतो. अभ्यासाच्या आपल्या 'मौल्यवान वेळाचा' अपव्यय होणारी ओशिनची पीडा त्यांना नको असते. दबावतंत्राचा वापर करून ती मुलं ओशिनला शाळा सोडायला लावतात. आपल्या देशातही शिकू इच्छिणाऱ्या अनेक ओशिन घराघरांत आहेत. त्यांना पायबंद घालणारं दारिद्र्य, मुलींच्या शिक्षणाबद्दलची उदासीनता, घरातली कामं करायला शिकणं म्हणजेच मुलीचं शिक्षण असा समज, मुलांच्या बरोबर मुलीनं शाळेत असण्याबद्दलचं अनामिक भय, मुलीनं शाळेत जाण्यासाठी जो थोडा-फार

खर्च करायला लागतो, त्याबद्दलची असमर्थता अथवा नाराजी अशी कितीतरी कारणं मुलींची शाळेकडं जाणारी पावलं रोखून ठेवतात.

**मी 'मी' आहे--**

मुलं आणि मुली यांचा शाळेशी दुवा जुळण्यात परिस्थिती जितकी जबाबदार, तितकेच आम्ही शिक्षकही जबाबदार आहोत हे सखेद मान्य करायला हवं. छोट्या-छोट्या कृतींनी शिक्षक मुलांना जाणवून देऊ शकतात की, तू शाळेत असतोस हे मला आवडतं. तुझ्याकडं माझं लक्ष असतं. अमुक एखाद्या विषयात तू कच्चा असलास म्हणून काय झालं? तुझ्यात इतर कितीतरी चांगले गुण आहेत. आपला विद्यार्थी आजारी आहे असं कळलं आणि शिक्षक त्याला बघायला गेले, तर मुलाला आपण कोणीतरी 'विशेषाधिकारी' (Priviledged) आहोत असं वाटतं. या वाटण्यानं त्याची शिकण्याची उमेद वाढते. शिकण्यासाठी नाही तरी निदान शिक्षकाच्या सहवासासाठी शाळेत यावं अशी इच्छा मूळ धरते. परिस्थितीवशात मुलं शाळेबाहेर फेकली जातात त्याबद्दल शिक्षक या नात्यानं आपण फारसं काही कदाचित करू शकणारही नाही; परंतु आपल्या अकरुणामय वागण्यामुळं मुलाचा काही मूलभूत हक्कच आपण हिरावून घेत नाही ना, याबद्दल आपण सजग असायला हवं. या संदर्भात वाल्टर डी ला मेअर या प्रख्यात कवीची पुढील रचना आपल्याला मार्गदर्शक होईल. ती आपण वाचू या. रचनेचं नाव आहे - 'ME'

'As long as I Live
I shall always be
Myself and no other
Just me.
Like a tree
Like a willow or elder
An aspen, a thorn,
Or a cypress, forlorn.
Like a flower
For its hour



A primrose, a pink,
or a violet.
Sunned by the sun,
And with dewdrop wet
Always just me.

या कवितेतल्याप्रमाणेच प्रत्येक मूल शिक्षकाला सांगत असतं की, मी 'मी' आहे; तो नाही. मला मीच व्हायला मदत करा. माझं त्याच्यात रूपांतर करण्याचा प्रयत्न नका ना करू. बागेत उगवणारं 'पिंक' सुंदर असतं हे मान्य आहे हो; पण मी आहे रानावनात उमलणारं 'प्रिमिरोज'. फक्त 'पिंक'च सुंदर दिसतं का? तेच फक्त चांगलं असतं का? 'प्रिमरोज' असूनही मी आहे ना चांगला, सुंदर. म्हणा ना मग तसं! एखादं तासभर टिकणारं, उन्हात चमकणारं किंवा दवानं भिजलेलं मी फूल असेन किंवा असेन एकाकी सुरूचं अगर दुसरं कसलं तरी झाड - एवढंच काय, मी असेन एखादा टोकदार काटाही. मुलांचं हे म्हणणं आपण मानत नाही. झोपडपट्टीतली मुलं, दलित कुटुंबांतली मुलं, आदिवासी मुलं, अपंग मुलं, मतिमंद मुलं अशी सारी वेगवेगळी मुलं आक्रोशून शिक्षकांना सांगत असतात-- "आमच्या वेगळेपणाला मान्यता द्या. आम्हाला बाहेर फेकू नका." त्यांचं हे म्हणणं शिक्षकांनी मनावर घेतलं, तर शिक्षणाच्या प्रवाहाबरोबर मुलांना फेकून देणारी जी बारा कारणं आपण या लेखात सांगितली, ती तरी निदान आपल्या आचरणात पाझरणार नाहीत याची दक्षता आपण घेऊ; आणि तेवढं झालं, तरी शिक्षणाच्या प्रवाहाबरोबर फेकली जाणारी लाखो मुलं त्या प्रवाहात असण्याचा आनंद उपभोगतील.

# महत्त्वाचं काय? खेळणं की खेळिया?

पालक मुलांसाठी अनेक प्रकारची खेळणी विकत घेत असतात. रस्त्यारस्त्यांवरची दुकानं खेळण्यांनी भरलेली असतात. रंगी-बेरंगी, लहान-मोठी, आवाज करणारी, फिरणारी, स्वस्त-महाग. रस्त्यांवरून जाणारी वेगवेगळ्या वयोगटाची मुलं आई-वडिलांचं लक्ष दुकानातल्या या ना त्या खेळण्याकडं वेधून घेत, "घे ना मला ते खेळणं." असं आर्जवत असतात. एवढंच काय, एस. टी. स्टँड आणि रेल्वेफलाटसुद्धा मुलांची खेळणी दिमाखानं मिरवत असतात. जगात लहान मुलं आहेत तोवर खेळणी तयार करण्याचा धंदा तेजीतच असणार. अलीकडं तर खेळण्यांच्या दुनियेत खूपच क्रांती झाली आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीची छाया खेळण्यांवरही पडली असल्यानं त्यांच्या स्वरूपात (आणि हो, किंमतीतही) खूप बदल झाला आहे. तरीही मुलं खेळणी विकत घेण्यासाठी हट्ट करतात आणि पालक आपल्या खिशाचं माप आणि मुलाची आवड यांची सांगड घालायचा प्रयत्न करतात. काही पालक मात्र एखादा रतीब लावल्यासारखं दर पंधरवड्याला किंवा महिन्याला एखादं तरी नवं खेळणं विकत आणून आपलं मुलावरचं प्रेम त्याच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करतात. खेळणी तयार करण्याचा धंदा सध्या बराच तेजीत आहे. पूर्वी लाकडाची चूल, बोळकी, बाहुल्या, काठी पायात धरून केलेला घोडा, दगडी गोट्या, चिंचोके, सागरगोटे, आट्यापाट्या असे अनेक खेळ मुलं एकोप्यानं खेळत असत. आता खेळणं विकतच आणायला हवं असं जणू समीकरण झालं आहे.

खेळणं विकत घेताना पालक कोणता विचार करतात? ह्या प्रश्नाला किंमत आणि मुलाची आवड एवढंच उत्तर सर्वसाधारणपणानं मिळेल. परंतु खरं पाहता अनेक बाबींचा विचार खेळण्यासारखी वस्तू विकत घेतानाही करायला हवा. वाचू या का अशा काही बाबी?



१) खेळणं विकत घेताना ते मोडलं तर त्याचे तुकडे तीक्ष्ण असतील का? खेळण्याचा भाग असलल्या तारा, स्प्रिंग्ज किंवा ज्या पदार्थाचं ते खेळणं बनवलं आहे, ते लवकर मोडू शकेल असं आहे का हे लक्षात घ्या.

२) आपण घेतलेलं खेळणं चटकन पेट घेणारं आहे का, याचा अंदाज करा.

३) विजेवर चालणारं खेळणं लहान मुलांसाठी घेणं तसं थोडं धोक्याचंच. खेळता-खेळता विजेचा धक्का बसण्याची शक्यता अजमावा.

४) तीक्ष्ण कडा असलेलं कोणतंही खेळणं घेणं टाळा.

५) चाकू, बाण म्हणजे काही खेळण्याच्या वस्तू नव्हेत. छंद म्हणून धनुर्विद्या शिकायची असेल, तर ती योग्य मार्गदर्शकाच्या नजरेखाली राहूनच शिकायला हवी.

६) मुलाची बोटं, केस अडकतील अशा बिजागऱ्या, भोकं इत्यादी खेळण्याच्या रचनेत अंतर्भूत नाहीत याची खात्री करा.

७) खूप जोराचा किंवा कर्कश आवाज करणारी खेळणी खरीदू नका. तुमच्या मुलाच्या नाजूक कानांसाठीही ते अपायकारक ठरू शकेल. खेळता खेळता मुलं दुसऱ्याच्या कानाजवळ खेळणं नेतात. शिवाय ध्वनीप्रदूषण वाढवायला तुम्ही कशाला मदत करता? आधीच किती आवाजांनी कान किटून गेले आहेत. "तुमचा खेळ होतो पण आमचा जीव जातो" असं म्हणायची पाळी घरांतील किंवा शेजारील प्रौढ, आजारी माणसं, कामात किंवा अभ्यासात व्यग्र असणारी मुलं किंवा प्रौढ यांच्यावर खेळण्यांच्या कर्कश आवाजामुळं येते.

८) डोळ्यांना लावायचे अनेक प्रकारचे चष्मे खेळणं म्हणून खरेदी केले जातात; परंतु काही वेळा त्यामुळं मुलाच्या दृष्टीवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

९) खेळण्यांनाही विषय असू शकतात. मुलाच्या सुयोग्य भावनिक विकासासाठी मैत्री, देवाण-घेवाण असे विषय असणारी खेळणी; किंवा शोधून काढणं, प्रयोग करून पाहणं, रचना करणं - अशांसारख्या प्रक्रिया असणारी खेळणी साहाय्यक ठरतात. हिंसेला खतपाणी घालणारी खेळणी विकत आणून आपण लहानपणीच मुलाला 'ठो' करून प्रश्न संपवायला

शिकवतो.

१०) चांगली खेळणी कल्पनाशक्तीचा विकास करतात.

आपण खरेदी करीत असलेलं खेळणं असं आहे काय, याचाही विचार करावा.

बऱ्याच पालकांना वाटतं की, खेळणं जितकं जास्त महाग तितकं ते चांगलं; पण हे खरं नाही. खेळणं सगळं काही आपोआपच (किल्ली दिल्यावर किंवा बटन दाबल्यावर) करत असेल, तर त्यामुळं मुलाची कल्पनाशक्ती वाढत नाही. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्रसिद्ध शिक्षणवेत्ते डॉ. जे. पी. नाईक म्हणत असत की, यांत्रिक घोड्यावर नुसतं स्वार होणारं मूल फक्त बसून राहायला शिकतं. याउलट स्वतःच्या दोन पायांत काठी धरून 'घोडा, घोडा' खेळणारं मूल घोड्यासारखं दुडकं चालणं, त्याच्यासारखा आवाज करणं आणि घोडेस्वारासारखं 'चक् चक्' करणं, चाबूक हवेत फिरवणं, मधूनच रस्त्यावरच्या लोकांना उद्देशून "अहो ताई, अहो आजोबा, चलताय का टांग्यातनं?" असं विचारणं - अशा कितीतरी प्रकारांनी नाना बाबी आत्मसात करत असतं. पूर्वीच्या आपण ऐकलेल्या किंवा पाहिलेल्या अनुभवांचा वापर करून मूळ खेळण्याला खेळतं ठेवत असतं.

आमच्या पम्याचा किल्लीवर चालणारा कोंबडा लगेचच मोडला; पण त्या मोडक्या कोंबड्यात जीव आणणारा संवाद मी त्याच्याशी केला आणि पम्याचा तो कोंबडा आवडता झाला. त्याचे-माझे एक-दोन संवाद ऐका हं.

१) "आज कुठं चालले आहेत कोंबडेदादा?"

"शेजारच्या आजींकडं."

"कशासाठी?'

"कण्या खायला देतात त्या."

"आणि त्या पलीकडच्या काकींकडं नाही का जायचं?"

"छे! मुळीच नाही. खडा मारून सारखं हुसकवतात त्या."

२) "आज काय खायला निघाले कोंबडेदादा?"

"खायला नाही काही. माझ्या मैत्रिणीबरोबर फिरायला जायचं आहे आज."

"कुठं जाणार फिरायला?"

"रस्त्याच्या टोकापर्यंत."

"फिरायला जाऊन काय काय करणार?"

"खूप खूप बोलणार. दिवसभरच्या गंमती-जंमती सांगणार. उद्या एक मोठी आळी चोचीतून आणून देईन प्रेझेंट, असं सांगणार?"

अलीकडं पम्याला इतर खेळणी आवडेनाशीच झाली आहेत. मी विचारलं, "काय रे पम्या? हा मोडका कोंबडा कशाला? आपण किल्ली दिली की, मान उंच करून कुऽऽ कुऽऽ च करून चालणारा कोंबडा आणूया की." मग पम्या म्हणतो, "अजीजी नको. हाच छान." म्हणून म्हटलं की, पालकांनी नुसती नवीनवी खेळणी आणण्याचा सपाटा लावण्यापेक्षा खेळण्यांचा सृजनशील उपयोग करून मुलाचा विकास कसा साधता येईल, कोणत्याही खेळण्यात असणारा साचेबंदपणा दूर करून त्याच खेळण्याचा उपयोग करून बोलणं, प्रश्न विचारणं, संवाद करणं, भूमिकाभिनय करणं (role play) असे वेगवेगळे प्रवाह त्या खेळण्यात मिसळून मुलाची सारी इंद्रियं जागृत कशी करता येतील हे पाहायला हवं; नाहीतरी खेळण्यापेक्षा 'खेळिया' महत्त्वाचा!

# शिक्षणजत्रा : एक अनोखा पण फलदायी उपक्रम

### नासलेलं शिक्षण--

ब्रिटिशांनी भारतात जी शिक्षणपद्धती सुरू केली, ती केवळ दुय्यम-तिय्यम दर्जाचे नोकर निर्माण करण्यासाठी असं नेहमी म्हटलं जातं. पण याचा नेमका अर्थ काय बरं? माणसांमधली विचार करण्याची, प्रश्नाशी सुसंगत अशी विविध पर्यायी उत्तरं शोधण्याची जी अनमोल देणगी आहे, तिला विरजण घालून दाखवलेलं तेवढंच पाहायचं, सांगेल तेवढंच ऐकायचं, दाखवेल तसंच करायचं, क्रमिक पुस्तक हेच परब्रह्म मानायचं - अशा प्रकारांनी त्या शिक्षणपद्धतीनं भारतीय लोकांमधली सृजनशीलता, विचारशक्ती, कल्पनाशक्ती जणू क्रमिक पुस्तकं, परीक्षा, शाळा आणि शिक्षक यांच्याशी जखडून ठेवली. भारतीय लोक आपले गुलाम आहेत या दृष्टीनं गुलामीला उपयुक्त असं शिक्षण ब्रिटिशांनी दिलं हे समजून घेण्यासारखं आहे; परंतु स्वातंत्र्योत्तर काळातल्या गेल्या पन्नास वर्षांत जवळ-जवळ तसंच अचेतन आणि पुस्तकी शिक्षण आपण चालू ठेवलं आहे - किंबहुना त्याचा प्रसार केला, हे मात्र समजण्यासारखं नाही. राष्ट्रीय आणि व्यक्तिगत जीवन ज्यामुळं दुबळं राहील अशा ह्या कालबाह्य ठरलेल्या शिक्षणानं साऱ्यांची मनं आणि बुद्धी किती नासवून टाकली याचे पुरावे अनेक प्रकारांनी आपल्यासमोर प्रत्यहीं येत असतात. मी ऐकलेले (आणि जे तुम्हींही नक्कीच ऐकले असतील असे) काही उद्‌गार पाहा -

''शिकायचं म्हणजे सर काय सांगतात, तेच ऐकायचं, तेच लिहूनही घ्यायचं, तेच पुस्तकांतून वाचायचं आणि तेच सारं पाठ करून लिहायचं.''

''नुसतं शाळेत जाऊन काय उपयोग? शिकवणीसुद्धा ठेवायला हवी.''

''अभ्यास कशाला करायला पाहिजे? परीक्षा जवळ आली की 'इम्प' प्रश्नांची शिकार करायची.''

''क्रमिक पुस्तक नाही घेतलं तरी चालेल; गाईड घे म्हणजे झालं.''

''अरे, त्या सरांचा तास चुकवून चालणार नाही हं! ते परीक्षक असतात.''

''वर्षभर मी तास घेतले नाहीत, तर काय बिघडणार आहे? लेको, मी सेटर आहे सेटर!''

असे हे उद्‌गार ऐकले म्हणजे आजचं शिक्षण किती निःसत्त्व बनलं आहे, किती प्रकारांनी नासलं आहे, ते लक्षात येतं.

### नुसत्या शब्दांचा पाऊस पुरे--

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या पंधरा-वीस वर्षांत जे आयोग/समित्या नेमल्या गेल्या, त्यामुळं लोकांच्या आशा पालवल्या. मात्र अनेक आयोगांनी अथवा समित्यांनी आणि अगदी नव्या शैक्षणिक धोरणानंसुद्धा जे काही केलं, ते मुख्यतः भरपूर चांगल्या शिफारसी करणं, इतकंच! त्या शिफारसी अंमलात आणण्यासाठी शासनाची जी जबर इच्छाशक्ती लागते, तिचा बहुवंशी अभावच जाणवला. त्यामुळंच आयोगांच्या शिफारसी आणि गेल्या पन्नास वर्षांतील प्रत्यक्ष शैक्षणिक वास्तव यांच्याकडं पाहिलं की, भूगोलातल्या पर्जन्यछायेच्या प्रदेशाची आठवण होते. भाषणं, परिसंवाद, परिचर्चा, आयोग, समित्या, शिफारसी, शिफारसीसंबंधी पुन्हा भाषणं, चर्चा. . . असं हे दुष्टचक्र भेदायचं असलं, तर वाचावीरांपेक्षा कृतिवीर हवेत. शिक्षणाबद्दलची अस्वस्थता गेल्या दहा-बारा वर्षांत तर इतकी शिगेला पोहोचली आहे की, ठिकठिकाणी काही संस्था आणि काही व्यक्तीही आपापल्या कुवतीनुसार शिक्षणातील निःसत्त्वता, अचेतनता आणि पुस्तकीपणा कमी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सृजन-आनंद शिक्षण केंद्र ही अशीच एक शिक्षणसंस्था आहे. ह्या संस्थेनं गेल्या दहा वर्षांत जे विविध प्रयत्न चालवले आहेत, त्यांपैकी एका प्रयत्नाची-- म्हणजेच शिक्षणजत्रेची-- ओळख आपण करून घेऊ या.

**क्षमतांचा विकास--**

शिकणाऱ्याच्या बहुविध क्षमता लक्षात घेऊन त्या विकसित करण्याचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत असं केंद्राच्या कार्यकर्त्यांना वाटतं. म्हणूनच पालकांना आणि शिक्षकांना शिक्षण म्हणजे क्षमतांचा विकास याची प्रत्यक्ष अनुभूती ज्यामुळं मिळेल आणि मुलांना शिकणं आनंददायक असतं, स्वतःच्या विचार, कल्पनांना त्यात अवसर असतो, नव्हे, तेच अधिक महत्त्वाचं असतं - याची प्रचीती ज्यामुळं येईल, असा शिक्षणजत्रेचा उपक्रम त्यांनी शोधला.

क्षमतांचा विकास आणि शिक्षण यांचा परस्परसंबंध थोडा अधिक समजून घेऊ या. विचार करणं ही एक महत्त्वाची क्षमता. शिक्षणातून तिचा विकास होण्यास मदत करायची म्हटलं, तर त्या क्षमतेत समाविष्ट असणाऱ्या इतर उपक्षमताही स्पष्टपणं समजून घ्यायला हव्यात. दृक्, श्राव्य, स्पर्श यांसारख्या माध्यमांमार्फत आपल्यापर्यंत जे पोहोचतं किंवा पोहोचविलं जातं, त्या आशयाचं आकलन होणं ही विचाराची एक उपक्षमता. मात्र हे आकलन म्हणजे नुसतं शोषून घेणं नव्हे. टीपकागद जसा त्याच्यावर पडलेलं दूध, पाणी किंवा शाई हे पदार्थ त्वरित ओढून घेतो व स्वतःच्या क्षमतेनुसार साठवूनही ठेवतो, तसंच केवळ मुलांचं आकलन असता कामा नये. झालेल्या आकलनामुळं स्वतःचे अनुभव किंवा आजूबाजचं वास्तव जीवन यांच्या संदर्भात काही नवे विचार मुलांच्या मनात उत्पन्न व्हायला हवेत. तसंच मूळ आशयातला चांगले-वाईटपणा मुलांच्या लक्षात यायला हवा. त्याबद्दलचे अभिप्राय त्यांच्या मनात तयार व्हायला हवेत. विचारप्रक्रियेच्या पुढच्या टप्प्यावर मूल त्याहीपुढं जाऊन जे उमजलं नाही किंवा पटलं नाही ते स्वतः करून पाहणं, त्यासाठी वेगळे तपशील शोधणं, इतरांशी त्याबद्दल चर्चा करणं - अशा मार्गांचा अवलंब करतं. आपल्यापर्यंत पोहोचलेल्या आशयाचं आकलन होऊन त्यावर आपण जे विचार केले, त्याच्याशी सुसंगत अशी इतर उदाहरणं किंवा सहसंबंध शोधणं, त्या आशयाचं वर्गीकरण करणं, वेगळ्या माध्यमांमार्फत त्याच आशयाची पुनर्रमांडणी करणं ही जरी अगदी तंतोतंतरीत्या विचार करण्याची उपक्षमता म्हणता आली नाही, तरी स्वतःपर्यंत पोहोचलेले विचार इतरांपर्यंत पोहोचण्यासाठी विचार आणि



सृजन यांचा मिलाफ होऊन निर्माण होणारी एक अतिशय सुंदर आणि तितकीच महत्त्वाची अशी क्षमता आहे. इतर क्षमतांबद्दलही असाच तपशीलवार विचार आपण करायला हवा.

**शिक्षणजत्रा म्हणजे हो काय?--**

शिक्षणासाठी मूलभूत असणाऱ्या काही क्षमतांवर आधारित असलेले खेळ तयार करून त्यांचं केलेलं आयोजन म्हणजे शिक्षणजत्रा. एखादं उदाहरणं आपण पाहू या. विज्ञानाच्या अभ्यासाचं एक उद्दिष्ट म्हणून वर्गीकरण करण्याच्या क्षमतेचा उल्लेख केला जातो. का बरं ही क्षमता इतकी महत्त्वाची? एकाच आशयाकडं वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून पाहिलं की, त्याच आशयाची फेरमांडणी आपण वेगवेगळ्या प्रकारांनी करतो आणि ती करत असता आशयाचे विभिन्न पैलू आपल्याला उमजत जातात. समजा, आपण प्राणी, नद्या, भाज्या यांपैकी कशाचीही यादी समोर ठेवली आहे किंवा करायला सांगितली आहे. त्या यादीकडं नजर टाकून 'भाज्यांचं वर्गीकरण करा' असं सागितलं तर चटकन फार प्रकार नजरेसमोर येत नाहीत; पण जरा अधिक विचार केला की, वेल, फळं, कंद, शेंगा, पाला अशा प्रकारच्या भाज्या दिसायला लागतात. रंग, आकार, पोषणमूल्यं अशा निकषांनुसारही भाज्यांचं वर्गीकरण करता येईल हे लक्षात येतं. आणि हो, माझ्या एका सहकाऱ्यानं सुचवलं की, 'श्रीमंती भाज्या' आणि ' गरीबी भाज्या' असंही वर्गीकरण कुणीतरी करेल.

आणखी एक उदाहरण घेऊ या म्हणजे शिक्षणजत्रा समजणं थोडं सोपं जाईल. 'साहचर्याचा नियम' तर शिक्षक-प्रशिक्षण घेतलेल्या सगळ्यांना माहीत असतोच. आपल्या साहचर्याच्या कक्षा किती दूरवर पोहोचलेल्या आहेत यावरच आपली बहुश्रुतता अवलंबून असते. सृजन-आनंद विद्यालयातलंच एक उदाहरण तुम्हाला सांगते. इयत्ता ४ थीसाठी 'इथे' ही श्रीमती शांता शेळके यांची एक कविता आहे. त्या कवितेत 'दुर्लभ' असा एक शब्द आहे. या शब्दाचा अर्थ मुलांपर्यंत पोहोचवून "दुर्लभ असलेलं काही तुम्हाला माहीत आहे का?" असं विचारताच त्या शैक्षणिक वर्षात (त्या वेळी इराक-इराण युद्ध चालू होतं.) "पेट्रोल" असा मुलांनी गिल्ला केला. मुलांची ही 'बहुश्रुतता' त्या

वेळच्या वास्तवानं त्यांना दिली. साहचर्याच्या नियमावर आधारलेला एक खेळ केंद्र-कार्यकर्त्यांनी तयार केला आहे. संदर्भ आणि संदर्भदर्शक शब्द यांचा हा मजेशीर खेळ आहे. जो जास्तीत जास्त संदर्भ गोळा करतो, तो जास्तीत जास्त श्रीमंत. (श्रीमंतीच्या अशा काही नवीन संकल्पना आपल्याला रुजवता आल्या, तर किती छान होईल!)

## शिक्षणजत्रा घ्यायची आहे?

सृजन-आनंद शिक्षण केंद्राशी पत्रव्यवहार करून संबंधित संस्था शिक्षणजत्रेचं आयोजन करतात. जत्रेत सहभागी होणाऱ्यांची संख्या लक्षात घेऊन आवश्यक तितक्या खोल्या (शक्यतो वेगवेगळ्या मजल्यांवरच्या किंवा एकमेकांपासून दूर) निवडून त्यांपैकी काही खोल्यांत मुलांसाठी व काही खोल्यांत पालक-शिक्षकांसाठी केंद्राचे कार्यकर्ते खेळ माडतात. खेळाचं संचालन करणारे कार्यकर्ते फळ्यावर खेळाचं नाव व त्याची माहिती लिहितात किंवा त्याबद्दलचा माहितीफलक चिकटवतात. ठरलेल्या वेळानंतर बहुधा पंधरा मिनिटं - घंटेचा टोल होतो. १ ते ८ या क्रमांकानुसार जत्रेतल्या लोकांनी आपल्या खोल्या बदलाव्या अशी अपेक्षा असते. प्रत्येक खोलीत वेगळा खेळ, वेगळ्या सूचना, निराळी क्षमता असं असल्यानं पहिल्या खोलीत येताना मंडळी जरी थोडी बावरलेली, बुजलेली असली, तरी हळूहळू ती जत्रेची मजा चाखू लागतात. समरसून अहमहमिकेनं खेळ खेळू लागतात. प्रौढ आपलं वय विसरतात. आपली पाळी जाऊन दुसऱ्यानं उत्तर दिलं तर "मी हे सांगणारच होतो रे; पण आठवलं नाही." असंसुद्धा म्हणतात. एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जाताना तू काय सांगितलंस - मी काय सांगितलं, याबद्दल बोलणं होतं. खेळ घेणाऱ्यावर कोणी शेरेबाजी करतं. काहींना खेळाचं पूर्ण स्वरूप समजलेलं नसतं. काहींना खेळ खूप आवडलेला असतो. मधल्या सुट्टीची सूचना झाल्यावर "इतका भर्रकन वेळ कसा गेला?" असं म्हणत मंडळी वाफाळत्या चहाच्या कपांना भिडतात. मधल्या सुट्टीनंतर पुन्हा एकदा खेळांना सुरुवात होते. शेवटची पंधरा मिनिटं शिक्षणजत्रेच्या अनुभवाबद्दल अभिप्राय लिहिण्यासाठी असतात. ज्या खोलीत जे असतील, त्यांनी तिथंच अभिप्राय लिहायचे असतात. मोठ्या गंभीर चेहऱ्यानं सारेजण जत्रेचा सगळा दिवस आठवून-आठवून त्याबद्दलची आपली निरीक्षणं, अनुभव लिहीत असतात. अशी जी निरीक्षणं आमच्याजवळ आहेत त्यांनी आम्हाला सांगितलं आहे की, शिक्षणजत्रा छान असते.

**मुलं म्हणतात,**

"अशा प्रकारच्या जत्रेत मी पहिल्यांदाच आले. येताना मी फार घाबरले होते; पण इथं आल्यावर आनंदच नाही, तर ज्ञानसुद्धा मिळालं, मनोरंजनही झालं."

"शिक्षणजत्रा कार्यक्रम फारसा चांगला असेल, असं वाटलं नव्हतं. परंतु इथं आल्यावर इतर कशाची आठवणसुद्धा राहिली नाही."

"शिक्षणजत्रेला लांबून हुशार मुली येणार व अभ्यासाचं घेतलं म्हणजे आम्ही 'ढ' ठरणार असं वाटलं होतं; पण झालं वेगळंच!"

"जत्रेत जशा विविध वस्तू असतात, तसेच शिक्षणजत्रेत विविध प्रकारचे खेळ, कोडी होती."

"ह्या जत्रेत गणिताची कोडी सोडवायची होती. ती मी बरोबर सोडवली. माझ्या मनातील भीती दूर झाली."

"भरपूर खेळ ठेवले होते; पण प्रत्येक खेळाकरता वेळ पंधराच मिनिटं - म्हणजे फारच थोडा!"

"आपण अभ्यास करतो आहोत, हेच कळलं नाही. विचार करावा लागला. जणू हे हसत-खेळत शिक्षण आहे."

"आम्हाला आवडणारे क्रिकेटपटू, नट-नट्याही खेळाद्वारे ओळखायला लावले, ते आम्हाला फार आवडलं. गणितावर आधारित खेळ खेळताना मजा आली."

"इथल्या ताई (खेळ घेणाऱ्या शिक्षिका) खूप गोड आणि समंजस होत्या."

"शाळादेखील अशाच तऱ्हेनं चालल्या, तर शाळेत जायला खूप आवडेल."

"पालकांना जत्रेत घेतलं, हे फार आवडलं. माझ्या पालकांचीही परीक्षा कोणी घेणारं कोणी होतं, हे मला आवडलं."

"वेळ कसा गेला हे समजलंच नाही. मजा आली बरं का मला!"

"खूप आनंद लुटला."

**पालक-शिक्षक म्हणतात,**

"आपण सहजपणे 'विद्यार्थ्याला 'तुला एवढं कसं येत नाही!' असं म्हणतो; पण खरोखरच आपल्यालाही कितीतरी साध्या गोष्टी येत नाहीत हे समजलं."

"नेहमीच्या करमणुकीपेक्षा मुलांना काही वेगळं देऊ शकू, ह्याचं समाधान वाटलं."

"पालक म्हणून कुठं कमी पडलो, ह्याची जाणीव झाली."

"पालक म्हणून मुलांना खेळता-खेळता शिक्षण देण्याची नवी दिशा समजली."

"मुलांना कसं शिकवावं हा प्रश्न सोडवण्याची दिशा आज सापडल्यासारखी वाटते."

"भरपूर विचार करण्याची किती गरज आहे हे कळलं. आपल्यापेक्षा मुलंच कितीतरी बाबतीत सरस आहेत हे आपोआप कळून आलं."

"विचारांचे लिलाव ह्या खेळाची कल्पना फारच नवीन. आपण नेहमी फारसा विचारच करत नाही. माहीत असलेल्या म्हणीही आयत्या वेळी आठवत नाहीत."

"आपलं शिक्षण संपलं म्हणजे विद्यार्थीदशा संपली असं नाही हे नवं सत्य जाणवलं."

"ह्या जत्रेमुळं पुनः एकदा बाल्य अनुभवायला मिळालं, तरतरी आली."

"केवळ शाळेचा अभ्यास एके अभ्यास उपयोगी नाही हे लक्षात आलं."

"हा अभिनव उपक्रम छान वाटला. छोट्यांनाच नाही, तर मोठ्यांनाही बौद्धिक खाद्य भरपूर होतं."

"केवळ घर, बालसंगोपन ह्याच्या वातावरणापासून दूर येता आलं."

"काही नवीन घेऊन जात आहोत."

"शिक्षणाच्या वाळवंटात शिक्षणजत्रा ओॲसिससारखी वाटली."

**शिक्षणजत्रेची सफलता--**

सृजन-आनंद शिक्षण केंद्रामार्फत मिरजेला एक, कोल्हापुरला दोन, वाटेगावला एक व इचलकरंजीला दोन अशा एकूण सहा शिक्षणजत्रा झाल्या आहेत. या जत्रा घेताघेताच केंद्र-कार्यकर्त्यांना असं जाणवत गेलं की, अशा प्रकारचे काही खेळ दैनंदिन अध्यापनातसुद्धा वापरायला हवेत. खेळ तयार करणं हे एक शैक्षणिक आव्हान असतं. ते पेलणं हा सेवांतर्गत शिक्षक-प्रशिक्षणाचाही भाग असू शकतो. नवं ज्ञान मिळवण्यासाठी, संकल्पनांच्या स्पष्टतेसाठी, आशयाचं आकलन व्हावं म्हणून झालेल्या अभ्यासाच्या दृढीकरणासाठी अगर नव्या दृष्टिकोनातून त्याच आशयाकडं पुन्हा पाहण्याकरता खेळ तयार करणं ही वाटते तितकी सोपी बाब नाही. त्यात आणखी 'खेळाची काठिण्यपातळी वाढवा किंवा कमी करा.' अशी सूचना आली म्हणजे तर शिक्षक-प्रशिक्षणाची कसोटीच लागते. खेळ तयार करणं आणि खेळाचं संयोजन करणं ही दोन वेगवेगळी कौशल्यं आहेत याचंही प्रत्यंतर ती दोन्ही कामं करून पाहिल्याखेरीज येत नाही; म्हणूनच केंद्र-कार्यकर्त्यांनी केवळ शिक्षणजत्रा घेणं यावरच लक्ष केंद्रित न करता साधना हायस्कूल व उदयाचल प्राथमिक शाळा अशी दोन शाळांत शिक्षणजत्राविषयक दोन शिक्षक-प्रशिक्षण सत्रंही सृजन-आनंद शिक्षण केंद्रानं घेतलेली आहेत. आजचं शैक्षणिक वास्तव लक्षात घेऊन बी. एड. आणि डी. एड. अभ्यासक्रमांची जी पुनर्रचना व्हावयास हवी, त्यासाठी शिक्षणजत्रा ह्या उपक्रमाचा उपयोग करून घेता येईल. अध्यापक विद्यालयांत आणि अध्यापक महाविद्यालयांत दरवर्षी हा उपक्रम घेतला तर अभ्यासक्रमातील विषय, त्यांची विविधांगी उद्दिष्टं, त्या उद्दिष्टांची खोली व व्याप्ती, गरजेनुसार काठिण्यपातळीत फरक करता येण्याची क्षमता अशा कितीतरी बाबी प्रशिक्षणार्थींना शिक्षणजत्रेच्या आयोजनामुळं प्रतीत होतील. शिक्षणाविषयीचा नवा दृष्टिकोन प्रत्यक्ष अनुभवातून पालकांपर्यंत पोहोचवण्यासाठीही शिक्षणजत्रा हे प्रभावी माध्यम ठरू शकतं, हे पालकांच्या अभिप्रायांवरून वाचकांच्या लक्षात आलंच असेल. 'मुलं म्हणतात'मधील आशय तर आपल्याला खूपच काही शिकवून जातो. म्हणूनच म्हणावंसं वाटतं की, महाराष्ट्रातल्या प्राथमिक व माध्यमिक शाळा चालवणाऱ्या संस्थाचालकांनी व शासनानंही या अनोख्या व फलदायी उपक्रमाकडं अधिक लक्ष द्यावं.

# राज्यपाल सी. सुब्रमण्यम् यांना अनावृत्त पत्र

माननीय राज्यपाल श्री. सुब्रमण्यम्‌जी यांना,

सादर प्रणाम.

विषय : दिनांक १७।७।९२ रोजी पावसासाठी प्रार्थना करण्याचे आपले आदेश.

संदर्भ : १) नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण
२) नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पुनर्रचित केलेले प्राथमिक व माध्यमिक स्तरांवरील अभ्यासक्रम.
३) दिनांक १९।७।९२ च्या साधनेच्या अंकातील श्री. बापू उपाध्ये यांचा लेख.

माननीय महोदय,

आपल्यासारख्या उच्चपदस्थांना माझ्यासारख्या एखाद्या व्यक्तीने पत्र लिहावे अशी उदाहरणे फारशी दिसत नसल्याने अनेकांना व सत्तेच्या भिंगातून बघणाऱ्या बऱ्याच अधिकाऱ्यांना ते अशिष्ट व औद्धत्यपूर्ण वाटण्याची शक्यता गृहीत धरूनही मला हे अनावृत्त पत्र लिहिल्याशिवाय राहात नाही. लिहावे की न लिहावे, याचा गेले दहा दिवस विचार करूनही मला असे वाटले की, आपल्यापुढे माझे विचार मांडणे हे एक नागरिक व शिक्षणक्षेत्रातील एक कार्यकर्ती या नात्याने माझे कर्तव्य आहे.

ज्या प्रागतिक राज्याचे आपण राज्यपाल आहात, त्याच राज्यातील शासकीय अध्यापक महाविद्यालयात वीस वर्षे शिक्षक-प्रशिक्षणाचे काम निष्ठापूर्वक केलेली मी एक माजी प्राचार्य आहे. तसेच नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्रतिपादिलेल्या लोकसहभागाधिष्ठित, आनंददायी, बालककेंद्रित, सृजनशील व विद्यार्थ्यांत सामाजिक जाणिवा संवर्धित करणाऱ्या ज्या प्राथमिक शिक्षणाचा ऊहापोह केला आहे, त्या प्रकारच्या



प्राथमिक शाळेची संकल्पना साकार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका प्राथमिक शाळेची मी प्रवर्तक आहे. माझ्या ह्या शैक्षणिक पार्श्वभूमीची ओळख एवढ्यासाठीच करून देण्याचे धाडस केले की, नेमकी त्यामुळेच मी आपल्याला हे पत्र लिहिण्यास प्रवृत्त झाले आहे.

नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ह्या शीर्षकाची जी पुस्तिका इ. स. १९८६ मध्ये प्रकाशित झाली, त्यातील पृष्ठ तेवीसवर विज्ञानशिक्षणाबद्दल पुढील मजकूर आहे -

"Science education will be strengthened so as to develop in the child well defined abilities and values such as the spirit of inquiry, creativity, objectivity, the courage to question. . .. Science education programmes will be designed to enable the learner to acquire problem solving and decision making skill and to discover the relationship of science with health, agriculture, industry and other aspects of daily life. Every effort will be made to extend science education to the vast numbers who have remained outside the pale of formal education." याच शैक्षणिक धोरणाचा परिपाक म्हणून शालेय अभ्यासक्रमांची जी पुनर्रचना करण्यात आली, त्यात प्रत्येक विषयाच्या अध्यापनासाठी दहा गाभाभूत तत्त्वे आवर्जून मांडली आहेत. परिसराचे संरक्षण व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास ही दोन तत्त्वे त्या तत्त्वांपैकीच आहेत. राष्ट्रीय चारित्र्याचा (national character) विकास व्हावा म्हणून नव्या शैक्षणिक धोरणात मांडलेल्या समाजरचनेचा व त्या समाजरचनेसाठी दहा गाभाभूत तत्त्वांचा आग्रह वस्तुतः सर्वच क्षेत्रांत आणि प्रामुख्याने शिक्षणात धरला जायला हवा. पर्जन्यविषयक परिस्थितीचा समग्र विचार करून, वस्तुनिष्ठतेने प्रश्नाचा अभ्यास करून 'असे का?' याचा तडा लावण्यासाठी दैनंदिन वास्तव जीवनाकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन विद्यापीठीय पातळीपासून प्राथमिक शाळांपर्यंत सर्वच विद्यार्थ्यांपर्यंत झिरपू शकला असता, तो आपल्या प्रार्थनेच्या आवाहनामुळे अस्पर्शित राहिला नाही का?

या वर्षी पावसाने इतकी ओढ दिली की, सर्वांच्याच तोंडचे पाणी

पळाले. पाण्यासाठी दाही दिशा फिरणाऱ्या खेड्यापाड्यांतील जनतेच्या अवस्थेमुळे राज्यपाल या नात्याने आपण अस्वस्थ होणे हे आपल्या संवेदनशीलतेचे द्योतक आहे. परंतु ज्या जनताजनार्दनाच्या हातात पाणी खेचून आणण्याचे सुप्त सामर्थ्य आहे, तेच हात जोडून आपण त्यांना प्रार्थना करण्याचे आवाहन का केले असेल?

महाराष्ट्रातल्या पाणी परिस्थितीविषयी आपल्याइतके दुसरे कोण जाणकार असणार? अनेक खात्यांमार्फत आपल्यापर्यंत अद्ययावत् माहितींचे स्रोत प्रवाहित होत असतात. त्या माहितीनुसारही आपल्याला असे वाटले का की पाणी मिळवणे, ते वापरणे व टिकवणे याबाबत शासनाने व जनतेने आपले कर्तृत्व-पणाला लावूनही या वर्षीची पाणी परिस्थिती निर्माण झाली? माझ्या अल्प वाचनात आलेल्या थोड्या-फार माहितीनुसार तसे नसावे असे दिसले. त्या माहितीपैकी काही माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१) राजस्थान व गुजरातसारख्या पाण्याचे दुर्भिक्ष असणाऱ्या राज्यांनीही स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रापेक्षा अधिक सिंचनक्षेत्र निर्माण केले.

२) वीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रात ८७ दुष्काळी तालुके होते. आता त्यांची संख्या जवळपास १०० झाली आहे.

३) राज्यात पडणाऱ्या पावसापैकी एक तृतीयांश पाऊस कोकणात पडतो व दरसाल राज्याला मिळणाऱ्या पाण्यापैकी एक तृतीयांश पाणी समुद्रात वाहून जाते.

४) कृष्णा लवादाने दोन हजार सालपर्यंत ५९३ दशलक्ष घनफूट पाणी महाराष्ट्राला दिले. लवादाचा निर्णय होऊन पंधरा वर्षे होऊनही त्यांपैकी फक्त एक तृतीयांश पाणी आपण वापरले.

५) दुष्काळ पडला की, मदतकार्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च होतात. इ. स. १९७२ च्या दुष्काळात २० कोटीपेक्षा अधिक खर्च झाला.

विज्ञान-शिक्षणासंबंधी उद्धृत केलेल्या उताऱ्याचा आशय, दहा गाभाभूत तत्त्वांपैकी परिसराचे संरक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास ही दोन तत्त्वे व महाराष्ट्राच्या पाणी-परिस्थितीसंबंधी वर उल्लेखिलेली माहिती लक्षात घेतली, तर औपचारिक शिक्षणाच्या कक्षेत



येणाऱ्यांना (Within the pale of formal education) परिसरातील परिस्थितीचा अभ्यासपूर्वक अन्वयार्थ लावून तसेच वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अवलंब करून पाऊस यावा, पाणी टिकून राहावे, पाण्याचा गैरवापर होऊ नये आणि पाण्याच्या संदर्भात दूरगामी आणि तातडीच्या कोणत्या उपाययोजना कराव्यात याबाबत विचारशील व कृतिशील करण्याऐवजी आपण त्यांना देवाला साकडे घालायला सांगून वैज्ञानिकतेपासून दूर लोटले असे म्हणता येईल का? शिवाय जे लाखो लोक औपचारिक शिक्षणाच्या कक्षेबाहेर (Outside the pale of formal education) आहेत, त्यांचा 'आकाशाच्या बापा'वरचा विश्वास वाढविण्यासच आपला आदेश साहाय्यभूत झाला असेल का? आपल्यासारख्या बुद्धिमंत उच्चपदस्थांनी त्या 'दयाघना'च्या दयेमुळेच पाऊस पडेल असे मानल्याने ती 'मुकी बिचारी कुणी हाका' अशी जनता अधिकच हवालदिल होऊन स्वतःपाशी असलेले थोडेफार पाणीही देवाच्या डोक्यावर ओतून धन्य व्हावी यात नवल ते काय? लाखो अशिक्षितांची दैवाधीनता आपल्या आदेशामुळे (आणि सृष्टिक्रमानुसार दुसऱ्या दिवशी पडलेल्या पावसामुळे) अधिकच बळावून ते लोक विज्ञानविन्मुख तर झाले नसतील ना?

एक व्यक्ती म्हणून आपण आपल्या घरात पावसासाठी प्रार्थना केली असती, तर कदाचित ती एक व्यक्तिगत घटना मानता आली असती. परंतु महाराष्ट्रातील तमाम जनतेला 'पावसासाठी प्रार्थना' करण्याचा शासकीय आदेश आपण दिलात. एकविसाव्या शतकासाठी विज्ञाननिष्ठतेची नितांत गरज भारताचे माजी पंतप्रधान कै. राजीवजी गांधी यांनी प्रतिपादली. त्याच विज्ञाननिष्ठतेला आपल्या शासकीय आदेशाने व आदेशाच्या अंमलबजावणीने फार मोठा हादरा बसला नाही का? भगीरथाचे पुत्र ज्या देशात निर्माण झाले, त्याच देशातल्या एका राज्यपालांना पावसासाठी प्रार्थना करण्याचा उपाय इ. स. १९९२ मध्येही का बरे सुचला असेल?

नव्या समाजरचनेच्या उभारणीत स्वतःच्या असलेल्या योगदानाचे पुरेपूर ज्ञान, भान असलेल्या माझ्यासारख्या एका तळमळीच्या शिक्षकाच्या मनाची जी उलघाल आपल्या आदेशाने झाली, ती आपल्यापर्यंत पोचवावी हाच ह्या पत्राचा एकमेव उद्देश आहे. आदेशाच्या दुसऱ्या

दिल्लीशी विद्यापीठांपासून पूर्वप्राथमिक शाळांपर्यंत आणि साऱ्याच शासकीय व निमशासकीय संस्थांत जे दृश्य दिसलं, त्यामुळे निदान मी तरी विज्ञानाधिष्ठित समाजरचनेच्या संदर्भात सचिंत झाले. आपल्या स्थानाविषयी व व्यक्तिगतरीत्या आपल्याविषयी संपूर्ण आदर बाळगूनही आपल्या आदेशाविषयीचे एक प्राथमिक शिक्षक म्हणून माझ्या मनात आलेले काही विचार या अनावृत्त पत्राद्वारे आपल्यापुढे सविनय मांडले आहेत.

आपली विनम्र

लीला पाटील



# आत्म्याचं शिक्षण महत्त्वाचं

**महारांची भाषा--**

सृजन-आनंद विद्यालयातला अगदी अलीकडचा एक अनुभव. 'आम्ही सारे भारतीय' हे गीत सुमित्राताई तिसरीच्या वर्गात शिकवत होत्या. भारतातील विविध वेष, भाषा यांच्याबद्दल त्या सांगत होत्या. इतक्यात भाषेचं एक उदाहरण म्हणून एका मुलानं 'महारांची भाषा', 'मुसलमानांची भाषा' असं सांगितलं. मुलानं असं का सांगितलं असेल? असे अनेक अनुभव आमच्या अंगावर सारखे आदळत असतात. माथेरानला सातवीचा सृजन-आनंद शिक्षणवर्ग होता. अगदी अनोळखी अशा चाळीस-पंचेचाळीस मुलांना शिकवायला सुरुवात करायची म्हणून एक खेळ घेतला. तीन मुलींना व तीन मुलांना पुढं बोलावलं व 'तुम्ही कोणतीही कृती करून दाखवा', असं म्हटलं. काय झालं असेल? मुलींनी पोळ्या लाटल्या. केर काढले, सडा घातला. मुलांनी बॅटिंग केलं, स्कूटर चालवली. सिगरेट ओढली. हे असं कशामुळं घडलं? कुणी शिकवलं त्यांना हे? सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणातून त्यांनी हे विचार, संस्कार आणि शिक्षण शोषून घेतलं आणि ते त्यांच्यात खोल रुजलं आहे. मुलं समाजात व कुटुंबात वावरताना अनेक विचार, तसंच संस्कार अंगीकृत करतात. प्रत्यक्ष शाळांत ते शिकवले जातातच असं नव्हे. या दोन दाखल्यांवरून शैक्षणिक पर्यावरणाचा विचार इतर अनेक प्रकारच्या पर्यावरणांशी निगडित राहूनच करावा लागेल हे लक्षात यावं. एकूण जीवनापासून फटकून शिक्षणाचा विचार करणंच शक्य नाही. शैक्षणिक पर्यावरणाचंही जाळं आहे.

**देशाच्या अंदाजपत्रकातून दिसणारं शिक्षण--**

शैक्षणिक पर्यावरणाचा विचार आणखी एका रीतीनं मांडता येईल.

आकडेवारीच्या साहाय्यानं. एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील शिक्षणासाठी होणारा खर्च आज ३.८ टक्के आहे. अनेक विकसित आणि काही विकसनशील देशांतसुद्धा हे प्रमाण ६ ते ९ टक्के आहे. विविध पंचवार्षिक योजनांत शिक्षणासाठी राखून ठेवला जाणारा खर्च कमी कमी होत आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेत एकूण खर्चाच्या फक्त ३.५ टक्के रक्कम शिक्षणासाठी निर्धारित होती. अंदाजपत्रकात शिक्षणाला दिला जाणारा हा अग्रक्रम बदलायला हवा, असं बरेच विचारवंत गेली कित्येक वर्षं सांगत आहेत. शिवाय शिक्षणावर जो खर्च होत आहे, त्याचा योग्य विनियोग कितपत होत आहे हे पाहायचं एक साधं साधन म्हणजे गळतीचं आणि अनुत्तीर्णतेचं प्रमाण. पहिली ते पाचवीमधील गळतीचं प्रमाण ४८ टक्के व पहिली ते आठवीमधील त्याबाबतचं प्रमाण ७५ टक्के आहे हे लक्षात घेतलं तर इसवी सन २००० पर्यंत 'सर्वासाठी शिक्षण' ही घोषणा कितपत वास्तवात उतरू शकेल, याबद्दल मन सांशक होतं. गेल्या कित्येक वर्षांत माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल ५३ टक्क्यांवर लागलेला नाही.

## नवनव्या शब्दांचे बुडबुडे--

गळतीचा आणि पर्यायानं अनुत्तीर्णतेचा मुकाबला करण्यासाठी राष्ट्रीय प्राथमिक शिक्षण अभियान सुरू करण्याबाबतची चर्चा ऐकिवात आहे. अनेक शब्दप्रयोग वातावरणात घुमत आहेत. ई. एफ. ए., एम. एल. एल., एल. सी. आय,. . . अक्षरांची टरफलं बाजूला करून पाहू लागलं की सर्वांसाठी शिक्षण म्हणजे ई. एफ. ए. किमान अध्ययनफल म्हणजे एम. एल. एल. असं समजतं. आकडेवारीनुसार असं मांडलं जातं की, जगातील निरक्षरांची संख्या ९५० दशलक्ष आहे. त्यापैकी ९१६ दशलक्ष निरक्षर विकसनशील देशांतले आहेत. त्यांपैकी ७५ टक्के निरक्षर नऊ देशांत आहेत. त्यांपैकी सर्वात जास्त लोकसंख्येचे देश म्हणजे चीन आणि भारत. त्यामुळेच 'सर्वांसाठी शिक्षण' ही जागतिक घोषणा भारत आणि चीन या देशांतील निरक्षरांचा निपटारा केल्याशिवाय साध्य होणं अवघड आहे. त्यासाठीच एल. सी. आय. म्हणजेच लार्ज कंट्री इनिशिएटिव्ह हा नवा पवित्रा घेतला गेला आहे. यापूर्वीही अशा



योजनांच्या शब्दांचे अनेक बुडबुडे उठले नव्हते, असं नाही. शैक्षणिक क्षेत्रात 'डायट'चा अर्थ डिस्ट्रिक्ट इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन अँड ट्रेनिंग असा आहे. नुसते शब्दांचे बुडबुडे! कोल्हापूर जिल्ह्यातील संस्था कोल्हापुरातच आहे. दोन वर्षांपूर्वीच काही लाख रुपये या संस्थेवर खर्च झाले म्हणजे ती अस्तित्वात आली असं मानायचं.

## मीठपण हरवलेलं शिक्षण--

विद्यार्थ्यांचे प्रवेश, शिक्षकांच्या नेमणुका, उत्तरपत्रिकांची तपासणी या व यांसारख्या बाबींकडे पाहिलं की, आजच्या शैक्षणिक पर्यावरणाचं स्वरूप मीठपण हरवलेल्या मिठासारखं वाटतं. शैक्षणिक पर्यावरण 'विद्येसाठी' निरामय व आरोग्यवर्धक बनवायचं असेल, तर आपल्याला अनेकांचे हात हाती घेऊन काम करावं लागेल. विधायक बदल घडवू पाहणाऱ्यांचंही एक जाळं तयार करावं लागेल. समाज, शासन, पालक, शिक्षक, विद्यार्थी, संस्थाचालक, संस्थाप्रमुख या घटकांप्रमाणंच वृत्तपत्रं, आकाशवाणी, दूरचित्रवाणी अशा प्रसारमाध्यमांनीही शिक्षणसंस्थांच्या आणि शिक्षणविषयक योजनांच्या आकडेवारीनं तृप्तीची ढेकर न देता आवश्यक ते बदल करण्यासाठी प्रखर इच्छाशक्तीनं पावलं उचलायला हवीत.

## यांच्यापासून 'शिक्षणा'ला वाचवा--

ते बदल करण्यापूर्वी कोणकोणत्या बाबींपासून शिक्षणाचं संरक्षण करायचं, ते ठरवावं लागेल. अशा काही महत्त्वपूर्ण बाबींची नोंद केली पाहिजे. शिक्षणाला बाधक ठरणाऱ्या गोष्टी अशा-- १) देशाचा सामाजिक व आर्थिक विकास आणि प्राथमिक शिक्षणाचा विकास यांचा अन्योन्य संबंध दुर्लक्षित राहणं. २) शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर गुणवत्तेच्या विकासाकडं होणारी डोळेझाक. ३) गळती व नापासीच्या भस्मासुराचं थैमान. ४) दुर्लक्षित असलेलं मुलींचं शिक्षण. ५) सगळीकडे बोकाळलेलं इंग्रजी माध्यमाचं वर्चस्व. ६) परीक्षांमुळे होणारी 'शिक्षणा'ची गळचेपी. ७) एकूण व्यवहारात परीक्षांतील यशाला असणारं अप्रतिहत महत्त्व आणि त्यामुळे होणारे दुष्परिणाम. ८) राजकारणी मंडळींचा

शिक्षणात होणारा हस्तक्षेप. ९) खालावत चाललेलं शिक्षण हतबलतेनं बघत राहण्याची पालकांची, समाजाची मनोवृत्ती. १०) चंगळवादी संस्कृतीला बळी पडलेल्या शिक्षकवर्गाचं स्वतःच्या व्यावसायिक कर्तव्यांकडे होणारे दुर्लक्ष. ११) या सर्व पर्यावरणात प्रवाहपतित होणारे विद्यार्थी. या अकरा समस्यांबाबत अनेक विचारवंतांनी अनेकदा लिहिलेलं आहे आणि शिवाय यांपैकी कोणत्याही एखाद्या समस्येची सांगोपांग चर्चा करायची म्हटलं, तर त्याचा खूपच विस्तार होईल. म्हणून आपण राष्ट्रीयदृष्ट्या सर्वाधिक महत्त्वाच्या असणाऱ्या प्राथमिक शिक्षणाच्या पर्यावरणातलं प्रदूषण कसं रोखता येईल याचा थोडक्यात विचार करू.

प्राथमिक म्हणजे ज्ञानभांडाराकडे जाण्याचा दरवाजा खुला होणं, सामुदायिक जीवनातलं स्वतःचं स्थान समजणं, एकाग्रतेनं एखादी गोष्टी समजून घ्यायला शिकणं आणि पद्धतशीरपणे काम करण्याची दीक्षा घेणं. त्यासाठी-- १) फक्त शिक्षकानंच सर्व शिकवायचं असतं ही समजूत, २) शिकवल्याशिवाय मुलं शिकू शकत नाहीत हा विचार, ३) शिक्षकानं जे शिकवलं ते जसंच्या तसं लक्षात ठेवणं म्हणजे शिक्षण, ४) विद्यार्थ्यानं शिक्षकाच्या सर्व आज्ञा व आदेश बिनतक्रार व तत्परतेनं पाळले पाहिजेत हा दंडक, ५) शिकताना विद्यार्थ्यानं अनावश्यक हालचाली किंवा आवाज करता कामा नये ही अपेक्षा, ६) परीक्षेत जो जास्त गुण मिळवतो तोच हुशार ही धारणा, ७) शिक्षकानं विचारलेल्या प्रश्नांना उत्तरं देणं किंवा लिहिणं म्हणजे शिक्षण हे गृहीतक, ८) शिक्षकानं बोललेलं ऐकणं, ते लिहून घेणं आणि ते लक्षात ठेवणं या व्यतिरिक्तच्या विचार, निरीक्षण, शोधून चर्चा यांसारख्या प्रक्रिया विद्यार्थ्याला अनावश्यक असं मानणं, ९) क्रमिक पुस्तकं म्हणजेच शिकण्याचं एकमेव साधन-सर्वस्व हा विचार. ही सारी गृहीतकं बदलली पाहिजेत. तरच अध्ययन-अध्यापनाला नवी आवश्यक दिशा लाभेल.

### आत्म्याचं शिक्षण हवं--

हे बदल होण्यासाठी प्रथमावश्यक गोष्ट म्हणजे शिक्षकांच्या व पालकांच्या शैक्षणिक दृष्टिकोनात बदल होणं. क्रमिक पुस्तकं पढवणं म्हणजे शिकवणं नसून मुलांच्या विविध अध्ययनक्षमता जागृत करणं,



चेतवणं आणि विकसित करणं म्हणजे शिकवणं असा दृष्टिकोन शिक्षकांत व पालकांत रुजला पाहिजे. मूल स्वतःला शिकवू शकतं, इतर वर्गमित्रांपासून ते शिकतं आणि पालकांचाही मुलाच्या शिकण्यात महत्त्वाचा सहभाग असतो. यासाठी काही प्रात्यक्षिकांचंही आयोजन करावं लागेल. तत्त्वांच्या पोपटपंचीपेक्षा त्यांची वास्तवात अर्थपूर्ण कार्यवाही अपेक्षित असेल तर शिक्षकांच्या सेवापूर्व व सेवांतर्गत शिक्षणाच्या पद्धतीही बदलाव्या लागतील.

यशिवाय 'तोतोचान', 'दिवास्वप्न', 'मूल नावाचं एक कोडं', 'आपली मुलं', 'ऐलमा पैलमा शिक्षणदेवा', 'शिक्षणातील ओॲसिस', 'शिक्षण देता-घेता' यांसारख्या मराठीत उपलब्ध असणाऱ्या पुस्तकांचं वाचन, त्यावर चर्चा, त्यातील कमीतकमी बाबींची ठराविक मुदतीत शक्य ती कार्यवाही आणि त्या कार्यवाहीचं सूज्ञतेनं तसंच सहानुभूतीपूर्ण पर्यवेक्षण यांसारखे उपक्रम निश्चितच लाभदायक ठरतील. एखादा विषयांश समजून घेण्याच्या अनेक पद्धती असू शकतात. शिक्षकाला दिसलेल्या अर्थापेक्षा वेगळा किंवा अधिक अर्थ त्यात असू शकतो. या विचारांचा स्वीकार करताना प्रथम धक्का लागतो तो शिक्षकाच्या एकाधिकारशाहीला. परंतु 'पार्टिसिपेटरी लर्निंग'वर विश्वास निर्माण झाला की, सहकारी शिक्षक, पर्यवेक्षक, पालक, एवढंच नव्हे, तर शिकणाऱ्या मुलांकडूनही शिक्षक शिकत राहतात.

जोपर्यंत स्मरणाधिष्ठित परीक्षा आहेत, तोपर्यंत कदाचित केवळ क्रमिक पुस्तकातील प्रश्नोत्तरांना किंवा माहितीला महत्त्व राहू शकेल. स्वातंत्र्यपूर्व काळातही अनेक आयोगांनी आपल्या अहवालात परीक्षा पद्धत बदलण्याची जी नितांत गरज पुनःपुन्हा मांडली आहे त्याबद्दल चर्चा न करता इथं एवढंच सुचवावंसं वाटतं की, आधीच आपण या बाबतीत खूप दिरंगाई केलेली आहे. आता पुन्हा आयोगांची नेमणूक, त्यांच्या अहवालांची प्रतीक्षा आणि नंतर त्या अहवालांतील प्रमुख शिफारसींची कार्यवाही करण्याची टाळाटाळ अशा चक्राच्या फेऱ्यांत न अडकता परीक्षापद्धतीत योग्य ते बदल केले तर अध्यापनपद्धतीचा तोंडवळा बदलण्यास निश्चितच मदत होईल. तसंच विविध व्यवसायांच्या वाटा खुल्या होण्याचा परवलीचा एकमेव शब्द म्हणजे विद्यार्थ्यांने 'परीक्षेत

मिळवलेल्या गुणांचा उच्चार'. हे चित्र बदलण्यासाठीही समाजानं व पालकांनी धाडसानं नव्या वाटा चोखाळल्या पाहिजेत.

शिक्षणसंस्थांच्या गुणवत्तेचा विचार तेथील सामान-सुमानाच्या गुणवत्तेच्या निकषावर तोलण्याची वजनमापंही बदलायला हवीत. शिक्षणाच्या गुणवत्तेचा विचार करताना शिक्षणातून सामाजिक कर्तव्याच्या दृष्टीनं मानवी मनांची घडण होणं अधिक महत्त्वाचं मानावं लागेल. शैक्षणिक गुणवत्तेची देखरेख सरकारनं करावी हा आजपर्यंत रूढ असलेला विचार बदलावा लागेल. जनतेच्या देखरेखीची नवी प्रथा सुरू करावी लागेल.

आजच्या काळवंडलेल्या शैक्षणिक पर्यावरणाला भेदून काही ध्येयवादी मंडळी प्रवाहाविरुद्ध पोहण्याच्या प्रयत्नांत आहेत. शिक्षणाच्या संख्यात्मक पसाऱ्याचा विचार केला तर त्यांचे प्रयत्न नगण्य आहेत; परंतु महत्त्वपूर्ण आहेत.

शिक्षण म्हणजे एकाच्या खांद्यावरचे माहितीचे ढिगारे दुसऱ्यांच्या खांद्यावर चढवणं नव्हे. माहितीच्या आधारे समोर जे वास्तव उभं आहे ते समजून, पारखून त्यातील चांगलं जोपासण्याची आणि अमंगल हटवण्याची आपलीही कर्तव्यं आहेत असं मानण्यासाठी जे सिद्ध करतं, ते शिक्षण, ती विद्या. ऐश्वर्याच्या शिखरावर विराजमान झालेल्या देशांच्याही आज हे लक्षात आलं आहे. त्यामुळेच अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी त्यांच्या पहिल्या भाषणात म्हटलं, 'Deeper successes are not made of gold and silk, but of better hearts and finer souls.' आत्म्याचं शिक्षण हेच शिक्षणाचं सर्वांत महत्त्वाचं ध्येय आहे, असं मानून आपण वाटचाल करू लागलो, तर आजचं प्रदूषित शैक्षणिक पर्यावरण दूर होऊ शकेल.